निबंध
२८०५

# चिवारींची फुल

प्रभाकर पाध्ये

REFBK-0022379
REFBK-0022379

27 AUG 1986

२२३८९
१९।१०।८
संदर्भ
निवडा
२८०५

# चिवारीची फुले

विश्वमोहिनी पुस्तक ४२

# चिवारीची फुले

प्रभाकर पाध्ये

प्रस्तावना

वि. वा. शिरवाडकर

REFBK-0022379

REFBK-0022379

आता अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमस्कारिलि मियां ।।

प्रकाशक :

आनंद अनंत अंतरकर
विश्वमोहिनी,
६२/१२ कर्वे रोड,
पुणे ४११००४.

मुद्रक :

आ. अ. अंतरकर
हंस प्रिंटिंग प्रेस,
४७४/१, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

© प्रभाकर पाध्ये

वेष्टण : सुभाष अवचट

प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट, १९७८

मूल्य : १८ रुपये.

अनुराधा औरंगाबादकर
अरुणा अंतरकर
हेमा अंतरकर
भारती जोशी
रोहिणी पटवर्धन
प्रतिभा पोरे
— यांस

For the simple joy of evening skies —

२२३८९ निबंध २८०७

# प्रस्तावना

वाङ्मयीन आणि राजकीय मीमांसेच्या प्रांतात प्रकांडपंडित म्हणून गाजणारे प्रभाकर पाध्ये हे अव्वल दर्जाचे ललितलेखकही आहेत. सौंदर्यशास्त्रातील नवीनवी प्रमेये बांधणारे पाध्ये प्रत्यक्ष सौंदर्याच्या समोर आले की शास्त्रज्ञ ही पदवी विसंगत वाटावी इतके बेभान होतात. मग ते सौंदर्य एखाद्या दृश्याचे असो, एखाद्या स्वराचे असो वा एखाद्या विचाराचे असो किंबहुना बेभानपणा हा पाध्यांच्या व्यक्तित्वाचा अविभाज्य भाग आहे. आमच्या वर्तुळातील एक मित्र नेहेमी म्हणतात, 'पाध्ये हे नुसते पाध्ये नाहीत, ते पराकोटीचे पाध्ये आहेत.'

आणि हे अगदी खरे आहे. न. चिं. केळकरांचा प्रख्यात सुवर्णमध्य पाध्यांना कोणत्याही बाबतीत आणि कोणत्याही प्रसंगी साफ नामंजूर आहे. (केळकरही याच कारणासाठी त्यांना नामंजूर असावेत.) सुवर्णमध्य म्हणजे सोनेरी असली तरी तडजोड. जे पटते ते अंशत: नाकारून जे पटत नाही त्याचा अंशत: तरी स्वीकार करणे. हे पाध्यांना जमत नाही आणि कधीही जमणार नाही त्यांच्याशी असलेला माझा स्नेहसंबंध आज निदान तीन तपांचा आहे. साठीच्या दक्षिण-दरवाज्यातून आम्ही केव्हाच बाहेर पडलो आहोत. नदीत घातलेली घागर भरायला आली की शांत होते, अशब्द होते. त्याप्रमाणे माणूस पांढऱ्या केसांच्या प्रदेशात आला की सौम्य आणि शीतल (कित्येकदा कोमटही) होतो असे म्हणतात. पाध्यांच्या बाबतीत असे काही घडलेले नाही. ४०।४२ सालामध्ये ते जसे आणि जितके उसळत असत, तितकेच आजही उसळतात; तेव्हाइतकेच आजही भाववश होतात; तेव्हाइतकेच आजही सर्वस्व पणाला लावून

वादाला सिद्ध होतात. या त्यांच्या वृत्तीमुळेच पाध्यांच्या भोवती गैरसमजांचे कुंपण उभे राहिले होते. आजही कमलबागेत ते कमी-अधिक प्रमाणात नसेलच असे नाही.

मी 'धनुर्धारी'त पाध्यांचा सहसंपादक म्हणून प्रवेश केला तेव्हा माझ्या कित्येक मित्रांचे चेहेरे चिंताक्रांत झाले होते. अनेक इशारे मला मिळाले : 'आत जात आहात ते बाहेर पडण्याच्या तयारीने जा. पाध्ये हे अतिशय भांडणप्रचुर गृहस्थ आहेत. गवताच्या गंजी-सारखे सहजासहजी पेटून उठणारे. कोणाशी न पटणे हा त्यांचा स्थायीभाव; पटणे हा अपवाद.'

सुदैवाने या अपवादाचा मी धनी झालो इतकेच नव्हे, तर त्यांच्यासंबंधीच्या या आख्यायिका किती बनावट आणि अतिशयोक्त आहेत याचा मला पुढील चार वर्षांत प्रत्यय आला. पाध्ये भांडण-प्रचुर जरूर आहेत; पण ते फक्त मतांच्या, बौद्धिक आग्रहांच्या आणि मनात रुजलेल्या काही निष्ठांच्या बाबतीत. ही सरहद्द ओलांडली की ते शाळेत नव्याने दाखल झालेल्या मुलासारखे प्रेमाचा शोध घेणारे आणि सारे काही समजून घेण्याच्या मनःस्थितीत असतात. आणि येथेही ते पराकोटीचेच असतात. राजकीय वादात कापरासारखा भडकणारा हा माणूस मित्रांच्या संबंधात किती हळवा आहे, त्यांच्या सुखदुःखांच्या बाबतीत किती संवेदनशील आहे याचा अनुभव माझ्या-प्रमाणे अनेकांनी घेतलेला असेल.

असे व्यक्तित्व असलेले पाध्ये जेव्हा एखाद्या अनुभवातून आर-पार जातात तेव्हा वादळी पावसात भिजलेल्या रेनकोटाप्रमाणे त्यांच्या संज्ञेवरून तो अनुभव चहूकडून निथळत असतो. पाध्ये एखाद्या विषयाकडे जातात अथवा शोधाशोध करून त्याची निवड करतात असे खरोखर दिसतच नाही. असे वाटते की तो विषयच एखाद्या पाणलोटासारखा त्यांच्याकडे धावत, गर्जत येतो आणि त्यांच्या लेखणीचा कबजा घेऊन आपल्या भावरूपाची नानाविध विलसिते तिच्या द्वारा आपल्यासमोर प्रकट करतो. मुक्तपणाने, कित्येकदा स्वैरपणानेही.

ललितनिबंध हा वाङमयप्रकार तसा मराठीतदेखील खूप जुना आणि शि. म. परांजप्यांसारख्या लेखकांनी संपन्न केलेला आहे. मध्यंतरी त्याचा विशाल प्रवाह लघुनिबंधाच्या मर्यादित आणि चिरेबंद कुंडात अडकून पडला होता. आता लघुनिबंध हा प्रकार जवळजवळ अस्तंगत झाला असून ललित निबंध पुन्हा आपल्या सिंहासनावर अधिष्ठित झाला आहे ललित निबंधाचे पुनर्वसन करण्याच्या कार्यातील पाध्यांचा श्रेयभाग नक्कीच महत्त्वाचा आहे.

ललितनिबंधाचे वैशिष्टच आणि सामर्थ्य हे की तो कोणत्याही अंगाने फुलू शकतो. काव्याच्या, उपरोधाच्या अथवा प्रांजळ आत्म-कथनाच्याही. पाध्यांचे निबंधलेखन बहुतांशी काव्याच्या अंगाने फुलले आहे. या संग्रहातील अनेक लेख म्हणजे केवळ गद्यकाव्येच आहेत — वृत्तयमकांच्या बंधनातून मुक्त झालेली. पाध्यांच्या कानांचे गाण्याशी सख्य असले तरी गळयाचे नाही. त्यामुळेच कदाचित त्यांच्या शालेय वयात — जेव्हा कविता प्रायः गेयच असे — ते काव्यापासून म्हणजे त्याच्या वृत्तयमकादी तंत्रापासून दूर राहिले असावेत. पण प्रौढ वयात ललितनिबंधासारखा सर्वानुकूल वाङ्मय-प्रकार हस्तगत होताच त्यांच्यातील काव्यात्मता अनिवार आवेगाने प्रकट झाली आहे.

इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा काव्य हे लेखकाच्या व्यक्तित्वाशी अधिक प्रमाणात बांधलेले असते. सूर्यास्ताच्या वेळी अस्तंगत सूर्याचा प्रकाश सर्वच आकाशात कमीअधिक प्रमाणात पडलेला असतो. परंतु ज्या ठिकाणी सूर्य प्रत्यक्ष मावळलेला असतो तेथे तो सोनेरी प्रकाश अधिक गडद आणि प्रकट असतो. त्याचप्रमाणं सर्वच साहित्यात लेखकाचे व्यक्तित्व कमीअधिक प्रमाणात व्यक्त होत असले तरी काव्यात ते सर्वात अधिक गडदपणे आणि प्रांजळ स्वरूपात व्यक्त होते. दुसरे असे की, आता येणारा अनुभव अगोदर आलेल्या अनु-भवाच्या साहाय्याने सांगणे हेही काव्याचेच एक खास वैशिष्टच. काव्यात्मतेची ही दोन्ही अंगे पाध्यांच्या या लेखनात उदंड प्रमाणात आढळून येतात.

आपल्या अंतरंगात घुसलेला विषय कोणत्या पद्धतीने पाध्ये वाचकांसमोर उभा करतात याचे प्रत्यंतर या संग्रहातील ' कोयलिया ना बोले ' या त्यांच्या एका प्रातिनिधिक लेखावरून लक्षात येण्यासारखे आहे. लेख आहे संगीतासंबंधी, म्हणजे किशोरी आमोणकरांच्या गायनासंबंधी. गायनासंबंधीचे अनेक लेख आपण वाचतो. स्वररचनेच्या संदर्भात त्याचे परीक्षण वा रसग्रहण करणारे. हा लेख त्या प्रकारातील नाही. येथें लेखकाची भूमिका जाणकार परीक्षकाची नाही, तर केवळ स्वानंदमग्न रसिकाची आहे. एखाद्या जलाशयात कोणी उंचावरून सूरउडी मारावी आणि त्या पाण्याच्या अंतरंगात लुप्त होऊन जावे त्याप्रमाणे लेखक त्या गायनाच्या रसानंदात पुर्णत: बुडालेला, विसर्जन पावलेला आहे. त्यामुळेच की काय, लेखाचा प्रारंभ, ' किशोरीबाई गायला बसल्या, तानपुरे झंकारू लागले' अशा वर्णनाने त्यांनी केलेला नाही. मनाची इतकी समधातता तेथे शिल्लकच राहिलेली नाही. कारंज्याच्या अनेक धारांनी चावी फिरताच हवेत अकस्मात झेप घ्यावी त्याप्रमाणे त्यांच्या मनातील त्या अनुभवाची बेहोषी, पूर्वी आलेल्या काही समान अनुभवांच्या स्मृतीत प्रकट होऊ लागते. जें घडते आहे त्याचे वर्णन जे पूर्वी केव्हातरी घडले आहे त्याच्या साहाय्यानेच करता येते. परिचिताच्या मदतीने अपरिचितापर्यंत पोचण्याचा हा प्रयत्न. आणि हा प्रयत्नदेखील सहेतुक वा तांत्रिक स्वरूपाचा आहे असे नाही. त्या स्वरोत्सवातून उसळणारा आनंद इतका अपार्थिव आणि दुर्मिळ आहे, की त्याचे नामांकन लेखक आपल्या मनाशीही करू शकत नाही. त्यासाठी तो वर्तमानातून भतकालात प्रवेश करतो.

' जें वाटले ते शब्दांत पकडण्यासारखे नाही ' असे पाध्यांनी सुरुघातीला म्हटले असले तरी त्यांच्यासारखा शब्दांचा स्वामी हे आव्हान अव्हेरणे अशक्यच होते. अर्थात हा सवाल नुसत्या शब्दांचा नसतो. आगापिछा नसलेले कोरडे शब्द फक्त कोशातच पाहण्याति[illegible]खें असतात. शब्द सुंदर होतात ते संदर्भात. पाध्यांच्या प्रखर स्वैरपणान[illegible] न्हाऊन आलेल्या शब्दांना रंगनादाची आभरणे प्राप्त

होतात, आणि त्यांना त्यांची स्वतःची अशी एक गतीही येते. शब्दांच्या या रंगीबेरंगी रूपाने आणि आवेगाने स्वतः लेखकही लुब्ध होऊन जातो आणि शब्दांची आणि उपमाउत्प्रेक्षांची उधळण करू लागतो. कित्येकदा वाचक कासावीस व्हावा इतकी ही उधळण धुवांधार होत जाते. दागिन्यांच्या अवडंबरात बाईच दिसेनाशी व्हावी त्याप्रमाणे आशय अंधुक होतो आणि अलंकरणाला प्राधान्य येते. पण या सर्वातून लेखकाची शब्दरती आणि प्रतिमाप्रेमच प्रकट होते असे नाही. त्याची अस्वस्थताही यातून व्यक्त होते असे मला वाटते. जे गवसत नाही ते शोधण्याचा, हातामध्ये आणण्याचा हा निकराचा प्रयत्न असतो.' आत्मक्रीडा ', ' आत्मविहार ' किंवा ' फुलली ', ' खुलली ' अशा बाह्यतः समानार्थी शब्दांतील भिन्न अर्थाच्या सूक्ष्म छटांतून ते पकडता येते का हे लेखक पहात असतो. आणि ते त्याला गवसले आहे असे आपल्याला वाटते, जेव्हा लेखक द ला मेअरच्या ' द लिसनर्स '—' प्रवासी '— या नितांतमधुर काव्यापाशी येऊन ठेपतो आणि त्यात प्रवेश करतो, तेव्हा.

सुंदर गायनातून सुंदर काव्यात झालेला हा पदन्यास अतिशय मनोज्ञ आहे. गाण्यातले आणि काव्यातले नाते अस्पष्ट आहे; पण तेच एक खरे आहे असे आपल्याला जाणवते. हा सर्वच काव्याशय पाध्यांनी फार मुलायम शब्दांत व्यक्त केला असून त्यातील गूढरम्य सूर अचूक टिपलेला आहे. पाध्यांच्या प्रत्यक्ष कवित्वाची साक्ष देणारे एक छोटे मुक्तकाव्य — चंद्राचे सांगणे — त्या ' प्रवासी 'नंतर लगेच येते. ते चंद्राचेच नव्हे, तर किशोरीच्या गाण्याचे किंबहुना कोणत्याही सुंदर कलाकृतीचे सांगणे असते असे म्हणायला हरकत नाही :

' माझे गूढ विरले नाही, विरणार नाही
माझे रहस्य संपले नाही, संपणार नाही
... मी तुझ्या मनाचीच हाक आहे
तुझ्या संज्ञेचीच साक्ष आहे
मी आहे कारण तू आहेस
तू आहेस म्हणून मी आहे ...

'कोयलिया'प्रमाणे आणखी पाचसहा लेख या संग्रहात आहेत, जे असेच काव्यात्मतेने निथळणारे, शब्दांच्या शृंगाराने नटलेले आणि विविध अर्थालंकारांनी मोहरलेले आहेत : ' झाडे ', ' आकाशदर्शन ', ' डोंगरावरून ', ' सागरदर्शन '. निसर्ग हे पाध्यांच्या सौंदर्यानुभवाचे आद्य केंद्र आहे हे या सर्व लेखांवरून आपल्या लक्षात येते. येथे सहज आठवण होते ती बालकवी आणि शि. म. परांजपे यांची. तेही निसर्गोपासक. निसर्गसौंदर्याच्या अनुभूतीत स्वतःला झोकून देणारे किंवा त्याचा आशय शोधणारे. बालकवी हे निसर्गाच्या कोमलतेत, प्रणयसदृश विलासात रमणारे; तर परांजपे त्यातील भव्यता आणि उग्रताच विशेष लक्षात घेणारे. पाध्यांची अनुभूती अशी एकसुरी नाही. अमावास्येचा अशेष काळोख पिऊन बसलेला भूमध्य समुद्र अथवा कडकलक्ष्मीप्रमाणे तडितांचे फटकारे स्वतःला मारून घेणारे आकाश त्यांना जितके मोहित करते, तितकेच ओल्या जमिनीवर फुलांचा सडा घालणारे पारिजातकाचे झाडही करते. कोमल, कठोर, सीमित आणि असीम — सारीच दृश्ये त्यांना मुग्ध किंबहुना बेहोष करतात; आणि कित्येकदा केवलानंदाच्या, तर कित्येकदा मूलग्राही चिंतनाच्या कोशामध्ये घेऊन जातात.

सुदैवाने पाध्यांना पृथ्वीच्या पाठीवरील सृष्टिसौंदर्याची अनेक निधाने डोळ्यांनी पाहायला मिळाली. जे नजरेने पाहिले ते त्यांच्या अंतःकरणाने टिपले. कोकणातील काजळीपासून प्रशांत महासागरापर्यंत, चतुःशृंगीपासून आल्प्स्पर्यंत, लांज्यापासून हाँगकाँगपर्यंत — शेकडो दृश्यांचा चित्रपट त्यांच्या स्मृतीत सतत जागृत असतो. संदर्भाची संधी मिळताच ही चित्रे आपल्या रूपरंगासह भराभर स्मरणातून खाली उतरतात आणि त्या लेखनाला मराठी साहित्यात दुर्मिळ असा एक व्यापक, जागतिक पार्श्वपट देतात. असे असले तरी पाध्यांचे सर्वाधिक प्रेम कोकणावरच आहे. किंबहुना त्यांच्या लेखनातील आणि भावविश्वातील कोकण हे एक अदम्य पात्र आहे. अपेक्षित ठिकाणी तर ते येतेच; पण अनपेक्षित ठिकाणीही अकस्मात स्वैरपणाने जगाची मुशाफरी करून आलेल्या पाध्यांच्या मनातून

कोकण कधीच मावळलेले नाही. पाध्यांचे बालपण कोकणात गेलेले आहे. तेथील शेतमळ्यात, माडपोफळींच्या परसात, डोंगरदऱ्यांत आणि देवदेवस्कीने भारलेल्या वातावरणामध्ये. लहान वयात नवख्या नजरेसमोर उलगडणाऱ्या सर्व विशेष दृश्यांचे आणि घटनांचे विशालीकरण होते आणि अपूर्वाईचे गहिरे रंग त्यात विगले जातात. म्हणून मला वाटते, साधारणत: सारेच लेखक-कवी आपल्या बालपणात गुंतलेले असतात. पाध्यांसारखी पराकोटीची माणसे तर पराकोटीनेच.

संग्रहातील इतर निबंधांतील, खानोलकरांवरील एक वाङ्मयीन आणि नेहरूंवरील व्यक्तिदर्शनात्मक स्वरूपाचा निबंध सोडले तर, बाकीचे — ‘ तुला इथं स्थान नाही ’, ‘ क्रिकेटची ध्यानधारणा ’, ‘ वुई आर ऑन अ हनिमून ’, ‘ वाढदिवस ’, ‘ स्वप्नयात्रा ’, ‘ आमचा जॉय ’, ‘ घुंगुरघंटांचा स्वरमेळ ’— यांसारखे लेख आत्मवृत्तात्मक आहेत. तसे पाहिले तर सर्वच ललित निबंध आत्मवृत्तात्मक असतात असे म्हणायला हवे. ‘ मी अमुक ठिकाणी जन्मलो ’ हे सांगणे जितके आत्मवृत्तात्मक, तितकेच ‘ मला शेवंतीचे फूल आवडते ’ हे सांगणेही. विविध झाडांशी, डोंगरांशी जडलेले आपले भावसंबंध पाध्ये जेव्हा सांगतात तेव्हा तेही आत्मवृत्तच असते. किंबहुना खऱ्या अर्थाने तेच आत्मवृत्त असते. पण लौकिक, प्रचलित अर्थाने ज्याला आपण आत्मवृत्त म्हणतो त्याच्या जवळपास येतील असे हे वर निर्देशिलेले निबंध आहेत. मदिरेच्या पेल्यामध्ये बर्फाप्रमाणे विरघळून जाणारे दोस्त, अथेन्समधील मद्योत्सवातील स्वानुभव, काकांबरोबर केलेले बैलगाडीचे प्रवास, ही सारीच प्रकरणे मनोवेधक आहेत.

पाध्यांची स्वप्नयात्रा हीही खास पाध्यांचीच. चित्पावनी चेहेऱ्याची स्त्री, शेलाटच्या अंगाची बहीण नसलेली बहीण, रिकामी दालने, रस्त्यावरील दंगल, येथपर्यंत आपण त्यांच्याबरोबर जाऊ शकू. अशा प्रकारची स्वप्ने आपल्यालाही पडू शकतील. पण पाध्यांच्या स्वप्नात जेव्हा पु. ल. देशपांडे सपत्नीक येतात, रा. भा. पाटणकर येतात, म. गांधी, नेहरू, मुजिबुर रेहमान हे नेतेही येतात, तेव्हा ही

'कोयलिया'प्रमाणे आणखी पाचसहा लेख या संग्रहात आहेत, जे असेच काव्यात्मतेने निथळणारे, शब्दांच्या शृंगाराने नटलेले आणि विविध अर्थालंकारांनी मोहरलेले आहेत : 'झाडे', 'आकाशदर्शन', 'डोंगरावरून', 'सागरदर्शन'. निसर्ग हे पाध्यांच्या सौंदर्यानुभवाचे आद्य केंद्र आहे हे या सर्व लेखांवरून आपल्या लक्षात येते. येथे सहज आठवण होते ती बालकवी आणि शि. म. परांजपे यांची. तेही निसर्गोपासक. निसर्गसौंदर्याच्या अनुभूतीत स्वतःला झोकून देणारे किंवा त्याचा आशय शोधणारे. बालकवी हे निसर्गाच्या कोमलतेत, प्रणयसदृश विलासात रमणारे; तर परांजपे त्यातील भव्यता आणि उग्रताच विशेष लक्षात घेणारे. पाध्यांची अनुभूती अशी एकसुरी नाही. अमावास्येचा अशेष काळोख पिऊन बसलेला भूमध्य समुद्र अथवा कडकलक्ष्मीप्रमाणे तडितांचे फटकारे स्वतःला मारून घेणारे आकाश त्यांना जितके मोहित करते, तितकेच ओल्या जमिनीवर फुलांचा सडा घालणारे पारिजातकाचे झाडही करते. कोमल, कठोर, सीमित आणि असीम — सारीच दृश्ये त्यांना मुग्ध किंबहुना बेहोष करतात; आणि कित्येकदा केवलानंदाच्या, तर कित्येकदा मूलग्राही चिंतनाच्या कोशामध्ये घेऊन जातात.

सुदैवाने पाध्यांना पृथ्वीच्या पाठीवरील सृष्टिसौंदर्याची अनेक निधाने डोळ्यांनी पाहायला मिळाली. जे नजरेने पाहिले ते त्यांच्या अंतःकरणाने टिपले. कोकणातील काजळीपासून प्रशांत महासागरापर्यंत, चतुःशृंगीपासून आल्प्स्पर्यंत, लांज्यापासून हाँगकाँगपर्यंत — शेकडो दृश्यांचा चित्रपट त्यांच्या स्मृतीत सतत जागृत असतो. संदर्भाची संधी मिळताच ही चित्रे आपल्या रूपरंगासह भराभर स्मरणातून खाली उतरतात आणि त्या लेखनाला मराठी साहित्यात दुर्मिळ असा एक व्यापक, जागतिक पार्श्वपट देतात. असे असले तरी पाध्यांचे सर्वाधिक प्रेम कोकणावरच आहे. किंबहुना त्यांच्या लेखनातील आणि भावविश्वातील कोकण हे एक अदम्य पात्र आहे. अपेक्षित ठिकाणी तर ते येतेच; पण अनपेक्षित ठिकाणीही अकस्मात अवतरते. जगाची मुशाफरी करून आलेल्या पाध्यांच्या मनातून

कोकण कधीच मावळलेले नाही. पाध्यांचे बालपण कोकणात गेलेले आहे. तेथील शेतमळचात, माडपोफळींच्या परसात, डोंगरदऱ्यांत आणि देवदेवस्कीने भारलेल्या वातावरणामध्ये. लहान वयात नवख्या नजरेसमोर उलगडणाऱ्या सर्व विशेष दृश्यांचे आणि घटनांचे विशालीकरण होते आणि अपूर्वाईचे गहिरे रंग त्यात विगले जातात. म्हणून मला वाटते, साधारणतः सारेच लेखक–कवी आपल्या बालपणात गुंतलेले असतात. पाध्यांसारखी पराकोटीची माणसे तर पराकोटीनेच.

संग्रहातील इतर निबंधांतील, खानोलकरांवरील एक वाङमयीन आणि नेहरूंवरील व्यक्तिदर्शनात्मक स्वरूपाचा निबंध सोडले तर, बाकीचे — ' तुला इथं स्थान नाही ', ' क्रिकेटची ध्यानधारणा ', ' वुई आर ऑन अ हनिमून ', ' वाढदिवस ', ' स्वप्नयात्रा ', ' आमचा जॉय ', ' घुंगुरघंटांचा स्वरमेळ '— यांसारखे लेख आत्मवृत्तात्मक आहेत. तसे पाहिले तर सर्वच ललित निबंध आत्मवृत्तात्मक असतात असे म्हणायला हवे. ' मी अमुक ठिकाणी जन्मलो ' हे सांगणे जितके आत्मवृत्तात्मक, तितकेच ' मला शेवंतीचे फूल आवडते ' हे सांगणेही. विविध झाडांशी, डोंगरांशी जडलेले आपले भावसंबंध पाध्ये जेव्हा सांगतात तेव्हा तेही आत्मवृत्तच असते. किंबहुना खऱ्या अर्थाने तेच आत्मवृत्त असते. पण लौकिक, प्रचलित अर्थाने ज्याला आपण आत्मवृत्त म्हणतो त्याच्या जवळपास येतील असे हे वर निर्देशिलेले निबंध आहेत. मदिरेच्या पेल्यामध्ये बर्फाप्रमाणे विरघळून जाणारे दोस्त, अथेन्समधील मद्योत्सवातील स्वानुभव, काकांबरोबर केलेले बैलगाडीचे प्रवास, ही सारीच प्रकरणे मनोवेधक आहेत.

पाध्यांची स्वप्नयात्रा हीही खास पाध्यांचीच. चित्पावनी चेहेऱ्याची स्त्री, शेलाटचा अंगाची बहीण नसलेली बहीण, रिकामी दालने, रस्त्यावरील दंगल, येथपर्यंत आपण त्यांच्याबरोबर जाऊ शकू. अशा प्रकारची स्वप्ने आपल्यालाही पडू शकतील. पण पाध्यांच्या स्वप्नात जेव्हा पु. ल. देशपांडे सपत्नीक येतात, रा. भा. पाटणकर येतात, म. गांधी, नेहरू, मुजिबुर रेहमान हे नेतेही येतात, तेव्हा ही

## प्रभाकर पाध्ये
## यांची पुस्तके

**कथा :** व्याधाची चांदणी (१९४४); कृष्णकमळीची वेल (१९४५); अर्धवर्तुळे (१९४९); अंधारातील सावल्या (१९६५); निळे दिवस (निवडक कथा) (१९७६).

**कादंबरी :** मैत्रीण (१९६१).

**प्रवासवर्णन :** नवे जग, नवी क्षितिजे (१९५३); अगस्तीच्या अंगणात (१९५७); उडता गालिचा (१९५८); तोकोनोमा (१९६१); हिरवी उन्हं (१९६४)

**व्यक्तिचित्रे :** प्रकाशातील व्यक्ती (१९४१); तीन तपस्वी (१९४६); व्यक्तिवेध (१९७३).

**समीक्षा :** कादंबरीकार खानोलकर (१९७७); आस्वाद (१९७७); वामन मल्हार आणि विचारसौंदर्य (१९७८).

**सौंदर्यशास्त्र :** कलेची क्षितिजे (१९४२); मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा (१९७०); पाटणकरांची सौंदर्यमीमांसा (१९७७); सौंदर्यानुभव (छापत आहेत).

**वैचारिक :** आजकालचा महाराष्ट्र (सहकार्याने, १९३५); पाकिस्तान की पन्नास टक्के ? (१९४४); समाजवादाचा पुनर्जन्म (१९५२); युगोस्लाविया (इंग्रजी — १९५२).

# घुंगुरघंटांचा स्वरमेळ

मी जागा होतो. कानांत घुंगुरघंटांचं नर्तन निनादत असतं. घंटा आणि घुंगुर यांचा स्वरमेळ. लयदार. मधूनच लयाला दुडकी चाल. एकदम त्यात गाण्याचे सूर. नकोसे वाटतात. स्वरमेळाशी ते जुळत नाहीत. त्याच्या लयाला छेद देतात. मन खटकतं. स्वरमेळातून निसटतं. आजूबाजूला नजर टाकतं. मी ओटीवरच्या पथारीवर पडलेला असतो. भोवताली भिंती. मूळच्या लाल. आता काळोखात अधिकच काळ्या भासणाऱ्या. काळोख किरमिजी. बाहेर चांदणं. नजर बेड्याकडे जाणाऱ्या रस्त्याचा वेध घेते. रस्त्यावर चंद्रफुलांची नक्षी. झाडीतून आलेल्या चांदण्यानं तयार झालेली ती चंद्रफुलं. खुडावीशी वाटतात. पण ती बाहेर दूर. नजर त्यांना नुसताच स्पर्श करते. रेशमी स्पर्श. त्या स्पर्शानं सुखावते. रस्त्याच्या जमिनीवर मखमलीची लव वठलेली असते. नजर क्षणभर तिथं स्थिरावते आणि बेड्यातल्या झाडावर फिरते. झाडावर म्हणजे झाडाच्या अधूनमधून उजळलेल्या अंधाऱ्या विस्तारावर. त्या विस्तारात झाडाचं कांड आणि फांद्या दिसतात, आणि नाहीशा होतात. नजर त्यांना रेखण्याचा प्रयत्न करते. पण क्षणभरच. लगेच मन थरकतं. ते स्वप्न आठवतं. हरीकाका वारल्यानंतर चारदोन दिवसांत पडलेलं.

हरीकाका त्या झाडावर. एका आडव्या फांदीवर. नुसती एक आकृतीच. पांढुरक्या प्रकाशाची. डोळ्यांच्या ठिकाणी दोन नुसत्या लाल ठिणग्या. माझ्या दृष्टीचा ठाव घेणाऱ्या. आता ती आकृती मी शोधू

लागतो. उगीच. मिळत नाही. मन नुसतंच मुग्ध होतं. थरकतं. आणि तो घुंगुरघंटांचा नाद पुन्हा ऐकू येतो — मावळता, दूर दूर जाणारा.

आणि मग मन त्या, फार दूर नसलेल्या, रस्त्यावरच्या एका बैलगाडीत जातं. शेजारची आई, वडील, भावंडं झोपलेली. मी एकटाच जागा. नजर एकटक बाहेर लागलेली. गाडीच्या टपातून दिसणाऱ्या अर्धवर्तुळाकार जगाचा वेध घेणारी. ते जग. गाडीच्या दिव्यानं प्रकाशलेलं. गाडीच्या टपाबरोबर हलणारं. झाडाझुडपांचं. आकाशाचं, आकाशात उगवलेल्या चांदण्यांचं. गाडीचे गदगद गचके खाणारं. गाडी फिरेल तसं फिरणारं. तिच्याबरोबर पुढं जाणारं. मुख्य म्हणजे बैलांच्या गळ्यांतल्या घंटांच्या नादानं नादमधुर बनलेलं. लयदार बनलेलं. आणि आपलंच एकट्याचं, अलिप्त असं वाटणारं...

या बैलगाड्यांच्या प्रवासानं माझं बालपण गजबजलेलं होतं. आणि त्या प्रवासांच्या स्मृतींनी आजही ते अंकुरतं. टपोरं बनतं. जीवनातली माझी पहिली स्मृती, आईच्या अंगावर दूध पितापिता एकदम पदराखालून तोंड बाहेर काढून खुदकन हसण्याची आणि समोवार दुग्धतुषार उडवण्याची आहे. आणि दुसरी, रत्नागिरीला एका घराबाहेर सोडलेल्या गाडीत, मुंबईस जाण्याला सक्त नकार देणाऱ्या दिवसभराच्या मुक्कामाची आहे. मुंबईच्या वाटेवरचा हा रत्नागिरीचा मुक्काम. मला मुंबईला जायचं नव्हतं. गावालाच राह्यचं होतं. पण रात्रभर गाडीत बसायला मिळतं म्हणून वडिलांबरोबर रत्नागिरीला आलो, आणि आल्याबरोबर आल्या गाडीनं परत जाणार म्हणून हट्ट धरला. धाकदपटशा, मार वगैरे रीतसर उपाय झाले, पण जाम हटलो नाही. ज्यांच्याकडे उतरलो होतो त्यांच्याकडून साश्चर्य कौतुक झाल्यावर माझ्या हट्टाला स्फुरणच चढलं. गाडीतच जाऊन बसलो.

अखेरीस जेवणाच्या वेळी माझा जय झाला. गाडीनं आलो तसा परत जायला मोकळा झालो. गाडी माझ्या चुलत-चुलत्याची. म्हणजे काय घरचीच. या चुलत्याला आम्ही गाडीकाका म्हणू. गाडीकाकांना माझं कौतुक होतं. त्यांच्या गाडीत मी राजा असे. काकांना मधेच गाडीतून उतरून इतर

गाडीवानांबरोबर गप्पागोष्टी करीत चालत रहाण्याची फार हौस. मग माझं फावे. काकांचा तो गोंडेदार चाबूक त्यांच्या खांद्यावरून दूर जाई. पण बैलांच्या कासरा असत. त्यांचा चाबकासारखा होईल तितका उपयोग करणं, बैलांच्या शेपट्या पिरगाळणं, तोंडानं ' च्याक च्याक ' करून त्यांना स्फुरण चढवणं वगैरे गोष्टी मी करू शकत असे. यापैकी एकाही गोष्टीची त्यांना गरज नव्हती. ते शहाणे होते. सरावलेले होते. आणि विलक्षण तेज होते. बटऱ्या आणि बाळ्या—काकांची ही जोडी म्हणजे पंचक्रोशीतल्या तमाम गाडीवानांच्या डोळ्यांत सलणारी गोष्ट होती.

मी त्या बैलांना हाकी म्हणजे काय, तर त्यांच्या ऐटदार चालीकडे, पावलाबरोबर डोलणाऱ्या वशिंडांकडे, माशी बसल्याबरोबर थरारणाऱ्या अंगांकडे, आणि त्यांच्या अंगांवर देवाने रेखलेल्या रंगदार कशिद्यांकडे पहात बसे. पहात बसे आणि त्यांच्या हालचालीत माझी नजर हरवे. काकांच्या या बैलजोडीचा त्यांच्याइतकाच मलाही अभिमान. शाळेतून येतांना या बैलांना डोळे भरून पहाण्यासाठी मी मुद्दाम काकांच्या घरावरून येई, आणि ज्या दिवशी गाडी भाड्याला गेलेली असे त्या दिवशी चुकल्याचुकल्यासारखं वाटे.

पुन्हा घंटाघुंगुरांचा तो लयदार नाद. पुन्हा तो स्वरमेळ. तंद्रीतलं मन तजेलतं. आंदोळतं. बैलगाडीच्या आठवणीवर रेंगाळू लागतं ...

गावातल्या उन्हाळ्याच्या मुक्कामाचा तो शेवटचा दिवस उगवला की मन कष्टी व्हायचं, जड व्हायचं. तो दिवस वैऱ्यासारखा वाटायचा. पण एक दिलासा असायचा — रत्नागिरीपावतचा २८ मैलांचा प्रवास बैल-गाडीनं — आणि तोसुद्धा काकांच्या.

तो प्रवास म्हणजे एक अप्रूप. संध्याकाळी पाचच्या सुमारास गाडी घरून निघायची. मैलभर आल्यावर एका समाधीसमोर उभी राह्यची. वडील आणि काका तोवर चालत यायचे. गाडी उभी राहिली की कुंकवाचा करंडा घेऊन आई उतरायची. समाधीला ती हळदकुंकू वाहायची, आणि वडील समाधीसमोरच्या शिळेवर नारळ फोडायचे. खोबऱ्याच्या फोडी चारी दिशांना फेकायचे, आणि उरलेलं खोबरं आम्हाला मिळायचं. ते खोबरं तोंडात विरघळत असतानाच गाडी सुरू व्हायची, आणि त्या समाधीची कथा

आठवायची. ही समाधी आमच्याच घराण्यातल्या एका साध्वीची. ओढ्या-काठच्या पिंपळाला रोज १०८ अखंड प्रदक्षिणा घालण्याचं व्रत तिनं घेतलं होतं. एका श्रावणातली गोष्ट. तिच्या प्रदक्षिणा चालू होत्या आणि इकडे ओढ्याला पूर आला. पाणी झपाझप चढलं. पिंपळाच्या पारावर पसरलं. तिच्या पावलांभोवती गरगरू लागलं. पण तिचे पाय थांबले नाहीत. प्रदक्षिणात खंड पडला नाही. अखेरीस पाण्यानं तिला ओढून नेलं. तिचं पूजेचं तेवतं तबक काठावर सापडलं. तिची ही समाधी. तिचा आशीर्वाद मागूनच आमचा प्रवास सुरू होत असे.

संध्याकाळी पाच वाजता घरून निघालेली गाडी रात्री नऊ-साडे-नऊला काजळी नदीच्या पुळणीत शिरायची आणि तासाभराचा दम खाण्यासाठी सुटायची. तिथं आणखीही गाड्या असायच्या. गाडी सुटली की प्रथम बैलांच्या पुढ्यात दाणावैरण आणि नंतर आमचा फराळ. बैलांच्या गळ्यांतील घुंगुरघंटांच्या नादात. आता त्याचं नर्तन नवीन. लय निराळा. वेगळा. संथ, श्रान्त, तुष्ट. शिळोप्याच्या गप्पांसारखा. मधूनच एखादा बैल जिभेनं अंग चाटी आणि घंटानादाचा आणखीच एक लय साकारे — खंडित लय. घंटाघुंगुरांच्या या वृंदवादनानं आसमन्त आंदोलू लागे.

काजळी नदीला पाणी चांगलं. अखेरचे, आगोटचे दिवस असूनही. काळंभोर. यमुनेच्या पाण्यासारखं. ठिकठिकाणी डोहांचे डेरे मांडून बसलेलं. अनेक ठिकाणी धारेला लागलेलं, पण काही म्हटलं तरी ही उन्हाळ्याची अखेर. नदीचं पात्र बरंच कोरडं. त्यात ठिकठिकाणी विखुरलेल्या शिळा-पाषाणांचंच राज्य — आता रात्री दबा धरून बसलेल्या भुतासारख्या दिसणाऱ्या पाषाणांचं. नदीत मधूनमधून वेताची नि दर्भाची बेटं. तपाला बसलेल्या ऋषींसारखी. शेजारून वाहणाऱ्या पाण्याचं अर्घ्यप्रदान करणारी. आजूबाजूच्या शिळांत एखादी अहिल्या असली तर तिच्या उद्धारासाठी प्रार्थना करणारी. योगासन घालून बसलेली. सभोवार नदीच्या काठानं हारीनं वृक्ष. निद्रावश झालेले. इथं एक वेगळंच स्वतंत्र आवार निर्माण करणारं. त्यांवर जडावलेलं आकाश उतरायचं. निसर्गाचा एक विशाल मंडपच तयार व्हायचा.

या मंडपात आमचं ते वनभोजन. प्रवासातला हा सर्वात आनंदाचा

अनुभव. त्याच्याकडे आमचे डोळे लागलेले असायचे. वेरळ गाव पार केल्यापासून घंटानादात पिठलं–भाकरीची चव मिसळलेली असायची. आता चवीत घंटानाद ! तोंडात ही चव विरघळत असतानाच समोरचं एखादं झाड लख्ख व्हायचं, आणि आपली हाडपेरं क्षणमात्र उजळून पुन्हा अंधारात गडप व्हायचं. तोपर्यंत काजव्याची एखाददुसरी ज्योत, या ज्योतीनं रेखलेली एखादी अग्निरेखा, दृष्टीस पडलेली असायची. पण वनभोजनाच्या नादात तिच्याकडे दुर्लक्ष झालेलं. काजव्यांच्या जमातीला हे दुर्लक्ष सहन व्हायचं नाही, आणि ती आपल्या दीपज्योतींची अशी काही आरास मांडायची ! वनश्रीच्या अंधारगौरीची आरास ! एखाद्या झाडाचं गूढ अंधारी अंतरंग क्षणभर लख्ख करून अंतर्धान पावणारी. तिचं पुनरपि दर्शन व्हावं म्हणून म्हणून मी त्या झाडाकडे एकटक बघत राही. तो दुसरंच एखादं झाड लख्ख व्हायचं, नि माझा म्होरा तिकडे वळायचा — पुन्हा चकण्यासाठी. इतक्यात नदीच्या एखाद्या कोपऱ्यात चूड झळकायची आणि वडील म्हणायचे, " कुळवाडी मासे मारताहेत. चुडीच्या उजेडाला भुलून मासे वर येतात आणि अलगद जाळ्यात सापडतात."

नदीचं हे आगळं दर्शन — पुळण, पाषाण, बेटं, डोह, पाण्याचा प्रवाह, वृक्ष, त्यांवर उतरलेलं आकाशाचं छप्पर, त्यात दाटलेला अंधार, त्याला भेदण्याचा गाड्यांच्या दिव्यांचा केविलवाणा प्रयत्न, या दिव्यांना लाजवणारे काजवे, त्यांचं प्रकाशनर्तन. नजर ते टिपण्याचा प्रयत्न करते. टिपून त्याच्याशी शिवाशिवीचा खेळ खेळते, तोच काकांचा घाटदार आवाज घुमू लागतो. ते बोलत असतात : " सांगतो मी तुम्हाला, तुमचा विश्वास बसणार नाही. पण साक्षात अनुभवाची गोष्ट. अगदी इथली. या ठिकाणची. मी अशी इथंच गाडी सोडली होती. बैल वैरण खात होते, मी भाकरी चघळत होतो, तोच... त्या दिवशी निघायला उशीर झाला. दिवस मावळून गेल्यावर एक भाडं आलं. तातडीचं. रत्नागिरीहून एका वैद्याला घेऊन यायचं होतं. भिकूशेटची बायको दुखणेकरी होती, तिचं अवचित अधिक झालं होतं. जोडली गाडी. निघालो. एकटाच. इतर गाड्या केव्हाच निघून गेल्या होत्या. इथं यायलाच मध्यरात्र झाली. आता अशा मध्यरात्री या एवढ्या पात्रात एकट्यानं थांबायचं म्हणजे... पण इलाज नव्हता.

बैलांना पाणीवैरण दाखवायला हवीच. त्यांना थोडा दम खायला हवा. सोडली गाडी, टाकली बैलापुढं काड, आणि बसलो दशमी खायला. दोन तुकडे मोडले असतीलनसतील, तोच समोर त्या दरडीच्या रोखानं कुणीतरी रेतीचा मारा केला. म्हटलं, असेल एखादं वाघरूबिघरू. उडवीत असेल पायानं वाळू. मी दशमी खात राहिलो. तोच पुन्हा रेतीचा मारा ! तसाच, पण आणखी जोरदार. आता मात्र चरकलो. असा मारा काय जनावरांच्या पायानं होतो ? दशमी मोडणारा हात एकदम आखडला. आता उठावं आन् गाडी जोडून चालू लागावं हे बरं. एवढा विचार करतोय तोच समोरचं झाड—"

काका एवढं म्हणताहेत तोच समोरचं वडाचं झाड एकदम लकाकलं. डोळ्यांत प्रकाशलं. पण मनात शिरलं नाही. सारं लक्ष काका काय सांगतात तिकडे होतं. काका बोलत होते, " मी सांगतो तुम्हाला. अख्खे झाड कुणीतरी गदागदा हलवलं. झाड हललं नि एकदम गप्प झालं. काय समजायचं ते समजलो. मुकाट्यानं उठलो, गाडी जोडली, रस्त्यावर आणली नि बैल चौखुर उधळवले. त्या झाडाखाली गाडी आली तेव्हा काळीज पोटात उतरलं ! पार पलीकडे गेल्यावर गाडी थांबवू लागलो. पण बैल उभेच रहात ना. मी कासरा खेचत होतो, पण बैलांच्या पायांत भूत शिरलं होतं, तो झाड हलवणारा समंधच पाठीस लागला होता काय नकळे ! मी वैद्याला आणायला निघालो होतो. म्हणून बिथरला असेल !"

आणि मग काकांच्या गोष्टी सुरू झाल्या : " मी सांगतो तुम्हाला. तो प्रसंग मी जन्मात विसरणार नाही. माडं लांबचं होतं. एका माहेरवाशिणीला मलकापूरला पोचवायचं होतं. साखरप्याला गाडी जोडली. आंब्या घाटाला लागली. नऊ मैलांचा चढाव. बैल आस्तेकदम जात होते. संथपणे रवंथ करीत. मला नि त्या मुलीला दोघांनाही झोप लागली. इतक्यात अवचित जागा झालो. पहातो तो बैल उभे. गळ्यांतल्या घाटा थंड. आडव्या आडव्याच बैलांना चाबूक लावला. पण ते पाऊल उचलतना. तसा उठलो नि एकेक तडाखा हाणला पाठीवर. पण छाट् ! रामाशिवागोविंदा ! जाम पाय उचलतना. तिथल्या तिथंच घुटमळू लागले. तेव्हा डोळे किलकिले करून पुढं बघितलं. तो काय ! समोर दहावीस पावलांवर, रस्त्याच्या

मधोमध एक ढाण्या वाघ बसलेला! आमच्याकडे रोखून पहात. मनात घाबरलो. सांगतो तुम्हाला, पोटात खळगा पडला! आठलांचं पाणी झालं! मी एकटा असतो तर हरकत नव्हती. पण बरोबर ही माहेरवाशीण. एकटी. ती उठली नि डोळे ताणून पाहू लागली. मी तिला थोडं दटावूनच म्हटलं, 'नीज तू निमूट. रस्त्यात दरडबिरड कोसळलेली दिसत्येय. पहातो मी काय करायचं ते!' ती बिचारी माझ्या शब्दानंच आडवी झाली! मी कासरा ताणल्या नि बैल एकेक पाऊल मागं घेऊ लागलो. पंधरावीस पावलं गाडी तशी मागं घेतली. नि बैल उभे केले. त्यांची पाठ थोपटली. नि मग एकदम कासरा सैल सोडून त्यांच्या पाठीवर चाबकाचे फटके ओढले! असे हाणले, असे हाणले! पिसाळल्यासारखे! हीच जोडी होती. तेव्हा ते जवानीत होते. अंगात मस्ती होती. मी चाबूक हाणल्याबरोबर ते उधळले. असे उधळले म्हणता! पायांत पिशाच्च शिरल्यागत! गाडी अशी अंगावर येते आहे असं दिसल्याबरोबर ते वाघरू ताडकन उडी मारून पळून गेलं. गाडी उधळली तशी ती मुलगीही उठली, काय चाललं आहे पाहू लागली. मी लक्षच दिलं नाही. धोका पार करून गेल्यावर गाडी उभी केली. आणि काय झालं ते तिला सांगितलं. त्याबरोबर ती पोर रडूच लागली. मी म्हटलं, 'आता हसायचं सोडून रडतेस कशाला?' पण ती थोडा वेळ मुसमुसतच राहिली आणि मग हसली."

काका मोठे गोष्टीवेल्हाळ होते. एका गोष्टीतून दुसरी गोष्ट निघे. त्यांचा आवाज खणखणतच होता. म्हणत होते, "तुम्हाला सांगतो मी, या धंद्यात काही राम नाही. पैसा नाही, आराम नाही, मजा नाही. एखाद-वेळेस धोका मात्र दत्त म्हणून उभा राहतो. गतवर्षीचीच गोष्ट. मी वेरळच्या घाटीनं उतरत होतो. पुन्हा मी एकटाच होतो. लवकर निघालो होतो. सूर्य अजून मावळायचा होता. इतक्यात समोरून एक गाड्यांचा तांडा आला. घाटावरच्या गाड्यांचा. एकेका गाडीवानाचा लाल-पिवळा कोल्हापुरी फेटाच सांगत होता. ते वर जात होते, मी खाली जात होतो. इतक्यात — काय सांगू तुम्हाला? त्यातल्या एका गाडीतून एकानं उडी मारली. त्याच्या हातात पाजवलेली फरशी! उतरला आणि झेलपाटे खात चालू लागला. चांगला तर्र झाला होता! हा काय

बैलांना पाणीवैरण दाखवायला हवीच. त्यांना थोडा दम खायला हवा. सोडली गाडी, टाकली बैलापुढं काड, आणि बसलो दशमी खायला. दोन तुकडे मोडले असतीलनसतील, तोच समोर त्या दरडीच्या रोखानं कुणीतरी रेतीचा मारा केला. म्हटलं, असेल एखादं वाघरूबिघरू. उडवीत असेल पायानं वाळू. मी दशमी खात राहिलो. तोच पुन्हा रेतीचा मारा ! तसाच, पण आणखी जोरदार. आता मात्र चरकलो. असा मारा काय जनावरांच्या पायानं होतो ? दशमी मोडणारा हात एकदम आखडला. आता उठावं आन् गाडी जोडून चालू लागावं हे बरं. एवढा विचार करतोय तोच समोरचं झाड—"

काका एवढं म्हणताहेत तोच समोरचं वडाचं झाड एकदम लकाकलं. डोळ्यांत प्रकाशलं. पण मनात शिरलं नाही. सारं लक्ष काका काय सांगतात तिकडे होतं. काका बोलत होते, "मी सांगतो तुम्हाला. अख्खे झाड कुणीतरी गदागदा हलवलं. झाड हललं नि एकदम गप्प झालं. काय समजायचं ते समजलो. मुकाट्यानं उठलो, गाडी जोडली, रस्त्यावर आणली नि बैल चौखुर उधळवले. त्या झाडाखाली गाडी आली तेव्हा काळीज पोटात उतरलं ! पार पलीकडे गेल्यावर गाडी थांबवू लागलो. पण बैल उभेच रहात ना. मी कासरा खेचत होतो, पण बैलांच्या पायांत भूत शिरलं होतं, तो झाड हलवणारा समंधच पाठीस लागला होता काय नकळे ! मी वैद्याला आणायला निघालो होतो. म्हणून बिथरला असेल !"

आणि मग काकांच्या गोष्टी सुरू झाल्या : "मी सांगतो तुम्हाला. तो प्रसंग मी जन्मात विसरणार नाही. भाडं लांबचं होतं. एका माहेरवाशिणीला मलकापूरला पोचवायचं होतं. साखरप्याला गाडी जोडली. आंब्या घाटाला लागली. नऊ मैलांचा चढाव. बैल आस्तेकदम जात होते. संथपणे रवंथ करीत. मला नि त्या मुलीला दोघांनाही झोप लागली. इतक्यात अवचित जागा झालो. पहातो तो बैल उभे. गळ्यांतल्या घाटा थंड. आडव्या आडव्याच बैलांना चाबूक लावला. पण ते पाऊल उचलतना. तसा उठलो नि एकेक तडाखा हाणला पाठीवर. पण छाट् ! रामाशिवागोविंदा ! जाम पाय उचलतना. तिथल्या तिथंच घुटमळू लागले. तेव्हा डोळे किलकिले करून पुढं बघितलं. तो काय ! समोर दहावीस पावलांवर, रस्त्याच्या

मधोमध एक ढाण्या वाघ बसलेला! आमच्याकडे रोखून पहात. मनात घाबरलो. सांगतो तुम्हाला, पोटात खळगा पडला! आठलांचं पाणी झालं! मी एकटा असतो तर हरकत नव्हती. पण बरोबर ही माहेरवाशीण. एकटी. ती उठली नि डोळे ताणून पाहू लागली. मी तिला थोडं दटावूनच म्हटलं, 'नीज तू निमूट. रस्त्यात दरडबिरड कोसळलेली दिसत्येय. पहातो मी काय करायचं ते!' ती बिचारी माझ्या शब्दानंच आडवी झाली! मी कासरा ताणल्या नि बैल एकेक पाऊल मागं घेऊ लागलो. पंधरावीस पावलं गाडी तशी मागं घेतली. नि बैल उभे केले. त्यांची पाठ थोपटली. नि मग एकदम कासरा सैल सोडून त्यांच्या पाठीवर चाबकाचे फटके ओढले! असे हाणले, असे हाणले! पिसाळल्यासारखे! हीच जोडी होती. तेव्हा ते जवानीत होते. अंगात मस्ती होती. मी चाबूक हाणल्याबरोबर ते उधळले. असे उधळले म्हणता! पायांत पिशाच्च शिरल्यागत! गाडी अशी अंगावर येते आहे असं दिसल्याबरोबर ते वाघरू ताडकन उडी मारून पळून गेलं. गाडी उधळली तशी ती मुलगीही उठली, काय चाललं आहे पाहू लागली. मी लक्षच दिलं नाही. धोका पार करून गेल्यावर गाडी उभी केली. आणि काय झालं ते तिला सांगितलं. त्याबरोबर ती पोर रडूच लागली. मी म्हटलं, 'आता हसायचं सोडून रडतेस कशाला?' पण ती थोडा वेळ मुसमुसतच राहिली आणि मग हसली."

काका मोठे गोष्टीवेल्हाळ होते. एका गोष्टीतून दुसरी गोष्ट निघे. त्यांचा आवाज खणखणतच होता. म्हणत होते, "तुम्हाला सांगतो मी, या धंद्यात काही राम नाही. पैसा नाही, आराम नाही, मजा नाही. एखाद-वेळेस धोका मात्र दत्त म्हणून उभा राहतो. गतवर्षीचीच गोष्ट. मी वेरळच्या घाटीनं उतरत होतो. पुन्हा मी एकटाच होतो. लवकर निघालो होतो. सूर्य अजून मावळायचा होता. इतक्यात समोरून एक गाड्यांचा तांडा आला. घाटावरच्या गाड्यांचा. एकेका गाडीवानाचा लाल-पिवळा कोल्हापुरी फेटाच सांगत होता. ते वर जात होते, मी खाली जात होतो. इतक्यात — काय सांगू तुम्हाला? त्यातल्या एका गाडीतून एकानं उडी मारली. त्याच्या हातात पाजवलेली फरशी! उतरला आणि झेलपाटे खात चालू लागला. चांगला तर्र झाला होता! हा काय

करतो म्हणून पाहू लागलो तोच गडी माझ्या गाडीसमोर आला नि 'गाडी उभी कर' म्हणून सांगू लागला. "गाडी उबी कर न्हाईतर बैलाच्या टकुऱ्यात फर्शीच हाणीन बघ," असं दरडावू लागला. आता उताराला गाडी उभी करायची म्हणजे ! पण झिंगलेल्या माणसाच्या नादी काय लागायचं ? कासरा खेचल्या नि गाडी उभी केली. तशी तो गाडीच्या अगदी समोर जोखडाला धरून उभा राहिला आणि माझ्याकडे एक रुपया मागू लागला. 'योक रुपया दे, न्हाईतर गाडी पुढं जानार न्हाय' असं म्हणू लागला. क्षणभर काय करावं समजेना, पण इतक्यात डोकं चाललं. खिशातून रुपया काढला, आणि त्याला दाखवला. तोही त्याच्याकडे हावरट नजरेनं पाहू लागला. मी गाडीतून उडी टाकली आणि रुपया पुढं धरून त्याच्याकडे गेलो — गेलो नि खाडदिशी त्याच्या गालफाडात वाजवली. अशी हाणली म्हणता की गडी आडवा झाला ! त्याच्या हातातली फरशी दूर उडाली. लगेच उडी मारून ती आधी काबीज केली आणि त्याला बखोटीला धरून उठवलं व मग आणखी एक तोंडात दिली. तेव्हा तो शुद्धीवर आला नि मग गयावया करू लागला. तोच त्याचे जोडीदार आले. त्यांच्या स्वाधीन त्याला नि त्याच्या फरशीला केलं. असा हा धंदा ! केव्हा काय उगवेल, सांगता येत नाही. भारी खराब धंदा !"

काजळीच्या पात्रात पिठलं–भाकरीच्या चवीत काकांच्या कथा मिसळायच्या, त्यांना एक न्याराच खमंगपणा यायचा, आणि काकांच्या चेहेऱ्यावर एक पाणी तकाकायचं....

त्या आठवणीत गुंगून बाहेर अंगणाकडे पहात राहिलो. अंगणात भुरं चांदणं पसरलं होतं. एखादं धुवट वस्त्र पसरावं तसं. वाऱ्याच्या झुळके-बरोबर हलकेच हलणारं ! मला आठवलं, या अंगणात एकदा आम्ही चांदण्याचे पत्तें खेळत बसलो होतो. आणि इस्पिक–बदामची आंधळी कोशिंबर झाली !

इतक्यात तो घंटानाद आला. घंटा–घुंगुरांचा स्वरमेळ, एखाद्या पोकळीतून यावा तसा — अंधारातून पणतीचा प्रकाश यावा तसा. पुन्हा तो प्रवास डोळ्यांसमोर उमलू लागला. ...

काकांच्या गोष्टीत आम्हाला उशीर व्हायचा. इतर गाड्या गेलेल्या असायच्या. मग काका घाईघाईनं उठायचे आणि झपझप गाडी जोडायचे. आणि ती चालू लागायची. बट्या–बाळ्यांच्या शानदार चालीनं. वरच्या टपाला हलवीत–डोलवीत. त्यांच्याबरोबर बाहेरच्या अर्धवर्तुळाकार जगाला नाचवीत. झाडाझुडपांचं जग. गाडीच्या दिव्यानं उजळलेलं जग. झाडांच्या बंधांचं, कांडांचं, फांद्याचं जग. रस्त्यावरच्या धुळीनं माखलेलं जग. रस्ता जणू झाडांचा मळवट भरायचा. झाडांबद्दलची आपली कृतज्ञता व्यक्त करायचा. झाडं आहेत म्हणून आपल्या जीवनाला काही अर्थ आहे असं सांगायचा : माणसं मला बांधतात. मजबूत बांधतात. काठानं रंगवलेल्या दगडांची शोभा उभारतात. ठिकठिकाणी पुलाफरशांचे आधार देतात. पण ते काही माझे मित्र नव्हत. खरं म्हणजे दावेदार ! इतका मी त्यांच्या उपयोगी पडतो, पण ते आपले मिजासखोर पाय माझ्या उरावर रोवतात, माझ्यावरून गाड्या उडवतात, माझी उरस्फोड करतात ! उलट ही झाडं, ती माझ्या वेदनांवर फुंकर घालतात. दिवसा छाया देतात, रात्री कलाबतूंची नक्षी पसरतात. चवऱ्या ढाळतात. ही झाडं नसली म्हणजे किती रेताड वाटतं ! एकाकी वाटतं ! आयुष्य सरता सरत नाही. आपलं खरं नातं या झाडांशी, नद्यांशी, टेकड्यांशी, डोंगराशी. या टेकड्यांवरून, डोंगरावरून, बाजूबाजूनं वळणं घेत जाताना काय मजा वाटते ! निसर्गाच्या नवनव्या कळा उमलतात ! टेकडी म्हणजे खरोखर एक जादूगार ! माथ्यावर छान थंडगार वारा, अंगावर करवंदीच्या जाळींची नि कुड्यांच्या झुडपांची झूल, अन् पायथ्याशी नदीची ओलीओली भेट ! नदीच्या पाण्यातलं प्रतिबिंब किती छान छान दिसतं ! कलदार, नाजुक, बिलोरी आरशात दिसावं तसं ! आपल्या प्रतिबिंबात कधी काठच्या झाडाचं प्रतिबिंब मिसळतं, लहरतं ! खरोखर आपलं नातं या झाडाशी, त्यांच्या कांडांशी, फांद्यांशी, पानांशी ! त्याचं रूप, त्यांचा ढंग पहातपहात आपण जगतो ! काय एकेका झाडाचा ढंग ! एखादं शिमग्यातल्या नाच्यासारखं डोलतं, तर दुसरं कमरेवर हात टेकून, विहीणबाईचा दिमाख आणत, तर तिसरं ओणवं होऊन भुईशी कानगोष्टी करतं. पृथ्वीची लतापल्लवांनी पूजा बांधत. कोणाच्या पायाशी वारुळाची वास्तू, तर कोणाच्या अंगावर शुभ्रसफेत आकाशदिवे !

काहींच्या फांद्यांवर पक्ष्यांची छान सुबक घरटी, तर काहींच्यावर खारीचा खेळ !

मनात रस्त्या–झाडांची अशी नाती जुळत असतात तोच डोळे मिटू लागतात. आता फक्त कान जागे असतात. बैलांच्या गळ्यातलं घुंगुरगाणं कान रिझवीत रहातं, पण हळूहळू त्याचा लय एकसुरी बनतो. त्याचा बोल बद्द बनतो. मग त्याची जागा गाडीच्या चाकाच्या आवाजानं घेतली. चाकाच्या आवाजात मी गुंगून गेलो नि मला झोप लागली.

गाडी थांबली नि जागा झालो. हातखंब्याला गाडी उभी करायची, बैलांच्या पाठीवरून हात फिरवायचा, त्यांच्या कानात दोन प्रेमाचे बोल ओतायचे, तोंडात पेंडीचा खडा द्यायचा, नंतर शेजारच्या हाटिलात चहाचा कप ढोसायचा, आणि मग गाडी पुन्हा सुरू करायची, असा काकांचा रिवाज होता.

गाडी चालू झाली, पुलावरून पलीकडे गेली, आणि डावीकडे एक स्वप्न उमललं. स्वप्नमय दृश्य. पुढच्या काळात मी इथून दिवसा मोटारीनं अनेकदा गेलो, पण हे स्वप्न कधी साकारलं नाही. शाळेत आमचे इतिहास–भूगोलाचे मास्तर इतिहास–भूगोल जिवंत करून डोळ्यांपुढं उभा करीत. कोकणच्या भूमीत ठिकठिकाणी भारताचा भूगोल आणि इतिहास पहाण्याचा नाद मला त्यांनी लावला. काजळी नदीत यमुनेचं काळंकाळं पाणी मला दिसे. आमच्या घराच्या पश्चिमेकडच्या उंच डोंगरात मी हिमालय पाही. संगमेश्वरला तुळशीचा वाडा माझ्यासमोर उभा राही.परशुरामाच्या देवळात पेशवे दिसत. आणि रत्नागिरीच्या किल्ल्यात तर मी एकदा संभाजी देखिला ! आता हातखंब्याची घाटी चढताना, डावीकडच्या मूढ ओढ्याच्या शेजारी एकावर एक चढत गेलेला भातमळा पाहून मला ब्रह्मपुत्रेपासच्या आसामची आठवण झाली !

डावीकडचं आसामी दृश्य मांझ्या डोक्यात आंदोळत असताच, काकांनी हातखंब्याच्या चढावालाच, आपली गाडी, पुढं हारीनं लागलेल्या गाड्यांच्या पुढं काढण्यास सुरुवात केली. " या साऱ्या घाटी गाड्या, यांचे बैल रावणासारखे अगडबंब, पण अगदी थंड. यांच्या चालीनं चालायला

माझे बैल मुळीच तयार नसतात. अगदी कुंचबतात," असं स्पष्टीकरण त्यांनी न मागताच दिलं. मला तरी ते नकोच होतं. कोल्हापूरच्या गबदूल बैलांना मागं काढून आमचे किरकोळ बटयाबाळ्या सटासट पुढं जात होते यानं माझं डोळ्यांचं पारणं फिटत होतं. आणि ते कोल्हापुरी बैल तरी असे ढम्म, की आमचे बैल त्यांची नाचक्की करून पुढं जात होते पण त्यांना याचं काही नाही. मग काय, काकांना अवसानच चढलं. जरा फट दिसली की ते खुशाल तीत गाडी घालीत. एका वळणावर तर गाडी पुढच्या कट्ट्यावर आदळणारसं वाटलं, तोच बटयाबाळ्यांनी असं काही बेफाम वळण घेतलं की आमची गाडी सर्वांच्या पुढं ! खरं म्हणजे कपाळमोक्षच व्हायचा. पण काकांच्या दृष्टीनं काहीच झालं नव्हतं. वर येऊन आम्ही संगमेश्वरकडून येणाऱ्या रस्त्याला लागलो नि ते थंड झाले आणि मी झोपलो.

आठवणीतला 'मी' झोपतो, पण घरातल्या मला झोप येत नाही. मी जागाच असतो. आता घुंगुरघंटांचं संगीत थांबलेलं असतं. नजर इकडेतिकडे फिरते. पडवीतल्या झोपाळ्याकडे जाते. अगदी लहानपणी या झोपाळ्यालाच गाडी समजून ती हाकण्याच्या आविर्भावात उंचउंच झोके घेतले होते. झोपाळ्याची ती जादू आता गेली होती. खरं म्हणजे या घराची, या गावाचीच जादू आता नाहीशी झाली होती. आता फक्त त्या जादूच्या आठवणी उरल्या होत्या. आणि आता त्या एका प्रवासाचीच आठवण उसळ्या मारीत होती. ...

झोप चांगली लागली. तिच्यात व्यत्यय आणील असं आता फारसं नव्हतंच. झाडंझुडपं नसलेला एकाकी रस्ता आता सुरू झाला होता. मी जागा झालो नि पाहिलं तर सकाळचं उन्ह सर्वत्र पसरलेलं. गाडीची सावली गाडीच्या पुढं सरकत होती. मन जड झालं. आता हा प्रवास लवकरच संपणार. शिवाय रात्रीची गंमत नाहीशी झालीच होती. मी भकास नजरेनं पाहू लागलो. समोरून दोन गृहस्थ आले. पांढराधोप पोशाख केलेले. सकाळीच गावाबाहेर फिरायला निघालेले. म्हणजे ही शहराची वेस ! जरा वेळानं आणखी लोक दिसले — शहरी. कुणी खाकी तुमान-कोट घातलेले,

कुणी बूट चढवलेले, कुणाच्या खांद्याला कसलीशी पिशवी. इतक्यात एक शाळकरी मुलगा — हातात पाटीदप्तर घेऊन. मनात काहीतरी डसलं. जरा वेळानं डावीकडचा थिबॉ राजाचा बंगला दिसला. उफाडयाचा. जरा वेळानं दूर समुद्राचं दर्शन झालं. आज संध्याकाळीच या समुद्रावर आपण मुंबईचा पाय ठेवणार ! संपलं. दोन महिन्यांचं चांदणं संपलं. आता तो रोजचा रटाळ कार्यक्रम. शाळा. अभ्यास. वडिलांच्या आरडाओरडीनं भरताड बनलेला. इतक्यात गाडी उताराला लागली. गावात उतरणारा उतार. मी तंद्रीतून बाहेर आलो. घुंगुरघंटा कानात शिरू लागल्या. आता त्रासिक वाटणाऱ्या तोच उजवीकडे पूज्याचा आकडा धारण केलेला मैलाचा दगड ! या दगडावर हा आकडा का ? प्रश्न उमटला, पण उत्तराची गरज वाटली नाही. इतक्यात उजवीकडून एक सायकल आली — आपलं चक्राकार आश्चर्य घेऊन. नारळातल्या पाण्याच्या आश्चर्यासारखं. कातळातून झुळझुळणाऱ्या झऱ्याच्या आश्चर्यासारखं. मुंग्यांच्या वारुळासारखं. सुतारपक्ष्याच्या सुतारकामासारखं. ही सायकल दोन चाकांवर उभी कशी रहाते ? अनेक चाकं डोळ्यांसमोर आली. गाडीचं चाक, कुंभाराचं चाक, सुत कातायच्या चकतीचं चाकं, घडयाळातलं करवती काठी चाक !

हे चाकांचं आश्चर्य डोक्यात फिरत असतानाच आम्ही आमच्या बिऱ्हाडी आलो. काकांनी गाडी तिथंच परसाबाहेर सोडली. मी घरात आलो, पण मन बाहेरच राहिलं — गाडीच्या चाकांचं निरीक्षण करीत. ते करताकरताच डोक्यानं एक चक्कर खाल्ली : बस्स, ठरलं ! आपण वडिलांसारखी मुंबईला नोकरी करीत रहाणार नाही. गावालाच राहणार. तो पश्चिमेकडचा, पिंपळापलीकडचा डोंगर विकत घेणार आणि त्याच्या माथ्यावर बंगला बांधणार. थेट बंगल्यापर्यंत गाडीरस्ता नेणार. वर नेहेमी गाडीनं जाणार — अगदी स्वतःच्या गाडीनं.

त्या डोंगरावर म्हणजे गावाबाहेरच एकाकी. पण हरकत नाही. तो पायथ्याचा पिंपळ करील आपलं संरक्षण. त्या पिंपळावरच्या महापुरुषाची कृपा असल्यावर काय होणार नाही ? तो महापुरुष — म्हणजे आमचा मूळपुरुष ! कडकडीत सोवळा ब्राह्मण. रोज मध्यरात्री आमच्या विहिरीवर येऊन स्नानसंध्या करणारा. आमच्या विहिरीवर ! आजोबांना त्याचे

गायत्री मंत्र ऐकू यायचे. आमच्यावर त्याची कृपादृष्टी. अशीतशी नाही. एकदा आमची कोयना गाय आजारी झाली. तीन दिवस मान टाकून पडली. गवताच्या काडीला शिवली नाही. पाण्याचा घोट घेतला नाही. रवंथाचा फेरा फिरवला नाही. काही कळेना. काय झालं हिला ? कसल्याही उपायांचा उपयोग होईना. आजोबा घाबरून गेले. त्यांचा दमदार आवाज गप्प झाला. स्वतःशीच विचार करीत एकीकडेच बसू लागले. पण त्या दिवशी उठलो, तर आजोबांचा आवाज स्वैंपाकघरात घुमत होता तडक उठलो नि आत गेलो. आजोबा सांगत होते : " स्वप्नात महापुरुष आला. म्हणाला, तीन दिवस बाहेरगावी गेलो होतो. तेवढ्यात दावेदाऱ्यानं दावा साधला. तुझ्या गाईला धरलं. पण आता मी परत आलो आहे. काही काळजी करू नकोस. एवढं म्हणाला नि अंतर्धान पावला. जागा झालो नि लगेच उठून कंदील घेऊन वाड्यात गेलो, तर कोयना रवंथ करीत होती." असा हा महापुरुष. त्यानं कोयनेला वाचवलं. तिचीच संतती आमच्या वाड्यात वाढली. गजबजली. त्यांतलेच दोन पाडे आपण गाडीसाठी घेऊ.

तो डोंगर माझ्या नजरेसमोर उभा राहिला. तीन बाजूंनी उचललेला पण चौथ्या बाजूनं उतरलेला. एकुलतं एक सातविनाचं झाड त्या बाजूला. आणि त्याच्या मुळाशी एक झरा. त्या झाडाच्या बाजूनंच आपला रस्ता जाईल. थेट माथ्यापर्यंत. त्या उंच माथ्यावरून समुद्र दिसतो. मी कधी पाहिला नाही. पण आता त्याचा धुवट निळा पट्टा माझ्या नजरेसमोर उभा राहिला. ...

मी तिथून समुद्र कधी पाहिला नव्हता, म्हणूनच तो मला दिसत होता. पण आता त्याचा काही उपयोग नव्हता. चारदोन दिवसांत मी हे घर, हे गाव सोडून जाणार होतो. पुन्हा परत न येण्यासाठी. पण बरोबर ही स्वप्नं, या स्मृती घेऊन, केवळ स्मृती. या स्मृती रिक्त वाटू लागल्या. रिकाम्या रांजणासारख्यां. पोकळ. इतक्यात एक घंटानाद आला. एखादी मागं राहिलेली गाडी आली वाटतं ? — होय. तिच्या बैलांच्या गळ्यांतल्या घुंगुरघाटांचा नाद वाढतो आहे. त्याचा स्वरमेळ जमतो आहे.

# तुला इथं स्थान नाही

कोनवाशावर बसलो होतो. साफल्याची संतुष्ट नजर पडवीच्या कोऱ्या-करकरीत पिंजरीवर टाकीत. सागाचे उतरते गव्हाळी वासे आणि त्यांवर समान्तर ठोकलेली शिवणीच्या सफेत पट्टयांची रीफ. मला एकदम युक्लिडच्या समांतर रेषा आठवल्या. एकमेकांना कधीच न मिळणाऱ्या. या रीफच्या पट्टयाही एकमेकांना मिळत नव्हत्या. पण त्यांनी खालच्या सशक्त वाशांवर कुरघोडी केली होती. त्या तुकतुकीत वाशांची नागमोडी ऐट उतरवली होती. याचीच गंमत मला वाटत होती. पण खरं वाटत होतं ते एक समाधान. काकांनी घर बांधलं, पण ते पुरं होण्याच्या आतच ते गेले. मागची पडवी बांधायची तशीच राहिली. आणि मग त्या ऐटबाज कौलारू घराला एक केंबळी पडवी लागली. - पैठणीला ठिगळ ! आज ते काढलं.

नजर समोर रचलेल्या मंगलोरी कौलांवर गेली. लालचुटुक. उद्या ती या पडवीच्या पिंजरीवर चढतील आणि त्यांचा तकतकीत रंग तेवू लागेल. रीफची सफेत स्वच्छ मिजास ती पार झाकतील. मग तिची पांढरी समांतर शोभा खालून पहावी लागेल. पण ती अंतराअंतरावर वाशांनी खंडित झालेली असेल. मग वासेच मिजास मारतील — अंगावरच्या तैल-दार सागवानी रेषांची आणि गाठींच्या नक्षीची. आणि रीफ बिचारी वरच्या कौलराशी हिरमुसल्या कानगोष्टी करीत बसेल.

माझे कान त्या कानगोष्टी चोरीत होते, तोच शब्द आले : " म्हण-

तात ना, आधी होता पाग्या, त्याचा झाला वाघ्या ! पण मूळ स्वभाव जाईना. बापानं मुंबईला नेला, शिकवला. पण वळचणीचं पाणी आढ्याला कसं जाणार ? टोणपा तो टोणपाच रहाणार."

लगेच लक्षात आलं : माझ्या या पडवीच्या कर्तबगारीवर हा शेरा होता. बेड्यात उभं राहून तो आमच्याच गड्याला सांगत होता. तो म्हणजे घरजावई. सारं गाव त्याला घरजावई म्हणून ओळखी. राजापूरला एका दुकानावर हिशेब लिहिण्याच्या कामावर होता. हिशेबात काही घोटाळा झाला म्हणून नोकरी गेली. तेव्हापासुन या गावात सासुरवाडीस येऊन बसला होता. दिवसा कुचाळक्या करीत आणि रात्री पोरांचं लेंढार वाढवीत !

गेली दोन वर्षं मी मुंबईची शाळा सोडून कोकणात येऊन बसलो होतो त्याला अनुलक्षून तो बोलत होता. मुंबईला गेलो की हिवताप सुरू होई. कोकणात हवा पालटायला जाणे हा त्या वेळी आजारावर रामबाण उपाय! म्हणून अभ्यासात गती असूनसुद्धा मी कोकणात येऊन उनाडक्या करीत होतो !

उनाडक्या ! शब्द मनाला डसला. डास गुणगुणतो तसा गुणगुणला. घिरट्या घेत राहिला.

खरंच मी दोन वर्षं उनाडक्याच केल्या ?

'होय. दुसरं नाव नाही त्याला.'

खरोखर आमच्या त्या 'चांडाळचौकडी'नं दुसरं काय केलं ? मी आणि माझे तिघे 'मित्र'. माझ्यासारखेच उनाड. गावाला ताप देणं हा आमचा धंदा. लोकांच्या अळ्यावरच्या काकड्या उडव, आंब्यावरचे आंबे उतरव, फणसाचे फणस पळव — आणि वर आपण त्या गावचेच नाही असं दाखवीत शीळ घालीत मटक, हा आमचा उद्योग.

... ती रात्र. वादळानं घोंघावणारी, पावसानं चिंब बनलेली, काळोखानं मिट्ट झालेली, काळी, काजळी. सारेजण घरात परशासमोर शेकीत बसलेले, गुरं गोठ्यात रवंथ करीत बसलेली, निसर्ग पावसानं निपचिप पडलेला. कळा कोमेजलेला. पाणदीतली वाट काळोखात हरवलेली.

शेतातली माताची रोपं अंधारात अंतर्धान पावलेली — अशा समयी आम्ही ठरवलं, माळावरच्या रत्नू शिंद्याचा आंबा उतरवायचा. तेवढ्या एकाच मागस आंब्यावर फळ उरलं होतं. आज ते उतरवायचं. का, तर त्यावर धोंडा मारला म्हणून रत्नू आम्हाला बोलला होता. आमची जात, आमची इभ्रत धाब्यावर बसवून बोलला होता. बस्स ! त्याला शिक्षा झालीच पाहिजे !

आंबा उतरायचा; पण कसा ? कुट्ट काळोखात झाडावर चढणार कसं आणि फळ दिसणार कसं ? कंदील होता, पण त्याचा उपयोग नव्हता. त्याच्या उजेडानं चहाडी केली असती. त्या पावसातसुद्धा रत्नू कोकलत आला असता. आणि आम्ही सापडलो असतो. आणि सापडलो तर आमची शान काय राहिली ? आम्ही एक रोवळी घेतली. एक घासलेटचा उघडा दिवा घेतला. तो रोवळीत घातला. म्हणजे उजेड वर जाईल. बाजूला पसरणार नाही. रोवळीला फडका गुंडाळून तिची भोकं बुजवून टाकली. पावसात हा उघडा दिवा कसा टिकणार हा प्रश्न होता. पण नशिबानं पावसाची आता झिमझिमच उरली होती. दिव्याच्या वातीवर पावसाचा थेंब पडला म्हणजे ज्योत थरथरे, थोडी तडतडे, विझू लागे; पण लगेच उजळे. आमच्या अंतःकरणात तसंच होत होतं. पण हिंमत होती — बेछूट हिंमत ! हा रोवळीतला दिवा झाडाखाली ठेवला म्हणजे वरच्या फांद्या लख्ख होतील, फळं लकलकतील, अलगद टिपता येतील. घळ, गोणता, दोर घेऊन आम्ही गेलो. रात्री दहाअकरा वाजता. आमच्यांतला सखाराम एरवी भागूबाई, बावळटच, पण झाडावर चढण्यात वांदर ! सटासट चढला. फांद्यांसरशी सरपटला. बरेचसे आंबे त्यानं हातानंच काढले आणि दोरानं वर ओढलेल्या गोणत्यात भरले. आम्ही आख्खं झाड खाली केलं असतं; पण दोन फांद्यांवर भागवलं. तेवढ्यापुरती आम्ही चक्क भुताटकी केली. फक्त आमची पावलं उलटी नव्हती. पण डोकी होती. झाडं कशी झपाटतात हे आम्ही पहात होतो; आणि दुसऱ्या दिवशी रत्नू शिंदा पहाणार होता !

आमच्या या उपद्व्यापांना गाव कंटाळला होता. आम्हाला कुणी ठोक कसा दिला नाही याचंच आश्चर्य वाटतं ! पण गावात आम्हीच उंडगे तरुण होतो. बाकीचे बाप्ये मुंबईला होते. गावात मरणा होता तो

म्हाताऱ्याकोताऱ्यांचा. त्यांतले काही आमची मनधरणीच करीत. एका माउलीनं आम्ही तिची तवशी चोरू नये म्हणून चक्क गोडगोड घारगे करून घातले. आम्ही ते खाल्ले आणि ढेकर देतदेत तिचं एक तवसं पळवलं ! आमची स्थिती त्या गवळी नोकरासारखी झाली होती. मालकाच्या म्हशीचं दूध काढून तो मालकालाच देई — पण थोडं पाणी घालून. एक दिवस मालकानं हटकलं तेव्हा म्हणाला, "मालक, दुधात पानी घालनं हा आमचा धरम हाय." उंडगेगिरी हा आमचा धर्म बनला होता !

पण या बाईच्या गाईनं आम्हाला धडा शिकवला. आमच्या एका मास्तरानं आम्हाला 'काव्यात्म न्याय' म्हणजे काय ते शिकवलं होतं. एक मोठं अजब उदाहरण देऊन. संभाजीला औरंगजेबानं सोललं; कारण तो दिवटा एकदा बापावर उलटला होता ! संभाजीच्या तेजस्वी धर्मप्रेमापेक्षा आमच्या पंतोजीमहाशयांना त्याचा कधीकाळचा पितृद्रोह अधिक भिडला होता ! या मास्तरची मतं तिरपागडी असत; पण शब्दांत विलक्षण कळकळ असे. आमच्या बाबतीत ती कळकळ फुकट गेली होती; पण ती कसर या गाईनं भरून काढली. तिनं आम्हाला 'काव्यात्म न्याय' म्हणजे काय ते शिकवलं — अगदी झकास रीतीनं !

... खरं म्हणजे आम्ही काही विशेष वांडपणा केलेला नव्हता. कोकणात झाडाखाली आपसूक पडलेले आंबे गावच्या मालकीचे असतात. कोणीही यावं आणि गोळा करावे ! मालक समोर असला नि त्यानं हटकलं तर पळून जावं. रात्री सारं रान मोकळंच ! कोकणचा हा पारंपरिक कायदा आम्ही पाळला होता. रात्री बारानंतर वारा सुटला. पिकलेली फळं खाली आली, आणि आम्ही जाऊन अलगद निवडली, नि अंगणात येऊन झोपलो. आंबे तसेच उशाशी ठेवून ! गाढ झोपलो. अगदी त्या गावचेच नाहीत असे. जरा वेळानं जागे झालो. कोणीतरी आमच्या डोक्याशी कचखस करीत होतं, त्या आवाजानं आम्ही जागे झालो. पहातो तर आमच्या डोक्यापासचे आंबे एक गुरू खात होतं. आम्ही जवळच्या कंदिलाची वात वर केली, आणि त्या प्रकाशात त्या गुराचे डोळे धारदार चमकले. आमची चाहूल लागल्याबरोबर ते ताडदिशी उडालं — अन् बेड्यावरून

पार झालं ! त्याच्या त्या उडीनंच ध्यानात आलं की, ही त्या बाईचीच कृष्णी गाय. वांडपणात ती आमच्या सवाई ! तिनं आम्हाला काव्यात्म न्याय शिकवला ! आम्ही संतापलो, चिडलो, तणतणलो, गाईला शिव्या घातल्या, आणि शिताफीनं गोळा केलेले आंबे असे गलथानपणं टाकून झोपल्याबद्दल स्वतःच्याच गालफडात मारून घेतलं. — व मग भरपूर हसलो. हसताहसता मला त्या मास्तरची आठवण झाली. त्या मास्तरच्या शब्दांतली कळकळ आता मला आठवली. ती शाळा, तो अभ्यास सोडून मी आलो होतो — एका बेकार आणि बेकाम घरजावयाकडून टोणपा म्हणवून घेण्यासाठी !

मी विलक्षण बेचैन झालो. सारं सारं खोटं वाटू लागलं. सारं फुकट गेलं. ती पडवी बांधली — सुताराबरोबर रंधा मारून, गवंड्याबरोबर टिकाव चालवून, आणि वर जमाखर्चाचा चोख हिशेब मांडून. फुकट फुकट हे सारं ! शेवटी मी टोणपाच. छट् ! या खेड्यात काही नाही. इथल्या जिण्यात काही राम नाही. पडवीसाठी चुन्याची घाणी घातली होती, तिच्या चुन्यात पाणी घातलं म्हणजे 'फस्स' होई, तसे आपण फस्स होणार ! घाणीचा फेरा फिरू लागला म्हणजे चुन्याचे खडे चुरचुर चुरडत, तसे आपण चुरडणार ! जांभ्या दगडात तो चुना चिप्प बसे, तसे आपण या जगात चिप्प बसणार ! आणि या साऱ्यातून निघणार काय, तर एक पडवी ! तीदेखील मागील दारची ! उन्हाळ्यात म्हशीच्या आंबोणासाठी आइनाचा पाला आणि पावसाळ्यात स्वैंपाकाची लाकडं ठेवण्याची सोय व्हावी म्हणून. छट् !

त्या रात्री झोप येईना. तो 'टोणपा' शब्द डोक्यात ठणकत होता. ओटीवरच्या अंथरुणावर तळमळत पडलो होतो. अखेर उठलो नि समोरच्या खळ्यात फेऱ्या घालू लागलो. सभोवारची झाडं काळोख पांघरून गप्प झाली होती. रातकिड्यांची किरकिर रात्रीची शांतता भयाण करीत होती. माझं पलीकडच्या विहिरीकडं लक्ष गेलं. विहिरीवरचं ते रहाटगाडगं ! असंच किरकिरणारं. स्वतःभोवती रडतरडत फिरणारं ! निम्मं पाणी विहिरीतच परत टाकणारं. कोकणचं जीवन हे असं ! निम्मं पाणी विहिरीतच !

मला आठवलं. रहाट ओढताना मी अनेकदा खाली खोल विहिरीत पाहिलं होतं. आमच्या विहिरीस खबदाडं होती. त्यात बेडूक येऊन बसत. कधी एखादा उन्हाचा कवडसा त्यांच्यावर पडे, अन् ते किती ओंगळ दिसत ! हे बेडूक म्हणे विहिरीचं पाणी स्वच्छ करतात ! पण त्याहून अधिक म्हणजे ती खोलखोल विहीर विलक्षण पोकळ वाटे. तिची पोकळी भयाण भयाण वाटे. आम्हाला जीवन पुरवणारी ही विहीर. हा विचार मनात आला की वाटे, आपण किती कृतघ्न ! पण आता पटला. खरंच पोकळ पोकळ !

वर पाहिलं. वर आकाशाची पोकळी. पण त्यात नक्षत्रं चमचमत होती. क्षणभर मला माझा विसर पडला. मी नक्षत्रांवर नजर फिरवू लागलो. ते मृगशीर्ष नक्षत्र दिसलं — अन् मग व्याधाचा तारा. माझा अतिशय आवडता. व्याध ! किती सुंदर कल्पना ! व्याध ! एका व्याधामुळं आपल्याला एक सुंदर महाकाव्य मिळालं. आमचे ते मास्तर रामायणाचं श्रेय वाल्मीकीऐवजी त्या व्याधालाच द्यायचे. पण काय उपयोग ? त्या पक्षिणीला तिचा प्रियकर मिळाला काय ? विफल, विफल, सारं विफल ! ...

माझ्या डोक्यात तेच चक्र फिरू लागलं. काय मिळवलं मी या दोन वर्षांत ? दोन वर्षांच्या या खेड्यातल्या वास्तव्यात ? पहाटफटी उठे, गुरं सोडी, रानात घेऊन जाई. पश्चिमेकडच्या डोंगरावर. सकाळची थंडी, ओलसर दवानं भिजलेली थंडी ... साऱ्या शरीरातून असे सुखसुखित शहारे निघत ! त्यांच्या लयावर मी गुरांना हाकी. त्यांच्या लयावर गुरांना दुसऱ्याच्या गवतात घाली. त्यांच्या लयावर त्या डोंगरावरच्या एकुलत्या एका सातविनाच्या मुळाशी असलेल्या झऱ्याकाठी जाई, आणि तिथं घोंगडीत गुरफटून घेई. त्या घोंगडीचा स्पर्श आणि अंगातले ते शहारे एकमेकांना असे झक्क भेटत ! ऊब आणि गारठा यांचं रहस्य जमे. ते रहस्य अनुभवीत मी पडून राही — गुरं लोकांच्या गवतात चरत असताना. काहीतरी शतकृत्य करीत असल्याच्या समाधानात ! पण त्याच वेळेला आमच्या डोंगरावर आमच्या गवतात दुसऱ्याच कुणाचीतरी गुरं चरत असतच ! माहीत असे. कुव्याच्या खानविलकरांची गुरं खिडीतून येऊन

आमच्या गवतात चरत. खानविलकरांची की दुसऱ्या कुणाची हे नक्की कुठं माहीत होतं ? पण मी कल्पना करी. ती सुखाची वाटे. आठवे, माझ्या काकांच्या रावज्यानं या खानविलकरांच्या मलकापुरी बैलाला पहिल्या घडकीत पळवलं होतं. बैलाला बैलाची पैज लावून झुंज लावलं होतं, अन् त्या घाटावरच्या धिप्पाड बैलाला आमच्या चिमुरड्या रावज्यानं चीत केलं होतं. या आठवणीत रमून आमच्या गवतात खानविलकरांची गुरं मी आणी आणि मोठ्या बेफिकीरीनं त्यांची उपेक्षा करी ! आणि मग घोंगडीतून तोंड बाहेर काढून आकाशातला एखादा तारा मोठ्या कर्तृत्वाच्या नजरेनं पाही.

आणि जांगळ्यांबरोबर केलेला तो वकटलेंडमुंडचा खेळ. त्यांच्याबरोबर विणलेल्या रंगीबेरंगी गवताच्या परड्या. त्यांच्याबरोबर गोळा केलेली नाना प्रकारची रानफुलं आणि रानफळं. आणि त्यांच्याबरोबर पऱ्ह्याच्या कोंडीत मारलेल्या बुड्या ! मी त्यांच्यांतलाच एक बनलो. त्यांच्याबरोबर भाकरीतुकडाही खाल्ला ! पुष्कळदा आमच्या घरचाच — एखाद्या जांगळ्याला दिलेला. पण त्या रानात त्याची चव काय बदलायची !

...त्या दिवशी आम्ही पऱ्ह्याचा शोध घ्यायचं ठरवलं. पऱ्ह्यातूनच वरवर उगमाकडे जायचं ठरवलं. वाटेत एखाद्या कोंडीत डुंबायचं, एखाद्या कातळाचा वेडाविद्रा आकार न्याहाळायचा, एखाद्या खबदाडीतून जाताना पाण्याचा प्रवाह कसा अडतो, कसा पलटतो, पलटता पलटता पुढं झेप कशी घेतो, घेताघेता आपला मोडलेला वेणीदार प्रवाह पुन्हा सांधण्याचा प्रयत्न कसा करतो हे डोळे भरून पाह्यचं, पऱ्ह्याच्या रेतीतले नाना आकारांचे, नाना रंगांचे दगड गोळा करायचे, ते एकमेकांवर मारायचे, मधूनच काठच्या अळूवरचे पिकलेले तपकिरी अळू खायचे किंवा नुसतेच ओरबाडायचे — असं करीत आम्ही चाललो. एका धरणापाशी आलो. धरणात खूप पाणी होतं. त्यात यथेच्छ डुंबलो, अगदी सूर मारून पोहलो आणि स्वच्छ होऊन शेजारच्या शंकराच्या देवळात गेलो. ते देऊळ आमचं आवडतं. अगदी शंकराला शोभेसं. म्हणजे एक पिंडी व वर चार बिनताशी खांबांचं कौंबळी खोपट. पिंडी भोंबाडांनी वेढलेली. या भोंबाडांत नाग

रहातो व पिंडीवर उन्ह आलं म्हणजे वर फणा धरतो, अशी आमची श्रद्धा. या पिंडीचं दर्शन म्हणजे भक्ती आणि भीती यांची शिवाशीव. शेजारीच एक पांढरा चाफा शिवगणासारखा उभा. भस्मचर्चित अंगाचा. ठिकठिकाणी नमस्कारासाठी लवलेला. अंगावर अनेक ठिकाणी खडतर तपाची भरड बिरुदं मिरवणारा. शंकराला वाहण्यासाठी पिवळझोक फुलांचे गुच्छ धरून उभा असलेला. या चाफ्यावर आम्ही चढलो. फुलं काढली. शंकराला वाहिली. काही कानांत घातली. तोंडानं डबड्यात खडे वाजवल्यासारखे आवाज काढले, देवाचा आशीर्वाद मागितला आणि पावन होऊन पऱ्ह्याच्या शोधाला पुन्हा लागलो. थोडे वर गेलो, तर आपली मासिक पाळीची चिरगुटं धूत असलेल्या एका बाईला उद्देशून आमच्यांतल्या शंक्र्यानं एक अभद्र उद्गार काढला नि माझं डोकं तडकलं. मी त्याला बोललो. पण त्याला त्याचं काहीच नव्हतं. तो फिदीफिदी हसू लागला व त्याच्या फिदीफिदीत इतरांनी आपली फिदीफिदी मिसळली. त्या क्षणी त्यांच्यांतलं व माझ्यातलं अंतर फडा काढून उभं राहिलं. आमची मैत्री संपली.

खरं म्हणजे मैत्री नव्हतीच. नंतर ध्यानात आलं की, या गावात माझी कुणाशीच मैत्री नव्हती. अगदी चांडाळचौकडीतल्या दोस्तांशीदेखील मैत्री नव्हती. आम्ही कधी एकमेकांशी हितगुज केलं नव्हतं. कधी एकमेकांच्या भवितव्याची चौकशी केली नव्हती. कधी कोणाची काही अडचण जाणली नव्हती. कोणाचं मन कुठं गुरफटलं आहे, अडकलं आहे अगर अडलं आहे याची पर्वा केली नव्हती. अंतरीचा जिव्हाळा नव्हताच. फक्त चारगटपणा होता टारगटपणा होता. आता या क्षणी ही जाणीव झाली. जाणीव अगदी नवीन होती.

ही जाणीव झाली नि ध्यानात आलं की, या गावात कोणीच कोणाचा मित्र नव्हता. भेटले म्हणजे गळ्यात गळा घालणारे, पाठ फिरली की एकमेकांना कसे निंदीत हे मी रोज पहात होतो. या गावात भांडणं होती, भाऊबंदकी होती, देवदेवस्की होती, शिंदळकी होती, पण मैत्री नव्हती. मला आठवलं. आमच्या गावातला एक सावकार आणि एक ब्राह्मणाची बायको यांचा संबंध होता. त्या बाईच्या मुलांचे तोंडवळे तो संबंध जगजाहीर करीत होते. एकदा काही कारणानं ही दोघं एकत्र

आल्याचं मी पाहिलं. ती परस्परांशी बोललीही. पण त्यांच्या अंतःकरणात काही लहर उमटली असेल — प्रेमाची, शरमेची, एखाद्या गुपिताची, भांडणाची — कसलीही लहर उमटली असेल, अशी शंकादेखील आली नाही. परस्परांबद्दल ती मुद्दाम उदासीनपणा धारण करीत होती असंही वाटलं नाही. नाटकाचेसुद्धा भाव असतात. पण तेही नव्हते. तिऱ्हाईतपणाचे-सुद्धा भाव असतात. पण तेही नव्हते. गेल्या मोसमात एकत्र आलेली पाडा आणि पाडी जणू !

छे ! पण हा त्या मोनजातीवर अन्याय होतो आहे. गुरांना एक-मेकांना चाटताना कसं निभ्रांत वाटतं हे मी अनेकदा पाहिलेलं होतं. निदान या गुरांशी मी मैत्री करू शकत होतो. त्यांच्यावर ममतेनं हात फिरवू शकत होतो, वासरांबरोबर उड्या मारू शकत होतो, कपिला गाईशी गोष्टी बोलू शकत होतो. पण माझा हा स्नेह गुरांना कळला ?

कुणास ठाऊक ! एकदा आईनं चाळीस रुपये दिले नि म्हटलं, एक म्हैस विकत आण. मामाकडे गेलो. त्याच्या मध्यस्थीनं एक म्हैस पाहिली नि घेऊन आलो. म्हैस चांगली मोरी होती, पण घेतली ती तिच्या पारडासाठी. पण त्याला नऊदहा मैल उन्हातून आणला आणि घरी आल्याबरोबर तो मान टाकून पडला ! खरं म्हणजे तो दिसायला गोंडस, तरी त्याच्यात त्राण नव्हतं त्याच्या कपाळावरचा चांद शोभत होता. पण डोळ्यांत प्राण नव्हता. त्याला तसा मान टाकून पडलेला पाहिल्याबरोबर आई म्हणाली, "कशाला बाबा हे मढं आणलंस ?" मी म्हटलं, "या मरतुकड्याला चांगला गुटगुटीत करीन बघ !" अन् त्या दिवसापासून त्याला उडदाचा भुसा आणि पेंडीचा चुरा कालवून देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्याला मी तो एखाद्या लहान मुलासारखा भरवी. नंतर त्याला नुसतं फणसाच्या ओल्या पानावर ठेवलं. त्या उन्हाळ्यात आजूबाजूचे अनेक फणस खडसून ओकेबोके केले आणि त्यांच्या पानांच्या भरीस भार शिव्या खाल्ल्या. पण मला पर्वा नव्हती. रेडा जीव धरीत होता. चारपाच महिन्यांत चांगला घोटीव गोटीसारखा झाला आणि मला चिकटला. अगदी कुत्रा मालकाला चिकटतो तसा. दोनचार तास डोळ्यांसमोर दिसलो नाही तर रेकून जीव काढायचा — स्वतःचा आणि इतरांचा. अगदी विव्हळून रेकायचा.

डोळ्यांत सारी प्रतीक्षा गोळा करून रेकायचा. आणि मी दिसलो रे दिसलो की रेकत येऊन मला चौखूर भेटायचा. भेटायचा म्हणजे धडक देऊन पाडायचा ! पण मध्यंतरी मी चार महिने मुंबईला गेलो तेव्हा मला साफ विसरला. मी आजारी पडून परत आलो तर अंगावर धावून आला ! एखाद्या दावेदारासारखा ! — छट् ! या गावात गुराशीही मैत्री नाही.

मैत्री नाही. जवळीक नाही. जिवाभावाची भेट नाही. परस्पर-विश्वास नाही. फक्त भाऊबंदकी आहे. जळणं आहे. जळफळणं आहे. बोटं मोडण्याचा अखंड क्रम चालू आहे.

मी मैत्रीचे व्याप केले होते. अगदी मनापासून केले होते. पण ते फुकट गेले. शेजारच्या एका गावात माझे नातेवाईक होते. त्यांतले तिघेजण थोडेबहुत शिकलेले. रत्नागिरीला चारपाच इंग्रजी इयत्ता केलेले. दोनचार इंग्रजी वाक्यं बोलणारे. ' आधी लग्न कोंडाण्याचं ' असं कधीमधी दरडावून सांगणारे मोरोपंतांच्या पाठ आर्यांच्या जोरावर जोरदार भेंड्या लावणारे. माझ्याच वयाचे. मला कंटाळा आला की मी त्यांच्या गावी जाई, त्यांच्या बरोबर चारदोन इंग्रजी शब्दांची देवघेव करी, त्यांच्याबरोबर जाऊन देवळात भजनं करी, गावठाणात जाऊन आंबेफणस तोडी. वाटे, आहेत, आपल्याशी जुळतील असे सगे या कोकणात आहेत. मी पडवी बांधायला घेतली तेव्हा सल्ला देण्यासाठी मी त्यांना चिठी पाठवून बोलावून घेतलं होतं, आणि मला यातलं किती कमी कळतं हे मला त्यांनी पटवून दिलं होतं.

त्यांच्याबरोबर केलेल्या सहली — अनुभवाच्या खाणी ठरल्या त्या. त्या सहली. पायीपायी केलेल्या. पायांत वहाणा. हातात काठी. कमरेला पंचा. अंगात शर्ट. डोक्याला टोपी. आणि खांद्याला पिशवी. हो, आणि तोंडात गप्पा ! फणसाच्या गऱ्यासारख्या. रसाळ. तोंडात विरघळणाऱ्या. कधी आवळ्यासारख्या आंबट-तुरट. कधी त्यांना तुळशीच्या रसाचा स्वाद. कधी पुदिन्याचा ! आणि वरकरणी भरड !

... विशाळगडच्या अलीकडील माळावरची गोष्ट. पाचसहा मैलांची

चढण चढून आलो होतो. जाम दमलो होतो. येताना जाणवलं नव्हतं. गप्पांच्या नादात, आणि सह्याद्रीच्या अंगावरील वनश्रीनं निवलेल्या डोळ्यांच्या समाधानात. आता वर आल्यावर जाणवलं. आम्ही तसंच जमिनीवर लोटून दिलं. पण लगेच उठलो. उशीर झाला होता. जेवण करायचं होतं. त्यापूर्वी हातपाय धुऊन सायंसंध्या करायची होती. आम्ही पाण्याच्या शोधात निघालो — आणि जणू तपश्चर्याच पावली. पाण्यानं भरलेली दोन कुंडं शेजारीशेजारी उभी. आत पाणी झुळझुळत होतं. स्वच्छ, नितळ, डोळ्यांचा स्पर्श तळाला करणारं. तळाचे शेवाळी रंग मनात खुलवणारं. कुंडांच्या स्वच्छ साधेपणानं पवित्र बनलेलं. इतक्यात कुणीतरी म्हटलं, " हा मुचकुंदी नदीचा उगम." नदीचं मूळ आणि ऋषीचं कुळ — दोनही इथं भेटली होती ! आणि आमच्या पदरी साता जन्माचं पुण्य घालीत होती !

पण त्या माळाचा उभार अधिक मनस्वी होता. जिकडेतिकडे झिरंगांची झुडपं. त्यांचं एक बनच. भूगोलाच्या मास्तरांनी चहाच्या मळ्याचं वर्णन केलं होतं, त्याची आठवण झाली. पण त्या मळ्यात झिरंगाच्या वासासारखा वास उधळतो ? या वासाबरोबर खेळणारा वारा असा स्वच्छंद खेळतो ? हिरव्यात पिवळट-लालट रंगाच्या लहरी अशा मिसळतो ? डोळे हरवले, हरखले; पण फार काळ नाही. पोटात कावळे कोकलू लागले. अशी भूक जन्मात अनुभवली नव्हती. कशामुळं आली ही ? या सन्नाट वाऱ्यामुळं ? वारा खाणं म्हणजे काय हे तेव्हा समजलं. या झिरंगाच्या स्वादामुळं, स्वादामुळं गुदमरण्याचा आनंद म्हणजे काय हे तेव्हा कळलं. आम्ही एकमेकांना विसरलो. स्वतःतच निमग्न झालो. स्वानंदात बुडालो. आतलं सत्य अनुभवू लागलो. अंतरंगाचं विश्व निरखू लागलो. मुख्य म्हणजे मी लखूनानाला विसरलो. पण लवकरच भानावर आलो. पोटातल्या भुकेमुळं. सिग्रेट पेटते तशी भूक पोटात पेटत होती. मी तसं म्हटलं, त्यासरशी लखूनाना म्हणाला, " वाः ! मुंबईला जाऊन ही विद्या कमावलीस वाटतं ? आणखी कायकाय कमावलंस सांग पाहू. " माझ्या ओठाला सिग्रेटचा स्पर्श कधीच झाला नव्हता. पण लखूनानाच्या ओठातलं विष अधिक भयंकर होतं. स्वतः लखूनाना पक्का

गांजेकस होता हे सर्वांनाच माहीत होतं. पण कोणी काहीच बोललं नाही.

झिरंगाच्या माळावरचा वारा खात मीही ते विसरलो. त्या माळावरची ती रात्र. श्रमांनी सुस्तावलेली झोप आणि थंडीनं दुखरी बनलेली गात्रं यांची गाठ पडली ती अगदी अनोखी. त्या अफाट अनुभवात दुसऱ्या दिवशीच्या विशाळगडच्या सरंजामी दर्शनाची आठवण बुडाली ती कधी वर आलीच नाही. पण एक आठवण कायम राहिली. विशाळगडच्या वाटेवरची. झिरंगाच्या माळावरून उतरलो ते प्रभानवल्लीच्या खिडीत. या खिडीतच शिवाजीच्या एका शूर वीराचं नुसतं धड लढलं होतं. त्या प्रभानवल्लीच्या खोऱ्यात नजर टाकली ती नुसती तरंगत राहिली. लहरत राहिली. विहरत राहिली — त्या पुण्यप्रद आठवणीवर.

विशाळगडच्या त्या सहलीची आठवण झाली की आजही छातीत काहीतरी डसतं. आमच्याबरोबर श्रीराम होता. नावाप्रमाणं निरागस. लाजरा. अबोल. पण विलक्षण विश्वासू चेहेऱ्याचा. नुकतंच लग्न झालेलं. विशाळगडचा गड चढायला लागण्यापूर्वी त्याच्या सासुरवाडीसच आम्ही मुक्काम केला होता. त्या मुक्कामात त्याच्या पत्नीला उखाण्यासकट त्याचं नाव घ्यायला लावलं होतं. आणि त्याच्या सासऱ्यानं वडयाघारग्यांचं जेवण आम्हाला दिलं होतं. आणि नंतर दोनच महिन्यांत हा आमचा मित्र सर्पदंशानं आटोपला. सारखं वाटे, आमच्यापैकी कुणाचीतरी दृष्ट लागली त्याला !

... आमची दुसरी सहल परशुरामाची. वाटेत संगमेश्वरला मुक्काम. संगमावर स्नान करून आम्ही जेवण करायला लागलो. पाण्याला आधण आलं आणि आम्ही तांदूळ वैरणार, इतक्यात तिथं एक गृहस्थ आला नि तणतणू लागला : " आम्ही काय मेलो की काय ? आम्ही जिवंत असताना तुम्ही ब्राह्मणमंडळी गावात येता आणि धर्मशाळेत जेवण करता म्हणजे काय गोष्ट आहे ! " तो त्या आधणाप्रमाणंच तापला होता. तो तडकतो आहे तोच आमच्यापैकी एकानं झटकन तांदूळ वैरले. " पण आज माझ्याकडे मुक्काम केल्याखेरीज तुम्हाला गाव सोडताच येणार नाही ! " असा दम

त्यानं दिला. प्रेमळ दम आणि तोदेखील खोताचा. आम्हाला त्याचं निमंत्रण स्वीकारण्याखेरीज गत्यंतरच नव्हतं.

दुपार परतल्यावर त्यानं आम्हाला आपल्या वाड्यावर नेलं. गावात हिंडवलं. डोंगरावरचं देऊळ दाखवलं आणि मग आपल्या आवारात नेलं. आवार मोठं मारदस्त. चारही बाजूंनी दगडी कंपाउंड. आवारात चारदोन घुमट्या. एक प्रकारचं अंतःस्थ रहस्य उराशी धरून उभ्या. तिन्हीसांजच्या त्या किरमिजी उजेडात त्या अधिकच गूढ दिसत होत्या. त्यांतल्या एका घुमटीसमोर खोतांनी आम्हाला नेलं नि म्हटलं, "या शंकराच्या घुमटीसमोर प्रार्थना करीत असतानाच मोगलांनी शंभूराजांना पकडलं.' आम्ही सारेच चक्रावून गेलो. एवढ्या मोठ्या ऐतिहासिक रहस्याच्या ओझ्यानं भारावून गेलो. मनानं त्या महापुरुषापुढं नतमस्तक झालो. खाली मान घालून त्या घुमटीपुढं निःशब्द उभे राहिलो. खोत मात्र बोलत होते. भोसल्यांच्या घराण्याशी आपल्या घराण्याचे किती निकटचे संबंध होते आणि त्यातूनच आपल्या घराण्याला हा वाडा आणि हे आवार कसं मिळालं, याचा सनदा आणि सनावळी त्यांनी मुखरित बनलेला इतिहास ते आम्हाला ऐकवीत होते. आमची नतमस्तकता आम्हाला नकळतच शंभूराजांकडून खोतांच्या घराण्याकडे वळली. पण संशयाचा भुंगा माझं मन पोखरू लागला. या घुमटीपुढं प्रार्थना करीत असताना या आवारात संभाजी एकटाच होता काय ? त्याचे कोणी संरक्षक नव्हते काय ? संभाजीला पकडण्यापूर्वी त्याला भानावर आणणारा काही गलका उडाला नव्हता काय ? संभाजीला कुणी सावध केलंच नाही काय ? पण मी माझी शंका दाबून ठेवली. खोतांच्या वक्तृत्वपूर्ण इतिहासकथनापुढं प्रकट होण्यास तिला संधीच मिळाली नाही.

खोतांनी रात्री आमचे बिछाने माडीवर टाकले आणि आम्हाला सांगितलं, "हा तुळशीचा वाडा. तुम्ही आता संभाजीच्या रंगमहालातच आहात. स्वस्थपणं झोपा आणि छानछान स्वप्नं पहा." आम्ही अवाक झालो. मी हळूच आजूबाजूला पाहिलं. वर एक झुंबर होतं. असंख्य वर्षांची धूळ खाऊन निबर बनलेलं. एके काळी झगमगणाऱ्या लोलकांच्या गच्छंतीमुळं हताश बनलेलं. आता त्यात एकाही दिव्याची सोय नसलेलं !

बाजूच्या भिंतींवर एकदा निळ्या-पिवळ्या-जांभळ्या रंगांची राधा-कृष्णाची चित्रं असावीत असा अंदाज करण्यास जागा होती. खिडक्यांच्या चौकटी आणि दारं यांचं एका काळचं नातं पार विस्कटलं होतं, पण याचा अधिक विचार करण्यास अवसरच नव्हता. या महालात संभाजीनं कोण-कोणते विलास केले असतील याचा चविष्ट तपशील लखूनानानं आपल्या तरारलेल्या आवाजात सांगण्यास सुरुवात केली होती. त्याचाच तो अधिकार होता. त्याचंच तेवढं लग्न झालेलं होतं. लखूनानाचं वर्णन मूढमुग्ध होऊन ऐकणं एवढंच आमचं काम होतं. ते बजावता बजावताच केव्हाशी झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी संगमेश्वर सोडताना मी म्हटलं, " हे खोत काय सटासट बाता मारतात हो ! म्हणे हा तुळशीचा वाडा. तुळशी नावाची कुणी बाई तरी होती काय ? एका नाटककाराची ती काल्पनिक व्यक्ती."

त्याबरोबर त्या रत्नागिरीला शिकलेल्यांपैकी एकजण म्हणाला, " अरे जारे ! मोठा इतिहास शिकलेला ! तुमच्या पुस्तकात नसेल तुळशी. पण तेव्हा तुळशी नावाची स्त्री नव्हती याला पुरावा काय ?"

आता याला उत्तर काय देणार ?

पण त्याच्या युक्तिवादापेक्षा त्याच्या आवाजातला विखार अधिक भयंकर होता. माझा गुन्हा काय, तर मी त्याच्याहून दोनतीन यत्ता अधिक शिकलेलो होतो, आणि मुंबईवाला होतो.

मी एकदम गप्पच झालो. लखूनानानं माझ्याकडे विजयी नजरेनं पाहिलं. त्याच्या नजरेत एक नशा होती. कसली ती मी सांगू शकत नव्हतो. मी संतापानं आतून उकडून निघालो. पण काही बोललो नाही. काय बोलणार ? मुकाट्यानं पावलं टाकीत राहिलो. त्यांच्या घोळक्यापेक्षा जरा वेगळा, माझ्याबरोबर फक्त श्रीराम होता, पण तोही अबोलच होता.

आरवलीच्या रस्त्यावर एक उन्हाळं आहे तिथं आम्ही थांबलो. उन्हाळं उकळत होतं. त्याच्या वाफा येत होत्या. त्यांना गंधकाचा वास होता. एकानं कल्पना काढली, आपण या पाण्यात भात शिजतो का पाहू

या. आमच्यापाशी तांदूळ होतेच. आम्ही थोडे घेतले, त्यांची एका पंच्याच्या टोकाला पुरचुंडी बांधली आणि त्या पाण्यात धरली. चारदोन मिनिटांत ती पुरचुंडी चांगली फुगली. तांदूळ चांगले शिजले होते. आम्ही सारे चाट पडलो. काय बेफाम असेल ही उष्णता ! पुन्हा माझ्यातला अभ्यास जागा झाला. मी म्हटलं, "या पाण्यात क्षार असतात. त्यांचं पाणी उकळायला उष्णतामान जास्त लागतं. आणि म्हणून त्यात भात लगेच शिजला."

"झाला का तुझ्यातला स्कॉलर जागा !" मघाचा मित्र म्हणाला, "तू काय इथं शाळाबिळा काढणार आहेस की काय ?"

हे लोक माझे मित्र होते की शत्रू ? मुंबईला माझे वडील होते व म्हणून मी मुंबईला जाऊन थोडा शिकलो हा माझा गुन्हाबिन्हा झाला की काय ?"

त्यानंतर माझ्यापुरत्या या सहली संपुष्टात आल्या ! पण झाल्या त्याच पुऱ्या होत्या. त्यांच्या स्मृती मी खोल कुठेतरी गाडल्या होत्या. पण आता त्या जाग्या झाल्या. आरवलीचीच गोष्ट. आरवलीच्या उन्हाळ्यावर आम्ही आंघोळ करू लागलो, तोच लखूनानानं म्हटलं, "काय बाबूराव, तुमच्या जानव्याला दोन गाठी दिसतात !"

मी मुंबईला जाऊन बिघडलो, धर्मबिर्म बुडवला, याबद्दल लखूनानाला संशय नव्हता. संगमेश्वरची गोष्ट. आम्ही गावात शिरल्याबरोबर थेट संगमावर गेलो. त्या दृश्यानं आमचे डोळे निवले. थकवा पळाला. पाण्यात पाय बुडवल्याबरोबर पायांना विश्रांती मिळाली. ती थंडगार विश्रांती नसानसांतून शिरली, अंगभर पसरली. आम्ही थोडा वेळ तसेच पाण्यात पाय बुडवून बसलो. ती थंडाई रक्तात खेळवीत. निःशब्द शांततेनं मनाचा थकवा घालवीत. संगमात एकमेकात मिसळणाऱ्या पाण्यांच्या लयदार खळाळीनं कानांत चैतन्य ओतीत. त्या मधल्या छोट्या देवळासभोवतालच्या दगडांभोवती आणि दर्भांच्या बेटांभोवती. आई घरात मुलाभोवती माया पखरीत वावरते तसं पाणी वावरत होतं. जरा वेळानं माझं एका बेटाकडे लक्ष गेलं. त्या बेटाचं दर्भ मुक्त पसरलं होतं. मी म्हटलं, "हे बेट काय झकास आहे. मला विश्वामित्राची आठवण होत्येय."

त्याबरोबर शेंडी झाडीत लखूनाना म्हणाला, "आवडायचंच ! तुझ्या डोक्यावरच्या झिपऱ्या तशाच आहेत ना !" माझ्या राखलेल्या केसांना हा टोला होता.

त्या दिवशी संध्याकाळी — परशुरामाच्या वाटेवर मावळतीच्या सूर्यवेळी आम्ही सारे एका नदीत बसलो. वहात्या प्रवाहाच्या काठी संध्येचं अर्घ्य देत. लखूनानाची तर समाधीच लागली ! विरक्त चेहेऱ्यावर संध्येचं पावित्र्य ! जरा विशविशित इतकंच ! इतक्यात नदीच्या पायातल्या एका शिळेवरून एक पक्षी उडाला — विचित्र आवाज काढीत. मी म्हटलं, "काय हा आवाज !" त्याच शांत, स्तब्ध, मिटलेल्या डोळ्यांच्या चेहेऱ्यानं लखूनाना उद्‌गारले, "कोण बोललं हे ? बाबूराव का ? छान !" माझ्या अद्‌भुत आवाजावर घासलेला हा विखार सर्वांनाच समजला. बहुतेकांची संध्या हसण्यात बुडाली !

आता या आठवणी खदखदू लागल्या. त्यांचा इत्यर्थ पूर्वी कधी ध्यानात आला नव्हता तसा आला. हे लोक माझे नाहीत. मी त्यांचा नाही. मी त्यांच्यांत बसु शकत नाही. त्यांच्यांत मला जागा नाही.

मी ओटीवर आलो. बिछान्यावर पडलो. तळमळत. डोक्यात विचार वेडेवाकडे गरगरत होते. एकदम ठरवलं, कोकण सोडायचं. मुंबईला पुन्हा ताप आला तर त्यातच मरायचं; पण कोकणात यायचं नाही. कोकणात मला स्थान नाही.

हा निश्चय झाला नि मन ताळ्यावर आलं. लगेच झोप लागली.

सकाळी जागा झालो नि नजर अंगणात गेली. तिथं कपिलेचं वासरू ! नेहेमीप्रमाणे वारा प्यालेलं. कान मागंपुढं करीत जमीन हुंगत होतं. हुंगताहुंगता एकदम उडालं. पुन्हा उभं राहिलं — टपोऱ्या डोळ्यांनी पहात. चारदोन अलगद पावलं टाकून पुन्हा उडालं ! मी कोकण सोडणार होतो; पण त्याबरोबर याला मुकणार होतो.

अशा कितीतरी गोष्टींना मुकणार होतो —

— दत्ताच्या देवळातील भजनाला आणि वासू गुरवाच्या गाण्याला.

— केदारलिंगाच्या देवळातील नागचाफ्याच्या फुलांना.

— पौलस्तेश्वराच्या देवळातील वार्षिक जत्रेला आणि तेव्हाच्या नाटकातल्या बंडू पाथऱ्याच्या इष्किबाज कामाला.

— पऱ्ह्याकाठच्या शंकराच्या देवळाला.

आत कुठंतरी वेदना उठली.

पण नाही. हे कोकण तुझं नाही. ते घरजावयांना आंदण दिलेलं आहे.

तू नीघ.

कोकणावर प्रेम कर. पण दुरून ! ...

# माझी स्वप्नयात्रा

आपली झोप ही एक स्वप्नयात्रा असते. मी रोज सकाळी उठतो तो कोणत्यातरी विलक्षण दृश्याची स्मृती पापण्यांवर खेळवीत. माझ्या झोपेची कृतार्थता या दृश्यांच्या साधनेत असते. माझ्या झोपेला स्वप्न-दृश्यांचं एक सुंदर अस्तर असतं. मला जीवनानं अनेकदा दगा दिलेला आहे; पण स्वप्नांनी दिलेला आठवत नाही. दुःस्वप्नांनी माझी झोप सहसा बिघडवलेली नाही. निष्पाप व्यक्तीला दुःस्वप्नं भेडसावीत नाहीत असं म्हणतात. हे खरं असेल तर मी निष्पाप आहे असंच म्हटलं पाहिजे. (कदाचित बेरड आहे असं म्हणावं लागेल !)

मी कविता लिहिलेली नाही. पण मी कवी नाही अशी ग्वाही मी देऊ शकत नाही. माझ्या स्वप्नांची तशी परवानगी नाही. शरदऋतूत कोकणचा माळ सोनावळीच्या फुलांनी फुललेला असतो, तसा फुललेला आकाशपट माझ्या मनासमोर (झोपेत) उलगडलेला आहे. उजळलेल्या ज्योतींचे दिवे पाण्यावर तरंगत तरंगत, आपला उजेड डोळ्यांची उघडझाप व्हावी तसा कमीजास्त करीत, कॅलिडोस्कोपमधील दृश्यं बदलावी तसे आपल्या गटांचे आकृतिबंध बदलीत माझ्या डोळ्यांसमोरून गेलेले आहेत. रंगीत स्वप्नं सहसा पडत नाहीत असं शास्त्रज्ञ सांगत असले तरी रंगतदार फुलांचे ताटवे निरखीत मी स्वप्निल उद्यानातून हिंडलेला आहे. बर्फमय भूमीवर सुवर्णप्रकाशाने उजळलेलं काळसर बांधणीचं चर्च मी पाहिलेलं आहे. एकदा मी एका नदीचं विशाल पात्र पार करून पलीकडच्या घाटा-

वरील एका प्रासादात शिरलो, त्याच्या एका दालनातून दुसऱ्या दालनात गेलो, अनेक रिकाम्या उजाड दालनांतून हिंडलो आणि उजाडरसाचा मुक्त अनुभव घेऊन जागा झालो. एकदा एका स्वप्नात मी इण्डोनेशिआला जाताना पाहिलेली, वनश्रीनं ओतप्रोत भरलेली बेटं पूजेची तबकं बनून प्रदर्शनात मांडून ठेवल्यासारखी पाहिली. ही व अशी अनेक स्वप्नदृश्यं विस्मृतीच्या धुक्यात शिरतात, आणि मी प्रयत्नपूर्वक हे धुक्याचं आवरण फाडण्याचा प्रयत्न करतो. कारण मग मी स्वतःला सुखवू शकतो की, मी आरती प्रभू किंवा कुसुमाग्रज यांच्या कोटीतला आहे. मला याची रोज साक्षच मिळते. अर्थात ही साक्ष अगदी खाजगी असते; तिला वस्तुगत पुरावा काहीच नाही. (आणि म्हणून तिला वस्तुगत किंमतही नाही.) पण येथे वस्तुगत पुराव्याची गरजच नाही. ही एक वैयक्तिक प्रतीतीची गोष्ट आहे. अगदी एखाद्या खाजगी गुपितासारखी. या गुपिताचं माहात्म्य त्या गुपितातच साठवलेलं असतं. आणि त्यानं एक आश्वासन मिळतं. आश्वासन एवढंच की, वस्तुगत पुराव्याखेरीज एक शब्दही ऐकून घेण्यास तयार नसलेले तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ फजूल आहेत. विद्यापीठांच्या विश्वात त्यांची विद्वत्ता निर्विवाद ठरत असेल; पण त्यांचं ज्ञान एका जादूमय विश्वाला वंचित झालेलं असतं.

येथे एखादा शास्त्रज्ञ मला हटकेल आणि म्हणेल, "तुमचं हे गुपित आता गुपित राहिलेलं नाही. आम्ही तुमच्या स्वप्नांचा शोध घेतलेला आहे. तुम्हाला स्वप्नं केव्हा पडतात हे आम्ही सांगू शकतो. त्याचा आलेखदेखील काढू शकतो." हे खरंच आहे. आम्हाला स्वप्न पडू लागलं की आमच्या बुबुळांच्या हालचालींवरून आम्हाला स्वप्न पडत आहे हे शास्त्रज्ञांना अचूक कळतं, ते आमचा स्वप्नभंगसुद्धा करू शकतात. म्हणजे स्वप्न पडू लागल्याबरोबर ते आम्हाला जागे करून आमच्या स्वप्नांची मालिका तोडू शकतात. आणि तरी ते आमची स्वप्नं हिरावून घेऊ शकत नाहीत. आमची आजची स्वप्नं छिनली; तर उद्या आपण ती दुप्पट पाहू शकतो. आणि काही म्हटलं तरी शास्त्रज्ञ आमची स्वप्नं रेखतात म्हणजे काय ते आमची स्वप्नं पाहू शकतात ? आम्हाला स्वप्नं पडत आहेत हे त्यांना कळत असेल; पण आमचं स्वप्न ते आमचंच गुपित. आमचंच ते रहस्य.

आमच्याच अनुभवातून आमच्याच प्रतिभेनं निर्मिलेलं — खास आमच्या-साठी.

कारण मी जे अनुभवतो ते खास माझंच असतं. माझ्याच पृथगात्म आकलनातून निर्माण झालेलं. मी जे अनुभवतो ती माझ्या संज्ञाशक्तीची माझ्यासाठी देणगी. तुम्ही नि मी एकच वस्तू, एकच देखावा, एकच निसर्गदृश्य, एकच प्रसंग पाहिला तरी त्याचं तुमचं आकलन निराळं आणि माझं निराळं. माझा अनुभव माझ्या आकलनातून निर्माण होतो, आणि म्हणून तो माझा खास आगळावेगळा असतो. माझी स्वप्नं माझ्या या आगळ्या अनुभवातून निर्माण झालेली असतात. माझी प्रतिभा माझ्या अनुभवाची मूलद्रव्यं घेते, म्हणजे रसरंगगंधनादादी कळा घेते, आणि त्याच्या प्रतिमा निर्माण करते. स्वप्न म्हणजे अशा प्रतिमांची मालिका — तीही आगळी अन् वेगळी, स्वतंत्रप्रज्ञ !

अलीकडे एकदा रात्री झोपण्यासाठी गादीवर पडलो तर बाहेर एक कुत्रं कुई–कुई करीत होतं. आता कसली झोप, हे कुत्तरडं त्याचं खोबरं करणार, अशा चिंताक्रांत विचारानं डोळे मिटले. आणि झोप लागली ! आणि एकदम एक सोडून दोन कुत्री कुई–कुई करू लागली — स्वप्नात ! आमच्या इमारतीच्या पलीकडेंच एक नवी सृष्टी निर्माण झाली. या सृष्टीच्या पार्श्व-भूमीवर दोन आवारं आणि त्यांत दोन बंगले. आवारं समोरासमोर. मधून रस्ता. माझे दोन जिवलग मित्र आवाराच्या दारात उभे राहून गप्पा मारीत होते. आणि त्यांच्या हातात साखळीनं बांधलेले आणि साखळीला करकचून ओढ घेत एकमेकावर भुंकणारे दोन कुत्रे ! भुंकणारे — म्हणजे कुई–कुई आवाज काढणारे ! स्वप्नातलं त्यांचं भांडण ' कुई–कुई ' आवाजानं चाललं होतं !

या स्वप्नाची गंमत अशी की, माझ्या या दोनही मित्रांना कुत्र्याचा नाद अजिबात नाही, आणि त्यांच्यापैकी एकाला तर कुत्र्याची भीतीच वाटते ! स्वप्नं निर्माण करणारी प्रतिभा अशी मिस्किल असते. ती आपल्या अनुभवांच्या परिसरात वावरते. तो परिसर ओलांडण्याची ताकद तिच्यापाशी

नाही; पण या परिसरातली द्रव्यं घेऊन अनेकदा अतिशय अकल्पित रचना ती करते.

अशी अनेक अकल्पित स्वप्नं माझ्या प्रतिभेनं मला दाखवलेली आहेत. (तुमच्या प्रतिमेने तुम्हाला दाखवलेली असतील.) हे स्वप्न पहा. मला हाँगकाँग शहरावर लिहायचं असतं. म्हणून एनसायक्लोपीडिआ ब्रिटानिकाचे खंड पहाण्यासाठी मी फर्गसन कॉलेजात जातो. फर्गसन कॉलेज म्हणजे आमचे अर्धगॉथिक वास्तुशिल्पाचे नव्हे. अगदी नव्या नितळ इमारतींनी नटलेलं. मी लायब्ररीत जाऊन चौकशी करतो, तर त्यांच्याकडे तो विश्वकोश नाहीच ! म्हणून युनिव्हर्सिटी लायब्ररीत जातो. या लायब्ररीचाही पूर्ण कायापालट झालेला. लायब्ररीतला एक गृहस्थ मला म्हणतो की, एन्सायक्लोपीडिआऐवजी मी हाँगकाँगहून येणारं एक नियतकालिक का वाचीत नाही ? तो त्याचा एक अंक मला देतो. मी तो चाळतचाळत ग्रंथालयातून बाहेर पाऊल टाकत असताना, त्या नियतकालिकात 'हाँगकाँगवर लाल चीनची स्वारी' असा मथळा पहातो. — आणि मी एकदम अशा हाँगकाँगमधे ! हाँगकाँगमधे पळापळ चाललेली असते. चिनी पोशाखांतली बायकापोरं पळत असतात. मीही त्यांच्यांत सामील होतो. क्षणात आम्ही एका इमारतीत असतो. पळतच. पळताना माझ्याबरोबर माझी एक बहीण असते — आपल्या आवदहा वर्षांच्या मुलाचा हात धरून. उंच शेलाटी बाई, पूर्वी कधीही न पाहिलेली. पण आता माझी बहीण ! आम्ही सारे पळत एकमेकांशी झोंबाझोंबी करीत एका लिफ्टमध्ये शिरतो. लिफ्ट सुरू होतं आणि खाली जाऊ लागतं. खूप खाली खाली — तळघरात. आणि मग येऊन थांबतं ते थेट सिंगापुरात ! पण आता बहीण नाही, तिचा मुलगाही नाही. दोघेही गायब ! बाप रे ! कुठे गेली ? मग मी संबंध सिंगापूरभर तिला शोधीत भटकतो. कोणीतरी सांगतो की, गावाबाहेर समुद्रकाठी निर्वासितांची वस्ती आहे, तिच्यात ती असेल. तो मला एका टेकडीवर नेतो आणि तो भाग दाखवतो. डावीकडे खूप दूरवर पसरलेला डोंगराळ भाग. उजवीकडे समुद्र नजर पोचेतो पसरलेला. मधल्या किनाऱ्यावर एक वस्ती. अगदी एकाकी. सारं दृश्य एका धुकट निळसर वातावरणात ! मी त्या वस्तीकडे जायला निघणार, इतक्यात कोणीतरी सांगतो,

स्वप्नातील तर्कशास्त्र वापरून सांगतो की ती वस्ती तेथं दोन वर्षं आहे, त्यात माझी बहीण असण्याचा संभव नाही. मग पुन्हा शोध आणि पुन्हा भटकंती. इतक्यात बहीण भेटते नि मी जागा होतो.

आता हे दुसरं स्वप्न पहा. पु. ल. देशपांडे, सुनीता देशपांडे, कमल (माझी पत्नी) आणि मी — आम्ही चौघे कुठल्यातरी अपरिचित गावी येतो. सहज सहलीला म्हणून. मुक्काम एका चौकोनी-चौकोनी आकारांची जाणीव करून देणाऱ्या बंगल्यात. संध्याकाळच्या सुमारास आम्ही फिरायला निघतो. एकदम शहराचा बराच भाग पार करून आम्ही एका रस्त्यावर येतो. समोर एक पूल. उजवीकडे बराच मोकळा वैराण भाग; पण त्याच्या-वर दहाबारा चंद्रमौळी झोपड्या. आणि डावीकडे ? एक तळं — समोर पुलापर्यंत आणि डावीकडे एका उभ्या पहाडापर्यंत पसरलेलं. आमच्या बाजूला रस्त्याच्या कडेनं त्याला एक बांध. त्या बांधावर अनेक स्त्री-पुरुष. कोणी अंघोळ करीत आहे, कोणी कपडे धूत आहे. कोणी भांडी घाशीत आहेत. मागचा उभार कडा उंचउंच होत गेलेला आणि अर्धकमानीसारखा वाकून तळ्याच्या पाण्यावर आलेला. त्या कड्याच्या माथ्यावर खालच्या बांधावरल्यासारखेच स्त्रीपुरुष. कोणी कपडे धूत आहे, कोणी भांडी घाशीत आहे आणि कोणी अंघोळ करीत आहे. यासाठी लागणारं पाणी ते खालच्या तळ्यातून पोहऱ्याने खेचीत आहेत ! आम्ही ते दृश्य पहातो, चकित होतो आणि चालू लागतो, तोच आमचा पुलाखालून जाणारा रस्ता नाहीसा होतो, व मी जागा होतो.

हे आणखी एक अकल्पित दृश्य पहा, मी अमेरिकेत बॉस्टनला आलेला असतो. तेथं मला एक व्याख्यान द्यायचं असतं. माझा मुक्काम एका दणकेबाज इमारतीत असतो. पण इमारतीत कोणी नसतं. माझ्या स्वाधीन पहिल्या मजल्यावरची एक प्रशस्त खोली. अगदी निर्लेप. रिकामी. फर्निचरचा मागमूस नाही. खोलीच्या मधोमध माझी बॅग. सताड उघडी ! उस्कटलेली. मी माझी डायरी शोधत आहे. संध्याकाळच्या व्याख्यानाची टिपणं त्यात काढलेली असतात. सापडत नाही. मी जाम वैतागतो. इतक्यात आठवतं. मघा तळमजल्यावरच्या टॉयलेटमध्यं गेलो होतो. तेथे विसरलो असेन. जिना उतरून जातो. टॉयलेटमधे शोधतो. सगळं कसं लख्ख लख्ख !

नाही; पण या परिसरातली द्रव्यं घेऊन अनेकदा अतिशय अकल्पित रचना ती करते.

अशी अनेक अकल्पित स्वप्नं माझ्या प्रतिभेनं मला दाखवलेली आहेत. (तुमच्या प्रतिभेने तुम्हाला दाखवलेली असतील.) हे स्वप्न पहा. मला हाँगकाँग शहरावर लिहायचं असतं. म्हणून एनसायक्लोपीडिआ ब्रिटानिकाचे खंड पहाण्यासाठी मी फर्गसन कॉलेजात जातो. फर्गसन कॉलेज म्हणजे आमचे अर्धगॉथिक वास्तुशिल्पाचे नव्हे. अगदी नव्या नितळ इमारतींनी नटलेलं. मी लायब्ररीत जाऊन चौकशी करतो, तर त्यांच्याकडे तो विश्वकोश नाहीच ! म्हणून युनिव्हर्सिटी लायब्ररीत जातो. या लायब्ररीचाही पूर्ण कायापालट झालेला. लायब्ररीतला एक गृहस्थ मला म्हणतो की, एन्सायक्लोपीडिआऐवजी मी हाँगकाँगहून येणारं एक नियतकालिक का वाचीत नाही ? तो त्याचा एक अंक मला देतो. मी तो चाळतचाळत ग्रंथालयातून बाहेर पाऊल टाकत असताना, त्या नियतकालिकात 'हाँगकाँगवर लाल चीनची स्वारी' असा मथळा पहातो. — आणि मी एकदम अशा हाँगकाँगमधे ! हाँगकाँगमधे पळापळ चाललेली असते. चिनी पोशाखांतली बायकापोरं पळत असतात. मीही त्यांच्यांत सामील होतो. क्षणात आम्ही एका इमारतीत असतो. पळतच. पळताना माझ्याबरोबर माझी एक बहीण असते — आपल्या आठदहा वर्षांच्या मुलाचा हात धरून. उंच शेलाटी बाई, पूर्वी कधीही न पाहिलेली. पण आता माझी बहीण ! आम्ही सारे पळत एकमेकांशी झोंबाझोंबी करीत एका लिफ्टमध्ये शिरतो. लिफ्ट सुरू होतं आणि खाली जाऊ लागतं. खूप खाली खाली — तळघरात. आणि मग येऊन थांबतं ते थेट सिंगापुरात ! पण आता बहीण नाही, तिचा मुलगाही नाही. दोघेही गायब ! बाप रे ! कुठे गेली ? मग मी संबंध सिंगापूरभर तिला शोधीत भटकतो. कोणीतरी सांगतो की, गावाबाहेर समुद्रकाठी निर्वासितांची वस्ती आहे, तिच्यात ती असेल. तो मला एका टेकडीवर नेतो आणि तो भाग दाखवतो. डावीकडे खूप दूरवर पसरलेला डोंगराळ भाग. उजवीकडे समुद्र नजर पोचेतो पसरलेला. मधल्या किनाऱ्यावर एक वस्ती. अगदी एकाकी. सारं दृश्य एका धुकट निळसर वातावरणात ! मी त्या वस्तीकडे जायला निघणार, इतक्यात कोणीतरी सांगतो,

स्वप्नातील तर्कशास्त्र वापरून सांगतो की ती वस्ती तेथं दोन वर्षं आहे, त्यात माझी बहीण असण्याचा संभव नाही. मग पुन्हा शोध आणि पुन्हा भटकंती. इतक्यात बहीण भेटते नि मी जागा होतो.

आता हे दुसरं स्वप्न पहा. पु. ल. देशपांडे, सुनीता देशपांडे, कमल (माझी पत्नी) आणि मी — आम्ही चौघे कुठल्यातरी अपरिचित गावी येतो. सहज सहलीला म्हणून. मुक्काम एका चौकोनी–चौकोनी आकारांची जाणीव करून देणाऱ्या बंगल्यात. संध्याकाळच्या सुमारास आम्ही फिरायला निघतो. एकदम शहराचा बराच भाग पार करून आम्ही एका रस्त्यावर येतो. समोर एक पूल. उजवीकडे बराच मोकळा वैराण भाग; पण त्याच्या-वर दहाबारा चंद्रमौळी झोपड्या. आणि डावीकडे ? एक तळं — समोर पुलापर्यंत आणि डावीकडे एका उभ्या पहाडापर्यंत पसरलेलं. आमच्या बाजूला रस्त्याच्या कडेनं त्याला एक बांध. त्या बांधावर अनेक स्त्री–पुरुष. कोणी अंघोळ करीत आहे, कोणी कपडे धूत आहे. कोणी भांडी घाशीत आहेत. मागचा उभार कडा उंचउंच होत गेलेला आणि अर्धकमानीसारखा वाकून तळ्याच्या पाण्यावर आलेला. त्या कड्याच्या माथ्यावर खालच्या बांधावरल्यासारखेच स्त्रीपुरुष. कोणी कपडे धूत आहे, कोणी भांडी घाशीत आहे आणि कोणी अंघोळ करीत आहे. यासाठी लागणारं पाणी ते खालच्या तळ्यातून पोहऱ्याने खेचीत आहेत ! आम्ही ते दृश्य पहातो, चकित होतो आणि चालू लागतो, तोच आमचा पुलाखालून जाणारा रस्ता नाहीसा होतो, व मी जागा होतो.

हे आणखी एक अकल्पित दृश्य पहा. मी अमेरिकेत बॉस्टनला आलेला असतो. तेथं मला एक व्याख्यान द्यायचं असतं. माझा मुक्काम एका दणकेबाज इमारतीत असतो. पण इमारतीत कोणी नसतं. माझ्या स्वाधीन पहिल्या मजल्यावरची एक प्रशस्त खोली. अगदी निर्लेप. रिकामी. फर्निचरचा मागमूस नाही. खोलीच्या मधोमध माझी बॅग. सताड उघडी ! उस्कटलेली. मी माझी डायरी शोधत आहे. संध्याकाळच्या व्याख्यानाची टिपणं त्यात काढलेली असतात. सापडत नाही. मी जाम वैतागतो. इतक्यात आठवतं. मघा तळमजल्यावरच्या टॉयलेटमध्यं गेलो होतो. तेथे विसरलो असेन. जिना उतरून जातो. टॉयलेटमधे शोधतो. सगळं कसं लख्ख लख्ख !

डायरी सापडत नाही. परत येताना जिन्याजवळचा फ्लॅट उघडा दिसतो. आतल्या खोलीत दोन सफेद पायजमा–झब्बा घातलेले महाराष्ट्रीय ब्राह्मण तरुण, आणि बाहेरच्या खोलीत मधोमध एक सामानाने भरलेला गोणता, आणि त्याच्या शेजारी एक घाऱ्या डोळ्यांची, चित्पावनी चेहेऱ्याची, नऊवारी लुगड्यातली वयस्क स्त्री उभी. आणि जाणवतं की, ते आतल्या खोलीतले तरुण पुण्याच्या सदाशिव पेठेत छान शोभतील. मी तिला माझ्या डायरीसंबंधी विचारतो. ती म्हणते, "थांबा हं ! गोणत्यात शोधते." ती त्या उभ्या उघड्या तोंडाच्या गोणत्यात हात घालते, आणि आतुन कपडे, बोचकी, भांडी वगैरे जिन्नस काढते. एक टूथ-ब्रशही काढते. आणि मग एक पुस्तक. हिरव्या बायंडिंगचे. मजबूत. 'ही पहा तुमची डायरी का' असे म्हणून ती ते पुस्तक माझ्यापुढे करते. ती हेमिंग्वेच्या 'आयलंड इन द स्ट्रीम' कादंबरीची प्रत असते. मी म्हणतो, "ही माझी डायरी नव्हे." ती चेहेरा कसानुसा करते. मी तिचा निरोप घेतो आणि जिना चढून वर येतो. त्या जिन्याच्या सॉलिड, पॉलिश्ड पायऱ्या माझं लक्ष वेधून घेतात. या इमारतीत लाकूड बरंच वापरलं आहे, आणि ते किमती, मजबूत आणि देखणं असतं व अमेरिकन वैभवाची साक्ष देतं असं जाणवतं, व मी जागा होतो,

काय या स्वप्नांचा अर्थ ? फ्रॉयडने स्वप्नांची चौकशी केल्यापासून, त्यांचा अर्थ लावण्याची एक तलस्पर्शी पद्धत काढल्यापासून स्वप्नांचा खोल अर्थ पहाण्याची एक फॅशनच बनली आहे. पण अशा स्वप्नांच्या अर्थापेक्षा त्यांची अल्कपित रचनाच माझ्या मनाचा वेध घेते. अशी ही अफलातुन स्वप्नं. त्यांच्या मुळाशी असलेल्या नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेनंच माझं लक्ष वेधून घेतलं आहे. ही प्रतिभा स्थलकालाची अगर वास्तवाची सुसंगती जाणीत नाही. सत्याची पत्राज बाळगीत नाही. वस्तुस्थितीचे संकेत पाळीत नाही. एकदा मी महात्मा गांधींना रस्त्याकाठच्या बाकड्यावर बसुन एका मुस्लिम पुढाऱ्याबरोबर हिंदुस्थानच्या भवितव्याची चर्चा करताना पाहिलं. महात्मा गांधी कसे ? नेहेमीचे पंचा नसलेले लुकडे ? छट् ! चांगले धिप्पाड बांध्याचे, धोतर नेसलेले, नेहरू-झब्बा आणि जाकिट घातलेले आणि डोक्यावर गांधीटोपी ठेवलेले ! मी त्या दृश्यानंच बांधला गेलो. मागं एक

टेकडी. टेकडीवर देवदार–सुरूंचे भरगच्च जंगल. रस्ता रिकामा. निवान्त वेळ. हे बोलताहेत, आणि फारसं काही विलक्षण घडतं आहे याची अगदी पुसट जाणीव असणारा मी तेथून जात आहे. मला आठवतं, गांधींच्या अंगातलं जाकिट पिवळं, त्यांच्या गव्हाळी डोक्यावरची टोपी पांढरी स्वच्छ आणि मागचं जंगल हिरवं–काळट !

काही स्वप्नांना तत्कालीन संदर्भ असतो. बांगलामुक्तीनंतर मी आणि कमल (माझी पत्नी) ढाक्क्याला गेलो. मुजिबूर रहमानना भेटायला. एक झोपडीवजा घर. समोरच्या विस्तीर्ण अंगणात बांबूचे तट्टये लावून लहान-लहान भाग केले होते. अनेक गरीबगुरीब बंगाली शेतकरी वगैरे लोक एकेका भागात वाट पहात बसले होते. एका भागात मोठमोठे चुले पेटले होते आणि त्याच्यावर भात–आमटी तयार होत होती. आम्हीसुद्धा मुजिबूर रहमानच्या भेटीची वाट पहात बसलो होतो. मी कमलला म्हणतो, " मी नुसता त्यांना भेटेन. त्यांच्याशी काय बोलायचं ते तू बोल — तू त्यातली आहेस." नि मी जागा होतो.

काही स्वप्नांना मोठा मजेदार अर्थ असतो. नेहरू वारले त्या दिवशी मला पडलेलं स्वप्न असंच अर्थपूर्ण आहे. नेहरू आमच्या पिढीचं दैवत. पण नेहरूंशी आपलं नातं नक्की कोणतं हे मला कधीच कळलं नाही. नेहरूंवर मी खूप प्रेम केलं. त्यांची देखणी मूर्ती डोळ्यांत साठवली. त्यांचा आर्त आवाज कानांत साठवला. त्यांची सांस्कृतिक शान मनात ठसवली. त्यांचे सुश्लिष्ट इंग्रजी अधीर वृत्तीनं वाचलं. पण त्यांचं धोरण फारसं कधी पटलं नाही. त्यांचे सोव्हिएट पक्षपाती पवित्रे कधी भावलेच नाहीत. त्यांच्यावर खूप टीका मी केली. पण नेहेमी या जाणिवेनं, की काही म्हटलं तरी अखेरीस हा माणूस आपला. दिल्लीला त्यांच्या निवासस्थानावरून जाई, मन आत कोठंतरी चोरटं बने. कसली तरी अपराधाची भावना मनात दाटे. पण पटत नसे. मन झगडा करीत राही. अखेरीस नेहरू वारले त्या दिवशी हा झगडा संपला. त्या दिवशी एक स्वप्न पडलं— माझे वडील वारल्याचं. एका निरुंद खोलीत वडिलांचं प्रेत ठेवलेलं होतं. शेजारी खुर्चीवर माझा मुलगा बसला होता. आणि मी दरवाज्यात उभा राहून पहात होतो. वडील पंधरा वर्षांपूर्वीच वारलेले होते; पण त्या दिवशी त्या स्थितीत स्वप्नात आले — माझं व नेहरूंचं नातं स्पष्ट करण्यासाठी.

एखादं स्वप्न नुसतंच अर्थपूर्ण नसतं, तर अर्थाचा शोध घेतं. 'सौंदर्य-मीमांसा'कार रा. भा. पाटणकरांनी (माझ्या स्वप्नात) सौंदर्यशास्त्राच्या अभ्यासाची एक महत्त्वाकांक्षी योजना आखली. नुसती आखलीच नव्हे, तर ती जवळजवळ आकारास आली होती. म्हणजे पाठशालेच्या इमारती तयार होत्या. ग्रंथालयात ग्रंथ होते. इतर सुविधा होती. सेक्रेटरी वगैरेंची नेमणूक झाली होती. सेक्रेटरी सौंदर्यशास्त्राच्या अभ्यासिकेस शोभेशी होती. विद्यार्थीही जमा झाले होते. सौंदर्यशास्त्राचे पाठ घेण्यास आतुर होते. पाठ देण्यास खुद्द पाटणकरांसारखे लोक सज्ज होते. पण योजना काही कार्यवाहीत येत नव्हती. कुठंतरी घोडं पेंड खात होतं. काय मानगड होती, समजत नव्हतं. आम्ही शोध घेत होतो. नाना स्पष्टीकरणं देत होतो. घेत होतो. अखेरीस शोध लागला. (अर्थात स्वप्नात.) तो एवढाच की, ज्या मूळच्या देणगीच्या जोरावर पुढचा डोलारा उभा रहाणार होता त्या देणगीचाच पत्ता नव्हता !

एखाद्या स्वप्नाचा अर्थ गूढ असतो. माझे काका वारले त्या दिवशी पडलेलं हे स्वप्न पहा. काका स्वतःलाच पोचवून आले होते. अंघोळीसाठी ते खालच्या विहिरीवर गेले. विहिरीपासून जरा दूर एका दगडावर बसले. डोणीतून पाणी काढून आपल्या अंगावर घाल असं मला सांगताहेत. ते स्वतः पाणी घेऊ शकत नाहीत; कारण ते डोणीला शिवू शकत नाहीत. कारण त्यांना विटाळ आहे. ते मरतिकाला पोचवून आले आहेत. मी डोणीत तांब्या बुडवून काढतो नि त्यांच्याकडे पहातो. त्यांची मूर्ती नेहेमीसारखीच. जरा काळसर चेहेऱ्याची. भिवईवरची शीर फुगलेली. पण चेहेरा जरा धूसर आणि डोळ्यांतील बुबुळांच्या ठिकाणी दोन पेटते निखारे ! काका गेल्यावर मला त्यांची दोनतीन स्वप्नं पडली; पण हे स्वप्न मनात अद्याप ज्योती-सारखं तेवतं आहे.

कधीकधी विलक्षण कृतिशील स्वप्न पडतं. परस्परांपासून अनेक योजने दूर असलेल्या कुणाचं तरी कुणाशी तरी लग्न जमवण्यासाठी एक अफलातून आटापिटा. अनेक अपरिचित व्यक्तींना आणि ठिकाणांना भेट. त्यात एक प्रचंड इमारत, आणि तीत वावरणारा महत्त्वाचा पण किराण्या व्यापाऱ्याप्रमाणं दिसणारा कळकट पुरुष. तो एका वसतिगृहाचा प्रमुख

असतो. त्या वसतिगृहात त्याची तितकीच कळकट बायकोपोरं खुशाल वावरतात. तो माझ्याशी जानवं ओढीतओढीत बोलतो. काय ते कळत नाही, पण मी मोठ्या कामगिरीवर निघतो. अनेक अपरिचित ठिकाणं पायाखाली घालतो. अनेक अनोळखी इमारतींतून जातो व येतो. त्या भानगडीत एका सुसज्ज फ्लॅटमध्यें सकाळची अंघोळ उरकून घेतो. डोक्यात एक छंदोबद्ध संहिता तयार करायची असते. त्यासाठी अनेकांना भेटायचं असतं. अनेकांकडची कागदपत्रं तपासायची असतात. वायरलेसनं लग्न लावायचं असतं व त्याच्याशी संहितेचा संबंध असतो. संहिता तयार होते. मग हे वायरलेस–प्रकरण नीट जमावं म्हणून एका मोडक्यातोडक्या टेपरेकॉर्डरशी यांत्रिक खटाटोप करतो. अखेर तो दुरुस्त होतो आणि तिकडे कनेक्शन लावण्याचा प्रयत्न करतो — आणि तो फसतो. पण जागा होण्याच्या या क्षणापर्यंत सारी धडपड आणि धडधड अतिशय आशापूर्ण अंतःकरणानं चालते. ही धडपड आता जागेपणी मुळीच सुसंगत वाटत नाही; पण स्वप्नात ती एखाद्या कादंबरीतील प्रसंगांच्या साखळीप्रमाणं जुळत जाते. एका क्रियाशील ईर्ष्येनं ती भारलेली असते आणि विलक्षण आशयपूर्ण वाटत असते.

आता एक विभिन्न विसंगत अनुभव एकत्र आणणारं स्वप्न सांगतो. माझ्या एका मामाची मुलगी वारल्यामुळं मामीच्या समाचारासाठी मी कोकणात एका खेडेगावी जातो. या माझ्या मामानं माझ्याशी एका महत्त्वाच्या व्यवहारात लबाडी केलेली असल्यामुळं त्याच्याकडे उतरायचं नाही असं ठरवून त्या गावातच रहाणाऱ्या दुसऱ्या मामेबहिणीकडे मुक्कामास जातो. गावच्या त्या आळीत सर्व प्रातर्विधींची जी सामुदायिक व्यवस्था असते तिनं मी थक्क होतो. तशी व्यवस्था मी दुसरीकडे कुठंही पाहिलेली नाही, ती सार्वत्रिक अनावृत असते, पण निसर्गनिर्मित नसते. माणसानं आपलं वास्तुशिल्पीय कौशल्य वापरून ती तयार केलेली असते. उदाहरणार्थ सामूहिक संडासाला स्वच्छसफेत गुळगुळीत टाइल्स वापरलेल्या असतात. असो. कसाबसा तयार होऊन मी बाहेर पडतो नि क्षणात एका चौकात उभा असतो. तेथे गर्दी करून जमलेल्या ऐटबाज अप्‌टुडेट मोटारींकडे पहात ! (अशा मोटारींचा मेळावा अमेरिकेतील ओपन–एअर थिएटरमध्येच जमतो.) एकाही मोटारीचा आश्रय न घेता मी पायीच जातो. पण

कोठं ते आठवत नाही. त्या रात्री कळतं ते एवढंच की मी त्यांच्याकडे उतरायला न गेल्यामुळं माझी आजी जाम भडकली आहे, आणि माझी मामाशी गाठ घालून देण्यासाठी दुसऱ्या दिवशी एक पुस्तकांचं प्रदर्शन तिनं आयोजित केलं आहे. हा पुस्तकवेडा नातू तिथं हमखास येणार आणि मामाला भेटणार हा तिचा हिशेब ! प्रदर्शन पाहण्यास मी अर्थातच जातो. मामा वगैरे मला कोणी दिसत नाही. दिसते ते एक हिरव्या-तांबड्या भाजीचं प्रदर्शन. पाल्यासकट बीटच्या जुड्या एकत्र मांडाव्या तसं. जरा खोल नजरेनं पाहिलं तेव्हा हिरवी-तांबडी पुस्तकंच प्रदर्शनात गिचमीड मांडलेली होती. पहातो नि जागा होतो.

हे फुटकळ पण विलक्षण स्वप्न पाहा : समुद्रात शिरलेला जमिनीचा एक भाग. एक छोटंसं लांबट भूशिरच. पण चांगलं बांधून काढलेलं. एक शिमिटचा अर्धवर्तुळाकार कट्टा, आणि मध्ये हिंडाफिरायला जागा. मे महिन्याचे दिवस. शहरातील सरकारी कचेऱ्यांना रजा असते. पण सर्व अधिकाऱ्यांनी संध्याकाळी या कट्ट्यावर सपत्निक फिरायला यायचं असा हुकूम असतो — सर्व स्त्रियांनी नऊवारी काळी चंद्रकळा नेसून आणि पुरुषांनी पांढराधोप सूट घालून. असा तो कट्टा या जोडप्यांनी भरून गेलेला असतो.

अशी एकेक स्वप्नं. रोज झोपेत माझ्या मनाच्या आरशावर विलोल प्रतिबिंबं पाडतात.

स्वप्नं का पडतात ? पूर्वजन्मींच्या स्मृती म्हणायचं का त्यांना ? वातावरणात अनेकांचे विचार, संकल्प, कल्पना आणि तशाच काही घटना लहरत असतात त्या स्वप्नात मूर्तरूप बनतात का ? इतर ग्रहगोलावरील मनं पृथ्वीला अशी भेट देतात का ? पृथ्वीवरून निघून गेलेले आत्मे पृथ्वीवर स्वप्नांच्या रूपानं येतात आणि वावरतात का ? रात्री आकाशात ताऱ्यांच्या रूपानं जाऊन बसलेले पुण्यात्मे स्वप्नात येतात का ? पृथ्वीवर प्रकाश सावल्यांची जी किमया करतो ती स्वप्नात उमटते का ? आपल्या सभोवतालच्या असंख्य चेतकांना आपल्या संज्ञेत प्रवेश मिळत नाही ते तो असा मिळवतात का ? आपल्या अंगच्या अतींद्रिय शक्ती

स्वप्नांत आपल्या ताकदीचा अंदाज घेतात का ? मानवेतर प्राण्यातलं मानवाविषयीचं कुतूहल स्वप्नांच्या रूपानं प्रकट होतं का ?

— मला माहीत नाही. मला माहीत आहे, अगर असावं ते एवढंच की आपली निर्माणक्षम प्रतिभा आपल्या पूर्वील अनुभवाचे स्वैर प्रबंध बांधते, आणि स्वप्नांच्या रूपानं प्रकट करते.

तुम्हाला सुंदरसुंदर स्वप्नं पडायला हवी असतील तर तुम्ही तुमचं अनुभवविश्व सुंदर बनवा.

# क्रिकेटची ध्यानधारणा

ता. २६ जानेवारी १९७२. पुण्यातील लेखक–प्रकाशकांचं स्नेहसंमेलन. हिंगण्याच्या — महर्षी कर्व्यांच्या स्मृतींनी आंदोळलेल्या आवारात. महर्षी कर्व्यांनी क्रिकेटच्या बॅटीला कधी स्पर्श केला नसेल; पण या लेखक–प्रकाशकांनी क्रिकेटचा डाव मांडण्याची टूम काढली. चारदोन आम्रवृक्षांच्या आसपास क्रिकेटची 'विकेट' तयार झाली. लेखणीशी सलगी करणारे लोक बॅट–बॉलशी संधान बांधू लागले. विद्याधर पुंडलिकांच्या मनगटात फलंदाजीचं सराईत स्फुरण चढलं. विश्वनाथ नरवणेंच्या हातात चेंडू वक्र व्यापारानं फिरू लागला. 'कॉण्टिनेण्टल'च्या अनंत-राव कुलकर्ण्यांनी यष्टियागाचा धोका पत्करला. पण माझं मन भूतकाळात गेलं. ...

पन्नास वर्षांपूर्वीची एक स्मृती जागृत झाली — अशाच एका आम्रवृक्षाच्या साक्षीनं उभ्या राहिलेल्या सामन्याची. रत्नागिरीची. आमच्या शाळेची मॅच होती. अशीतशी नाही. कलेक्टर–कचेरीच्या टीमबरोबर. तिचा कॅप्टन होता त्या वेळचा प्रांत. प्रांत वैद्य त्याच्या एका नजरेच्या फेकीनं आमच्या टीमचा निकाल लागण्यास हरकत नव्हती. त्याचा रुबाबच तसा होता. कटदार पँट, ऐटबाज कोटी, बाह्या सरसावलेला रेशमी शर्ट. जमीन तुडवणारा स्वच्छ सफेत बूट. पण आम्हाला डर नव्हती. असेल विलायतेत खेळलेला. पण आमच्या गोडबोलेचा इंगा पाहिलान होता का ? गोडबोले म्हणजे आमचा एस्. एम्. ! एस्.एम्. जोशी — हिंदूंचा फिरकी गोलंदाज.

साक्षात बाळू नव्हे, पण बाळूच्या छायेत तयार झालेला. आम्ही तयार असतो. प्रांत वैद्य खेळायला येतात. आमचा दळवी दमदार चेंडू टाकतो. आम्ही ' औट ' म्हणून ओरडतो. हेगडे सर डोळे वटारतात. एरवी हेगडे सर म्हणजे देवमाणूस. मुलांवर मायेची पाखर धरून राहणारे. पण आता त्यांच्या डोळ्यांत क्रिकेटची शिस्त तेजाळते. आम्ही गप्प होतो. वैद्य एक धाव घेतात. पुढच्या ओव्हरीत आणखी काही धावा. पण मग गोडबोलेशी गाठ. गोडबोले थोडा लंगडतच येतो, आणि झुलता चेंडू टाकतो. वैद्य जोरात बॅट फिरवतात. पण चेंडूशी तिची गाठच पडत नाही. असे दोन चेंडू जातात, आणि गोडबोलेचा पुढला चेंडू प्रांतांच्या विकेटमधे अलगद शिरतो. आम्ही उठतो, नाचतो, ओरडतो —" प्रांतसाहेब, तुमची सेंचरी कुठाय ?" प्रांतसाहेब नेहेमी सेंचरीची प्रतिज्ञा करूनच मैदानात उतरत. हेगडे सर आपल्या भरघोस मिश्या हास्यानं फुलवून एका मुलाला हळूच म्हणतात, " अरे थांबा. जरा दमानं घ्या. एवढी घाई का ? आता दहा धावा झाल्या. आता फक्त एक पूज्यं उरलं. प्रांतसाहेबांना ते काही कठीण नाही. पुढल्या डावात !" आम्ही खुशालतो. थयथय नाचतो.

ही आठवण खेळवीत मी उभा असतो. तोच मेंदूतील एका पेशीला सणक येते. वाटतं, आपणही खेळावं. काय हरकत आहे ? बॅट हातात घेतो नि खेळायला जातो. त्याबरोबर श्री. ज. जोशी म्हणतात, " काय पाध्ये, तुम्ही खेळलेले आहात काय ?" इतक्यात कोणीतरी म्हणतो, " अरे, पाध्यांना जरा जपून चेंडू टाका." तोच चेंडू येतो आणि मी बॅट फिरवतो. लगेच श्री. ज. म्हणतात, " पाध्ये, तुम्ही खेळलेले आहात. प्रश्नच नाही !"

मी गप्प रहातो. थोडा आश्चर्याने. मी क्रिकेट खेळलेला नसतो. क्रिकेट फारसा खेळलोच नाही. विटीदांडू खेळलो. म्हणजे हे ' श्वायुवा' सारखं झालं. क्रिकेटसमोर विटीदांडू काय आणणार ? कुठं तो राजबिंडा खेळ, तर कुठं हा दरिद्री ! कुठं त्याचा दरबारी रुबाब, तर कुठं याचा लक्तरी नूर ! कुठं त्याची मैदानी मिजास, तर कुठं याची गल्लीतली धाव ! अर्थात मी विटीदांडू खेळलो तो असा गल्लीभरू नव्हता. आमचं रत्नागिरीच्या बोर्डिंगातलं मैदान क्रिकेटच्या मैदानाच्या दुप्पट होतं. आमचा

स्कोअर हजारांत मोजावा लागे ! आमचे साने, वैद्य, सावंत — मोठे तगडे खेळाडू ! धोतराचा काचा मारून ते मैदानात उतरले की दांडूविटीचा ध्रुपद-धमार सुरू होई. मी अजून हाफपँटीतच होतो. अंगानं हाडकुळा. पण मी या खेळाचा हीरो असे. आठवड्याच्या सामन्यात मी कोणत्या बाजूनं खेळायचं ते अनेकदा ओलीसुकी करून ठरे ! एरव्ही मी म्हणजे ! बोर्डिंगच्या चेष्टा-मस्करीत कुणीतरी भोज्या लागतो, आणि त्यासाठी बहुधा माझीच निवड होई. एकदा काही विद्यार्थ्यांनी, मी झोपेत असताना माझ्या चेहेऱ्यावर रंगरंगोटी करून माझं शिमग्याचं सोंग बनवलं. पण मी याचा वचपा विटीदांडूच्या सामन्यात काढी. तेथं मी शेर असे. पण मला वेड लागलं ते क्रिकेटचं — आणि तेही मी या बोर्डिंगात असतानाच ! विटीदांडूच्या काटकुळ्या कुडीत क्रिकेटचा आत्मा आहे की काय ? दांडूच्या फटक्यात बॅटीचा दणका शिरतो की काय ? विटीचा झेल चेंडूच्या झेलासारखा हातात हुळहुळतो की काय ? निदान माझ्या तरी हुळहुळे ! मी विटीदांडूचा खेळ क्रिकेटच्या मिजाशीनं खेळे !

. . .

क्रिकेट फारसा मी खेळलोच नाही; पण पाहिला भरपूर. अगदी जीव ओतून पाहिला. अधाशी नजरेनं पाहिला. हावऱ्या वृत्तीनं पाहिला. रक्ताचं अभि-सरण रोखून पाहिला.

क्रिकेटची आठवण झाली की माझा मेंदू प्रोजेक्टर बनतो. आठ-वणींची रिळं उलगडू लागतात. मनाच्या पडद्यावर दृश्यं नाचू लागतात. सळसळती दृश्यं. आत्मसंतुष्ट दृश्यं. अंतर्मुख दृश्यं. अग्निबाणाप्रमाणं सर-सरणारी दृश्यं. सूर मारणारी दृश्यं.

... तो कुमठा. डोक्यावर शेंडी भुरभुरते आहे, पुढं खिसा असलेल्या शर्टातून जानवं डोकावतं आहे, कमरेच्या पंच्याचा काच खुपतो आहे, नागवी पावले पिचवरच्या धुळीत बोटें रोवताहेत, आणि कुमठाकडे टाकलेला चेंडू कट होऊन स्लिपमध्ये सटकतो आहे, आणि हाच कुमठा बोर्डिंगाच्या पडवीत चेंडू कट् कसा करायचा याचे पाठ आम्हाला देतो आहे.

... तो १९२३ च्या चौरंगीतला शेवटचा सामना. युरोपीअनांनी

पहिल्या डावात ४८२ धावा केल्या आहेत; तर आमच्या हिन्दूंनी त्याला ४७४ चं उत्तर दिलं आहे. अटीतटीचं वातावरण आहे. सामना जिंकण्यासाठी आम्हाला १५० मिनिटांत १५९ धावा करायच्या आहेत. 'करणार' या निर्धारानं विठ्ठल—परदेशी उतरले आहेत. भराभर धावा निघत आहेत. इतक्यात परदेशी बाद होतो. आता देवधर. पण देवधरच्या हातून जलद धावा होतील ? लोक 'नायडू नायडू' असं ओरडतात, आणि देवधरऐवजी नायडूच येतो. आणि मैदानावर वादळ अवतरतं. खेळ संपायला तीन मिनिटं असतानाच १५९ वी धाव निघते.

... १९२६ साल. चौरंगी सामन्याचे विजेते म्हणून हिन्दूंचा गिलिगनच्या इंग्लिश टीमबरोबर सामना आहे. कालचे अर्लचे आठ षट्कार आमच्या उरात धडकी देऊन आहेत. आमची नजर नायडूवर आहे. नायडू म्हणजे आमची कडकलक्ष्मी ! कनकय्याच्या कडकडाटावर आमची सारी भिस्त. नायडू येतो. त्याची उंच श्यामल सडसडीत देखणी मूर्ती पिचवर शोभते. हातातली बॅट समशेरीसारखी सरसावीत तो चोहोकडे नजर टाकतो आहे. त्याच्या उभं रहाण्यात एक उभार ऐट आहे. नायडू खेळू लागतो. त्याच्या अंगातलं चैतन्य त्याच्या अवयवांतून सळसळू लागतं. त्याची मूर्ती एक साक्षात चैतन्यमूर्ती बनते. इतक्यात त्याचा एक चेंडू आकाशात चढतो. आणि मर्सर त्याचा वेग आणि दिशा अचूक पकडून त्याच्या रोखानं धावू लागतो. चेंडू खाली येऊ लागतो आणि मर्सर आपले राक्षसी हात पसरून उभा असतो. तेव्हा नायडूच्या अवघ्या ३२ धावा झालेल्या असतात. आमची हृदयं आमच्या पोटात उतरतात. गेला... गेला, आमचा आधार गेला. आता आमची ससेहोलपट होणार. आणि ती बघून चारी बाजूंच्या तंबूतले काकडे 'काय तात्या' म्हणत आमची शेंडी ओढणार ! आम्ही फक्त हुंदके द्यायचे बाकी राहिले होते — तोच हसू फुटले. मर्सरच्या हातातून चेंडू खाली पडला ! त्याच्या डोळ्यांत सूर्य शिरला होता. कुरुक्षेत्रावर जयद्रथाचा काटा काढण्यासाठी श्रीकृष्णानं आपलं सुदर्शनचक्र ढगासारखं बसवलं. आता त्यानं उलटा प्रयोग केला आणि आम्हा भक्तांची लाज राखली ! मुख्य म्हणजे काकड्यांची तोंडं गप्प झाली. त्यांचा जल्लोष आतल्या आत जिरला. आता आमच्या क्रिकेटार्जुनाची बॅट बेफाम फिरू

लागली. तिच्यात वेताळ शिरला. नायडूच्या बॅटीनं मारलेला चेंडू आता वर आकाशात तळपणाऱ्या पक्ष्यांशी स्पर्धा करू लागला. एकदा तो युरोपीअन जिमखान्यामागच्या टेनिसकोर्टात शिरला, नि आम्हाला मागं याच जिमखान्यावरचं घड्याळ अशाच एका चेंडूनं फोडणाऱ्या रणजीची आठवण झाली. एकदा चेंडू तंबूपलीकडील रस्त्यावरील ट्रॅमच्या रुळाबरोबर धावू लागला. आता आम्ही नायडूच्या धावा मोजायचे थांबलो. त्याचे चौकार मोजू लागलो. लवकरच षट्कार मोजू लागलो. अर्लने आठ षट्कार काढले होते, त्या तरळत्या आकड्यावर नायडूचे षट्कार सटासट बसू लगावले. नायडूचा आठवा षट्कार आकाशात उडाला आणि आम्ही फक्त डोक्यावर डभे राह्यचे विसरलो. आता षट्कारांची गती वाढली. ... हा नववा ! हा दहावा ! हा अकरावा ! इतक्यात एकानं हिशेब करून सांगितलं : नायडूने एका षट्कात ४, ६, २, ४, ६, ४, अशा २६ धावा काढल्या.

आता आम्ही नायडूच्या हजार धावा पाहण्यास सज्ज झालो, इतक्यात नायडूचा झेल गेला, आणि आम्ही कोलमडलो. आमचं स्वप्न विरलं. नायडू हेच एक विलक्षण स्वप्न बनलं होतं. ते आमच्या नजरेसमोर आपल्या बदलत्या प्रतिमांनी उमलत होतं. तोच या झेलानं आम्ही जागे झालो. अचानक. आणि काकड्यांनी आमच्या दुःखावर डागण्या देण्यास सुरुवात केली. त्यांना जणू झरथुस्त्र पावला ! त्या वेळी क्रिकेटमध्ये धर्माभिमान मिसळून तेच कॉकलेट आम्ही पिऊ आणि बेहोष होऊ.

... १९३६ सालची गोष्ट. एक शनिवार. माझा ठराविक कार्यक्रम. सकाळी चित्रा 'कचेरीत' काम, दुपारी 'व्हेरिटी'मध्ये स-बीअर भोजन, आणि नंतर 'मेट्रो'ची मॅटिनी. त्या वेळी मुंबईच्या रस्त्यावरून चालणं शक्य होतं. फ्लोरा फौंटनवरून धोबी तलावकडे रमतगमत चाललो. तोच उजवीकडे लक्ष गेलं. युरोपीअन जिमखान्यावर क्रिकेटचा एक सामना सुरू, आणि मोकळ्या मैदानावर बाउंडरीच्या बाहेर प्रेक्षकांचे गट उभे, बसलेले. तेव्हा मुंबईची मैदानं मोकळी असत व किरकोळ सामने पहाण्यासही प्रेक्षक जमत. मी 'मेट्रो' विसरलो. मॅच पाहू लागलो. एक सतरा–अठरा वर्षांचा पोट्टा झकास खेळत होता. चौकशी केली, हा कोण ? कळलं, हा नवा-

नगरचा विनू मांकड.— फ्रँक टॅरण्टचा शिष्य! फ्रँक टॅरण्ट म्हणजे क्रिकेटची एक घडकी होती. हा पूर्वी चौरंगी सामन्यात खेळे. आणि हिंदू–पार्शी–मुसलमान संघांची तिरडी बांधी! भाऊमामा घडफळ्यांनी सांगितलेली गोष्ट आठवली. १९१६ साली देवधर चौरंगी सामन्यात प्रथम खेळले. नागव्या पायांनी खेळण्याइतके ते नवखे होते. देवधर त्या वर्षीचे 'हीरो' ठरले; कारण दोनही डावांत ते टॅरण्टच्या गोलंदाजीवर नाबाद राहिले होते. फारशा धावा न काढताच, केवळ अक्षत बॅटीने हीरो ठरले! असा हा टॅरण्ट! आणि त्याचा शिष्य खेळतोय. मी नीट पाहू लागलो. मांकडच्या कट्सनी खूष झालो. पुढल्याच 'चित्रा'त लिहिले : 'विनू मांकड : हिन्दूचे नवे शिगरू!' न्यू कोल्ट! सोमवारी कचेरीत गेल्यावर डॉ. भालेरावांचा फोन आला. संतप्त फोन. (भालेराव म्हणजे 'मुंबई साहित्यसंघा'चे भालेराव. जाणकार क्रिकेटर होते आणि 'क्रिकेटर' या नावानं 'चित्रा'त लिहीत.) भालेराव रागावले होते : "तुम्हाला ज्या विषयावर कळत नाही त्या विषयावर लिहिता कशाला?" आता त्यांना काय सांगू? धडाकून लिहिण्याचा पत्रकाराचा वसा मी नुकताच घेतला नव्हता काय? "अहो, हे तुमचं शिगरू बॉल चॉप करतं. स्लिपमधे कॅच देणारा हा खेळ!" आता ही टेक्निकॅलिटी मला काय माहीत? मी खजील झालो. मी भालेरावांना मानीत होतो. पण विनू मांकडनं मानलं नाही!

... १९४० सालची गोष्ट. नव्या 'ब्रॅबोर्न स्टेडियम'वर पंचरंगीतला हिंदु–मुसलमान सामना सुरू. माझं नुकतंच लग्न झालं होतं. बायको 'झेव्हिअर'मधे. तिच्याबरोबर 'झेव्हिअर'च्या जागेतून हा सामना पाहिला — क्रिकेटमधं रोमान्स मिसळून. 'झेव्हिअर'ची जागा बरोबर विकेटच्या मागं. सामना येथून पाह्यचा असतो. गोलंदाजीचे सारे विभ्रम येथून बिनचूक दिसतात. हिन्दूची फील्डिंग सुरू होती. अमरसिंह अर्थात गोलंदाजी करीत होता. त्या दिवशीच्या त्याच्या गोलंदाजीनं डोळ्यांचं पारणं फिटलं. 'लेग ट्रॅप' म्हणजे काय ते त्या दिवशी समजलं. अमरसिंहानं फक्त एक गडी स्लिपमध्ये लावला, एक समोर सीमेवर, आणि बाकीचे सात लेगला — आणि दिलं आव्हान फलंदाजांना : 'हिंमत असेल तर मारा ऑफला.' अमरसिंहाचं नशीब त्या दिवशी रजेवर होतं. विकेट्स मिळत नव्हत्या. पण

कपाळावर नशीब नसलं तरी अंत:करणात हिंमत होती. दिवसभर गडी न दमता गोलंदाजी करीत होता. यष्टिरक्षकानं टाकलेला चेंडू बुटाच्या टोकानं अडवून सर्रकन वर चढवीत झेलीत होता. आणि दिवसभर 'लेगमारी' करीत होता. फलंदाज बाद झाला नाही; पण त्याला समोर चेंडूही मारता आला नाही अशी चेंडूवर हुकमत पाहिली नि धन्य झालो !

... एकदा असेच 'मेट्रो'च्या रस्त्यावरून विजय मर्चंटला पाहिलं — अर्ध्या पिचवर जाऊन अमीर इलाहीची गोलंदाजी तडकवताना. पण मर्चंट हा खरा धीमावतार ! ढम्मावतारदेखील ! त्याचं हे दर्शन घेतलं — मनमुराद घेतलं 'ब्रॅबोर्न स्टेडियम'वर. पण त्यातसुद्धा एखाद्या गोलंदाजानं आखड टप्प्याचा चेंडू टाकण्याची चूक केली, तर मर्चंटच्या बॅटीला हूकचं पिसं चढे, आणि डावीकडच्या सीमेवर रान पेटे !

पण मर्चण्टची माझी आठवण आहे ती निराळीच. डॉ. भालेरावांबरोबर त्याची मुलाखत घेतली तेव्हा पैदा केलेली. मर्चंटची साक्ष पटे ती जलद गोलंदाजीवर खेळताना. एखाद्या डुकरानं धडक घ्यावी तशी मर्चंटची बॅट वेगांध चेंडूशी धडक घेई. "हे कसं जमतं तुम्हाला ?"— आमचा कुतूहलानं थरथरलेला प्रश्न. "अहो, तुम्हाला माहीत नाही ? मी लहानपणी फास्ट बोलिंगच्या मशिनवर प्रॅक्टिस केलेली आहे" मला एकदम केशवराव भोळ्यांनी सांगितलेली नायडूची आठवण आठवली. डॉ. नायडू म्हणून कनकय्याचा चुलता होता. त्याला पुतण्याच्या क्रिकेटचं भारी कौतुक. पण हा पुतण्या अंगावर येणाऱ्या चेंडूला टरकायचा ! डॉ. नायडूनं काय केलं ? त्यानं चक्क नायडूचा पाय बांधून खिळ्यानं जमिनीला जखडून ठेवला, आणि सारखी त्याच्या पायावर मारक गोलंदाजी केली. नायडूची डर अशी गेली. मर्चंट सांगत होता, "पण मी फास्ट बोलिंगला तोंड देतो याचं कारण हे नाही. त्याचं श्रेय एका इंग्लिश डॉक्टरला आहे. जार्डिनच्या टीमविरुद्ध मी 'बॉबे क्रिकेट असोसिएशन'मधून खेळलो तेव्हाची गोष्ट. वझिफदार आमचा कप्तान होता. मी खेळू लागलो, आणि निकोल्सच्या एका चेंडूनं माझी हनुवटी फोडली. मी आडवाच झालो. रिटायर झालो. जिमखान्यात एक इंग्रजी डॉक्टर होता. त्यानं माझी जखम बांधली, आणि

नंतर वझिफदारला सांगितलं, 'पुढला गडी बाद झाल्याबरोबर मर्चंटला खेळायला पाठव. हा या गोलंदाजीवर लगेच खेळला नाही तर कायमचा डरपोक बनेल.' तेव्हापासून माझी फास्ट बोलिंगची भीती गेली. वाटतं, होऊन होऊन काय होईल ? आणखी एकदा हनुवटी फुटेल." हनुवटीवरच्या जखमेची खूण खाजवीत मर्चंट म्हणाला.

मर्चंट आणखी सांगू लागला : "पण या डॉक्टरची मजा आहे ती निराळीच. संध्याकाळी माझ्या दवाखान्यात ये, म्हणजे जखम पुन्हा बांधीन असं त्यानं मला सांगितलं होतं. मी संध्याकाळी फोर्टमधं त्याच्या दवाखान्यावर गेलो. वेटिंगरूममधं वाट पहात बसलो. तिथं पेशंट्सची गर्दी. पण त्यांत पुरुष कुणीच नाही. साऱ्या बायका. पारशी आणि युरोपीअन. मला चोरट्यासारखं झालं. त्यानं मला बोलावलं नि माझी जखम बांधली. मी परतताना बाहेर त्याच्या पाटीवर नीट नजर टाकली, तेव्हा ध्यानात आलं की, हा स्त्री-रोगचिकित्सक होता !"

अशा एकेक आठवणी. एकेक आठवण म्हणजे कोरीव मूर्ती. जिवंत शिल्प. तो मुस्ताकअली. त्याची शेलाटी मूर्ती अशी लवे, अशी वाके, शरीराची अशी बाकदार वळणं घेई की, करमरकरांचं एखादं शिल्पच पुढं ठाके. अमरनाथ खेळू लागला म्हणजे पिचवर नर्तन सुरू होई. १९३२ साली या अमरनाथला नायडूनं ड्रेसिंगरूममध्ये इन्स्विंगर कसे खेळायचे ते दाखवलं, आणि त्याच डावात त्यानं शतक ठोकलं ! नायडूची सर्वांगीण चपळता अमरनाथच्या पायांत गोळा झाली होती. पंजाबचा हा यष्टिरक्षक पुढं फलंदाजीच्या विक्रमातून गोलंदाजीचा वस्ताद बनला. जसा विनू ! पण मला आठवते ती त्याची विकेटपाशी नाचणारी मूर्ती. तसेच आपले देवधर — अमरनाथच्या विरुद्ध. म्हणजे पायाचे ढम्म ! पण फटका मारताना त्यांच्या मनगटाची पोलादी कांब व्हायची. हर्क्युलसनं पृथ्वी कोलवली तसा ते चेंडू कोलवायचे ! आणि तो एम्. एम्. दळवी — डावं ढोपर टेकून, डोकं खाली करून, वरच्या वर चेंडू हूक करायचा ! आणि तो जय ! पहिल्या चेंडूला धाव निघायलाच हवी ! मी इतके फलंदाज पाहिले; पण क्रिकेटच्या राजस खेळात सात्त्विकता ओतणारा विठ्ठलसारखा दुसरा खेळाडू पाहिला नव्हता. कदाचित जॅक हॉब्जबद्दल

तसं म्हणता आलं असतं. हिंदू कॉलनीच्या पहिल्या गल्लीत पुढं विठ्ठल दिसे, तेव्हा पंढरपूरचा विठ्ठल पाहिल्याचं समाधान मी मिळवी ! विठ्ठलच्या अगदी विरुद्ध दिलावर हुसेनची पोज. तो खेळायला उभा राह्यचा तो जणू कमोडवर बसल्यासारखा ! पण त्याची बॅट काय फिरे !

जशी एकेका फलंदाजाची तऱ्हा तशीच एकेका गोलंदाजाची. महमद निस्सार एखाद्या रेल्वे इंजिनासारखा यायचा. चंदराणाची धाव म्हणजे एक अफलातून उडी ! ही उडी जमली तरच चेंडूत वेग शिरायचा. शूते बानर्जीच्या धावेपेक्षा त्याची स्टार्ट घेण्यास मागे जाणारी मूर्तीच अधिक झोकदार ! डोक्याचे केस उडवीत जायचा. सी. एस्. नायडूच्या हातून चेंडू सुटला की अनेकदा तो पिचला साष्टांग नमस्कार घालतोय की काय वाटे, पण असा कोलमडता कोलमडताच तो एखादा परत-झेल (रिटर्न-कॅच) असा पकडी, की वाह ! आणि तो यष्टिरक्षक हिंदळेकर — यष्टीमागचा जादूगार ! त्याचे हात असे अलगद फिरत, की ध्यानीमनी नसताना त्याचं बोट वर जाई, आणि अम्पायरचं त्याच्याशी एकमत होई ! पण कोणा एका पाश्चात्य पत्रकारानं " Now that Oldfield is old, Hindalekar is the best wicket-keeper in the world " (आता ओल्डफिल्ड म्हातारा झाल्यामुळे हिंदळेकर हाच आजचा सर्वोत्कृष्ट यष्टिरक्षक आहे) असे उद्गार काढले, आणि हिंदळेकरांचा मेंदू काही काळ सुजला. पण कलावंताचा मेंदू सुजला म्हणून काही तो धवड बनत नाही !

पण मी क्रिकेट पाहिला म्हणजे नुसते क्रिकेटर्स पाहिले असं नव्हे. एकटा क्रिकेटर तुम्ही पाहूच शकत नाही. क्रिकेटर खुलतो तो दुसऱ्या क्रिकेटरच्या करामतीनं. सोलकर झेल पकडताना गडबडा लोळला, पण त्याने चेंडू धरलेला हात जमिनीला टेकू दिला नाही; ही करामत त्याला साधली, कारण लॉइडनं मारलेला चेंडूच तसा होता. खरं म्हणजे ही करामत त्यानं केली नाही; ती त्याला झाली ! नायडूच्या अकरा षट्कारांचे महत्त्व होतं ते टेटसारखे गोलंदाज गिलिगनच्या संघात होते म्हणून.

२२३५८
ता. क्र. निबंध २००५
शाखा



क्रिकेटचा मजा आहे तो नुसत्या चेंडूफळीच्या भेटीचा नाही; तर ही भेट झाल्यानंतर सबंध चमू एकदम हलतो त्याचा. म्हणून कव्हर पॉइंटला झेल घेतला तरी सिली मिड्-ऑनचा क्षेत्ररक्षक तसेच योगासन करतो ! चेंडू एकजण पकडत असतो; पण इतर अनेकांचे हात फुरफुरतात. लोकांचे लक्ष फलंदाजावर असते; कारण ते एक 'क्षणैक्षणैर्यन्नवतामुपैति' असं सजीव शिल्पच असतं. पण मला आपलं वाटतं की, क्रिकेटच्या खेळाचा जीव चेंडूबरोबर फिरत असतो. आपण क्रिकेट पहातो म्हणजे काय, चेंडू कसा टाकला, कसा पडला, कसा टोलवला कसा अडवला, कसा पकडला याचा वेध घेतो. चेंडू टाकण्याचे प्रकार तरी किती ! एखादा गोलंदाज वजनफेकीच्या जीवघेऊ ईर्ष्येनं चेंडू फेकतो; तर दुसरा एखादा चेंडूला कुरवाळीत गोलंदाजी करतो. कोणाला वाटतं की, चेंडूच्या रूपानं पृथ्वीच आपल्या हातात वावरते आहे; तर दुसऱ्याला वाटतं, हे एक ब्रह्मशस्त्रच आहे. कोणी गोलंदाजी करताना यष्टीवर मंत्र टाकतोसा वाटतो; तर कोणी तिला प्रदक्षिणा घालतो. एखादा गोलंदाज धैर्यधरासारखा धरणी नमवीत येतो; तर दुसरा एखादा कोळ्याचा नाच करीत येतो. आणि चेंडू तरी किती विविध रीतीनं पडतो ! कधी तो यष्टीशी बेबनाव पुकारतो; तर कधी तो तिला मिठी मारण्याच्या आविर्भावाने घुसतो. कधी तो फलंदाजाच्या अंगाशीच अतिरेक करतो. कधी तो त्याला चक्क मामा बनवतो. कधी तो अशा वेगानं येतो की विजेची एक चकाकती रेषा दिसते, आणि बॅटीनं तो अडला की त्याला एक सुरेख सुगोल रंगरूप प्राप्त होतं. कधी तो अडतो; पण गोलंदाजानं त्याला दिलेली सारी फिरत उराशी धरून वक्राकार फिरतो. असे त्याचे नाना रंग, नाना रूपं. त्याच्या प्रत्येक नव्या रूपाबरोबर फलंदाजीला नवा आकार येतो. म्हणून मला वाटतं, चेंडू हीच क्रिकेटची कळ आहे.

मी क्रिकेट जरा अधीऱ्या-अधुऱ्या मनानं पाहिला, तसंच अधीऱ्या-अधुऱ्या मनानं त्याच्यावर लिहिलं. खरं म्हणजे लेखकाची लेखणी ही विषयाची स्वामिनी नसते; ती त्याची सखी असते. काही विषयांवर लिहिणं म्हणजे मस्तकात शेगडी पेटवूनच लिहिणं; नरराक्षस स्टालिनवर मी असं लिहिलं.

काही व्यक्तींवर लिहिताना अंत:करणात नंदादीप आपोआपच तेवतो; आगरकर, वामन मल्हार, जयप्रकाश नारायण यांच्यावर मी असं लिहिलं. काही विषय माझ्या लेखणीवर मोहिनीअस्त्र पसरतात. काव्य आणि तत्त्वज्ञान यांच्यावर लिहिताना माझं असं होतं, आणि मग लेखणीला खात्रीच वाटत नाही. क्रिकेटवर लिहिताना मी प्रेमिकाच्या समर्पणवृत्तीनं लिहिलं. मग माझी लेखणी क्षणोक्षणी ताजी झाली. कारण क्रिकेटचं तिला क्षणाक्षणाला नवदर्शन घडलं. त्यात तांत्रिकाचं ज्ञान नव्हतं; प्रेमिकाचा उत्साहच अमाप होता. कधी तिच्यात मिस्किलपणा शिरे, आणि मग 'पाच वाजले म्हणून बारा वाजले नाहीत' असा मथळा अवतरे. कधी तिला यौगिक स्पर्श होई, आणि मग मी 'ब्रेबोर्न स्टेडियम'वरील हृदयांची स्पंदनं रेखाटण्याचा यत्न करी. कधी ती स्वच्छंद बने, आणि वॉरेल-विक्स-वॉलकॉटचे अनुप्रास पकडी. 'क्रिकेट हा चारित्र्य घडवणारा खेळ आहे — वॉटर्लूची लढाई हॅरो-ईटनच्या मैदानावर जिंकली गेली,' असल्या नीतिशास्त्राचा तिच्यावर कधीच परिणाम झाला नाही. कारण क्रिकेटच्या राजकारणाची दर्शनं तिला दरवर्षी घडत. पण तिनं क्रिकेटच्या खेळाचा एक संदेश सतत चित्तात धरला : 'Never say die!' क्रिकेटच्या खेळाच्या अनिश्चितपणाचाच तो संदेश आहे : शेवटचा चेंडू पडेपर्यंत आशा सोडू नकोस. हाच संदेश माझ्या लेखणीनं गिरवला. 'नेव्हर से डाय!' म्हणूनच क्रिकेटवर लिहिताना माझी लेखणी कधी शिणली नाही, थकली नाही, भागली नाही!

क्रिकेट मी असा देखिला, चिंतिला, चर्चिला. म्हणूनच मला वाटतं, त्याची एक झलक त्या दिवशीच्या माझ्या बॅटीच्या फिरतीत उमटली. ध्यानधारणेनं जग जिंकण्याचा तो एक प्रकार होता. पण सरड्याचीच धाव ती!

# आमचा जॉय

ते आठदहा दिवस मी भासांच्या दुनियेत वावरत होतो. (अजूनही थोडासा वावरतो.) एखादा कागदाचा कपटा वाऱ्यानं उडायचा नि वाटायचं, त्यानं उडी मारली. भिंतीवरचं कॅलेंडर फडफडायचं नि वाटायचं, त्यानं अंग झडझडलं. तिकडे स्वैंपाकघरात कमल काहीतरी म्हणायची नि वाटायचं, तिनं ती तिची लाडिक 'जमड्या' ही हाक मारली. बाहेर जाण्याची तयारी करावी नि वाटावं, तो आपल्या अगोदरच तयार आहे. चहाचा कप तोंडाला लावावा नि वाटावं, तो तोंडात वाटी धरून हजर आहे. बाहेरच्या खोलीत पाऊल टाकावं नि वाटावं, की तो दिवाणावर अंगाची घडी घालून बसला आहे. ...

आणि अर्थात लगेच भासाचा भंग व्हायचा. आत कुठंतरी कुरतडणारा भंग. मनावर अगोदर ओरखाडे काढणारा भंग. अंत:करणाच्या तळाशी बसलेला वेदनेचा गाळ एकदम पृष्ठभागावर आणणारा भंग.

भासाचा भंग व्हायचा; कारण सत्य लगेच हसायचं — तो आता नाही. तो गेला. तो पुन्हा दिसणार नाही. आपल्या जीवनाच्या आंदोलनावर अलगद उडी आता तो घेणार नाही. जीवनाचे ते खेळकर क्षण भूतकालाच्या डोहात आता कायमचे बुडाले. नुसते बुडाले नाहीत, तर विरून गेले. पार विरून !

— आणि मग ती जाणीव उरात कट्यारीसारखी घुसायची. मृत्यू म्हणजे शेवट. कधीही न पलटणारा शेवट. कसलीही तळटीप नसलेला शेवट!

एकेक भास विरायचा आणि अंत:करणावर एकेक फोड उठायचा.

इतका जॉय आमच्या जीवनात शिरला होता. १९६९ च्या जुलैमध्ये तीन आठवड्यांचे पिलू म्हणून तो घरात आला, तेव्हा तो आमच्या जीवनात असा खोल शिरेल असं वाटलं नव्हतं. एक नवीन मजेदार गंमत एवढीच तेव्हा भावना होती. तीन तासांचा मोटरचा प्रवास करून एका टोपलीतून तो आला होता. टोपलीत उबदार कपडा पसरलेला होता; पण आईच्या उबेची सर त्याला कशी येणार ? काहीतरी विपरीत घडलं होतं, पण काय ते त्याचं त्यालाच समजत नव्हतं. म्हणूनच बहुधा तो मुरगसून गप्प बसला होता. स्वत:तच शिरला होता. पण जरा वेळानं त्यानं एक इवलाली उडी मारली. वाटलं, ठीक झालं. ही नव्या जीवनात पसंतीनंच मारलेली उडी. आणि खरंच तो रुळला. पण ती उडी म्हणजे आमच्या जीवनात निर्वाणीनं घेतलेली उडी होती हे तेव्हा समजलं नाही. त्यानंतर तो आमच्या घराशीच नव्हे, तर जीवनाशी समरस होत गेला. आमच्या जीवनाची एक जागती सावली म्हणून वावरला.

पण तो आमच्या जीवनात किती शिरला होता ते तो गेल्यावरच समजलं. मी दुपारी घरात एकटाच वाचीत बसे, तेव्हा तो शेजारच्या कॉट-वर पहुडलेला असे. एखाददिवशी नसला म्हणजे ध्यानात येई. की, माझ्या वाचनाचा तो एक गुप्त आधार होता. दुपारी जेवताना तो बरोबर नसला तर जेवणात आज काहीतरी कमी आहे असं वाटे. आवारात एखादा बाहेरचा कुत्रा शिरला म्हणजे तो ओरडत या खिडकीतून त्या खिडकीत धावे, आणि घराला एक घरपण प्राप्त होई. स्वैंपाकघरात बिस्किटांच्या बरणीला हात लावल्याबरोबर तो तिथं हजर होऊन तेवत्या नजरेनं पाही, आणि बरणीतल्या बिस्किटांना एक नवं सार्थक लाभे. आम्ही चहा घ्यायला लागलो की तो वाटी घेऊन हजर होई, आणि मग ज्ञानाप्रमाणं चवदार पेयही देऊन वाढतं याचा प्रत्यय येई. त्याला बाहेर नेण्यासाठी साखळी हातात घेतली की तो पट्ट्याची मान झटकन पुढं करी, आणि या निष्पाप प्राण्याचा आपल्यावर केवढा विश्वास आहे याची जाणीव होऊन कधी धन्य वाटे, तर कधी ओशाळं. तो बिछान्यावर पडलेला असताना जवळ

गेलो म्हणजे कधी तो गुरगुरे, तर कधी शेपटी चवरीसारखी हलवून स्वागत करी. पण तो काहीच करीत नसे तेव्हा हृदयाचा धागा गुरफटे.

खरं म्हणजे तो आमच्यावर एक हक्क सांगे — आणि आत कुठं-तरी आम्हाला ते आवडे. पाहुणे आले की त्याच्या या हक्कदारीला जोर-दार जाग येई. त्याची पहिली जाणीव खुशीची असे. विलक्षण खुशीची. पाहुणे आले, आता चहा येणार, कदाचित फराळाचे जिन्नस येणार... त्याचा आनंद उतू जाई, त्याचा पहिला आविष्कार वाटीच्या अधीर अधुऱ्या शोधात होई, आणि वाटी शोधून आणून त्यानं ती पाहुण्यासमोर आदळली की त्याचा स्फोट होई ! पण लवकरच त्याच्या ध्यानात येई की, पाहुण्यांशी होणाऱ्या गप्पात आपल्याकडे दुर्लक्ष होत आहे. आणि मग तो फुरफुरू लागे, गुरगुरू लागे. माझ्या शेजारीच तो बसलेला असल्यामुळे त्याची आतली तगमग मला बाहेर जाणवे. अर्थात सोशिक शांतपणा हा त्याचा गुणच नव्हता. (आमच्या घराचा तो गुण नव्हेच !) थोड्याच वेळात तो काहीतरी निमित्त काढून पाहुण्यावर गुरगुरू लागे. ज्या दिवशी याचे पर्यवसान वस्कन ओरडण्यात होत नसे तो दिवस त्याच्या (नव्हे, आमच्या) कुंडलीतला शुभदिन, असा माझा होरा असे !

खरं म्हणजे तो सात्त्विक वगैरे काही नव्हताच. कुत्र्यांविषयीच्या काही कोष्टकांवर त्याने चक्क काटच मारलेली होती. माझ्याशी तर तो खूपच भांडे. कमलच्या खोलीत तिच्यापाशी तो बसलेला असला की एक विलक्षण मक्तेगिरी त्याच्या डोक्यात शिरे. मग त्या खोलीत पाऊल टाक-ण्याची माझी प्राज्ञा नव्हती. त्याच्या मर्जीविरुद्ध मी त्याला फिरायला नेलं तर परतल्याबरोबर त्याच्या क्रोधाचा गुर्गुर–मारा माझ्यावर सुरू होई.

आणि तरी माझ्यावर त्याचा विश्वास होता. आमची एक विलक्षण प्रकारची दोस्तीच होती. एकदा असाच पाहुणे आलेले असतानाच तो पिसाळला आणि मला चावला. मी त्याच्या अंगावर ओरडलो. भीतीच्या नि अपराधाच्या भावनेनं तो कॉटखाली जाऊन बसला. मी दिवाणावरच्या बिछान्यावर बसलो. त्याच्याशी लुटूपुटीची लढाई खेळण्याचा पवित्रा घेतला. क्षणात त्यानं ओळखलं. बाहेर आला, बिछान्यावर चढला नि माझ्याशी

खेळू लागला. दोन मिनिटांपूर्वीचं चावणं आणि आताचं खोटंखोटं चावे घेण्याचं खेळणं — त्याचा हा कोटिभेद तर्कशास्त्राची सारी प्रमेयं कोळून प्यालेल्या तत्त्वज्ञान्यालाही साधला नसता.

हा कोटिभेद करण्याची त्याची ताकद विलक्षण होती. माझी फिरायला जायची आणि त्याला धाक दाखवण्याची काठी एकच होती, पण त्या काठीचं केव्हा कोणतं दर्शन होणार आहे हे तो अचूक हेरी; आणि तसा पवित्रा घेई. फिरायला जाताना त्याच काठीनं त्याला पाठीवर ढोसलं तरी थोडा लपकारा काढण्यापेक्षा तिची अधिक दखल त्यानं घेतली नाही. पण त्या काठीचा माराचा अवतार त्यानं दुरून पाहिला तरी तो लगेच दात विस्कारी !

अर्थात यात काही नवल नाही. कुत्र्यांनाही ते वरदान लाभलेलं असतं. बुद्धी, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती वगैरे गोष्टींचं देणं जो मेंदू मानवाला देतो त्याचा थोडासा लाभ कुत्र्यांनाही झालेला असतो. कुत्र्यालाही थोडी प्रतिभा असते. त्याला स्वप्न पडतं ही एकच गोष्ट याची साक्ष आहे. आमच्या जॉयला स्वप्नं पडत, मग तो झोपेत हलकेच भुंके. निरनिराळ्या आवाजात भुंके. भुंकणं ही त्याची भाषा होती. त्यानं वाटी आमच्यापुढं आपटली आणि तरी आम्ही चहा घातला नाही तर तो एका आवाजात भुंके — तक्रारीचा आवाज. त्याला बाहेर जायची घाई लागली आणि आम्ही लगेच दार उघडलं नाही तर तो दारावर उड्या मारीत ओरडे — काहीसा किंचाळत. त्याचं आवडतं माणूस दाराबाहेर येऊन त्यानं घंटा वाजवली की धावत जाऊन दारावर तशाच उड्या मारी — पण आता आनंदानं चीत्कारत. असा त्याचा वेगवेगळ्या गरजेचा वेगवेगळा आवाज असे. असा तो आमच्याशी बोले.

अर्थात सर्वच कुत्रे असं बोलतात. पण उलट आम्ही जॉयशी बोलू शकू. तो चहासाठी माझ्यापुढं येऊन उभा राहिला की मी त्याला सांगे, "जा, वाटी कमलच्या खोलीत आहे ती घेऊन ये." क्वचित तो घोटाळ्यात पडे. काही वेळा तो आळस करी. पण बहुधा 'कमलची खोली' आणि 'वाटी' या दोन ध्वनींचा मेळ घालून तो अचूक वाटी घेऊन येई. पुष्कळदा फिरायला गेल्यावर या रस्त्यानं जायचं की त्या रस्त्यानं जायचं याचा

विचारपूर्वक निर्णय घेऊन आपल्या पसंतीच्या रस्त्याकडे तो ओढ घेई. अशा वेळी तो दोहोंपैकी एका गोष्टीची निवड करतो आहे याचा मला त्याच्या डोळ्यांवरून प्रत्यय येई. त्याचे ते काळेभोर डोळे ! काळ्या कमळाच्या दोन कळ्याच. यमुनेच्या पाण्यावरचे दोन स्वप्निल बुडबुडे. दोन भावकाव्यं. त्याच्या मनाचे दोन ठिपके ! कोणाचा कानोसा घेऊन तो पाहू लागला की दोन शोधक प्रतिबिंबं तेवताहेत असं वाटे. पुढं त्याच्या डोळ्यांतली ती विलोल स्वप्नं फिकुटली तेव्हा त्याच्या नावाची सार्थता निम्मी विस्कटली !

जॉयच्या रूपानं एक व्यक्तिमत्त्वच वावरत होतं. तो हुशार होता, लाघवी होता, तल्लख होता; तसाच संतापी आणि पक्षपातीही होता. माझे काही मित्र त्याचे विशेष आवडते होते. पण प्राध्यापक इनामदार यांच्यावर त्याचा मुक्त लोभ होता. त्यांच्यावर तो कधी ' बिघडला ' नाही. तशीच काही रस्त्यांवर त्याची मर्जी होती. त्याला बाहेर हिंडायला अर्थातच आवडे; पण हव्या त्या रस्त्यानं जायची त्याची तयारी नव्हती. काही ठराविक ठिकाणीच, ठराविक व्यक्तींबरोबरच गेला तरच त्याचा प्रातर्विधी उरके. त्यासाठी सकाळी तो एका रस्त्यानं जाणार, तर रात्री दुसराच एक कोपरा गाठणार. अर्थात कुत्र्याच्या स्वभावाप्रमाणे काही ठराविक ठिकाणां-वर तो आपला हक्क विधिपूर्वक प्रस्थापित करी; पण त्यातही त्याची आवडनिवड होती.

आपण मूळचे लांडग्याच्या कुळातले याची जाणीव तो मला वारंवार आणून देई, आणि मी त्याला थोडा भिऊनच असे. पण लांडगे मानवी बालकाचं मोठ्या आस्थेनं पालनपोषणही करतात. लांडग्यांचा हा गुण घेऊन आणि त्याचा गुणाकार करूनच कुत्रा जन्माला येतो. तसा जॉय आला होता.

आम्ही बाहेरून आलो की जॉयमध्ये या गुणाचा अगदी आवेग शिरे. घरात शिरल्याबरोबर तो कडकडून भेटे, अंगावर उडी मारी आणि अवघा जीव अर्पण करी. आंधळं प्रेम म्हणजे काय ते मला या वेळी कळे. त्याचे डोळे अक्षरशः मिटत. नाकपुड्या घुसमटून निघत. प्राण घशात गोळा होत. संज्ञा एकवटून जाई. प्रेमाचा एक झपाटाच अंगाला भिडे.

आणि मग माझ्या डोळ्यांपुढं जाहिरातीतले ते गोडगोंडस पिलू उभे राही. आणि वाटे : ते शब्द किती अर्थहीन आहेत ! ‘ द ओन्ली लव्ह यू कॅन बाय ’ ! ‘ लव्ह ’ हा शब्द येथे अधुरा आहे, आणि हे लव्ह विकत घेण्याची कल्पना ही फक्त मनुष्यालाच लखलाभ होणारी दुष्ट विकृती आहे.

ही जाणीव जॉयनं वारंवार दिली. अनेकदा वाटलं, आपण याला पाळला, पण आपण याला न्याय दिला नाही, देत नाही, देऊ शकत नाही. त्याचं मन मी पुरतं जाणू शकत नाही. त्याची अंतरीची अपेक्षा मी पुरी करू शकत नाही. त्याच्या अंत:करणाला दाद मी देऊ शकत नाही. खरं आहे. माणसाचं मन तरी आपल्याला पुरं कधी कळतंय ? पण माणसाचा अपेक्षाभंग झाला, त्याला अन्याय झाला, त्याच्या अंत:करणावर आघात केला तर तो त्याचा बदला घेऊ शकतो. त्याला त्याचं निर्णयस्वातंत्र्य असतं, आणि ते त्याचं मोठं शस्त्र असतं. आपण त्याला अन्याय केला तर तो आपल्याला करू शकतो आणि एक समाधान मिळवू शकतो. माणूस प्रेम करू शकतो; पण त्याचं प्रेम हिशेबाच्या कोष्टकात बसू शकतं. कुत्र्याचं तसं नाही. त्याचं प्रेम म्हणजे एक नितान्त अर्पण. विश्रब्ध समर्पण. त्याच्या प्रेमाला अपेक्षेचा रकाना नाही. त्याच्या भक्तीला हिशेबाचा ताजवा नाही. कित्येक तास जॉयला घरात एकटा टाकून आम्ही घराबाहेर असू. ते त्याला आवडत नसे. पण आम्ही परत आल्यावर, आमचा नुसता वास लागल्या-बरोबर त्याची नि:शेष भक्ती उफाळून येई. आणि मला वाटे, आपण याला पुरे पडू शकत नाही. आपण याला आणला नि त्याच्यावर अन्याय केला. आज तो गेला तरी ही जाणीव निमालेली नाही. जातानासुद्धा आपल्या आजारपणाचा फारसा उपद्रव न देता, आपल्याला कसला आजार झाला याची सुद्धा कल्पना न देता तो गेला. म्हणजे आमचाच त्रास त्याला झाला; त्याचा आम्हाला नाही.

उलट त्याने आमची कसलीतरी जबरदस्त गरज पुरवली. नाहीतर आमच्या जीवनात तो इतका शिरलाच नसता.

कसली गरज पुरवली ? वात्सल्याची ? — असेल. जॉय म्हणजे

एक लहान मूलच होतं: दीडदोन वर्षांच्या मुलाच्याइतकी त्याची जाण होती. रागलोभही तसेच. पण वात्सल्यासाठी मी खरोखरच कधी कळवळलो नाही. लहान मुलांशी दोस्ती मला करता येत नाही. बालवाङ्मयानं भुरळ मला कधी घातली नाही. मग कसली ? जॉयनं मला एक विलक्षण सोबत पुरवली. एक अकृत्रिम स्नेह दिला. अहम्‌चं पोषण करणारा. असा स्नेह माणसाला हवा असतो. आपण सारे सामाजिक प्राणी आहोत. सामाजिकतेच्या उत्संगावर आपण वाढतो. पण आपली सामाजिकता आपल्या अहम्‌ची सारखी कुचंबणा करीत असते पण जॉयची सोबत माझा अहम् सुखवीत असे. कुरवाळीत असे. एक जगावेगळा कुत्रा आपल्यापाशी आहे याचा एक सूक्ष्म अहंकार मला होता. जॉय वयानं वाढला तरी तो पोर वाटायचा. त्याची ही टवटवी मोठी सुखकर वाटायची. त्याच्या दर्शनात एक अप्रूप होती. रस्त्यात त्याला घेऊन फिरताना कोणी मला विचारी, 'का हो, कोणत्या जातीचा हा कुत्रा ?' मला कुठं माहीत होतं ? पण 'सोनाली'-प्रसिद्ध पूर्णपात्र्यांनी तयार केलेल्या एका जातीचा तो प्रतिनिधी होता, आणि त्याची अपूर्वाई वाटायची. त्याची शेपटी हे त्याचं वैभव होतं. पुष्कळ कुत्र्यांचं असतं. पण याचं आगळं होतं. आपण सारेच क्षितिजावर उभं इंद्रधनुष्य पहातो; पण मी विमानातून खाली ढगावर पसरलेलं आडवं पूर्ण वर्तुळाकार 'इंद्रधनुष्य' पाहिलेलं आहे. कुत्र्याची शेपटी पाठीवर उभी वळलेली असते. पण याची उजवीकडे बाजूला आडवी वळलेली होती. तशी त्याच्या बापाची पाहिली, म्हणून तर याला मी आणला. सुरुवातीला त्याची शेपटी तशी होईल की नाही अशी मला काळजी वाटायची. पण झाली. त्यानं दगा दिला नाही. जॉयचं हे दर्शन माझ्या अहम्‌चं सूक्ष्म पोषण करी.

पण जॉयला असा अहम् नव्हता. अंतिम अर्थानं कसलाच अहंकार त्याला नव्हता.

आणि हीच जाणीव अस्वस्थ करते.

कोणतीही जाणीव, कोणताही अनुभव समृद्ध करतो असं शास्त्रज्ञ सांगतात.

पण माझ्या या समृद्धीला शाप बाधलेला आहे. माझ्या काही अनुभवांनी माझं आयुष्य समृद्ध केलेलं नाही. एखादी सुबक वस्तू कानशीनं

घासावी तसे हे अनुभव माझी आंतरिक जाणीव घाशीत असतात. तो शाप घेऊनच मी जन्माला आलो आहे. काही गोष्टींनी माझं आयुष्य कायमचं श्रापलं आहे. करपलं आहे. — कौसानीला सकाळच्या सूर्यप्रकाशात हिमालयाच्या एका शिखराचं विलोल दर्शन होत असताना नेमका एक ढग मधं आला तसं.

मी समाधान करून घेतो – जगातल्या कितीतरी गोष्टींना असा शाप बाधलेला आहे :

— शेक्स्पीअरच्या 'हॅम्लेट'ची रचना शिथिल आहे.

— काण्टच्या भव्य तत्त्वज्ञानाची शैली क्लिष्ट आहे.

— मार्क्सच्या उदात्त स्वप्नाचं स्टालिननं मातेरं केलेलं आहे.

— नेहरूंसारख्या राजयोग्यांना काही तामस व्यक्तींनी घेरलं होतं.

— गंगेलासुद्धा प्रदूषण जडतं.

पण तुम्हाला माहीत आहे, मला माहीत आहे, हे समाधान खोटं आहे.

काही शाप भोगायलाच हवेत — अश्वत्थाम्याच्या भळभळत्या जखमेसारखे !

# वुई आर ऑन अ हनिमून

"आय हॅव नॉट वूड इव्हन अ वूमन लाइक धिस." 'फ्री प्रेस'चे जनरल मॅनेजर नाडकर्णी म्हणत होते. माझी नजर समोरच्या ग्लासमधील बिअरच्या बुडबुड्यांच्या लहानमोठ्या अशरीर आकारांचा वेध घेत होती.

ता. २९ नोव्हेम्बर, १९४५ मुंबईतली एक जडावलेली संध्याकाळ. नाडकर्णी आणि मी 'एरॉस रेस्टोरॉं'मध्ये बिअर पीत बसलो होतो. नाडकर्णी बोलत होते. आणि मी समोरच्या ग्लासमधील सोनेरी द्रव्याची खुलावट न्याहाळीत होतो. खुलावट नव्हे; खरोखर ते बुडबुडेच. ग्लासाच्या तळाशी ते उमटतात. ईथरचा आकार धारण करतात. एक प्रकारच्या विकारवश गतीनं पृष्ठभागाकडे धावतात आणि पृष्ठभागावर येऊन फुटतात. स्वप्नांप्रमाणं. माझी नजर त्या बुडबुड्यांभोवती भिरभिरत होती.

खरोखर एका स्वप्नानंच माझं जीवन त्या वेळी बांधलं होतं. हे स्वप्न कोणत्या नेणिवेत उमललं होतं मला माहीत नव्हतं. पण मला त्याची पर्वा नव्हती. जीवनाच्या कोणत्या धाग्यानं ते ओढलं जात होतं तेही मला माहीत नव्हतं. पण मला त्याची पत्राज नव्हती. त्या स्वप्नामुळं माझ्या अंतर्मनात जादूचं एक तरल विश्व उमललं होतं, आणि तेवढंच मला पुरे होतं.

स्वप्न होतं कथालेखनाचं. स्वतःच्या आणि इतरांच्या कथालेखनात रमण्याचं. त्या वेळी दादरच्या वृक्षांवरील पक्ष्यांची घरटी माझ्या मनात

कथा बांधीत. भायखळ्याच्या पुलाखालच्या पिंपळाची तकतकीत पानं माझ्याशी कथेची कुजबुज करीत. समुद्राच्या लाटांवरील फेनपुष्पं माझ्या पुढं कथेची परडी रचीत. गुलमोहराची लाललाल फुलं कथेची पुष्परचना करीत. आगगाडीचे चकाकणारे रूळ माझ्या मनात कथालेखनाचे चक्रव्यूह तयार करीत.

फडके-खांडेकर-य. गो. जोशी यांच्या कथांनी मला भुरळ घातलीच नाही. क्षमा राव, विभावरी शिरूरकर, वि. वा. शिरवाडकर, वामन चोरघडे यांच्या कथांनी माझ्या मनाला मखमली स्पर्श केला. पण मला वेड लावलं ते बाल्झाकनं – त्याच्या भव्यतेनं. मॉमनं – त्याच्या जीवन-दर्शनानं. मोपासाँनं – त्याच्या खट्याळ स्वभावरेखनानं. चेकोव्हनं – त्याच्या ऋजू प्रतिभेनं. एच. ई. बेट्सनं – त्याच्या तरल पण अर्थगंभीर प्रतीकांनी. आणि पिरांदेलोनं – त्याच्या विदारक उपरोधानं. या कथा-लेखकांची एकेक कथा घ्यायची, वाचायची आणि मित्रांशी त्याबद्दल खूप-खूप चर्चा करायची याचा मला नाद लागला. या माझ्या नादानं सदानंद रेगे, प्रभाकर लाड, प्रभाकर नेरूरकर, वि. वा. शिरवाडकर, दि. बा. मोकाशी, मंगेश पाडगावकर या मित्रांना खूप छळलं. लगोऱ्यांच्या खेळात आपण सोबत्यांच्या पाठीमागे लागतो तसे. रात्री झोपेतसुद्धा कथा माझी पाठ सोडीत नसे. एक दिवस मी बेट्सची एक कथा वाचली, आणि स्वप्नात इंग्लंडला गेलो. एका ऑर्कर्डमध्ये. सारा ऑर्कर्ड बर्फानं पांढराधोप झालेला ऑर्कर्डच्या मधोमध एक छोटं चर्च, तिकोनी आकाराचं. आतल्या प्रकाशानं सुवर्णमय झालेलं. खुललेलं पण काहीतरी गूढ किमया चालू आहे असं भासविणारं. चर्चच्या वरच्या कोनावर क्रॉस नव्हता, क्राऊन होता ! इतक्यात चर्चमध्ये घंटानाद सुरू झाला नि मी जागा झालो. माझ्या नजरे-समोर तो क्राउन होता क्रूसाऐवजी राजमुकुट ! बेट्सचं एक विलक्षण प्रतीकच !

१९४३ साली माझी 'व्याधाची चांदणी' ही कथा प्रसिद्ध झाली. या कथेनं माझी नाडकर्णींशी मैत्री जडवली होती. त्या कथेत एका स्त्रीच्या पोटरीवरील सफेद रेषांचं वर्णन मी केलं होतं. त्यानं अनंतराव गद्रे संतापले. संतापले म्हणजे भडकले ! उखडले! नाडकर्णींना म्हणाले," काय हे अलीकडचे

लेखक ! उनाड लेखणीचे ! फोडून काढायला हवेत !" काय आहे तरी काय या कथेत असं, हे पहाण्यासाठी नाडकर्णींनी ती कथा वाचली. वाचली नि खूष झाले ! एकदम मला त्यांनी फोन लावला नि म्हणाले, "ए यंग मॅन मस्ट राइट लाइक धिस !" तेव्हापासून त्यांची माझ्यावर मर्जीच जडली. तेव्हा ते 'फिल्मिस्तान'मधे पब्लिसिटी मॅनेजर होते. एकदा ते मला आणि माझ्या 'जंगली कोमाली' या कथेला घेऊन शशधर मुखर्जींकडे गेले. या कथेला रुपेरी पडद्यावर फार मोठं भवितव्य आहे अशी नाडकर्णींना खात्री वाटत होती. पण मुखर्जींच्या कम्युनिझमशी माझ्या कम्युनिस्टविरोधाचं पटलं नाही. पाच मिनिटांतच आमचा खटका उडाला. नाडकर्णींना हे कितपत मानवलं कल्पना नाही; पण स्टुडिओच्या दाराशी मला निरोप देताना ते म्हणाले, "पाध्ये, डोन्च्यू फर्गेट दॅट स्टोरी. इट हॅज ग्रेट पॉसिबिलिटीज ऑन द स्क्रीन." थिएटरबाहेर माझा स्क्रीनशी संबंध आला तो तेवढाच.

पण नाडकर्णींची मर्जी कथालेखनापुरती मर्यादित राहिली नाही. १९४५ साली ते 'फ्री प्रेस'चे जनरल मॅनेजर झाले, आणि त्यांनी डबघाईस आलेल्या 'नवशक्ती'चा जीर्णोद्धार करायचं ठरवलं. आचार्य जावडेकरांनी प्रस्थापित केलेल्या या 'फ्री प्रेस'–भावंडाचा खप तेव्हा रोजी नऊशे होता. नाडकर्णींना वाटलं की हे जीर्णोद्धाराचं ओझं माझ्या खांद्यावर टाकावं ! पण माझ्या डोक्यात कथालेखनाची नशा होती. दैनिकाचे अग्रलेख आणि कथालेखनाची स्वरसात्मकता यांचं सापत्न नातं मला माहीत होतं. एकदा दैनिकाच्या धबडग्यात शिरलो की माझं कथालेखन खलास ! तेव्हा 'धनुर्धारी'त मला महागाईभत्त्यासकट मोजून एकशेदहा रुपये मिळत होते, आणि नाडकर्णी मला साडेतीनशे देणार होते. महागाईचे चटके बसणाऱ्या संसाराला त्यांची गरज होती पण डोकं कथालेखनाच्या नशेनं पार फेसाळलं होतं. कथालेखनाचे कायदे निराळे आणि दैनिकाचे कायदे निराळे, असा बुद्धीचा ठाम निर्णय झाला होता. आणि ते बरोबरच आहे. कथेत माणूस असतो; अग्रलेखात राजकारणी असतो. कथेत निसर्ग फुलतो; दैनिकाच्या रकान्यात राजकारणाचं रान माजतं. कथा स्वतःत डोकावते; दैनिक बाहेरच्या वाचकाकडे पहातं. पण नाडकर्णींना हे पटत नव्हतं. ते मला शॉ, हेमिंग्वे, शरवूड अॅण्डरसन यांची उदाहरणं देत होते, वृत्तपत्रीय अनुभवानं

यांचं लेखन कसं समृद्ध झालं ते सांगत होते, आणि बिअरचे बुडबुडे डोक्यात फिरत असूनसुद्धा, या मातब्बरांचे दाखले मला कशाला असे मी म्हणत होतो. अखेरीस नाडकर्णी वैतागले नि म्हणाले, " मी आजवर कुण्या स्त्रीची देखील अशी मनधरणी केली नव्हती. " या उद्गारांचा माझ्यावर चमत्कारिक परिणाम झाला नि मी ' हो ' म्हटले. त्या एका ' हो'नं माझ्या कथालेखनाची इतिश्री आणि वृत्तपत्रीय जीवनाची भाग्यश्री यांचा एकदम पाया घातला. जीवनातला एक प्रचंड निर्णय मी असा बिअरच्या बुडबुड्यांवर स्वार होऊन घेतला !

पण मी दारू पीत नाही. म्हणजे दारूच्या थेंबाला स्पर्श करीत नाही असं नव्हे. स्पर्श करतो, पण थेंबालाच. पण हा थेंब व्हिस्कीचा नाही. व्हिस्की मला आवडत नाही. (यावरूनच मी त्यातला नव्हे हे ध्यानात येईल.) मला आवडतं पोर्च्युगिझ ' ब्रँको ', इतालिअन ' किआंटी ', फ्रेंच ' बोर्दो ', युगोस्लाव्हिआची ' स्लिव्होविझ ', जर्मनीची ' ऱ्हाइन वाइन ' आणि टोकिओची ' साके '. ' स्लिव्होविझ 'ने माझी युगोस्लाव्ह पत्रकारांशी झालेली चर्चा अर्थपूर्ण केली. ' ऱ्हाइन वाइन'नं लंकेच्या शरच्चंद्रांशी केलेली भारतीय साहित्यशास्त्राची चर्चा रसपूर्ण बनवली. ' पोर्च्युगिझ ब्रँको'नं मला एकदा हवेत उचललं. ' बोर्दो किआंटी'नी लातिन संस्कृतीची चव दिली. आणि ' साके'नं जिभेवर विरघळवणं म्हणजे काय हे शिकवलं. पण ' साके'नं मदिरेचं एक नवंच परिमाण दाखवलं. अन्न आणि मद्य यांचं एक नवंच नातं ' साके'नं मला शिकवलं. आंतरिक नातं. अन्न आणि दारू यांच्या संबंधांचं शास्त्र निराद चौधरींनी एकदा आम्हाला पाजलं होतं : विशिष्ट मद्य विशिष्ट अन्नाबरोबरच जातं; अशी युती जमली तर अन्नाची चव मद्यानं खुलते आणि मद्याची चव अन्नानं खुलते. पण ' साके ' आणि ' सुकियाकी ' यांचं नातं अधिक जिव्हाळ्याचं आहे. ' सुकियाकी ' तयार होतानाच ' साके ' त्यात मिसळते — आणि हा पदार्थ खाताना एकाच वेळी अन्नाची चव मोहरते, आणि मदिरेची मोहिनी पसरते. ' सुकियाकी ' खाताना आपण अन्न पोटात ढकलीत नाही, तर जिभेवर स्वादाच्या लहरी खेळवतो.

पण जपानात साक्षात्कार घडतो तो इतका घरगुती नसतो. जपानात 'साके'ची खरी मजा येते ती गेशांच्या संगतीत. ही संगत नुसती संगत नसते. ते एक मीलन असतं — संस्कृतीचे संकेत पाळून केलेलं मीलन. ही गेशा तुम्ही 'साके' पीत असताना नुसती तुमच्या शेजारी बसून असते असं नाही. 'साके'पानाच्या वेळी ती आपली नजर तुमच्या नजरेत नुसती मिसळतेच असं नाही. ती तुमच्या मनात एक स्नेहशीतल दरवळ निर्माण करते एवढंच नाही. ती 'साके'चा पेला तुमच्या तोंडाला लावते. ती तो पेला पुढे करते तेव्हा तिची नजर फडफडते, ओठांना मिस्किल मुरड पडते आणि तिचा स्निग्धस्नेहाळ हात तरल बनतो. थोडक्यात म्हणजे, ती आपली सारी किमयाच तुमच्या तोंडाला लावते. आणि मग तुम्ही तुम्ही रहात नाही. तुमच्या खालची भूमी भूमी रहात नाही. आणि ते गेशागृह गेशागृह उरत नाही.मग ती एक जादूची नगरी बनते — आणि तुम्ही तो पेला तिच्या तोंडाकडे नेता. मग ती लाजते, विलक्षण लाजते. तिची नजर मोहरते, गाल गुलाबतात आणि कानाच्या पाळ्या लालीलाल बनतात. ती आपले तोंड मागं नेते आणि तिचे ओठ मुरडतात. मग तुमच्या शब्दांत एक आवेग शिरतो, तेव्हा ती तुमच्याकडे अशी काही पहाते, अशी काही पहाते, की तुम्ही ओशाळता. ओशाळता — कारण एक अनोखी जाणीव तुमचं मन घेरते. जाणीव ही की, तुम्ही या अप्सरेपुढे एखादे गंधर्व नाही, तर साधे माणूस आहात. पंचमहाभुतांनी बांधलेले माणूस. जमिनीला जखडलेले माणूस — एक जड प्राणी. आणि तुमच्या अंतरंगात उमलू लागलेले यक्ष-गान मूक बनते. 'साके'चा पेला धरलेला तुमचा हात एकदम अचेतन बनतो. तुमचा तुम्हालाच तो कुरूप वाटतो. इतक्यात या अप्सरेची नजर मिस्किल बनते. तिच्या नाकपुड्या थरथरतात. तिचे ओठ थोडे विलग होतात आणि ती आपले तोंड पुढे करते नि तुमच्या हातातल्या 'साके'च्या पेल्याला ओठांचा स्पर्श करते. आता त्या 'साके'त मिसळलेल्या तुमच्या चवीचं मीलन तिच्या चवीशी होतं आणि साकेपान कृतार्थ बनतं !

पण मदिरेला अशी संकेतात्मक कृतार्थता मानवत नाही. मदिरेची कृतार्थता म्हणजे आपली संपूर्ण शरणागती. पण मदिरेला असा शरण मी फारसा

कधी गेलोच नाही. माझी मदिरेची साधना म्हणजे कनवटीला सुपारी लावून केलेली पूजा. अधुरी आणि अपुरी. आणि तीसुद्धा या व्रताची दीक्षा मला खुद्द आचार्य अत्र्यांनी दिलेली असताना ! असं झालं, कारण माझ्या बाबतीत मदिरेची साधना म्हणजे समर्पण नव्हतं. एका गद्य व्यावहारिक हिशेबानं मी मदिरेला स्पर्श केला. मदिरेला म्हणजे बिअरला. भाऊमामा घडफळ्यांनी माझी अत्र्यांशी ओळख करून देली, तेव्हा अत्रे म्हणाले, " अहो पाध्ये, किती लुकडे तुम्ही ! अहो बिअर प्या, म्हणजे माझ्यासारख भराल ! मीसुद्धा तुमच्यासारखाच लुकडा होतो. पण इंग्लंडला गेलो नि चापून बिअर प्यालो. मी सांगतो, वजन वाढवायला बिअरसारखं औषध नाही. बिअरच्या एकेका घोटाबरोबर एकेक औंस वजन वाढतं." खरं म्हणजे अत्र्यांच्या शब्दांसाठी नाही, तर बिअरच्या रुचीसाठी मी तिच्याशी सलगी करू लागलो. बिअर ही अशी वस्तू आहे, की जिच्यामध्यं स्वाद आणि चव यांचं एक आगळं मिश्रण होतं. बिअरचा घोट घेतला की जिभेवर एक खोडकर चव रेंगाळू लागते, आणि तिच्या विलक्षण स्वादामुळं ती तुम्हाला पकडून ठेवते. मग जिभेला नवनवीन घुमारे फुटतात. तिचे अणुरेणू फुलून येतात, आणि या प्रत्येक रेणूत ती खट्याळ चव स्वतंत्रपणं विरघळते.

एक दिवस मी आणि हरिभाऊ मोटे प्रिन्सेस स्ट्रीटवरील एका बारमध्ये बिअर पीत बसलो होतो. इतक्यात बिअरच्या बॅरेलमध्यें घुमल्यासारखा एक आवाज आला. आम्ही वर पाहिलं तो अत्रे — एका मित्राबरोबर. तोच त्यांचंही आमच्याकडे लक्ष गेलं. त्याबरोबर ते उठले. आपण रिचवलेल्या व्हिस्कीचा हलता हवाला देत ते आमच्याकडे आले नि मला म्हणाले, " पाध्ये, तुम्ही — आणि बिअर ?" मी म्हटलं, " वाः ! तुम्हीच नाही का दीक्षा दिलीत मला !" बस्स, मी एवढं म्हटलं, आणि अत्र्यांनी घेतलेलं सारं मद्य आनंदानं फुलून आलं. चेहेऱ्यावर उमटलं आणि म्हणालं, " शाबास ! शाबास ! तुम्ही स्मरता ! मी आजवर इतक्या लोकांना शिकवलं. इतके विद्यार्थी माझ्या हाताखालून गेले. पण अशी कृतज्ञता कुणी दाखवली नव्हती. तुम्हाला माहीत नाही, लोक विसरतात ! पण तुम्ही गुरूला विसरलात नाहीत ! शाबास !" तेव्हा अत्रे शिक्षक होते —

'मराठ्या'चे संपादक नव्हते. नाहीतर त्यांनी म्हटलं असतं, "असा शिष्य हजार वर्षांत झाला नव्हता!"

अत्र्यांची दीक्षा फुकट गेली. बिअर पावली नाही. मी लुकडाच राहिलो. कारण अत्र्यांनी दिलेला धडा मी नीट गिरवला नाही. गिरवू शकलो नाही. कारण बिअर आणि माझं अन्न-यंत्र यांचं पटलं नाही. द स्पिरिट वॉज विलिंग बट द फ्लेश वॉज वीक! (स्पिरिट — दोनही अर्थांनी.) लठ्ठ व्हायचं असेल तर बिअरमध्यं बुडायला हवं. मग पाण्यात बुडालेला माणूस फुगतो तसं फुगायला होतं. त्याला हिंमत लागते. ती माझ्या डोक्यात होती, पण पोटात नव्हती.

म्हणून मी फक्त दारूच्या थेंबाला स्पर्श करणाराच राहिलो. यानं माझा एक फायदा झाला. समर्पितांच्या कंपनीत माझा प्रवेश झाला, आणि समर्पितांच्या लीला मला न्याहाळता आल्या. या समर्पितांत कधी मर्ढेकरांचा सिद्धान्त सिद्ध होई, तर कधी अमेरिकेच्या राजकारणाची झडती होई. कधी राज्यशास्त्राचा एखादा अकल्पित सिद्धान्त निष्पन्न होई, तर कधी महाभारतावर अजब प्रकाश पडे. एकदा (खूप पूर्वी) आम्ही काही मित्र पुण्याच्या 'दोराबजी'कडे जेवायला गेलो. हे मित्र चांगले अनुभवी होते. मदिरापान म्हणजे मदिरेशी क्रीडा हे ते चांगले जाणत होते. मदिरेशी विश्रब्ध आलाप (विलाप) कसे करावे, तिच्याशी ईषद्-चुंबनाचा खेळ कसा खेळावा, त्या खेळात मधूनमधून कृतक तटस्थता, अलिप्तता, दुरावा कसा धारण करावा, मधूनच अगदी संन्यस्त कसं व्हावं, नि मग त्याचा वचपा आवेशपूर्ण घुटक्यानं कसा काढावा, स्वतःचा चषक भरपूर भरण्यासाठी दोस्तांना मनसोक्त आग्रह कसा करावा, तोंडाचा उपयोग पिण्यापेक्षा गप्पांसाठी कसा करावा, आणि अखेरीस पिण्याचा वरचष्मा करून गप्पा कशा गुदमराव्या (किंवा आपण तितकेच भाग्यवंत असलो तर अजिबात गप्प कशा कराव्या), पृथ्वीवर बूड (अर्थात कसेबसेच) ठेवून अस्मानात कसं जावं, पेल्यातील पेयात राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, सौंदर्यशास्त्र, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र (विशेषतः नीतिशास्त्र) यांची प्रतिबिंबं कशी पहावीत, अगदी काहीच नाही तर एकमेकांच्या संसाराची चव पेयाच्या चवीत

मिसळून कशी चर्चावी वगैरे गोष्टींचं तंत्र आणि मंत्र ते नीट जाणीत होते.

आमच्या या मित्रमंडळीत आर. सदाशिव गोरे नावाचे एक गृहस्थ होते. त्यांना सौंदर्यशास्त्राचा भारी नाद. तेव्हा मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राची चलती होती. गोरे एकदम मर्ढेकरांनी दिलेलं 'मर्मर' शब्दाचं उदाहरण घेऊन अर्थ आणि नाद या कशा वेगळ्या गोष्टी आहेत हे सांगू लागले. प्राथमिक शाळेतल्या मास्तराप्रमाणं तेच तेच वाक्य पुनःपुन्हा उच्चारून समजावून देऊ लागले. हे चांगलं पटावं म्हणून की काय, प्रत्येक नवीन पुनरावृत्तीतला उच्चार ते बदलीत होते. आणि समजावून सांगत होते की, संगीतात शब्दांच्या अर्थाला महत्त्व नाही. त्यावर एकानं विचारलं — आपल्या प्रश्नाला जोर येण्यासाठी हुज्जत घालीत विचारलं—की," ज्योत्स्ना भोळेंनी गाइलेल्या काणेकरांच्या 'आला खुशित समिंदर' या भावगीताला हे तुम्ही कसं लावून दाखवाल ? " होता प्रश्न; पण मदिरेचा प्राण प्रश्नात शिरला की त्याचं आव्हान होतं. प्रा. गोरे यांनी ते आव्हान लगेच स्वीकारले आणि ते स्वतःच गाऊ लागले, 'आला खुशित महिंदर, त्याला घालू घाव, होडीला डबडी बडू; ग गजरे, होडीला डबडी बडू.' अर्थ आणि नाद यांचा काही संबंधच नाही याचं प्रात्यक्षिकच गोऱ्यांनी सुरू केलं. गोरे गाऊ लागले आणि इतरांनी ताल धरला. इतक्यात 'दोराबजी'चं हॉटेल बंद होण्याची वेळ झाली, निदान त्यानं तसं सांगितलं. बिल वगैरे देऊन आम्ही सारे मित्र मोटारीतून घरी परत निघालो. वाटेत रस्ताभर मोटारीत प्रा. गोरे तानांवर ताना घेऊन 'होडीला डबडी बडू' करीत होते, आणि इतरजण मोटारीच्या मिळेल त्या भागावर ताल धरीत होते. इतक्यात मोटार गोऱ्यांच्या घरासमोर येऊन उभी राहिली. मित्र म्हणू लागले; "गोरे. उतरा. तुमचं घर आलं." पण अजून गोरे होडीला बडवीत होते. कुणीतरी गोऱ्यांना धरलं आणि म्हटलं, "गोरे, उतरा. तुमचं घर आलं." गोऱ्यांनी आपली जडसुस्त पापणी घराकडे वळवली आणि म्हणाले, "हे माझं घर नाही. होडीला डबडी बडू !" इतक्यात ही गडबड ऐकून सौ. गोरे बाहेर आल्या. आणि त्यांनी मोठ्यानं विचारलं, "कोण आहे ?" त्याबरोबर गोऱ्यांची होडी बुडाली. ते उठले, गाडीच्या बाहेर आले आणि घराच्या दिशेनं चालू लागले !

तसेच आमचे दुसरे एक मित्र. श्री. अमृत राव. रॉयिस्ट. त्यांना रॉयची ती गोष्ट माहीत होती. एकदा क्रेमलिनमध्ये स्टालिनच्या कमऱ्यात ओली पार्टी होती. बाकी सारे आडवे झाले; पण स्टालिन आणि रॉय पायांवर (स्वतःच्या) उभे होते. ते पाहून स्टालिन म्हणाला, " कॉम्रेड रॉय, हे साले (सारे) युरोपिअन बघ कसे खलास झालेत. पण तू नि मी— आपण एशिॲटिक्स. दारू प्यावी तर आपण एशियन लोकांनी !" ही कथा ऐकल्यापासून अमृत राव रॉयचे ग्रंथ वाचतावाचता व्हिस्कीचे डोसही घेऊ लागले. किंबहुना रॉयचे विचार व्हिस्कीत बुडवूनच घेण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यांनी रॉयचा ' द हिस्टॉरिकल रोल ऑफ इस्लाम ' वाचला आणि ते मुसलमानांचे पक्के पक्षपाती बनले. मुसलमानांचे पक्षपाती म्हणून पाकिस्तानचे पक्षपाती. आणि पाकिस्तानचे पक्षपाती म्हणून कश्मीरच्या स्वयं— निर्णयाचे पुरस्कर्ते. इतकंच काय, पण अमेरिकेच्या धोरणाचेही पुरस्कर्ते. पण १९६५ च्या युद्धात पाकिस्तानने अमेरिकेची ' सेबरजेट ' वापरली, आणि अमृत रावांची पंचाईत केली. अमृत राव एकदम शांत बनले. अंतर्मुख बनले. राजकारणावर फारसे बोलेनासे झाले. पण कोणी त्यांना छेडलंच तर म्हणत की, ' पाकनं अमेरिकेचा विश्वासघात केला, त्यात अमेरिकेचा काय दोष ?'

असे हे अमृत राव एका पेयपार्टीत भेटले. पार्टी रंगात आली होती. टेपरेकॉर्डरमधून संगीत स्रवत होतं; पण त्याच्याकडे कोणाचं लक्ष नव्हतं. एक जोडपं एकमेकांना धरून कथ्थकची पावलं टाकीत होतं. एक बाई एका मित्राला योगासनाची, प्रयोगाची एखादी झलक दाखवून, माहिती देत होती. एक इसम शेजारच्या बाईचा हात पहात होता. एक तर्रर नजर दुसऱ्या तर्रर नजरेत विश्वाचं रहस्य शोधीत होती. एक गृहस्थ अमेरिकेचं सेबरजेट नॅटनं कसं सहज पाडता येतं हे सांगत होता. पलिकडचा आणखी एक हिंदुस्थानची फाळणी ही कशी गाढवचूक होती हे, जीनांचं एक त्यालाच माहीत असलेलं पत्र उद्धृत करून सांगत होता. इतरजण मानवी विसंगतीची अनेक अनोखी प्रात्यक्षिक दाखवीत होते. पण अमृतराव गप्प होते. कोपऱ्यातील एका खुर्चीवर एकटेच बसून व्हिस्कीचा एकेक थेंब जिभेवर विरघळवीत होते. पिण्यावर नितान्त निष्ठा ठेवून वागत होते. एक

पेग झाला की दुसरा, एवढंच कर्तव्यकर्म ओळखीत होते. असे पाच पेग झाले. तरी शांत होते, स्तब्ध होते. शब्द आतल्या आत अडकवून अंतर्मुख असलेल्या चेहेऱ्यानं स्वस्थ बसून होते. ते बोलत असलेच तर घशात जाणाऱ्या व्हिस्कीच्या थेंबाशी कसल्यातरी अबोल, अबोध भाषेत बोलत होते. अखेर त्यांनी सहावा पेग घेतला, आणि त्याच्याशी त्यांचा मूक विनियोग सुरू झाला. विनिमय सुरू झाला. पेला अर्धा रिकामा झाला — आणि त्यांचे डोळे लकाकू लागले. चेहेऱ्याचे स्नायू सैल झाले. टेपरेकॉर्डरमधून स्रवणाऱ्या संगीताशी पायानं ताल धरू लागले. आणि मग एकदम त्यांनी माझ्याकडे पाहिलं. थोडे हसले. आणि एकदम उठले, त्या पार्टीत सामील झालेल्या एकुलत्या एक अमेरिकन स्त्रीकडे गेले, आणि तिचा खांदा धरून तिच्या तोंडावर एकदम ओरडले, " यू अमेरिकन्स आर स्काउंड्रल्स ! व्हाय डोन्च्यू स्टॉप पाकिस्तान फ्रॉम मिस्‌युजिंग युअर आर्म्स ?" ( तुम्ही अमेरिकन बदमाष आहात ! तुमची शस्त्रं वापरण्यापासुन तुम्ही पाकिस्तानला थांबवीत का नाही ?') प्रत्येक जण थक्क झाला. अमृत राव — सुसभ्य, सुस्वभावी अमृत राव — त्यांचं हे दर्शन अगदी नवीनच होतं. ती अमेरिकन बाई थोडी बिथरली. पण मी खूष झालो. भारताच्या एका सुपुत्राची हरवलेली राष्ट्रीय अस्मिता गवसली होती.

असेच ते ब्रह्मदेशचे उ मॉंग मॉंग ! ऱ्होड्‌स आयलंड (ग्रीस)मध्ये एका सेमिनारला आम्ही हजर होतो. एक दिवस रात्री नऊ वाजता मला त्यांचा फोन आला : " आर्यू अलाइव्ह ऑर्डेड ? कम् हिअर इमिजिएट्‌ली. यू आर्माय ओन्ली फ्रेंड हिअर, हू कॅन हेल्प मी." (' तू जिवंत आहेस की मेलाहेस ? ताबडतोब इकडे ये, मला मदत करू शकेल असा इथं तू माझा एकच मित्र आहेस.') त्याचा आवाज थोडा विचित्र होता. (पण खरं सांगतो, टेलिफोनमधून वास वगैरे काही आला नाही ! ) मी गेलो, मॉंग मॉंगच्या खोलीत प्रवेश केला आणि चकित झालो ! गृहस्थ बूट–टाय–सुटासकट पलंगावर पसरला होता. चेहेऱ्यावर एकप्रकारचा भकासपणा. आढ्याकडे एकटक पहात होता. मी जाऊन शेजारी उभा राहिल्यावर भानावर आला. विकट हसला. विकल हसला. म्हणाला, " आय वॉंट युअर ॲडव्हाइस." माझा सल्ला ? कशाबद्दल बुवा ? मी नुसताच

प्रश्नार्थक चेहेरा केला. म्हणाला, " आत्ताच बायकोची तार आलीय. मी कायदेमंत्री म्हणून आपल्या सरकारात सामील व्हावं असं ने विन म्हणतोय. "

ने विननं नुकतेच उ नूला पदच्युत करून लष्करी राजवट स्थापली होती. मी म्हटलं, " मग लेका, विचार कसला करतोहेस ?"

" प्रभाकर, तुला कळत नाही. ने विन सहा महिन्यांनंतर निवडणुका घेणार आहे, आणि निवडणुकीत उ नू नक्की निवडून येणार."

" हे काय ने विन जाणीत नाही ?" मी विचारले.

" जाणतो. पण ने विन हा शब्दाचा पक्का आहे. राष्ट्राला दिलेला शब्द तो मोडणार नाही. हीच तर पंचाईत आहे. सहा महिन्यांनी मी माजी मंत्री होणार. आणि तुला माहीतच आहे की, माजी मंत्र्यासारखा केविलवाणा प्राणी दुसरा नाही." राजकारणातलं एक मोठं सत्य माँग माँगनं मला त्या अवस्थेत सांगितलं. ते सांगण्यासाठी त्यानं मला बोलावलं नव्हतं. या विषयावर बोलत रहाणं ही त्याची गरज होती, त्याला श्रोता हवा होता. माजी मंत्री किती केविलवाणा असतो हे त्यानं मला वाढत्या खात्रीच्या स्वरात सांगितलं, आणि मी ते वाढत्या समबुद्धीनं ऐकलं.

हे झालं राजकारणातलं सत्य. पण महाभारतावरचं एक महान भाष्य मला अशा प्रसंगी ऐकायला मिळेल असं चुकूनसुद्धा कधी वाटलं नव्हतं. पण मिळालं. आणि भाष्य आलं ते विद्वत्तेचं तेज पाजळीत आलं नाही; तर नंदादीपाची स्निग्धता पसरीत आलं. बुद्धीवर प्रकाशाची तिरीप टाकीत आलं नाही, तर तिला रेशमी स्पर्श करीत आलं. हा आमचा मित्र तसाच आहे. एखादं अफलातून गूढ उलगडतो; पण असं काही करीत आहोत याची त्यालाही जाणीव नसते, आणि ऐकणारालाही ती जरा उशीराच होते. शांत, प्रसन्न, मुलायम, आनंदमय स्वरात तो बोलत रहातो, आणि पारिजातकाची फुलं प्रातःकाली दवबिंदूनी आर्द्र होऊन अलगद पडावीत तसे त्याचे शब्द आपल्या कानांवर पडतात. असेच त्या दिवशी पडले आणि म्हणाले, " भारतीय युद्ध हे आर्य-अनार्यांचं युद्ध होतं. कौरव-पांडव — दोघेही आर्यच होते. पण अज्ञातवासाच्या कालात पांडवांनी

पेग झाला की दुसरा, एवढंच कर्तव्यकर्म ओळखीत होते. असे पाच पेग झाले. तरी शांत होते, स्तब्ध होते. शब्द आतल्या आत अडकवून अंतर्मुख असलेल्या चेहेऱ्यानं स्वस्थ बसून होते. ते बोलत असलेच तर घशात जाणाऱ्या व्हिस्कीच्या थेंबाशी कसल्यातरी अबोल, अबोध भाषेत बोलत होते. अखेर त्यांनी सहावा पेग घेतला, आणि त्याच्याशी त्यांचा मूक विनियोग सुरू झाला. विनिमय सुरू झाला. पेला अर्धा रिकामा झाला — आणि त्यांचे डोळे लकाकू लागले. चेहेऱ्याचे स्नायू सैल झाले. टेपरेकॉर्डरमधून स्रवणाऱ्या संगीताशी पायानं ताल धरू लागले. आणि मग एकदम त्यांनी माझ्याकडे पाहिलं. थोडे हसले. आणि एकदम उठले, त्या पार्टीत सामील झालेल्या एकुलत्या एक अमेरिकन स्त्रीकडे गेले, आणि तिचा खांदा धरून तिच्या तोंडावर एकदम ओरडले, " यू अमेरिकन्स आर स्काउंड्रल्स ! व्हाय डोन्च्यू स्टॉप पाकिस्तान फ्रॉम मिस्युजिंग युअर आर्म्स ?" ( तुम्ही अमेरिकन बदमाष आहात ! तुमची शस्त्रं वापरण्यापासुन तुम्ही पाकिस्तानला थांबवीत का नाही ?') प्रत्येक जण थक्क झाला. अमृत राव — सुसभ्य, सुस्वभावी अमृत राव — त्यांचं हे दर्शन अगदी नवीनच होतं. ती अमेरिकन बाई थोडी बिथरली. पण मी खूष झालो. भारताच्या एका सुपुत्राची हरवलेली राष्ट्रीय अस्मिता गवसली होती.

असेच ते ब्रह्मदेशचे उ मॉंग मॉंग ! ऱ्होड्स आयलंड (ग्रीस)मध्ये एका सेमिनारला आम्ही हजर होतो. एक दिवस रात्री नऊ वाजता मला त्यांचा फोन आला : " आर्यू अलाइव्ह ऑर्डेड ? कम् हिअर इमिजिएट्ली. यू आर्माय ओन्ली फ्रेंड हिअर, हू कॅन हेल्प मी." (' तू जिवंत आहेस की मेलाहेस ? ताबडतोब इकडे ये, मला मदत करू शकेल असा इथं तू माझा एकच मित्र आहेस.') त्याचा आवाज थोडा विचित्र होता. (पण खरं सांगतो, टेलिफोनमधून वास वगैरे काही आला नाही ! ) मी गेलो, मॉंग मॉंगच्या खोलीत प्रवेश केला आणि चकित झालो ! गृहस्थ बूट–टाय–सुटासकट पलंगावर पसरला होता. चेहेऱ्यावर एकप्रकारचा भकासपणा. आढ्याकडे एकटक पहात होता. मी जाऊन शेजारी उभा राहिल्यावर भानावर आला. विकट हसला. विकल हसला. म्हणाला, " आय वॉंट यअर्र ॲडव्हाइस. " माझा सल्ला ? कशाबद्दल बुवा ? मी नुसताच

प्रश्नार्थक चेहेरा केला. म्हणाला, "आत्ताच बायकोची तार आलीय. मी कायदेमंत्री म्हणून आपल्या सरकारात सामील व्हावं असं ने विन म्हणतोय."

ने विननं नुकतेच उ नूला पदच्युत करून लष्करी राजवट स्थापली होती. मी म्हटलं, "मग लेका, विचार कसला करतोहेस ?"

"प्रभाकर, तुला कळत नाही. ने विन सहा महिन्यांनंतर निवडणुका घेणार आहे, आणि निवडणुकीत उ नू नक्की निवडून येणार."

"हे काय ने विन जाणीत नाही ?" मी विचारले.

"जाणतो. पण ने विन हा शब्दाचा पक्का आहे. राष्ट्राला दिलेला शब्द तो मोडणार नाही. हीच तर पंचाईत आहे. सहा महिन्यांनी मी माजी मंत्री होणार. आणि तुला माहीतच आहे की, माजी मंत्र्यासारखा केविलवाणा प्राणी दुसरा नाही." राजकारणातलं एक मोठं सत्य माँग माँगनं मला त्या अवस्थेत सांगितलं. ते सांगण्यासाठी त्यानं मला बोलावलं नव्हतं. या विषयावर बोलत रहाणं ही त्याची गरज होती, त्याला श्रोता हवा होता. माजी मंत्री किती केविलवाणा असतो हे त्यानं मला वाढत्या खात्रीच्या स्वरात सांगितलं, आणि मी ते वाढत्या समबुद्धीनं ऐकलं.

हे झालं राजकारणातलं सत्य. पण महाभारतावरचं एक महान भाष्य मला अशा प्रसंगी ऐकायला मिळेल असं चुकूनसुद्धा कधी वाटलं नव्हतं. पण मिळालं. आणि भाष्य आलं ते विद्वत्तेचं तेज पाजळीत आलं नाही; तर नंदादीपाची स्निग्धता पसरीत आलं. बुद्धीवर प्रकाशाची तिरीप टाकीत आलं नाही, तर तिला रेशमी स्पर्श करीत आलं. हा आमचा मित्र तसाच आहे. एखादं अफलातून गूढ उलगडतो; पण असं काही करीत आहोत याची त्यालाही जाणीव नसते, आणि ऐकणारालाही ती जरा उशीराच होते. शांत, प्रसन्न, मुलायम, आनंदमय स्वरात तो बोलत रहातो, आणि पारिजातकाची फुलं प्रातःकाली दवबिंदूनी आर्द्र होऊन अलगद पडावीत तसे त्याचे शब्द आपल्या कानांवर पडतात. असेच त्या दिवशी पडले आणि म्हणाले, "भारतीय युद्ध हे आर्य–अनार्यांचं युद्ध होतं. कौरव–पांडव — दोघेही आर्यच होते. पण अज्ञातवासाच्या कालात पांडवांनी

अनार्य आदिवासींशी सख्य केलं होतं, आणि हा पांडवांचा मोठा गुन्हा होता. म्हणून भीष्माचार्य, द्रोणाचार्य कौरवांच्या बाजूनं लढले. या युद्धात पांडवांचा जय झाला, आणि आर्य–अनार्यांच्या सहकार्याचा मार्ग मोकळा झाला. कृष्णावतारानंतर बुद्धावतार झाला ही गोष्ट या दृष्टीनं महत्त्वाची आहे."

हा सिद्धान्त मान्य करण्याचं काही कारण नव्हतं. पण मदिरेनं खुललेल्या त्या वाणीतून काहीतरी मधुरमुलायम, प्रसन्न, सुखकारक बाहेर पडतं आहे आणि त्याच्या श्रवणानं आपण आत कुठंतरी संतुष्ट होत आहोत एवढीच जाणीव उरली होती.

नेहेमीच मला असं अलिप्त राहून अनुभव गोळा करता आले असं मात्र नाही. एकदोनदा मदिरेच्या मादक पाशात मी सापडलोच

ऱ्होड्स आयलंडहून आम्ही अथेन्सला आलो, आणि आल्यानंतर लगेच समजलं की आज मदिरोत्सव आहे, मदिरोत्सव ? आत्ता ? या ऑक्टोबरात ? आश्चर्य वाटलं. ऐकलं होतं की, ग्रीसचा मदिरोत्सव वसंतात होतो — एप्रिलमध्ये होतो. पण डायोनिससचा तो उत्सव वसंताच्या निसर्गमंचकावर होत नाही. तो एखाद्या रंगमंदिरात होतो. द्राक्ष-वेलींच्या नवांकुरांचा तो उत्सव प्रतिभेच्या नवांकुरांनी साजरा होतो. तो वनपुष्पांचा उत्सव नव्हे; तर काव्यकुसुमांचा — डायोनिससला, त्या द्राक्ष-देवाला वहायच्या कुसुमांचा. हा आज, नवमदिरेच्या स्वागताचा उत्सव डायोनिसला प्रिय असलेल्या डोंगरावर होतो. टेकड्यांच्या परिसरात होतो. द्राक्षवेलींनी नटलेल्या भूमीच्या उत्संगावर होतो. आणि रात्रीच्या रहस्यमय वातावरणात होतो.

हर्बट पासीनच्या नेतृत्वाखाली आम्ही निघतो. आम्ही म्हणजे ऱ्होड्सच्या सेमिनारहून आलेले वसंतराव कर्णिक वगैरे. मोटारीनं डोंगराची चढण चढत आणि वळणं घेत उत्सवाच्या प्रवेशद्वारापाशी येतो. पासीन प्रवेश–फी भरतो आणि आजच्या एकेकाच्या हातात एकेक ग्लास देतो. यानं मदिरेचं सेवन करायचं आणि आमच्या उत्सवाचं संस्मरण म्हणून तो घरी घेऊन जायचा. मी तो आत्ताच हातातल्या हातांत कुरवाळू लागतो. आत

ठिकठिकाणी बूथ असतील. तिथं जायचं, ग्लास पुढं करायचा, म्हणजे एक ग्रीककन्या त्यात मदिरा ओतील. मदिरा म्हणजे द्राक्षमदिरा — ग्रीसचं राष्ट्रीय पेय. या पेयपानापेक्षा ही कल्पनाच अधिक कल्पनारम्य वाटते. कारण ही ग्रीककन्या म्हणजे एखादी मामुली ग्रामीण कन्या नाही. द्राक्षकन्या. डायोनिससनं ज्या असंख्य मदिराभक्त — नव्हे, मदिरासक्त — महिला गोळा केल्या आणि त्यांच्या सहवासात ग्रीसचे डोंगर रोमांचित केले — वनस्पतींच्या राज्यात ज्यांना त्यानं खेळवलं — वनपुष्पांनी सजवलं — वनौषधींनी कांतिमान केलं — वनद्रव्यांनी त्यांची तहानभूक हरपवली — द्राक्षलतांच्या कुंजात ज्यांच्याबरोबर त्यानं असंख्य विभ्रम केले, त्याच या ग्रीककन्या असतील का ? त्यांचा रंगीबेरंगी पोशाख तसाच असतो. त्यांची आभूषणं तशीच असतात. त्यांच्या चेहेऱ्यावरचे भाव तसेच असतात. त्यांच्या डोळ्यांतलं पाणी तसंच असतं. पण त्यांचा आविर्भाव तसा नसतो. मदिरोत्सवात मश्गूल झालेल्या त्या नसतात. त्यांचे हावभाव प्रसन्न असतात, त्यांची हालचाल सळसळीत असते, त्यांची वृत्ती तळपती असते, त्यांच्या चेहेऱ्यावर हास्याचा एक स्वतंत्र उत्सवच असतो, पण त्या अलिप्त असतात. तुमचं स्वागत आणि तुमच्या पेल्याचं आभरण एवढीच त्यांची कृतार्थता असते. पण कृतार्थता अशी की, त्यांच्या हातून तो द्राक्षरस घेताना तुम्हालाच जीवनाची कृतार्थता वाटावी ! आणि मी तेच ठरवतो — मला मद्याची सवय नाही, पण आज या द्राक्षकन्यांच्या हातून जेवढं मद्य मिळेल तेवढं प्यायचं. मग आपलं काय होईल ते होवो. एक विलक्षण समर्पणवृत्ती मला अंतर्बाह्य व्यापून टाकते. वाटतं, या द्राक्षकन्यांच्या सोज्वळ हातांतून जें द्रव्य येईल ते शुद्ध होऊनच येईल. अगदी सात्त्विक नसलं तरी राजस असेल. मदिरेच्या या मुक्त प्रवाहात तामसपणाचा अंश नसेल. बाकी हा युक्तिवाद उगीच असतो. आपल्या मनाचं एक समाधान करण्यासाठी. खरं म्हणजे वृत्ती कलंदर बनलेली असते.

आणि या मदिरोत्सवात कलंदर वृत्तीलाच आवाहन असतं. आणि असंख्यांनी ते स्वीकारलेलं असतं. त्यांच्या झुंडीच्या झुंडी येत असतात. झुंडी म्हणजे मुक्त झुंडी. स्त्रीपुरुषांच्या एका विमुक्त मीलनानं पल्लवित झालेल्या झुंडी. डायोनिससप्रमाणं अग्नीमध्यं जन्म झालेल्या वृत्तीच्या

झंडी. तोंडानं लोकगीतांचा उन्मेष आसमंतांत फेकणाऱ्या झुंडी. ग्रीक बोलीत बाल्कनमधील अनेक बोली मिसळून त्यात डायोनिससची स्तवनगीतं गाणाऱ्या झुंडी. आम्ही त्यांच्या उत्साहात शरीरानं नाही पण मनानं सामील होतो. इतक्यात आमच्यांतला एक सेमिनारिस्ट ग्रीकांच्या द्राक्ष-संस्कृतीवर एक छोटासा परिसंवाद भरवतो. त्यानं जरा शीण आला की आम्ही एखाद्या बूथकडे जातो, तेथील द्राक्षकन्येच्या स्मिताचं पान करीत आमचा पेला भरून घेतो आणि परत येऊन परिसंवादात सामील होतो....

इतक्यात ११ वाजले, आणि वीज पडून एखादं झाड डोळ्यादेखत वठावं तशा त्या बूथवरच्या द्राक्षकन्या वठल्या. त्यांच्या चेहेऱ्यावरचं स्मित एकदम मावळलं. त्यांच्या अवयवांवरची झळाळी एकदम आक्रसली. त्यांच्या चेहेऱ्यावरचे भाव एकदम परके बनले. तिथं एकदम एक विलक्षण शुष्कता आली. एका चमत्कारिक थंड वृत्तीनं त्यांनी आपापले बूथ बंद करण्यास सुरुवात केली.

पण आमच्या उत्फुल्ल वृत्ती अशा एकदम आक्रसायला तयार नव्हत्या. पासीननं कल्पना काढली की, आपण येथून एखाद्या रेस्टोरॉंमध्ये जावं. सेमिनारवाल्यानं सेनिमार झटकला, आणि एखाद्या पुंगीवाल्यामागून जावं तसे आम्ही पासीनमागून चाललो. आम्ही मोटारीत बसलो — अन् काय झालं नकळे. माझी संज्ञा एकदम मावळू लागली. शुद्ध क्षितिजापार होतेशी वाटू लागली. संस्मरण म्हणून आणलेला हातातला ग्लास कुठंतरी नाहीसा झाला. डोळ्यावर असलेला चष्मा तिथं नाहीच असं वाटू लागलं. पण मी बेफिकीर होतो. मोटार थांबली. आम्ही उतरलो. लोहचुंबकाच्या मागून लोहकणांनी जावं तसा मी पासीनच्या मागून गेलो. पासीननं काही-तरी मागवलं ते प्यालो. समोर एक नर्तिका नाचत होती, तिच्या एकदम दोन झाल्या. कधी त्या एकमेकीत मिसळत, कधी विलग होत. जरा वेळानं नर्तिकांच्या रेषा झाल्या. प्रकाशरेषा... हळूहळू त्या रेषा लोपल्या. पुढं काय झालं ते आठवतच नाही. आठवतं ते एवढंच की सकाळी उठून मी चहा-ऐवजी चार लिंबांचा रस घेत आहे !

हा एक अफलातून अनुभव होता. पण तो जिनोआचा आदळणारा होता—

एकदम भूमीवर आदळणारा. 'लाइड ट्रिस्टिनो' कंपनीनं ज्या हॉटेलात मला ठेवलं होतं, त्याला इंग्रजीचा गंध नव्हता. स्पर्श नव्हता. रात्री डायनिंगमध्यं जेवताना मी 'किआंटी' मागवली. वेटरनं 'किआंटी'चा एक पुरा फ्लास्क (बुधला) आणून टेबलावर ठेवला. आता याला कसं सांगायचं की, मला पुरा फ्लास्क नको आहे, मला पाव फ्लास्कच हवा आहे ! पण मी सांगितलं. इंग्रजीत सांगितलं, हावभावानं सांगितलं, हताश होऊन सांगितलं, डोळ्यांत अर्थ ओतून सांगितलं, हात हतबल करून सांगितलं, ते विशविशितपणं टेबलावर ठेवून सांगितलं, मानेला झटका देऊन सांगितलं, अंगाला बाक आणून सांगितलं. (मराठीतदेखील सांगितलं !) पण छट् ! नाही — म्हणजे तो काहीतरी बोलला, आणि मी नुसता आ वासला. तेव्हा तो खुणा करू लागला. त्यांतली एक खूण बोटानं बोट कापल्याची — दोनदा बोट कापल्याची होती. दुसरी फ्लास्कवर कानावरच्या पेन्सिलीनं काहीतरी गिचमिड करण्याची होती. तिसरी डायनिंग रूमच्या एका कोपऱ्यात एक टेबल होतं त्याच्याकडे बोट दाखवण्याची होती. चौथी माझ्याकडे एकाच वेळी अजीजीच्या, तुच्छतेच्या आणि तिऱ्हाईतपणाच्या नजरेनं पहाण्याची होती. आणि पाचवी हताश हसण्याची होती. (नंतर त्या साऱ्याचा अर्थ समजला. तो सांगत होता की, हा फ्लास्क तुमच्या खोलीचा नंबर घालून ठेवतो. आता तुम्हाला हवी तेवढी प्या, उरलेली कोपऱ्यातल्या टेबलावर ठेवण्यात येईल. पुढच्या जेवणाच्या वेळी तोच फ्लास्क पुन्हा हजर होईल.) मला काही कळेना. पण मी महाराष्ट्रीय ब्राह्मण होतो. विचार केला : मी या फ्लास्कची पुरी किंमत मोजणार आहे ती काय यातलं अर्धं द्रव्य फुकट घालवायला ? आत्ताच ती सारी पोटात रिचवायला काय हरकत आहे ?

मी पिऊ लागलो. 'किआंटी' चवीचवीनं प्यायची असते. थेंबाथेंबांनी प्यायची असते. पण मी घुटक्याघुटक्यांनी पिऊ लागलो. अर्धापाऊण तास पीत होतो. जसजशी 'किआंटी' माझ्या पोटात जाऊ लागली तसतसे डोळे जड आणि डोकं हलकं होऊ लागलं. डायनिंग रूममधल्या वस्तू कधी मंद होऊ लागल्या, तर कधी त्यांच्यावर प्रकाशाची चमक मारू लागली. हळूहळू 'किआंटी'ची माया माझ्यावर पसरू लागली असावी. भोवतालच्या

टेबलापाशी बसलेले लोक माझ्याकडे पाहू लागले. त्यांना माझ्यात रस वाटू लागला आणि त्यानंच मी खूष झालो. मीही त्यांच्याकडे पाहू लागलो — आणि मग गोंधळलो. मला त्यांच्या पाहण्याचा अर्थ कळेना. कोणाच्या डोळ्यांत कीव होती, तर कोणाच्या डोळ्यांत मिस्किलपणा होता. एकाच्या डोळ्यांत सहानुभूती होती. मला वाटलं, हे नुसते पहातात का ? बोलत का नाहीत? यांच्यापैकी कोणालाच इंग्रजी येत नाही काय ? ती पलिकडच्या टेबलावरची स्त्री ? गेल्या सहा आठवड्यांत मी कोणत्याही स्त्रीशी तशा गप्पा मारल्या नव्हत्या. आणि पोटात इतकी 'किआंटी'! जन्माला यायचं, इतालीला पोचायचं, स्त्रीपुरुषांनी भरलेल्या भोजनगृहात बसायचं आणि एकट्यानं 'किआंटी' पीत बसायचं — यात काही अर्थ आहे ? इतक्यात माझ्या शेजारच्या टेबलापाशी एक स्त्री आणि पुरुष बसली होती, त्यांच्याकडे लक्ष गेलं. — खरं म्हणजे त्या स्त्रीकडेच गेलं. 'किआंटी'नं त्या पुरुषाकडे दुर्लक्ष केलं. लक्षात आलं की स्त्री आपल्याकडेच पहात आहे. तिच्या डोळ्यांत कुतूहल आहे, कणव आहे. मला वाटलं, सलगी आहे. मी एकदम तिच्याकडे आवेगानं पाहिलं आणि ओढाळ आवाजात विचारलं, "डू यू स्पीक इंग्लिश ?"

ती हसली आणि म्हणाली, "येस, आय स्पीक इंग्लिश, बट... बट वुई आर ऑन अ हनिमून !"

माझी 'किआंटी' एकदम उतरली !

# प्राक्कथाकार खानोलकर

चिं. त्र्यं. खानोलकर हे माझे आवडते कादंबरीकार आहेत. आपल्य' कलापूर्ण कादंबऱ्यांनी त्यांनी माझ्या वाङ्मयीन अभिरुचीत कुठंतरी खोल स्पर्श केलेला आहे. आणि म्हणून वाटतं की, त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तित्वास माझ्या अंतरंगाचा एक धागा जोडलेला आहे. याला वैयक्तिक कारण काही नाही. ते माझे स्नेही वगैरे काही नव्हते. उभ्या आयुष्यात मी त्यांना दोनतीनदा भेटलो असेन. त्यांच्या बैठकीत बसण्याचा योग कधी आलाच नाही. पण त्यांची ' कोण्डुरा ' वाचली नि वाटलं, एक अभिजात कलावंत आपल्याला सापडला, हा अनुभव त्यांच्या नाटकांनी दिला नाही — ' एक शून्य बाजीराव 'नंही नाही. ते माझ्या दृष्टीनं एक अनाकलनीय गूढच ठरलं. ' अजब न्याय वर्तुळाचा 'नं त्यांच्या अव्वल प्रतिमेचा एक कवडसा दाखवला — पण तो एक फक्त कवडसाच. त्यांची कविता हे एक नाजुक अनोखं प्रकरण होतं. पण हे कबूल करायलाच हवं की, त्यांच्या कादंबऱ्यां-प्रमाणे तिनं मला कधी भारलं नाही. नाही म्हणायला —

' अखेरच्या वळणावर यावा<br>
मंद सुगंधी असा फुलोरा<br>
थकले पाउल सहज उठावे<br>
आणि सरावा प्रवास सारा'

— या त्यांच्या ओळींनी माझे डोळे ओले केले. पण याचं कारण, या ओळी मृत्यूच्या छायेवर गडद काळंवडलेल्या होत्या. ती रसवत्तेची दाद

होती त्यापेक्षा दुःखाचा हुंदका अधिक होती. मला वाटत असे, मृत्यूनं माझ्या मनावर इतके ॲसिड फासलेलं आहे, की त्यावर वेदनेचा फोड आता उठणारच नाही. पण नाथ पै आणि चिं. त्र्यं. खानोलकर यांनी हा माझा अंतःस्थ कयास खोटा पाडला. नाथ अर्थात माझा जिव्हाळ्याचा स्नेहीच होता. खानोलकर तसे काही नव्हते. त्यांच्याबद्दल एक अपार सद्भावना माझ्या मनात होती; पण तो त्यांच्या कलेनं मिळवलेला हुंकार होता. अशी तळाचा ठाव घेणारी कलात्मकता मला मराठीत इतरत्र फारशी दिसली नव्हती. त्यांच्या कादंबऱ्यांची कलात्मक नव-नव्हाळी सहज जिंकून जायची. त्यांच्या कादंबऱ्या अंतःकरणात खोल शिरायच्या आणि तेथला आत्मविश्वास जागा व्हायचा. वाटायचं, ही कादंबरी भावली आणि आपली वाङ्मयीन जाण जिवंत आहे याची साक्ष मिळाली. असा अव्याहत अनुभव एकदा शेक्स्पीअरच देतो; पण खानोलकर तो मधूनच देत. ही रसिकतेची चूकभूल नव्हती. ज्या तत्त्वांचा साक्षात्कार या रसिकतेला झाला होता आणि ज्यांच्यावर चिंतनाचा थोडासा शिडकावाही झाला होता त्यांना मिळालेला हा आंतरिक उजाळा होता. मी वाङ्मयाकडे अगर कलेकडे लौकिक जीवनाची कोडी उलगडणारा एक मंत्र म्हणून कधी पाहिलंच नाही. मार्क्सवादाच्या उत्साही दिवसांत तसं पहाण्याचा प्रयत्न मी केला. पण प्रत्येक वेळी आत कुठंतरी तो पोकळ ठरला. रिता ठरला. बद्द वाजला. आणि वाङ्मयीन अभिरुचीनं मनोमन बजावलं : हे गलत आहे. आपल्या बुद्धीच्या बँकेवर काढलेला हा चेक साफ खोटा आहे. व्यवहारात तो कदाचित वटवला जाईल; पण तो आपल्या वाङ्मयीन संवेदनशीलतेला कायमची जखम करील. कला ही जीवनाचे प्रश्न सोडवण्यासाठी किंवा सोपे करून मांडण्यासाठी जन्मतच नाही. ती कुठंतरी लौकिक जीवनाच्या पलिकडे जाते, त्याच्या पृष्ठभागावरचा फेस बाजूला करून आत शिरते. तळाकडे धावते. जीवनाच्या मूलस्रोताचा शोध घेते. जीवनाच्या पृष्ठभागाला तिला जखडणं हा तिचा अपमान आहे. अधिक भयानक म्हणजे ती एक आत्मवंचना आहे. आपल्या रसिकतेच्या निर्झरात जीवनाचं मुस्कट कालवण्यासारखं ते आहे.

खानोलकरांच्या कादंबऱ्या वाचताना मला याची प्रचीती आली —

जी मला प्रत्येक अव्वल कलाकृती आस्वादताना आलेली होती. 'मेघदूता'ची माझी ओळख माझ्या वडिलांच्या गिरणीतील एका कारकुनानं करून दिली. माझ्या अगदी लहानपणी. अभिजात वाङ्मयाशी ती माझी पहिलीच ओळख, तेव्हा जीवनाचा अर्थ वगैरे भानगड मला माहीतच नव्हती. आणि आज-देखील 'मेघदूता'च्या वाचनानं मी गलबलून जातो तेव्हा जीवनाचा कोण-ताही अर्थ माझ्या संज्ञेच्या क्षितिजावरसुद्धा नसतो. त्या मेघाच्या स्नेहस्निग्ध दर्शनात यक्षानं तरी तो शोधला काय ? आपल्या विरही जीवनाला जीवना-र्थाचं एखादं अनोखं अस्तर लाभलं वगैरे विचारांनी तो अंतर्मुख झाला काय ? उलट असं नव्हे का, की ज्या आर्त अनुभवांनी त्याचं अवघं अस्तित्व उत्कट बनतं होतं, रसतृप्त बनलं होतं, आत्मनिवान्त बनलं होतं, त्या अनुभवांना आषाढ–मेघाच्या दर्शनानं एक नवा मोहर आला, त्या मोहराच्या सुगंधानं त्याचं अंतरंग आंदोलित झालं, आणि त्या आंदोलनाला मंदाक्रांत लय प्राप्त झाली ? गुरुदेव रवींद्रनाथांना 'मेघदूता'त प्राचीन भारताच्या सांस्कृतिक वैभवाचं मनोज्ञ दर्शन झालं. पण माझं मन अंकुरलं ते निसर्गाच्या वैभवानं. 'श्रीविशाला विशाला' अवन्तीला पोचण्यापूर्वीचा रेवा नदीचा विन्ध्याच्या उत्संगावरचा अवखळ विलास आणि कैलासप्रिया अलकेला पोचण्यापूर्वी 'राशीभूतः प्रतिदिनमिव त्र्यम्बकस्याट्टहासः' अशा हिमालयाचं भव्य दर्शन... माझी 'मेघदूती'य संज्ञा निसर्गाच्या या विमल विभ्रमांनी व्यापलेली आहे. 'मेघदूता'तील प्रणयाचे विभ्रम अर्थात कोण विसरेल ? यक्षाची संज्ञा या विभ्रमांनीच व्यापलेली होती. पण हे विभ्रम म्हणजे आदिशक्तीच्या विश्वातील विभ्रम; ही तुम्हाआम्हा मानवांच्या शिणलेल्या जीवनातील घालमेल नव्हे. कालिदासाच्या 'मेघदूता'तील सौंदर्य म्हणजे पंचमहाभूतांच्या प्रतिमाविश्वाचं चैतन्य ज्या प्रतिभाविलासानं प्रकटतं त्या प्रतिभाविलासाचं सौंदर्य. ही जाणीव त्या काव्यांच्या सौंदर्यास्वादात सारखी नहात असते.

माझी आवडती 'द ओल्ड मॅन ॲण्ड द सी' ही हेमिंग्वेची नोबेल पारि-तोषिकविजेती कादंबरी म्हणजे खरोखर या चैतन्याचाच विलास होय. एक अदम्य आत्मशक्तीचा म्हातारा आणि एक अफलातून मासा यांच्यामधील

जिद्दीच्या संग्रामाची ही कथा. एक मरायला विसरलेला म्हातारा. शेजारच्या एका पोराच्या मायेखेरीज मानवी ममतेच्या चुकार स्पर्शाचाही धनी नसलेला. लागोपाठ ८५ दिवस समुद्राची निव्वळ वांझ सफर करून आलेला. ८६ व्या दिवशी त्या पोरानं दिलेली एवढीशी कॉफी घशाखाली लोटून एकटाच होडीवर चढतो, आणि आज एक मोठा मासा पकडणार या जिद्दीनं तिला दूर समुद्रावर हाकारतो. आणि काय चमत्कार! एक वर्णनविलक्षण मासा त्याच्या गळाला लागतो — मस्त आकाराचा, मस्त रंगीन सौंदर्याचा मस्त ताकदीचा. गळाचा फासा त्याच्या घशाला अडकतो, आणि त्याचं नशीब सान्तियागोच्या होडीला जखडतं — नव्हे, ती होडीच त्या माशाला जखडते. आता त्या माशाबरोबर होडीची आणि होडीबरोबर आतल्या म्हाताऱ्या कोळ्याची फरफट होते. तो महान मासा न दमता, न थांबता त्या म्हाताऱ्याला दूरदूर, समुद्राच्या अजस्र अथांगाकडे ओढीत नेतो. तो अचाट मासा, ती अगतिक होडी आणि सभोवतालचा अफाट समुद्र यांचा एक दैव–त्रिकोण निर्माण होतो, आणि म्हातारा त्या त्रिकोणात फिरू लागतो — असहायपणं, अतर्क्यपणं. त्याचं अवघं भवितव्य आपली अधुरी, अनिश्चित रूपं दाखवीत त्याच्यासमोर उभं रहातं, आणि हा म्हातारा त्या भवितव्याचे धागे आपल्या ओसरत्या शक्तीशी आणि सभोवतालच्या समुद्र–आकाशाच्या बदलत्या अवतारांशी जोडीतजोडीत तितिक्षेची मूर्तच बनून जातो. आता त्याचा मानवी संदर्भच गळून पडतो. तो एका अमानवी वैश्विक पसाऱ्याचाच भाग बनतो. आता तो त्या बंदिवान माशाशीच विश्रब्ध वार्तालाप करू लागतो — आणि त्या क्षणी त्या म्हाताऱ्याचं आदिम वास्तव प्रज्वलित होतं.

अखेरीस तो मासा त्याच्या ताब्यात येणार, इतक्यात त्या विलक्षण नाट्यात शार्क मासे प्रवेश करतात. एकेक शार्क त्या बंदिवान माशाचा एकेक लचका तोडतो. आणि म्हातारा सान्तियागो आपली सारी शक्ती गोळा करून एकेका शार्कचा निकाल लावतो. एकेक शार्क खलास होतो, पण म्हाताऱ्याचं एकेक शस्त्रही त्यांच्याबरोबर खलास होते. हा त्या महाकाव्याचा उत्कर्ष–अध्यायच असतो. वाटतं, हा अध्याय संपुष्टात येण्यापूर्वीच हा म्हातारा संपणार. या झटापटीत सान्तियागोचा शेवट हीच या महा-

काव्याची सफल सांगता ठरली असती. पण तसं होत नाही. म्हातारा सुखरूप परततो — त्या माशाच्या निःशेष सांगाड्याच्या रूपानं आपल्या पराक्रमाची ध्वजा फडकावीत. महाभारतातील कुरुक्षेत्राचा 'युगान्त' असा अर्थ इरावतीबाईंनी पाहिला. सान्तियागोच्या या कुरुक्षेत्राचा अर्थ कोणता ? अर्थ एकच : निसर्ग–मानवाचा अनादी संग्राम. तो अनंत ठरेल का, कोण सांगणार ? पण या संग्रामाचं आदिम सत्य हेमिंग्वेच्या प्रतिभेनं पकडलं. या कथेच्या रूपानं त्यानं एक आदिम अनुभव कोरला. आणि त्या आदिम अनुभवातच आपण आपल्या रसास्वादाचं साफल्य शोधतो.

हेमिंग्वेची ही कादंबरी म्हणजे खरोखर एक प्राक्कथाच ('मिथ्') आहे. अनेक महान कलाकृती या अशा प्राक्कथाच असतात. शेक्स्पीअरच्या शोकात्मिका, दोस्तोएव्हस्कीच्या कादंबऱ्या या अंतिमतः प्राक्कथाच. काही विलक्षण आदिम अनुभवांनी खुललेल्या. हेन्री मूरच्या शिल्पांत प्रत्ययास येणारं सामर्थ्य हे आदिमच असतं. लिओनार्दोची 'देल्फी' तुमच्याकडे आदिम नजरेनंच पहाते. व्हॅन गॉख् रंगाकडे आणि सीझान आकारांकडे आदिम दृष्टीनंच पहात असत. आदिम दृष्टी म्हणजे संस्कृतीचे शहाजोग चष्मे न वापरता लावलेली दृष्टी. ही प्राक्कथांची दृष्टी. आदिम मानवाला आलेल्या अनुभवांनी ती तयार झालेली असते. जन्म, मृत्यू, नियती, निसर्ग, सहजप्रेरणा इत्यादींचा वेध घेताना असे अनुभव येतात . सावित्रीनं यमाशी जेव्हा मुकाबला केला तेव्हा ती नियतीचाच शोध घेत होती. सत्यकाम जाबालाचा प्रश्न जन्मरहस्याचा भेद करणारा होता. नचिकेत मृत्यूशीच धडक घेत होता. परशुरामावर आंधळ्या सहजप्रवृत्तींचा पगडा होता. एखादं खोल खोल पाणी इतकं स्वच्छ असतं, की तळच्या भूमीचं पारदर्शक दर्शन होतं, आणि त्याचबरोबर पाण्याची खोलीही अंतःकरणाला भिडते. प्राक्कथांनी मानवाच्या सहजप्रवृत्तींचं असंच पारदर्शक दर्शन घडते.

साऱ्याच वाङ्मयाला प्राक्कथांचा असा झपाटा असतो असं मला म्हणायचं नाही. पण ज्याला असतो ते निःसंशय थोर ठरतं. खानोलकरांच्यासारखं झपाटलेलं मनच असं वाङ्मय तयार करतं. पण आपली अभिरुची इतक्या

गोष्टींनी संस्कारलेली असते, की वाङ्मयाची ही आदिम अभिजात कसोटीच आपण वापरू असं नाही. अनेकांना अनेक कारणांसाठी वाङ्मय आवडतं. मला वाटतं, आपल्याला कोणतं वाङ्मय आवडतं याचा शोध घेण्याचा एक सोपा मार्ग आहे. आपण जीवनाचा इतका प्रवास केलेला असतो. त्याची कोणकोणती संस्मरणं आपल्या मनात जागृत आहेत यांचा शोध घ्यावा आणि त्यांची जात तपासावी. त्यांच्या अनुरोधानं आपल्या अभिरुचीची जात कळेल. जीवनप्रवास सोडा, पण मी केलेल्या प्रवासातल्या कोणत्या स्मृती माझ्या मनात रुणझुणत असतात याचा मी शोध घेतो, आणि खानोलकरांच्या कादंबऱ्या मला इतक्या का आवडतात याचा एक खुलासा होतो. एकदा विमानात असताना सूर्योदय झाला. सूर्याचे कोवळे किरण क्षितिजावरल्या ढगात खुलले. विखुरलेले ढग. अधुऱ्या आकारांचे ढग. कमजास्त घनतेचे ढग. मला वाटलं, कोणत्यातरी प्राचीन सुवर्णनगरीचे अवशेष इथं अवतरले आहेत. आणि एकदा बोटीतून प्रवास करताना समुद्राच्या पाण्यावर वातचक्र उतरलं, आणि त्यानं पाणी खेचून त्याचा स्तंभच उभारला-आणि त्याच्यावर सूर्याच्या किरणांनी सप्तरंगी शोभा पसरली. या कल्पनारम्य स्मृती अजून माझं मन रंगवून सोडतात. एकदा आल्प्सवरून उड्डाण करीत होतो. खाली काळ्याकभिन्न शक्तिमान खडकांवर शुभ्रसफेद बर्फाची पखरण झाली होती. ते स्वच्छशुभ्र बर्फ आणि ते काळे अणकुचीदार खडक! वाटलं, निसर्गाची दोन मूलद्रव्यंच इथं सारीपाट खेळत आहेत. जपानात अतामीला जाताना समुद्रकाठच्या एका अजस्र कड्यावर गेलो. खाली कड्याला एक घळ होती. त्या घळीत समुद्राचं बेफाम पाणी क्षणभर कुंठित होऊन स्वत:भोवतीच फिरत होतं. रिओ द जिनेरोला डोंगरांचे अफलातून आकार समुद्रात कोरीव काटकोन धरून शिरले होते. पंचमहाभूतांचे हे उद्दाम अस्तित्व-प्रयोग आजही माझी दृष्टी बांधून टाकतात. दक्षिण-व्हिएतनामात दलातला जाताना आमची मोटार हमरस्ता सोडून एका जंगलात शिरली आणि एका नदीच्या काठी धबधब्याचं दर्शन घडवीत उभी राहिली. आम्ही त्या कोसळत्या पाण्याची विखरण पाहत होतो, इतक्यात तिथं एक इवलाला रक्त-नील पक्षी आला, क्षणभर त्या पाण्याच्या तुषारात शिरला आणि पलिकडच्या दगडावर जाऊन उभा राहिला.

वाटलं, हा कोणी प्राचीन चिरंजीव ऋषीच आपली सायंसंध्या उरकीत आहे. हिमालयात पर्वताच्या रांगा एकामागे एक उभ्या राहिलेल्या दिसल्या, आणि ' स्वर्गसोपान ' शब्दाचा अर्थ पाण्यात रंग मिसळावा तसा जाणिवेत मिसळला, व लगेच स्वर्गाची एकेक पायरी चढणारी पांडवांची थकलेली पावलं. समोर साकारली. हरिद्वारला गंगेच्या विमलशुद्ध पाण्याचा प्रवाह पाहिला आणि पाण्याची आंतरिक गती म्हणजे काय याचा बोध झाला. याच प्रवाहावर तरंगत चाललेले दीप पाहिले आणि त्यांच्या भोवतालच्या वलयात प्रकाशमान पावित्र्याचा प्रत्यय आला. याच हरिद्वारला गंगेच्या पलिकडे उभे असलेले हिमालयाचे पहाड पाहिले आणि हे कोणी संरक्षक क्षेत्रपालच उभे आहेत असं वाटलं. या हिमालयातच एक अद्‌भूत अनुभव आला. हिंदुस्थानच्या चारी दिशांच्या शहरांत गेलो, अगदी कॉस्मॉपॉलिटन शहरात गेलो. तिथं वावरलो, लोकांत मिसळलो, काहींशी हृदयसंवाद केला. पण तिथं कुठंही न आलेली भारतीय ऐक्याची प्रचीती हिमालयात आली. भारताचा जीवनाधार अशी हिमालयाची साक्ष मला मिळाली.

एकेका प्रदेशाकडे पहाण्याची एकेकाची दृष्टी असते. मराठ्यांच्या इतिहासाचा साक्षी म्हणून सह्याद्री अनेकांना दिसतो. त्याचे गड आणि किल्ले यांच्यावर नजर रोखूनच ते सह्याद्रीकडे पहातात. मला सह्याद्रीची प्रचीती थोडी निराळी येते. महाराष्ट्राच्या भूमीचा शक्तिशाली मानदंड म्हणून मी त्याच्याकडे पहातो. बोरघाटातून जाताना खालच्या खोऱ्यात नदीचं पाणी लकाकतं तेव्हा मला मगरीच्या डोळ्यांची आठवण होते. रत्नागिरीत दक्षिणोत्तर प्रवास करताना सह्याद्रीचा काळा कडा बरोबर चालतो तेव्हा कालपुरुषच आपल्याबरोबर चालतो आहे असं वाटतं. कोकणच्या कभिन्न कातळावर समुद्राच्या लाटा धडक देऊन बेहोष फेसाळतात तेव्हा ही दोन विश्वशक्तींची झुंज चालल्यासारखे वाटते. सह्याद्रीकडे पहाण्याची ही माझी दृष्टी असल्यामुळं सह्याद्रीच्या एखाद्या पाषाणव्यूहाला ' ड्यूक्स नोज ' म्हणताना आपण त्याची दारुण कुचेष्टाच करीत आहोत असं मला वाटतं. एखाद्या साहेबाचं नाक साकारण्यासाठी सह्याद्री जन्माला आलेला नाही. एका आदितत्त्वाचा आविष्कार करण्यासाठी तो जन्माला

आला, याची जाण असल्यामुळंच बहुधा आपल्या पूर्वजांनी त्र्यंबकेश्वर, महाबळेश्वर अशी नावं सह्याद्रीच्या दर्शनांना दिली. म्हणूनच सह्याद्रीचा एखादा अचाट पाषाण पाषाणेश्वर ठरतो आणि शिखर कळसाई ठरते. १९४४ साली आंबाघाटाच्या कड्यावरून कोकणचा विस्तार माझ्या नजरे-समोर उघडला तेव्हा या महापुरुषाचा साजशृंगारच समोर पसरलेला आहे असं मला वाटलं.

भूशास्त्रज्ञ सांगतात की, कोणत्यातरी आदिकाली सह्याद्रीचं अंतरंग ज्वालामुखीच्या रूपानं उलून आलं, त्यातला विराट तप्तरस खालच्या समुद्रावर पसरला आणि कोकणची भूमी निर्माण झाली. परशुरामानं समुद्र हटवला तो असा. मी जेव्हा कोकणच्या जांभ्या दगडावरचं रासायनिक नक्षीकाम पहातो तेव्हा परशुरामाची ही प्राक्कथा वैज्ञानिक सत्याचं वितरण करीत माझ्यासमोर उभी रहाते. म्हणून मला कोकण हवं असतं ते तुमच्या-आमच्या प्रवासी दृष्टीला दिसतं ते — लाल मातीनं माखलेलं, फणसाच्या वासानं घमघमाटलेलं, हापूसच्या रुचीनं वेडावलेलं, हेंगाड्या बोली बोल-णारं, दारिद्र्याची लक्तरं ल्यालेलं, मनिऑर्डरींवर जगणारं, भाऊबंदकीत बुडालेलं, तिरकस नजरेचं आणि देवदेवस्कीत दंग असलेलं असं — नसतंच. म्हणजे हेही कोकण मला हवं असतं. त्यासाठी मी माझ्या लहानपणात शिरतो, स्मृतींचा साठा ढवळतो, पेंडसे–दळवींच्या कादंबऱ्या वाचतो आणि कधी एखादी कोकणची सफर करतो (म्हणजे करीत असे). पण मला कोकण खरोखरच हवं ते यापलिकडचे. आदितत्त्वांचे. प्राक्कथांचे. प्राक्कथांचा प्रमाथी प्रत्यय देणारं. साध्या शब्दात सांगायचं म्हणजे झपाटलेलं. हे कोकण मला खानोलकरांच्या कादंबऱ्यांत मिळतं.

त्यांचा 'कोण्डुरा'च पहा. असे कोण्डुरे कोकणच्या खडकाळ किनाऱ्यावर अनेक आहेत. पण खानोलकरांच्या कादंबरीत तो येतो तो असा : "डोंग-राचा तुटलेला कडा. माडाएवढा उंच. त्याच्या पायाशी विवर. सगळ्या जगाचा काळोख त्यात. अमावस्येचं उगमस्थान. त्यातून सरपटलेले पाषाण. त्यांवर आदळणाऱ्या समुद्राच्या लाटा. त्या विवराकडे देवमाशांसारख्या ओढल्या जातात, फुटतात आणि टाहो फोडून बाहेर पडतात. घोऽऽघोऽऽ

धाऽऽस. विश्वरहस्याला हाक त्या नादाची वलयं, त्या वलयांची आवर्तनं, ध्वनी, प्रतिध्वनी पंचक्रोशीतल्या माणसांच्या कानात काहीतरी ज्वलंत सांगतात. आणि मग माणसांची कल्पना होते : त्या विवरात हजारो वर्षांचं एक म्हातारं कासव आहे. प्रत्येकाची माती त्याच्या हिशेबी जमा आहे. सगळ्या जगाची सूत्रं हाती ठेवणाऱ्या परमेश्वराशी त्याचं नातं आहे. कुरुक्षेत्रावर पांडवांशी लढलेल्या आणि डोक्यातला मणी हरवून बसलेल्या चिरंजीव वेदनेशी — अश्वत्थाम्याशी — त्याचा परिचय आहे."

ही वेदना खानोलकरांची प्रत्येक कादंबरी व्यापून बसलेली आहे. 'कोण्डुरा'तल्या तात्यांना ही वेदना एका मंतरलेल्या मुळीबरोबर मिळते. चानीचं सौंदर्यही उभ्या गावाला ठसठस लावणारी वेदना ठरते. 'रात्र काळी'मधल्या लक्ष्मीची वासना ही तिची वेदनाच असते. 'अगोचर'मधील नंदिनीची वेदना अखेरीस भडका उडवते. 'भागधेया'तली वेदना एका अश्राप सौंदर्याचा बळी घेते. एखाद्या जागत्या दैवतासारखी ही वेदना साऱ्या कादंबरीभर फिरत राहते. एखाद्या गूढ शक्तीनं भारावं तशी ती भारलेली असते. 'कोण्डुरा'तल्या वेदनेचा ताल देवळातली मध्यरात्री अचूक वाजणारी घंटा धरते. 'अगोचर'मधील वेदनेचा ताल दादूभटाचा मृदंग धरतो. 'भागधेया'त या वेदनेला सामन्ताच्या घोडीबरोबर पळावं लागतं. 'चानी'ची वेदना आप्पा बामणावर अघोरी भिस्त टाकून असते. अखेरीस दरेक वेदनेची ठसठस बनते !

पर्शुरामतात्याच्या गावावर कोण्डुराची जशी नजर असते तशी नजर कोणाची ना कोणाची तरी खानोलकरांच्या प्रत्येक कादंबरीत असते. 'अगोचर'मधील स्वामीची नजर अंतर्ज्ञानी असते; तर 'चानी'मधील आजीची नजर आत्ममुग्ध असते. 'भागधेय'मधील अहमदमियाची नजर स्वतःशीच झुरत असते. ही सर्वसाक्षी नजर म्हणजे नियतीच — सारं काही पाहणारी, पण स्वतः ढम्म बसलेली. कारण खानोलकरांचं जग हे अपरिहार्य भवितव्याला जखडलेलं जग असतं. ते भवितव्य जितकं मनस्वी तितकं हे जग मनस्वी. आणि त्याचा आविष्कारही मनस्वी. 'भागधेया'तली ही हत्तीची कोंड पहा : "मधोमध दोनतीन पुरुष उंचीचा एक भलामोठा खडक देवमाशाच्या शिंगासारखी उगवलेला होता. रौद्र दिसायचा — दबा

धरून बसलेल्या कुण्यातरी आदिमानवी हिंस्र श्वापदासारखा." या कोंडीत दोन खडकांच्या दरम्यान एक ढोल असते. तिच्यात पक्षी धान्याची वर्ष-भराची बेगमी करून ठेवतात, आणि ते धान्य चोरून नेणाऱ्या कुळवाड्यां-च्या डोक्यावर कर्कश आवाज काढीत, वर्तुळाकार फिरतात. कुळवाड्यांच्या हातांतल्या चुडीमुळं त्यांना त्यांचा सूड घेता येत नाही. तो सूड ते पलिकडे झोपलेल्या हसनवर काढतात : एकाएकी त्याच्यावर हजारो पाखरांचा थवा तुटून पडतो. त्याला समजतही नाही. कानावर, नाकावर तीक्ष्ण चोची बसत असतात. खानोलकरांच्या कादंबरीत ती पाखरं आदिशक्तीचा आशीर्वाद घेऊनच आलेली असतात.

जसा निसर्ग तशी माणसं. ती चानी ? संपूर्ण सुंदरपणा एखाद्या शापासारखा घेऊन आलेली. " एकान्त आणि अंधार, आणि कसलेतरी करुण सूर यांनी घडवलेला तिचा देह " अखेरीस रामकोंडीच्या पाण्यावर निष्प्राण तरंगतो. आणि 'अगोचर'मधला दादूभट. गावाच्या सद्सद्विवेकबुद्धीसारखा वावरणारा. सदसद्विवेकबुद्धीचा पराभव मृदंगवादनात बुडवणारा. आणि हे मृदंगवादन तरी कसं ? त्याचे बोल जेव्हा गती पकडतात तेव्हा वाटतं, " वृषभांचे उन्मत्त तांडे जणू काय महाकाय पाषाणावर टकरा घेत आहेत." " वारुळातल्या नागांनी फूत्कार टाकावेत त्याप्रमाणे तापलेल्या सोन्याच्या रसा-सारखे नाद वातावरणात सळसळत आहेत." आणि 'भागधेया'तील हसनची ती तरुण बायको ? तिचं सौंदर्य विद्युल्लतेच्या कळांनी बनवलेलं आणि विद्युतल्लतेप्रमाणेच स्वतःबरोबर आसमन्ताला भस्मीभूत करणारं. सामन्ताच्या शय्यागृहात ती आपला पोशाख उतरते आणि तिचा नग्न देह— " एखादी कात टाकलेली नागीणसुद्धा इतकी पिवळीजर्द दिसायची नाही. एखाद्या मद्यपात्रातून उठलेल्या निळसर ज्वालेच्या रंगाचे तिचे डोळे खोल होते तेवढेच निर्लज्जही होते, आणि या निर्लज्जपणात भयंकर करवती हट्टही होता. समईच्या मंद प्रकाशात चमकणारे तिचे किरमिजी रंगाचे केस विषाची ओढ लावणारे होते. कुठच्याही पुरुषानं स्वतःच्या हातानं त्या केसावर गळा कापून घेतला असता. संपूर्ण उगवलेल्या चंद्राला अगर प्रखर सूर्यबिंबाला जर नग्न म्हणता आलं असतं तर तिच्याही देहाला नग्नतेचं विशेषण लागलं असतं. तिचा नग्नपणा शंभरनंबरी सोन्याचा होता. जणू

काय विधात्यानं तिची मूर्ती घडवताना तप्त कांचनाची तार छेडली होती." तिचं देहतेज जितकं विलक्षण तितकंच तिचं आत्मतेजही विलक्षण. या नग्न देहावर ती चंद्रकळा चढवते, आणि नंतर ती कात्रीनं कापीत सुटते : "उभी–आडवी. देहावरून चंद्रकळेचं तुकडे खाली पडत होते. हे कर्म करताना तिचा चेहेरा अत्यंत शांत होता. दु:खही नव्हतं. आनंदही नव्हता. हर्षखेदांच्या पलिकडे उभी राहून ती एखाद्या अनासक्त माणसासारखी चंद्रकळा कापीत सुटली." नंतर सामन्त आला. तिच्या नवऱ्याचा अवमान करणारे शब्द बोलला. त्याबरोबर "समोरच्या आरशाचा खळकनी आवाज झाला आणि काचा फुटून खाली पडल्या. समोरच्या स्टुलावरील तांब्या उचलून हसनच्या बायकोनं आरशावर फेकून मारला होता. आणि तिचा खालचा ओठ दातांखाली रगडून त्यातून रक्ताची धार फुटली होती."

समोरच्या आरशावर स्टूल फेकणारा कॅम्यूचा कॅलिगुला अस्तित्वाचा आशय भरलेला चंद्र शोधीत होता. खानोलकरांना अस्तित्वाचा अर्थ नको होता. त्यांना अस्तित्वाचा ठाव घ्यायचा होता. त्यासाठी अस्तित्वावरची संस्कृतीची शहाजोग आवरणं दूर करून आत बघण्याची त्यांची तयारी होती. हे आतलं विश्व म्हणजे आदिम विश्व. मानवाच्या आदिम अनुभवांचं विश्व. आदिम वेदनांचं विश्व. आदिम विकारांचं विश्व. या आदिम विकारांमुळं 'कोण्डुरा'तले तात्या हातातल्या मंतरलेल्या मुळीचा अमानुष उपयोग करतात. या आदिम विकारांमुळं 'अगोचर'मधला आनंदराव एकुलत्या एक पुत्राच्या जिवावर उठतो, आणि या आततायीपणाच्या अग्नीत सर्वस्व भस्मसात करून घेतो. या आदिम विकारांच्या होमकुंडात चानी आणि हसन–पत्नी या इहलोकीच्या अप्सरा जळून खाक होतात. खानोलकरांचे आदिम अवतार फक्त आततायीच असतात, असं नाही. कोकणच्या भूमीवर आदिशक्तीची कोमल मायाही पसरलेली आहे. कोकणात सह्याद्रीचा काळा कडा आहे, तशी औषधी पाण्याची उन्हाळीही आहेत. सात्विन वृक्षाची रुक्ष एकाकी दर्शने आहेत, तसाच सुरंगीच्या अंगावरचा सुगंधी मोहर आहे. आवेगाने उड्या घेणारे धबधबे आहेत, तसे स्वच्छ झुळझुळ वाहणारे झरेही आहे. सदा एकेरीवर आलेली रानडुकरं

आहेत, तशी अलगद उडणारी–बागडणारी वासरंही आहेत. आदि-शक्ती रौद्रभीषण असते तशी सौम्यसुंदरही असते. खानोलकरांच्या विश्वात आकाशीचं सुवर्ण लुटून जन्माला आलेली चानी आहे, तशी अंतः-करणात काव्यकळा घेऊन जन्माला आलेली धाकटी मामीही आहे. अघोर आनंदराव आहे, तशा सात्त्विक थोरल्या वहिनीही आहेत. मुख्य म्हणजे खानोलकर या विश्वातून प्राक्कथा ( मिथ्स ) बांधीत आहेत. खानोलकर हे आजच्या मराठी वाङ्मयाचे ‘ मिथ्–मेकर ’ (प्राक्कथा-कार) होत. ‘ द ओल्ड मॅन अँड द सी ’च्या जबरदस्त कर्त्याशी नातं सांगणारे.

# तो आर्त आवाज

त्या दिवशी पुण्याच्या रस्त्यातून चालताना एक आवाज ऐकू आला नि पाऊल थबकलं. पुण्याच्या रस्त्यात तसं ते अनेक कारणांनी थबकतं. कधी सायकलवाल्याच्या आगाऊपणानं तर कधी रिक्शावाल्याच्या बेगुमान चालीनं. पण आता थबकलं ते रेडिओतून आलेल्या एका आवाजामुळं.

तो आवाज लता मंगेशकरचा नव्हता. तिचा आवाज सारखाच ऐकू येत असतो. तो आवाज देवराज पुरींचा नव्हता. देवराज पुरी आता नाहीतच. तो आवाज द मेल्लोंचा नव्हता. ते आता निवृत्त झाले आहेत. पृथ्वीवरील घडामोडींना आकाशात गोते खायला लावणाऱ्या दुसऱ्या कोणत्या बातमीफेक्याचाही नव्हता. तो रेडिओतून आलेला होता, पण नेहरूंचा होता.

तो आवाज ! ज्या आवाजानं माझ्या आंतरिक–निद्रेचा अनेकवार भंग केलेला आहे, ज्या आवाजानं माझी वैचारिक तंद्री कधी मोडली आहे तर कधी निर्माणही केली आहे, ज्या आवाजानं माझ्या आतील खोल भावनांना कधी हळूवार तर कधी आवेगानं स्पर्श केला आहे, पण ज्या आवाजानं माझा जीव एका अंतस्थ समाधानानं बहुधा मारून टाकला आहे तो आवाज.

आर्त आवाजानं असं मारून टाकण्याचं सामर्थ्य आणखी एका आवाजात आहे — कुंदनलाल सायगलच्या आवाजात, किंवा अगदी अचूक बोलायचं म्हणजे ‘ त्या ’ देवदासच्या आवाजात

सायगलच्या आवाजाची जादू मी गेली चाळीस वर्षं अनुभवत आहे. नेहरूंच्या आवाजाची जादू त्याहूनही जुनी आहे.

सायगलच्या गाण्यात विसाव्याच्या जागांना जसं अमोलिक मोल आहे तसंच नेहरूंच्या भाषणात चाचरण्याला आहे. काही स्वरांच्या, काही शब्दार्थांच्या पुनरुक्तीला आहे. केळीच्या पानाची तकाकी वाऱ्याच्या तरंगानं लहरते तसा नेहरूंचा आवाज या पुनरुक्तीनं लहरत असे. नेहरू असे चाचरत, शब्दांच्या शोधासाठी अडखळत — पण खरं म्हणजे तो शब्दांचा शोध नसे. शब्दसंपन्न भाषा ही त्यांची चिरसखीच होती. ते अडखळत, कारण बोलताबोलता त्यांचं मन एक विचारगर्भ विश्रांती घेई. मनातच एक विसाव्याची जागा निर्माण करून एखाद्या विचाराच्या तुकड्याशी किंवा शब्दप्रयोगाशी शिवाशिवीचा खेळ खेळे.

सायगलच्या गाण्यात विसाव्याची स्थळं निर्माण होत कारण तिथं त्या गाण्याचे स्वर स्वतःचंच रूप निरखण्यासाठी थांबत. नेहरूंचे विचार तसेच थांबत. सायगलचा तो एक स्वरविभ्रम होता तसा नेहरूंचा हा एक विचार-विभ्रम. आत्मप्रतीतीचा एक विलास. आत्मशोधाचा एक थाट !

वक्तृत्वाच्या एखाद्या विक्रमवीराशी नातं सांगणारा तो आवाज नव्हता —

— तो आवाज बुलंद नव्हता. असा बुलंद आवाज फेरोझशहा मेहतांचा होता.

— तो आवाज वक्तृत्वाची तार खेचणारा नव्हता. ते कौशल्य होतं शापुरजी सकलातवाल्यांचं.

— तो आवाज पल्लेदार नव्हता. समुद्राच्या एकामागून एक येणाऱ्या लाटांचा पल्लेदारपणा प्रत्ययास येई मौलाना अबुल कलम आझादांच्या भाषणात.

— त्या आवाजाला करवतीचे दाते नव्हते. तसे दाते होते वल्लभ-भाई पटेलांच्या जिव्हेला.

— तो आवाज नाट्यमय नव्हता. निर्व्याज नाट्यमय सलगी करावी नाथ पैंनी.

त्या आवाजाचं थोडंसं नातं होतं गांधींशी, जयप्रकाशांशी — गांधींच्या आत्मप्रतीतीशी. जयप्रकाशांच्या शांत, संथ, समर्पणाशी.

आणि त्याचं एक वैशिष्ट्य होतं — आर्तता. ही आर्तताच त्याला देवदासशी जोडते. आर्तता हा नेहरूंच्या आवाजाचा स्थायी भाव होता. एक विश्रब्ध आर्तता. आत्ममग्न आर्तता. स्वत:शीच आलाप करणारी आर्तता. भावार्तता. प्रसंगानुसार भाव बदलत, क्वचित ते उंचबळत. पण त्यांची विश्रब्ध आर्तता कधीच लोपली नाही. मावळली नाही.

त्यांचं ते भाषण. चिन्यांनी नेफा जिंकला होता. ती पिवळी धाड आता तेजपूरवर पडणार होती. तशी घोर धास्ती निर्माण झाली होती. आणि नेहरू रेडिओवरून बोलले, " मी शरण जाणार नाही. मी लढेन. शक्य असेल तेथून लढेन. प्रांताप्रांतांतून लढेन. वेळ आलीच तर देशाच्या बाहेर जाऊन लढेन."

त्या प्रक्षुब्ध अवस्थेतही स्वस्थतेने ऐकलेल्या चर्चिलच्या भाषणांची आठवण झाली. चर्चिलच्या भाषणांना धार होती. पण अशी आर्त झार नव्हती.

नेहरूंच्या प्रत्येक भाषणाबरोबर ही आर्तता माझ्या अंतरंगात शिरली. तिथं तिनं घर केलं. बहुधा ती अबोधच राहिली. पण आता तिला जाग आली. जाग आली, पण रस्त्याच्या कल्लोळांत क्षणार्धात हरवली. नेहरूंचा आवाज श्रुतीआड झाला.

पण वाळूच्या एका कणानं मानवी जीवनाचं अवघं तत्त्वज्ञान सांगावं, एका ॐकारात ब्रह्मांचं सारं रहस्य समाविष्ट व्हावं, एका लहानशा बीजानं आख्खा वटवृक्ष पारंब्यांसकट साकारावा, एका गोळीबंद घोषणेत सबंध क्रांतिकाल एकवटून उभा राहावा, एका स्वप्नानं मनाच्या गुहेत लख्ख प्रकाश पडावा, एका सस्मित नजरेनं अवघं जीवन बांधलं जावं तसे त्या आवाजाच्या एका विभ्रमानं झालं — नेहरूंच्या या किमयेचं रहस्य समजलं.

नेहरू तसे वक्तृत्वाच्या व्याख्येंत बसणारे वक्ते नव्हते. शब्दांचे धारदार प्रबंध बांधून ते विशिष्ट लयानं वातावरणात सोडून देण्याच्या कलेचे ते वस्ताद नव्हते. शब्दांच्या गंभीरगंभीर घोषणेनं आसमन्त घुमवून टाक-

णाऱ्या जादूची देणगी त्यांना नव्हती. शब्दांच्या आकृतिबंधांत श्रोत्यांना अडकवण्याच्या आणि अडगवण्याच्या युक्तीचा वापर ते करीत नसत. पण त्यांचा आर्त आवाज एखाद्या अतींद्रिय बोधनेप्रमाणं अंतःकरणाला भिडे. त्यांच्या शब्दांचे नितळ पारदर्शकत्व अंतरंगात शिरे.

मला तो दिवस आठवतो. चिंतामणराव देशमुखांच्या, दिल्लीचं भूषण ठरवलेल्या इंडिया इंटरनॅशनलच्या उद्‌घाटनाचा. दिल्लीतल्या बुद्धिमत्तेचा आणि प्रतिभेचा अर्क तेथं उपस्थित होता. एक अभिजात सांस्कृतिक संमेलन तिथं भरलं होतं. देशमुखांच्या बौद्धिक सत्त्वशीलतेनं त्याला समुत्सुक केलं होतं. त्यांच्या या कार्याच्या अलौकिकतेनं त्याला आकर्षित केलं होतं शिवाय डॉ. राधाकृष्णन् आणि पंडित नेहरू यांच्या सुभग वक्तृत्वाचा लाभ एका स्थळी एका समयी होणार होता.

प्रथम राधाकृष्णन् बोलले. त्यांच्या संस्कारित वक्तृत्वशैलीला ते एक आगळं आव्हान होतं. त्यांनी ते स्वीकारलंही होतं सुंदर सुश्लील इंग्रजीचा लयबद्ध प्रवाह सुरू झाला. विदग्ध विद्वत्तेचे स्फुल्लिंग उडायला लागले. श्रोत्यांच्या ज्ञानाला उजळू लागले. ऋषीच्या तोंडातून याव्या तशा वेदांतल्या ऋच्या येऊ लागल्या आणि एक पवित्र वातावरण निर्मू लागल्या. उपनिषदांतले उतारे अवघं तांत्रिक दर्शन घेऊन उपस्थित झाले आणि एका बौद्धिक तपस्येचा साक्षात्कार घडला. भारतीय संस्कृतीच्या थोर वारसदारीच्या जाणिवेनं अंतःकरणं भरून आली आणि कृतार्थ झाली.

नंतर नेहरू बोलले. त्यांच्या नेहमीच्या पद्धतीनं — हळू, अडखळत, आत्मगत ! विजय मर्चंटच्या बॅटीच्या शिस्तशील मशागतीनंतर मुस्ताक अलींच्या बॅटीची स्वैर फिरत सुरू व्हावी तसं वाटलं. आता संस्कारित शब्दांऐवजी सजीव शब्द स्रवू लागले. विद्वत्तेची जागा उत्स्फूर्त वाग्धारेनं घेतली. इतिहासाचा वारसा पुनः इतिहासात गेला आणि जिवंत वर्तमान अवतरलं — आपल्या साऱ्या समक्षतेसह ! पण ते वर्तमान अंतर्मुख होतं. नेहरू आता त्यांच्या अंतरीच्या विश्वात होते. विचारवंतांच्या मेळाव्यात. त्यांच्या अंतरंगाला साक्षात् स्पर्श करणाऱ्या वातावरणात. समोर अनेक लेखक आणि अनेक प्राध्यापक. अनेक संशोधक आणि अनेक कलावंत.

मुख्यतः शब्दांचे साधक. पुस्तक हा नेहरूंचा जिवलग मित्र. इथं अनेक पुस्तकं जिवंत होऊन आली होती. नेहरू त्यांवर खुणा करू लागले. लाल निळ्या. ओळीखाली, ओळीबाहेर. अधोरेखा, ऊर्ध्वरेखा. आणि मार्जिनमध्ये आत्मप्रत्ययाच्या टीपा. मघाच्या त्या विद्वत्तेचा आता पुनर्जन्म झाला. तिला एक निरागस नव्हाळी प्राप्त झाली. जिवंत जगाशी एक जागतं नातं जमलं.

मुख्य म्हणजे सारं आसमन्त एका विश्रब्ध आर्ततेनं आंदोलित झालं.

ही कसली किमया होती ? कसली जादूगिरी ?

स्वतःशीच चूर होणाऱ्या योग्याची किमया होती ती. एक आंतरिक शक्ती. या आंतरिक शक्तीनंच त्यांचं जीवन अनेकदा सावरलं. नव्हे, अक्षत रखलं.

ही शक्ती म्हणजे अंतःस्थ अलिप्तता.

नेहरूंना व्यथित करणारे अनेक प्रसंग घडले. अनेक घटना. अनेक घडामोडी. ब्रिटिशांच्या कालात अनेकदा मानभंग. मनोदाह. अनेक अपेक्षाभंग. आशांवर आघात. स्वातंत्र्य येण्याच्या कालात पृथ्वी थरकापविणारं हत्याकांड. नंतर गांधीजींचा खून. अंतःकरणावर ॲसिड ओतणारा. मस्तकात निखारे पेटविणारा. चित्ताला चेटूक करणारा. नंतरच्या कालात वल्लभभाई, रफीसाहेब, मौलाना आझाद. गोविंद वल्लभ पंत यांसारखे स्नेही, सहकारी गेले. प्रत्येक वेळी नेहरूंचं संवेदनाशील मन हादरलं. अंतःकरण व्याकुळ झालं. चित्त विस्कटलं. वृत्ती वैराण झाली. पण प्रत्येक वेळी ते सावरले. एका आंतरिक ताकदीनं दृढ पावलावर उभे राहिले.

अंतःस्थ अलिप्तता. स्वर्ग-धरेला कल्पनेच्या कमानीनं जोडणाऱ्या महाकवीच्या अंतरंगात वावरणाऱ्या अलिप्ततेसारखी. एकाच वेळी शांत आणि तेजस्वी. या अलिप्ततेमुळंच त्यांचं व्यक्तित्व कोलमडण्याची, निपचित पडण्याची, त्याचा गाभा गढूळण्याची पाळी आली नाही. म्हणूनच, नेहरू कुठंही असोत, गर्दीनं वेढलेले, मेळाव्यात घेरलेले, परिसंवादात गढलेले, कसेही असोत — ते स्वतःला कधी हरवून बसले नाहीत. फोटोग्राफर्सनी गर्दी केली म्हणून कधी ते संतापले, एखाद्या बातमीदारानं आगाऊपणा केला म्हणून त्याच्या तोंडात मारली, एखाद्या भाषणात प्रतिपक्षाला ‘ जहान्नमें जाव ’ असं दुरुत्तर केलं — पण हा वरवरचा फेस होता,

सागराच्या फेसाळणाऱ्या लाटेसारखा. अंतरंग अबाधित होतं. तिथं एक संकलित ताकद असे. समाधीची शक्ती असे. त्यांचं व्यक्तित्व हरवे, विसरे, ते ग्रंथवाचनात, अधिक तर काव्यवाचनात. पण हे वाचन पुर्निर्माणाचं, सर्जनशीलतेचं, चैतन्याच्या पुनर्जन्माचं. तेव्हा त्यांचं व्यक्तित्व हरवत नसे, हरखत असे. नवजन्म पावत असे.

नेहरूंची ती दोन भाषणं. त्यांच्या आत्म्याचे ते दोन अमर उद्‌गार : 'नियतीशी आम्ही करार केला होता... ...', 'आमच्या जीवनातला प्रकाश आज गेला.' — एक आत्मविश्वासाचा, दुसर आक्रोशाचा. पण दोनही प्रसंग आव्हान देणारे. नेहरूंच्या आंतरिक शक्तीनं ती आव्हानं पेलली.

नेहरू आपली धोरणं रामलीला मैदानावर जाहीर करतात अशी तक्रार एका युगोस्लाव्ह मुत्सद्द्यानं एकदा मजपाशी केली होती. वाचिक अर्थानं ती खरी होती. पण रामलीला मैदानावरील त्या व्यासपीठावरून बोलताना ते चित्तानं रामलीला मैदानावर नसतच. त्यांच्या तोंडाचे शब्द मायक्रोफोनवर आदळत, पण ते खरोखर स्वतःशीच बोलत असत. स्वतःच्या आर्त अंतःकरणाशी चाललेला तो संवाद असे. फक्त मोठ्यानं केलेला. त्यांची भाषणं म्हणजे वस्तुतः 'मोनोलॉग्ज'. स्वगतं. त्यांचे प्रकट उद्‌गार म्हणजे स्वतःशी चाललेले युक्तिवाद.

नेहरूंनी राजकारणाला वाहून घेतलं, पण खरं म्हणजे ते चिंतकच. या चिंतनातून कधी विचार बाहेर पडले, कधी वाङ्मय. त्यांचं सरदारांशी जमलं नाही. त्यांचा जिव्हाळा मौलानासाहेबांशी जुळला याचं कारण हेच. ते कुटुंबवत्सल वाटत, पण खरोखर मनानं ते एकटेच होते. मुलाला तुरुंगात कसं झोपावं लागेल म्हणून साध्या सतरंजीवर झोपण्याचा प्रयोग मोतिलालांच्या प्रकृतीशी जमतो. नेहरूंबाबत अशी कथा प्रचलित नाही. नेहरूंना 'हॅम्लेट' म्हणतात, ते परमार्थानं खरं नाही; कृष्ण मेननवरील त्यांची मर्जी ही हॅम्लेटची मर्जी नव्हती. पण या अभिप्रायातला आशय बरोबर आहे. नेहरू हे लोकप्रिय होते, लोकही त्यांना प्रिय होते. पण ते लोकांशी कधी समरस झाले नाहीत, जनसमूहातही ते अलिप्त राहिले.

नेहरू विचारानं समाजवादी होते, पण अंतरंगानं व्यक्तिवादीच राहिले. ते आत्मनिष्ठच होते. ते आत्मपूजक झाले नाहीत, कारण इतरांची आत्मनिष्ठाही त्यांना तितकीच मान्य होती. नेहरूंचे भारतावर प्रेम होतं, भारताच्या इतिहासावर प्रेम होतं, मानवाच्या इतिहासावर प्रेम होतं, पण खरं म्हणजे मानवाच्या रूपानं निसर्गानं जो प्रचंड प्रयोग चालविला आहे त्याच्या चिंतनात ते हरवून गेले होते. मात्र त्याबद्दल तिऱ्हाईत निष्कर्ष काढून त्यावर ताठ उभं रहाण्याची त्यांची वृत्तीच नव्हती.

दिल्लीला आम्ही भरविलेल्या टॉलस्टॉय सेमिनारचं उद्घाटन करताना ते म्हणाले, " कित्येक भाग्यवानांचे सारे प्रश्न सुटलेले असतात. पण माझ्यासारखे अनेक अभागी असे असतात की, अनेक प्रश्न त्यांची मनं सारखे कुरतडीत असतात. " काहीजणांना वाटलं की समोर मिनू मसानी बसले होते त्यांना उद्देशून ते हे बोलले. पहिलं वाक्य तसं असेल कदाचित, पण दुसरं वाक्य आत्मशोधाचंच होतं. त्यांच्या आवाजातली अर्तताच याची ग्वाही देत होती.

ते त्यांच्या वृत्तीला धरूनच होतं. साहित्यसमारोहात, साहित्यिकांना उद्देशून, " आम्ही राज्यकर्ते आमच्या धोरणांच्या नशेत असतो, त्या नशेत आमच्या चुका आम्हाला कळतच नाहीत. तुम्ही विचारवंतांनी त्या दाखवायला हव्यात, " असं सांगणारी वृत्ती ती.

पण नेहरूंच्या आवाजाची एक झलक मी अनुभवली ती अगदी निराळी होती.

दिवस, तारीख मला आठवत नाही. आठवतं ते एवढंच की आदल्या दिवशी लेडी माउंटबॅटनचं निधन झालं होतं.

डॉ. राधाकृष्णन् तेव्हा उपराष्ट्रपती होते. त्यांच्या किंग एडवर्ड मेमोरिअल रस्त्यावरील बंगल्यात, ' पेन'च्या मदाम सोफाया वाडिया यांना पद्मश्री की पद्मभूषण मिळाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाची सभा होती. सकाळीच.

मला निमंत्रण होतं, पण मी ते साफ विसरून गेलो होतो. सभा नऊ वाजता होती आणि वीस-पंचवीस मिनिटं अगोदरच मला त्याची आठवण

झाली. मी विलक्षण अस्वस्थ झालो. जायला हवंच होतं, पण वेळेवर कसा पोचणार ? एरव्ही फारशी हरकत नव्हती. पण नेहरू येणार होते. नेहरू येणार म्हणजे वेळेवर येणार आणि त्यांच्या नंतर तिथं उमटण्याची माझी हिंमत नव्हती.

कसा तरी तयार झालो नि टॅक्सीत बसलो. मनाचा एक आश्वासक स्वर सांगत होता की, आज कदाचित नेहरू येणारच नाहीत.

मी पोचलो तेव्हा नेहरू आलेले नव्हते. बचावलो !

राधाकृष्णन्नी आपल्या अभिजात आपुलकीनं स्वागत केलं. त्यांच्या संस्कारित स्वरानं एकदम मोकळिक वाटली. मंडळी मोजकीच होती त्या आटोपशीर दिवाणखान्यात स्नेह आणि सलगीचं वातावरण नांदत होतं. मी एका खुर्चीत जाऊन बसलो. लोक नेहरूंची वाट पाहात होते. पण त्यांच्या आगमनाचं चिन्ह उगवेना, तेव्हा कार्यक्रमास सुरवात झाली. अभिनंदनाचं वक्तृत्व विखरू लागलं. मदाम वाडियांचा चेहरा प्रसन्न होता —मध्यंच उजळत, मध्यंच आपले मिस्किल भाव दाखवीत.

इतक्यात सारं एकदम स्तब्ध !

नेहरू आले. लोक उठले. त्यांचे चेहरे थोडे खुलले, थोडे गोंधळले.

राधाकृष्णन् पुढं झाले, नि नेहरूंचे हात ओंजळीत घेऊन त्यांचं त्यांनी स्वागत केलं. त्यांनी नेहरूंना सोफायांच्या शेजारी बसण्याची सूचना केली. पण ते दुसऱ्याच एका खुर्चीत बसले.

नेहरूंच्या शेरवानीला आज गुलाबाचं फूल नव्हतं.

पुनः भाषणं सुरू झाली. शब्द स्रवू लागले. पण माझं त्यांच्याकडे लक्ष नव्हतं. माझी नजर नेहरूंकडे लागली. त्यांचा चेहरा विशविशित दिसला. अबोल होता, त्याहीपेक्षा अधिक मूक होता. गंभीर होता, त्याहीपेक्षा अधिक मलूल होता. ते आमच्यात होते याची जाणीव आम्हाला होती, पण त्यांना नसावी. जाणीव-नेणिवेच्या सीमारेषेवरच ते असावेत.

इतक्यात कोणी तरी त्यांना बोलण्याची विनंती केली. नेहरूंनी ती हसण्यावारी नेली. त्यांचा चेहरा प्रथमच जरा मोकळा झाला.

पण नेहरूंना आग्रह करण्यात जीवनाचं सार्थक मानणारं वातावरण

तिथं जमा झालं होतं. कुणीतरी आवाज उंचावून म्हणालं, "से अ फ्यू वर्डस, प्लीज."

त्याबरोबर विस्तवावर धरलेला कागद एकदम वक्र व्हावा तसं झालं. नेहरू तीक्ष्ण स्वरात म्हणाले, "नो, आय् डोण्ट विश् टु स्पीक्—"

तो आवाज अनोखा होता.

# झाडे

काहीकाही नात्यांचा अर्थच लागत नाही, आणि लागला तरी त्यांचा विस्मय निमत नाही. लांडग्यांनी पळवलेल्या आणि पाळलेल्या दोन बंगाली मुली. महायुद्धामुळे एका बेटावर अडकून पडून 'एप' माकडांशी जमलेलं नातं, आणि त्यातून जन्मलेलं एक जगप्रसिद्ध पुस्तक. मंडालेच्या तुरुंगात टिळकांच्या खांद्यावरून चिमण्यांनी केलेलं त्यांच्या ताटात जेवण. शिवाजीमहाराजांच्या चितेत त्यांच्या कुत्र्याने मारलेली उडी. छळछावण्यांचा शोध लावणाऱ्या लेनिनच्या हातातून एका कोल्ह्याच्या सौंदर्यदर्शनामुळे गळून पडलेली बंदुक. एका वृक्षाच्या छायेत सिद्धार्थांना झालेला साक्षात्कार...

खरं म्हणजे हे महापुरुष आपल्याला मूक बनवतात. पण जित्याची खोड म्हणून बोलतो: काहीकाही वृक्षांशी जडलेलं माझं नातं केवळ अनाकलनीय आहे. आयुष्याच्या निरनिराळ्या अवस्थांत निरनिराळ्या झाडांशी नातं जमलं आणि त्याला निरनिराळा आकार आला. कधी एखाद्या झाडाच्या विस्तारात गडप व्हावंसं वाटलं. कधी एखाद्या झाडाला टेकून उभं राहाण्यात अकल्पित विसावा लाभला. कधी एखाद्या झाडाचा आकार कोरण्यात नजरेला धन्यता वाटली. कधी ती एखाद्या वृक्षाच्या पानांबरोबर नर्तन करायची. कधी एखाद्याच्या फुलांचा गंध मन मोहरून टाकायचा. कधी एखाद्या झाडाची उगाचच अबोध आठवण व्हायची. आजही होते.

बालपणी कोकणात एकाच झाडावर जीव जडला असं नाही. कोकण म्हणजे

वनमहोत्सव. तेथले देवसुद्धा झाडाच्या आधारानं रहातात. ( भुतांना तर 'झाडं'च म्हणतात.) आपण तर काय माणसं ! आपल्या जीवनाशी निसर्गाचं मुळी मीलनच झालेलं — सूर्यकिरणांचं नेत्रांशी होतं तसं. डोळे सारखे निसर्गाचे रंग पीत असतात — लाल, निळे, हिरवे, पिवळे. निसर्गाशी लय साधूनच आपण जगतो. विशेषतः कोकणची माणसं. पावसाळ्याच्या प्रारंभी पाचूचे किरण जमिनीतून कोंभाचे आकार धारण करून उगवतात आणि यांच्या मनात आशा उगवते. भर पावसाळ्यात वईवरल्या आक्रस्ताळी निवडुंगावर वनवेलींची माया पसरते, आणि यांचं अंतःकरण मृदुमुलायम बनतं. सुराईला शेतातले भात आणि रानातील सोनावळ जशी लवलवते, तसा त्यांचा सणासुदीचा उत्साह लवलवतो. हिवाळ्यात निसर्ग थोडा संकोचतो, पण यांचा निसर्गोत्साह संकोचत नाही. लवकरच आम्रवृक्षांवर नवपालवीचे रेशमी रुमाल झळकतात आणि यांचं मन मोहरून जातं. थोड्याच दिवसांत त्यांचं जीवन आंब्या—फणसांच्या वासानं भरभरून जातं पण कोकणच्या माणसाची झाडझाडोऱ्याशी नाती इतकी निवडक नसतात. त्याच्या जीवनात वृक्षवल्लरींची गर्दीच असते. साऱ्यासाऱ्यांत त्यांचा जीव गुंतलेला असतो. साऱ्यांचा गंध त्यांच्या मनात दरवळतो. साऱ्यांच्या आळ्यांत त्यांचं जीवन रुजतं.

नुसती परमेश्वरी सृष्टी नाही; तिला आव्हान देणारी विश्वामित्री सृष्टीही जोडीला असते. सात्त्विक सृष्टीबरोबर तामसी सृष्टी !

तेव्हा लहानपणी माझा जीव एकाच एका झाडावर पोसला असं नाही. आई मला पडवीत ठेवून विहिरीवर जाई तेव्हा मी पायाचा अंगठा तोंडात कोंबून सर्व झाडाझुडपांवर सारखीच नजर फिरवीत राही. त्या नजरेसमोर एकच झाड सळसळत नसे. मिश्र वनश्रीचा एक रंगीत पडदाच फडफडे. तेव्हा हे कळत नसावं, पण आज ग्वाही देता येते ! मी आजोबां-बरोबर फुलं काढली, मामीबरोबर पत्री वेचली, बहिणीबरोबर फुलांच्या माळा केल्या आणि मित्रांबरोबर हुंदडलो, तेव्हा एकच एका झाडाशी अगर वेलीशी जीव बांधला नव्हता.

आणि तरी त्या काळात काही मोजक्या झाडांनी माझी संज्ञा अधिक व्यापली होती. आज त्या उमलत्या संज्ञेच्या क्षितिजावर स्मृती फिरवतो

तेव्हा त्याच्यावर काही थोडयाच झाडांच्या आकृती डोलताना दिसतात. बालपणात शिरलो की अलगद एका सुरंगीच्या विस्तारात गडप होतो. आजोळच्या अंगणात नजर टाकली की तुळशीवृंदावनापासचा औदुंबर आपला शेलाटा आकार उभारतो. कोकणातच का, मुंबईलासुद्धा त्या वेळच्या भवानीशंकर रोडवर गेलो की बोरीचे एक विस्तीर्ण झाड समोर सडसडते आयुष्याच्या उभारीत पार्शी कॉलनीतला प्राजक्त माझ्या आकुल अंतःकरणावर एक सुगंधी फुंकर घाली. पिंपळाची अनेक सपर्ण–विपर्ण, कोमल–करपट, भव्य–भयाण रूपं माझ्या मनावर सावल्यांचा खेळ मांडतात, त्याचा उगम एकदोन पिंपळांच्या दर्शनातच शोधायला हवा. आयुष्याचे अखेरचे दिवस इथं 'कमलबागें'च्या एका फ्लॅटमध्ये मोजीत असताना समोरचं एक बोरीचं झाड, आपल्या अस्तित्वाला काही आगापिछा आहे असं मला सांगत असतं.

पण आयुष्याच्या काही कालखंडांत झाडानं माझ्या जीवनावर आपली छाया टाकलीच नाही. पौगंडावस्थेतील दोन वर्षं मी 'रत्नागिरी हायस्कूल'च्या सडयावरील बोर्डिंगात काढली. तेव्हाच्या माझ्या स्मृती एखाद्या झाडानं व्यापलेल्या नाहीत. आमच्या बोर्डिंगच्या उघडयाविशाल मैदानानं त्या विस्तारलेल्या आणि विस्फारलेल्या आहेत. या मोकाट मैदानावरच मी क्रिकेटची पहिली बॅट फिरवली. या मोकळ्या विस्तारातच मी विटी-दांडूचा दांडू राजदंडासारखा वापरला. या काळात माझ्या नेत्रांना ओढ लावली तो रोज सायंकाळी सातच्या सुमारास रत्नागिरी बंदरात शिरणाऱ्या मुंबईच्या बोटीनं. या बोटीचं आमच्या आवाराच्या गडग्यावरून मी दर्शन घेई, आणि मन तिच्याबरोबर भटकायला जाई. आणि मग ते सागराच्या विस्तारावर मनसोक्त नाचे, आणि त्यावरच्या शिडाच्या जहाजांबरोबर कुठं कुठं जाई. आजसुद्धा कोलंबसाची सफर माझ्या मनात येते तेव्हा ॲटलांटिकच्या नकाशावर रत्नागिरी बंदराचा ठिपका अलगद उमटतो. रत्नागिरीनं मला समुद्राचा विस्तार दाखवला तसा रात्रीच्या आकाशाचा एक अनोखा विस्तारही दाखवला. हा विस्तार नक्षत्रांनी कशिदलेला नव्हता, टिटवीच्या ओरडयानं आक्रंदलेला होता, रत्नागिरीचा हाच एक पक्षी माझ्या संज्ञेत शिरलेला आहे. रात्री व्हरांडयात झोपलो की आकाशाचं वस्त्र फाडीत तो इकडून तिकडे हिंडे.

२२३७८ नि. क्र. निबंध २६०७५



पुढं दादरला मी पुणेवाडीत दोनचार वर्षं राहिलो, तेव्हा जीवनाच्या नवनव्हाळीनं माझं मन अनेकदा अंकुरलं; पण कोणत्याही वृक्षाचा पराग त्याच्यावर उडाला नाही. एका पुस्तकाची अर्पणपत्रिका मिळवण्याइतके ते दिवस लोभस ठरले, पण त्यांतले कित्येक निद्रानाशानं सुरकुतले होते. दहा वर्षांपूर्वी मी पुण्याला चतुःशृंगीच्या पायथ्याशी रहायला आलो. आपलं डोंगरपण आमच्या अस्तित्वावर बेदरकार आदळणाऱ्या त्या डोंगरानं आपलं एकही झाड माझ्या मनोभूमीत रुजवलं नाही.

...हे माझे कालखंड रिते होते, रिकामे होते, ओकेबोके होते असं मी म्हणू शकत नाही. खरं म्हणजे त्यांपैकी काही अर्थपूर्ण आशयानं भरलेले होते. परळला पांडुरंगाच्या चाळीत मी रहात होतो तेव्हा त्या कंगाल वातावरणात विदग्ध संस्कृतीचे फारसे संस्कार माझ्यावर झालेच नाहीत; पण बालगंधर्वाच्या रेकॉर्डस्‌मुळे सुरांचे संस्कार गळ्यात नाही तरी डोक्यात साचले. चतुःशृंगीच्या जत्रेतील ओरडयानं माझ्या संज्ञेचा एक तुकडा कायमचा भरड बनवला, तरी लोकजीवनाच्या त्या अनुभवानं अनेकदा माझं कोकणातलं बालपण जिवंत केलं. त्या त्या वेळच्या अगोचर अनुभवांनीही माझ्या अनुभवविश्वाला एक तोल दिला. पण या काळखंडात आत काही-तरी कुठंतरी विस्कटलं होतं यात शंकाच नाही. पांडुरंगाच्या चाळीत सांस्कृतिक हेळसांड झाली. रत्नागिरीला अभ्यासाची हेळसांड झाली. आणि चतुःशृंगीला आलो तो मुळी एक अमोल श्रेय हरवूनच या कालातला अखेरचा ठसा अभावाचा आहे. त्या कालखंडात जाण्याचा मी प्रयत्न करतो तेव्हा कसलेतरी विचित्र भास होतात—निर्गंध फुलाच्या वासाचे, स्वप्नहीन झोपेचे, नेत्रहीन चेहेऱ्याचे, स्नेहहीन ज्योतीचे, निःशून्य भावभेटीचे, अस्वच्छ आंघोळीचे, निर्जल आचमनांचे, निःशब्द संवादांचे, कसले कसले...

या निष्पर्ण आठवणींवर उतारा म्हणजे त्या सपर्ण आठवणी. एकेका रुखा-भोवती रुंजी घालणाऱ्या. त्या आठवणी एकदम आकारत नाहीत. नानाविध पानांचे, घुमाऱ्यांचे, गवताच्या केसरांचे मिश्रसंमिश्र रंगगंध त्यात शिरतात. त्यांनी माझी निसर्गलीन संज्ञा गजबजून जाते. गलबलून जाते.पण थोडा वेळ स्मृती तिच्यावर स्थिरावली की ती एका सुरंगीनं साकारते. ती सुरंगी...

तसं पाहिलं तर वाळीत टाकल्यासारखी, आमच्या परसावाच्या एका गवताळ रानवट भागाकडे एखाद्या परित्यक्तेप्रमाणं उभी असलेली. थंडीच्या दिवसात ती मोहरे तेव्हा काय ती तिची वस्तपुस्त. ती अशी उपेक्षित, आणि तरी ती स्वतःशीच मस्तचुस्त असायची. जणू या गावची नाहीच. निराळ्या भूमीची. कोकणच्या लाल, मातट, चिकट जमिनीचा स्पर्श नसलेली. सभोवार राखी, रेताळ, स्वच्छ, कणीदार मातीचा घाणा घालून बसलेली. तिचं एक स्वतंत्रच विश्व. विश्रब्ध. स्नेहाळ. सलगीचं. तिच्या सभोवार उतरलेल्या डहाळ्यांनी एक घरकुलच निर्मिलं होतं, आम्हाला विसावण्यासाठी. गमण्यासाठी. रमण्यासाठी. आपलं एक जग निर्माण करून त्यात हरवून जाण्यासाठी. आईच्या हाताखांद्यावर बागडावं तसं तिच्या फांद्यांवर बागडण्यासाठी.

थंडीत ती फुलायची तेव्हा हे विश्व सुगंधानं भरून जायचं. गंध-गंधायचे. रंगरंगायचं. या दिवसांत ती मोहरली की तिच्या अंगाअंगावर रोमांच उभे रहायचं,—प्रियकराच्या पहिल्या स्पर्शाचे. तिच्या कळ्या फुलल्या की मंगळागौरीच्या दिवशी नवी नवरी सजावी तशी ती सजे. पण ती भारावे. स्तोकनम्र बने. प्रमत्त गंध प्यालेलं भोवतालचं वातावरण तसंच भारावे. जड बने. आणि मग ती स्वतःच्याच अस्तित्वात मुग्ध बने—अबोल, अबोध.

सुरंगी फुलू लागली की लांबलांबून लोक यायचे. कळ्या तोडायचे. फुलं तोडायचे. थोडे घसमुसळायचे. तिच्या सौंदर्याचा, सुगंधी सत्त्वाचा, अत्तरलेल्या विश्वाचा स्पर्श त्यांना व्हायचा नाही. तो हक्क आमचा. आम्ही फुलं तोडायला जात नसू; फुलांत फुलायला जायचे. कळ्या तोडायला जात नसू; मोहरायला जायचे. उदबत्तीच्या धुराची वलयं तिच्या गंधाबरोबर विहरतात तसे विहरायला जायचे. म्हणून आमची जाण लोक गेल्यावरच अंकुरायची. आमचे भाव ते गेल्यावर भ्रमायचं. आमची अंतःकरणं ते गेल्यानंतरच उमलायची. मग सुरंगी त्यांवर चैतन्य शिंपडायची.

या सुरंगीच्या दोन आठवणी माझ्या मनात दरवळत असतात. एकदा घनदाट धुकं पडलं होतं. सुरंगी दिसलीच नाही. वाटलं, धुक्यात विरली. वाटलं म्हणजे वाटण्याची गंमत वाटली. खरं म्हणजे झोपून

उठल्यावर स्वप्न अधुरं आठवतं, तशी दिसत होती ती. अपुरी, अस्पष्ट. धुक्याशी खेळतखेळत आम्ही आत शिरलो. धुकं आम्हाला ओला स्पर्श करीत होतं. नाकात करपट गंध भरीत होतं. डोळ्यांत चुरचुर ओतीत होतं कपड्यांत शिरून अंगाभोवती लपेटत होतं. सुरंगीच्या डहाळ्यांशी झुंबत होतं. कळ्यांना चुंबत होतं. सभोवार त्यानं राहुटी उभारली. आम्ही आत विसावलो. इतक्यात सूर्य उगवला. धुकं त्याचे किरण पकडू लागले, किरण धुक्याचं वस्त्र विरवू लागले. धुकं आणि सूर्यकिरण यांचं एकच रसायन बनलं. सूर्यबिंबाला कोणीतरी सेलोफेनमध्यं गुंडाळलं. पण हळू-हळू धुक्याचं आवरण विरू लागलं. राहुटी वितळू लागली, निसर्गाच्या त्या निःशब्द निचऱ्याची गंमत वाटत होती. मजा वाटत होती. त्यातच एक सुख वाटत होतं. सूर्यकिरणांच्या उबेचं. या उबेच्या मायेत मग्न असतानाच आमच्या भोवतालचं धुरकट-धुरकट प्रावरण विलयास गेलं — ही आठवण मागं ठेवून.

ही आठवण सकाळची, तर दुसरी संध्याकाळची. सुरंगीच्या फांद्यांवर पहुडून आम्ही गप्पागोष्टींची अर्थहीन पण नादवेल्हाळ गंमत अनुभवीत होतो. तोच डोक्यावर एक ढग फुटला, आणि पावसाच्या धारा कोसळल्या. पावसांच्या धारांनी आमच्या भोवती फेर धरला. एक पर्जन्यमय कोट उभारला. आम्ही तो भेदून बाहेर बघू लागलो, तो डोक्यावरच्या फांद्यांनी थेंब गोळा केले आणि ते आमच्या अंगावर टपटप फेकायला सुरुवात केली. आमच्या गप्पांवर पाणी पडलं. सुरंगीच्या अंतरंगातली आमची गंमत वाहून गेली. अलिप्त विश्वाचा हाही प्रयोग संपुष्टात आला.

तेव्हा या अनुभवांना शब्दरूप नव्हतं. ते अबोल होतं. अबोध होतं. आज त्यांना शब्दकळा फुटते आहे. पण वाटतं आहे, फुटली नसती तर बरं होतं. हृदयाचा विश्रब्ध ठेवा हृदयातच रहायला नको का ? पण अनुभवाला प्रकट व्हायची खोडच असते.

आणि आजोळचा तो औदुंबर, अंगणातल्या तुळशीवृंदावनापासचा. उंचच उंच शेलाटी बांध्याचा. डोक्यावर पालवीचा झुबका धारण केलेला. राजाच्या अब्दागिरासारखा उभा. याच्या पानोऱ्यात एक साळुंकी रहायची.

आजी म्हणायची, ती तिची सासू. साळुंकीच्या रूपानं तिथं वास करते. तुळशीला दाखवलेला नैवद्य ती तिला मोठ्या अपूवाईनं खायला देई. आणि साळुंकीसुद्धा आजी तुळशीच्या पूजेला आली रे आली की अचूक उगवे. रुप्याच्या वाटीतल्या शुभ्र दुधात टपटपणारी तिची पिवळी चोच आपलं रंगीन नर्तन आजही माझ्या समोर करते. घरचं मांजरही मुकाट्यानं पहात राही, आणि साळुंकीच्या चोचीत न शिरलेल्या उच्छिष्ट भागावर समाधान मानी.

दादरच्या पार्शी कॉलनीतल्या धडफळ्यांच्या आवारातला पारिजातक माझा एक स्निग्ध आधार होता. पावसाळ्यात त्याच्यावर नक्षत्रं फुलत आणि सभोवार सुवासाचं चांदणं पसरे. सकाळी माझी पावलं त्या झाडाखाली अलगद फिरत आणि हात कवडशाप्रमाणं फुलं वेचीत. रात्री झाडावर नक्षत्राप्रमाणं दिसणारी प्राजक्ताची फुलं सकाळी बशीत जमली की पोवळ्यांचे पद्मबंध रचीत. या दिवसांत माझ्या डोक्यात कथा पाऱ्हवायची. मी म्हणे, माझ्या डोक्यात शरदाचं चांदणं फुलतं. आज जाणवतं, ती माया त्या पोवळ्यांची होती.

पण मध्यंतरी जीवनाच्या एका तुकड्यावर दुसऱ्याच एका झाडाची छाया पडली होती. त्याला मी का विसरतो आहे? ते झाड बोरीचं. भवानीशंकर रोडवरचं. त्याला कसला आलाय् आकार आणि कसलं आलंय् तेज? त्याचा विस्तार तरी कसला? पण त्याचं अस्तित्व माझ्या जीवनाशी चमत्कारिक जखडलं एवढं खरं. संध्याकाळी शाळेतून आल्यावर त्या झाडाखाली आम्ही गोट्या खेळायचे. आमचा डाव भरात आलेला असायचा, तोच वडील गिरणीतून परतायचे. यायचे ते दम देतच यायचे. माझ्या वडिलांना माझा अभ्यास कधी दिसलाच नाही. दिसल्या त्या उनाडक्या. त्या अर्थात भरपूर होत्या. त्याच्या परीही खूप. त्यांचं पर्यवसान एकच —, मार. (लहान मुलाला मारलं की मी अस्वस्थ होतो, असहाय जिवावर पडलेले बलिष्ठ हात मला कासावीस करतात, याचं मूळ इथं आहे.) पण ही बोर माझ्या संज्ञेत इतकी खोल शिरली आहे, हे मला अलिकडेच समजलं. मी 'कमल बागे'त रहायला आल्यावर माझ्या खिडकीसमोरचं बोरीचं झाड माझी भवानीशंकर रोडवरची संस्मरणं जागवीत असतं. का जागवीत असतं? उमलत्या

आयुष्याचा अनुबंध आजच्या मावळत्या आयुष्याशी असा जडल्यामुळं ? त्या बोरीच्या दर्शनात माझ्या अस्तित्वाचं दर्शन होऊ शकतं म्हणून ? माझ्या स्वभावात 'चणयामणया'पेक्षा काटेच अधिक भासतात म्हणून ? माझ्या सौंदर्यबुद्धीस ते एक जागतं आव्हान म्हणून ? समाप्तीचं सूचन संपवितं म्हणून ? पण आयुष्याच्या गाठी घट्ट धरून रहाण्याची माझी धारणाच नाही. १९६० साली, लंडनच्या हार्वे स्ट्रीटवरील एका डॉक्टरनं माझ्या घशात कॅन्सरची शक्यता पाहिली तेव्हा मी काय केलं ? हॉस्पिटलचा रस्ता सुधारला नाही –रिओदि जिनेरोला गेलो. (कॅन्सरच्या वेदनांविषयीचं अज्ञान हा याचा आधार असेल. ) ते काहीही असो. बोरीचा काटा माझ्या आत कुठंतरी सलतो एवढं खरं. अखेरीस गत वर्षी एक मनुष्य आला आणि त्यानं या बोरीवर निर्वाणीची कुऱ्हाड घातली. आत कुठंतरी समाधान तरळलं. पण पुढं काही दिवसांनी पाहिलं तर त्या बोरीच्या विच्छिन्न बुंध्याला जबरदस्त कोंभ ! आज ते चांगले फोफावले आहेत आणि मी त्यांना स्वीकारण्याचा प्रयत्न करीत आहे !

दिल्लीचे ते हारीने उभे असलेले युकॅलिप्टस. त्यांच्याबद्दल सुरुवातीला अशीच नफरत. वास्तविक हा वृक्ष कसा ताठ उभा असतो ! त्यात किती ऐट ! झुलतो दशावतारी खेळ्यासारखा. दिसतो निमग्न साधूसारखा. एक प्रकारची तपस्या करीत उभा. पण नाही आवडला. कळाहीन वाटला. विशीर्ण वाटला. पोटातला राग निराळाच असेल. युकॅलिप्टसचा संबंध सर्दीशी —निलगिरी तेलाच्या द्वारं, आणि सर्दीनं मला जन्मभर छळलेलं आहे. काही असो, या मिजाशीनं उभ्या असलेल्या युकॅलिप्टसशी सहकंपन झालंच नाही. तोच एकदा हिमालयातून नैनितालच्या दयाळ पक्ष्याची सुस्वर स्मृती घेऊन परतलो, आणि सकाळी एक दयाळ त्या युकॅलिप्टसवरून स्वरांची साद घालीत होता. युकॅलिप्टस माझा मित्र बनला.

आणि ते पलिकडचे लॅबर्नम ? हेली रोडच्या दोनही अंगांना अंग चोरून उभे असलेले. आदबीनं, विनयानं, आपल्या अस्तित्वाबद्दल क्षमायाचना करीत. या रस्त्याला सर माल्कम हेलीची लाभलेली संगत मला आवडत नसे. मी त्याला लॅबर्नम रोड म्हणे. मुंबईच्या लॅबर्नम रोडची आठवण होई. तेवढंच बरं वाटे. या रस्त्यावरील डॉ. चिटणीसांच्या घरी मी

एकदाच गेलो होतो. तेथं लीला चिटणीस दिसल्या होत्या. डॉ. चिटणीसांच्या घरी त्या मला एकदाच दिसल्या — या घरी. ती आठवण जिवंत होत होती, आणि आत कुठंतरी रेशमी स्पर्शानं हुळहुळत होती. ही झाडं मे महिन्यात या रस्त्यावर तलम पारदर्शक पिवळ्या रंगाचं सडासंमार्जन करीत. माणसाच्या स्पर्शानं मलीन झालेल्या फुलांच्या माळा हातात धरून उभी रहात. डॉ. दयाकृष्णांना त्यांचा कोण सोस ! फेनपुष्पं पसरावी तसा. ते या दिवसांत यायचे नि विचारायचे — आदिम उत्साहानं विचारायचे, " या दिवसांत इथं महत्त्वाचं काय आहे ? " मी निर्बोध उभा राहयचा, पण कमलच्या संज्ञेला लगेच धुमारा फुटायचा : ' लॅबर्नम ! ' यावर दयाकृष्ण म्हणायचे, ' अमलताश ! ' शब्द सुरेख ! पण, मला त्या सुवर्ण-रेशमी मौसमाचा इतका सोस नसायचा. एक महिन्याचं सौंदर्य. तेही उन्हाळ्यानं करपलेलं ! सौंदर्य मान्य, पण त्यासाठी अकरा महिने त्या झाडांचं मरतुकडं ध्यान ! डोळ्यांवर अत्याचार ! पण त्या वेळेपुरता तरी दयाकृष्णांचा उत्साह जिंकी. मी त्यांच्याबरोबर त्या रस्त्यावर फेरफटका करी. त्या शापित सौंदर्याला सलाम करीत.

आणि आता माझ्या खिडकीतून दिसणारं समोरचं बदामाचं झाड. पर्णवैभवानं मुसमुसलेलं. एखाद्या नर्तकाप्रमाणं अलंकृत हात पसरून उभं असलेलं. पिकलेल्या पानातसुद्धा आदिचैतन्याचं रक्तलाल रूप दाखविणारं. ही पानं फांदीपासून विलग होऊन वाऱ्यावर विहरतात तेव्हा आकाशात स्वप्नं नाचवत ही पानं मातीत मिसळायला तयार नसतात. यक्षकिन्नरांच्या विश्वाकडे झेप घेतात — नजर बांधून ठेवणारी झेप !

झाडांशी हे संघटन का ? त्यांच्याशी जीवनाचे धागे मी का जोडीत आहे ? याची मोठी सैद्धान्तिक कारणं द्यावीशी वाटतात. ती बरोबरच असतील असं नाही. जीवनाची कोष्टकं गणिती समीकरणात थोडीच बसतात ? पण बसवली म्हणजे बरं वाटतं. उन्नत वाटतं. सर्जनाचा झरा झुळझुळल्यासारखं वाटतं. सत्याचा कस्तुरीमृग सापडल्यासारखं वाटतं.

कस्तुरीमृग पकडला तरी सुटतो, सटकतो. पण मनात येतं : वृक्षा-इतकं सर्जनशील काय असू शकेल ? नवनवोन्मेषाचा असा फुलोरा दुसरी-

कडे कुठं आढळेल ? नवनवोत्सवाची असली प्रतिज्ञा इतरत्र कुठं ? दर वर्षी नवी साल, नवी पालवी, नवा मोहर, नवं रूप. संपूर्ण कायापालट अव्याहत रंगपालट — कोवळा लाल, पोपटी, हिरवा, पिवळा, जून लाल, काळपट, करपलेला, हिरव्याच्याही बदलत्या छटा — हिरवा, पोपटी, हिरवा-कंच, हिरवाकाळा, शेंदरी हिरवा, हिरवाशार ! पानगळीतही रंगांची उधळण. युरोपात झाडंच्या झाडं लाल, पिवळी, नारिंगी झालेली पाहिली, आणि रंगाचा एक विलक्षण उल्लास संज्ञेत शिरला. ही झाडं लवकरच काळी, उदी, ओकीबोकी बनतील; पण आकाशावर नक्षी कोरतील, नंतर डहाळ्यांवर हिमशुभ्र कशिदा रेखतील. तोही वितळेल, आणि उजाडपणा अंगी येईल. नवजन्माची ही तपस्या. फिनिक्स राखेत नवजन्म शोधतो तो मिथ्यकथेत, पण वसंताच्या नवोत्सवात सर्जनाचं सत्य सरळ साकारतं. माणसाच्या शरीराचंसुद्धा नूतनीकरण होतं. पण ते सात वर्षांनी, आणि अगदी अभावता. पण वृक्षाचा पुनर्जन्म तुमच्याआमच्या डोळ्यांदेखत होतो. पानाफुलांची तोरणं उभारून. खरोखर वृक्ष जीवनावरचा विश्वास वाढवतो.

हा विश्वास तो वाढवतो, कारण तो चैतन्याचा साक्षीदार असतो. विश्वाच्या मुळाशी असलेली ऊर्जेची उलझल तो आइनस्टाइनचे गणित न मांडताच प्रकट करतो ! वृक्ष म्हणजे चैतन्याचा विलास आणि विभ्रम. एकच गुलमोहर, पण त्याच्या एका फांदीवर अर्भकाचं कोवळं हास्य, दुसऱ्या फांदीवर वृद्धाची फिकट पिवळी सुरकुती, आणि तिसरीवर सौभाग्य-साक्षिणीचा साजशृंगार ! एकाच आइनस्टाइनच्या डोक्यात गणिताची समीकरणं आणि व्हॉयलीनचे स्वरबंध, तसंच हे. ते एकाच प्रतिभेचे उच्छ्वास; हे एकाच चैतन्याचे आविष्कार.

अगदी व्यक्तित्वपूर्ण आविष्कार. एकेक झाड म्हणजे एकेक व्यक्तित्व, काहींचं मिजासखोर, तर काहींचं आदबशीर. काहींत ताठा तर काहींत आर्जव. काही पेहेलवानासारखी, तर काही भिकारी. काही मस्त, तर काही रुष्ट. काही पानं मिटून प्रार्थना करतात, तर काही हातवाऱ्यांनी आवाहन करतात. काही काठच्या पाण्यातलं आपलं प्रतिबिंब न्याहाळण्यात मग्न तर काही आपल्या छायेतच निमग्न. काहींची निर्वात समाधी, तर काहींचं वाऱ्यावर डुलणंझुलणं. एखादं झाड आपल्या शेंड्यानं आकाशावर आकृत्या

रेखतं तर दुसरं एखादं भुईशी कानगोष्टी करतं. एखादं झाड वादळात असं पिळवटतं, असं पिळवटतं की त्याच्या अंगातच येतं!

एकेक झाडाचा अवतार म्हणजे एकेका माणसाची वृत्तीप्रवृत्ती. एका मनोवैज्ञानिकानं झाडाची माणसाशी तुलना केली आहे, आणि फरक असा सांगितलेला आहे की, झाड एका जागेला जखडलेलं असतं, तर माणूस मोकळा असतो तो चलनक्षम असतो. तो चालतो. त्याचं नशीबही चालतं. चराति चरतो भग: । झाडाला पळता येत नाही. पण खरोखर माणसाला तरी येतं काय ? — स्वत:पासून ? पावलांना व्यायाम देऊन प्रेमभंगाची अगर प्रियजनवियोगाची जखम बुजवता येते काय ? कोणी जवळचे गेलं की अमेरिकन माणूस पृथ्वीपर्यटनास निघतो. आणि सारी पृथ्वी पालथी घातल्यावर त्याच्या ध्यानात येतं की, आपण होतो तिथंच आहोत.

पण तो मनोवैज्ञानिक तत्त्वज्ञान शोधीत नव्हता, वैज्ञानिक सत्य हुडकीत होता. हे सत्य तो वृक्ष आणि मानव यांना जोडणाऱ्या पेशीत पहात होता. सारी सजीवसृष्टी पेशीवर उभारते. आणि तिची संज्ञा-देखील. आणि हे सिद्ध झालं आहे. संगीतानं मानवाचं मन फुलतं. गाई अधिक दूध देतात, आणि झाडांना नवी पालवी फुटते. सर्व सजीव सृष्टीला व्यापणारं हे सत्य संगीतानं सांगितलं. हे ' सांगीतिक ' सत्य ! असंच ' काव्यात्म ' सत्य सेसिल डे लेविस या आंग्ल कवीनं सांगितलं होतं: विश्वाची विविध अंगं एकमेकांशी जोडणाऱ्या उपमा, विश्वाला व्यापून असणारं एक समान सत्यच प्रकट करतात. सजीव सृष्टीचं हे सत्य आपल्या सर जगदीशचंद्र बोसांनी मागंच सांगितलं तेव्हा मोठमोठे सुज्ञ संशयित झाले होते. आज सर जगदीशही नाहीत आणि ते सुज्ञही नाहीत. पण सर जगदीशनी सांगितलेलं सत्य प्रा. टी. सी. एन. सिंग यांच्या कृषिसंशोधनानं सिद्ध होत आहे.

झाडाचं माणसाशी हे जीवशास्त्रीय नातं. पण झाडाचे बंध स्थलकाला-त्महीं असतात. स्थलकाल ! — मला तो जपानचा टोकायडो रस्ता आठवतो. राजरस्ता. पूर्व-किनाऱ्यावरून वळणावळणानं जाणारा. काठा-काठानं जपानी देवदारांचे पुराणावतार धारण करून बसलेला. तोकुगावा

राज्यकर्त्यांनी मोठ्या धोरणी बुद्धीनं राखलेला. हर्बर्ट पासीन मला सांगत होता, तोकुगावांनी हा रस्ता जपानी सरदारांसाठी मुद्दाम राखला होता. त्यांच्यासाठी हे वृक्ष लावून त्यांनी सावलीची सोय केली होती. दर सहा महिन्यांनी राजधानीत येऊन नजराणे अर्पण करण्याची सक्ती या सरदारांवर होती. ते बंडखोरीत गुंतलेले नाहीत याची ग्वाही मिळविण्याची ही युक्ती. पासीनची ही सुरस (आणि चमत्कारिकही) कथा ऐकली, आणि या देवदारूच्या फांद्या इतक्या तिरपागड्या का याचा प्रकाश पडला ! जपानी देवदारांच्या फांद्या अशाच असतात, पण या झाडांच्या विशेष होत्या. हिरोशिगेनं आपल्या चित्रांत या फांद्यांची वक्रता अचूक पकडली आहे. " कालानं त्या वठल्या आहेत, " पासीन म्हणाला. मी म्हटलं, " नाही; या सरदारांचे कारस्थानी मनसुबे आणि या फांद्याची वक्रता यांनी परस्परांना यथेच्छ स्फुरण दिलं म्हणून त्यांची ही अशी दशा. "

कालाचा दुसरा साक्षात्कार अमेरिकेत झाला. १९६३ साली मी कॅलिफोर्नियाच्या ' रेडवूड फॉरेस्ट'मधं गेलो, आणि एका पुरातन विश्वात प्रवेश झाला. एकेक झाड म्हणजे प्राचीनतेचा साक्षात्कार. एकेक वृक्ष पुराणपुरुषासारखा उभा. कोणाचं वय चारशं, तर कोणाचं सहाशं. इतिहासाचं आसव प्राशन करूनच ती झाडं उभी होती. एकेक झाड आकाशाचा आस पकडीत होतं. कालचक्राचा फेरा धरीत होतं. या झाडांच्या कांडांवर फिरणारी नजर कालाची सांधेजोड करीत होती. संस्कृतीच्या सीमांपलीकडे जात होती. इतिहासपूर्व आरशात आपलं रूप न्याहाळीत होती. आज हे झाड आपल्याला भूतकाळाशी जोडतं. उद्या ते वर्तमानाला जोडील, आणि अमरत्वाचा एक आगळा साक्षात्कार घडेल.

पण अमरत्वाची ही साधना झाड कालाच्या अनुबंधानंच करतं असं नाही. स्थलाच्या अनुरोधानंही करतं. कोकणची माझी एक स्मृती ताम्हनीच्या झाडात गुंतलेली आहे. ताम्हनीच्या फुलांनी माझ्या मनाची मंगळागौर एकदा सजवली होती. कित्येक वर्षांनी त्या झाडाचं दर्शन पूर्व–पाकिस्तानात ढाक्क्याला झालं, आणि त्या शहराशी एक नाजूक ऋणानुबंध जुळला. त्याआधी तो एका कुंकू लावणाऱ्या आणि भरतनाट्याचे

पदक्षेप करणाऱ्या ढाक्क्याच्याच, ब्रह्मदेशात भेटलेल्या मुस्लिम युवतीनं जुळवला होता. ( 'कुंकू म्हणजे हिंदू संस्कृतीची मक्तेदारी आहे काय ?' असं तिनं मला विचारलं होतं.) या झाडाला आम्ही 'कृष्णचुडा' म्हणतो असं एकानं सांगितलं तेव्हा त्या नावाचं अभिजात नातं त्या मुस्लिम युवतीच्या हिंदू आभरणांशी जमलं. या कृष्णचुड्यानं, कोकणचा धागा थेट बांगलाशी जुळवला. कोकणच्या काही झाडांनी तो इण्डोनेशिआशी अगोदरच जुळवला होता. कॅलिफोर्नियाच्या 'रेड वूड'नं कालाचा पडदा खोलला, तसा कोकणच्या वनश्रीनं अग्नेय–आशियात अनेकवार खोलला — बृहन्-भारतीय इतिहासाला भूगोलाची साक्ष देऊन !

मला वाटतं, माणसं घरात रहायला लागली ती झाडांकडे पाहूनच. प्रत्येक झाड हे एक वास्तुशिल्पच असतं. काही झाडं राजवाड्यासारखी दिसतात, तर काही चंद्रमौळी झोपडीसारखी. काही झाडांना देवळासारखं शिखर असतं तर काही धर्मशाळेसारखी आडवी पसरतात. हिमालयात मोरपंखी वृक्ष पाहिले तेव्हा मला गोव्यातल्या दीपमाळांची आठवण झाली. झाडं नुसती वास्तुशिल्पं नसतात, ती वास्तुशिल्पाचे पाठही देतात. चांगल्या इमारतीत कोणती तरी कल्पना मूर्तरूप झालेली दिसते, तशी ती झाडांत दिसते. ॲरिस्टॉटल म्हणे, झाडाच्या बीजात जी कल्पना असते तिच्याप्रमाणे झाडाची वाढ होते. ही कोणाची कल्पना ? परमेश्वराची असं म्हणण्यात मानवाची कल्पनाशक्ती दिसते. पण खरं म्हणजे प्रत्येक झाड, जमीन, पाणी, हवा यांनी बनलेल्या परिस्थितीला अनुरूप असा आकार घेतं. म्हणजे ही निसर्गाची कल्पना !

पण मला झाडाच्या बाहेरच्या रूपापेक्षा त्याच्या भूमिगत रूपाबद्दल अधिक आकर्षण वाटतं. अधिक रस वाटतो. हा कुतूहल–रस ! गूढातून जन्मलेला.हे भूमिगत रूप अगर रचना सदैव गूढच रहाणार. ती पहाण्यासाठी जमीन खोदली की ही रचना बिघडणार. लहान मुलं एखादं रोप लावतात आणि ते किती वाढलं आहे हे पहाण्यासाठी रोज उपटून पहातात. त्यांची दृष्टी वास्तुशिल्पाची नसते म्हणून बरं ! हे भूमिगत वास्तुशिल्प कसं असेल याचं सतत कुतूहल मला वाटतं. मग मी कल्पना करतो. झाडाखाली उभं

राहिलं नि त्याच्या विस्तारातून आकाशाकडे पाहिलं तर जशी जाळीदार रचना दिसेल, तशी त्याच्या पाळांची असेल का ? किंवा दुपारी तिची नक्षीदार सावली पडते तशी ती असेल का ? कल्पनाशक्ती थकते, अन् मग ती विचार करू लागते. पाळांची रचना कशीही असो, पण ही अशी जमिनीत घट्ट असते म्हणूनच झाडं वाऱ्यावादळांतून तगून रहातात ना ? आणि अनेकदा भूकंपातही ? मला वाटतं, फ्रँक लॉइड राइटनं आपल्या त्या विख्यात वास्तुशिल्पाचं ' सीक्रेट ' झाडांपासूनच चोरलं. टोकिओचे ' इम्पीरिअल हॉटेल ' बांधताना त्यानं भूमीवरच्या बांधणीकडे जितकं लक्ष दिलं, तितकंच भूमिगत बांधणीकडेही दिलं. आणि म्हणून १९२३ च्या भयंकर भूकंपात ' इम्पीहो ' दिमाखानं उभं राहिलं. आणि असं म्हणावंसं वाटतं की ले कार्बुझिएनं आपलं खांबावर इमारत उचलण्याचं तंत्र झाडांपासूनच उचललं !

पण माणसांनी झाडात जितकं वास्तुशिल्प पाहिलं त्यापेक्षा पक्ष्यांनी अधिक पाहिलं. नुसतं पाहिलं नाही, तर या वास्तुशिल्पाचा प्रत्यक्ष उपयोग केला त्यांनी त्याच्यावर घरटी बांधली. खरं तर हे वास्तुशिल्प ! पण माझ्या दृष्टीला ती शिल्पंच दिसतात. वृक्षाच्या वास्तुशिल्पाला हा शिल्पांचा अलंकार. झाडाच्या वास्तुशिल्पाचा आणखी एक उपयोग पक्ष्यांनी केला. त्यांनी त्याचं सभागृह केलं. संगीतसभेसाठी. सकाळी मी पक्ष्यांचा ऑर्केस्ट्रा ऐकतो, आणि झाडाचं हे रूप मनावर ठसतं.

वटवृक्ष हे एक सभागृहच असतं. अधिक म्हणजे सभामंडप. पारंब्यांच्या खांबांनी बनवलेला. अड्यारच्या ' थिऑसॉफिकल ' केंद्रात त्याचा तसाच अवतार मी पाहिला. पण अलेक्झांड्रियाला पाहिलेल्या वटवृक्षानं एक निराळाच पाठ दिला. दोन महिने युरोपात काढून बोटीनं मी अलेक्झांड्रियाला उतरलो, तिथं हा वटवृक्ष मला दिसला, आणि पौर्वात्य संस्कृतीचं प्रतीक म्हणून भावला. पौर्वात्य संस्कृती वटवृक्षासारखीच वाढते. तिला पारंब्या फुटतात, आणि पारंबीगणिक तिची शाखा उभी रहाते. नवी संस्कृती, पण जुन्याचा ऋणानुबंध जागवते. वंश अमर करते.

पण झाडांचा आशय अधिक अर्थगर्भ असेल का ? आपले ऋषी आत्म्याच्या शोधासाठी अरण्यात जात. अरण्यातील वनश्रीत त्यांना

आत्म्याचा साक्षात्कार होई. निसर्गातच ते स्वतःचं स्वरूप शोधीत. आपण निसर्गातून जन्मलो आणि निसर्गाकडे परततो. हेगल म्हणाला होता, आपल्याला एखाद्य वस्तूंचं ज्ञान होतं म्हणजे तिच्यात आपण आपलं रूप पाहतो. तिच्या सत्त्वात आपल्या स्वत्वाचा साक्षात्कार होतो. निसर्गात आपण आपलं स्वत्वच शोधीत असू. काही संस्कृतींनी निसर्गाशी अगदी जिवाशिवाचं नातं जोडलं आहे. जपानी वास्तुशिल्प म्हणजे हा नातेसंबंधच. या वास्तुशिल्पात बाग हा घराचा भाग असतो, आणि घर बागेचा. खरंच, घराला वृक्षासारखी दुसरी सोबत कोणती ? आपल्याला वाटतं, घर घराच्या आधारानं टिकतं. टिकत असेल. पण असं घर एकटं वाटतं. एकलं वाटतं. दाराशी एकच वृक्ष असू द्या — तो घरावर लगेच पाखर टाकतो. जपान्यांनी हे ओळखलं.

# आकाशदर्शन

सौ. सुचेता भिडे ( चापेकर ) यांच्या घराच्या अंगणात बसलो होतो. त्यांच्या आवारातील एका झाडानं माझं लक्ष वेधून घेतलं. कोणाचंही घेतलं असतं. झाड जरा आगळं होतं. शेंड्यापर्यंत नेहमीसारखंच, म्हणजे पर्णराजीनं भरलेलं आणि भारलेलं; पण शेंडा मात्र उघडाओका. म्हटलं तर उघडाओका नाहीही. शेंड्याच्या फांद्या शुष्क; उघड्याबागड्या, पण त्यांची काही एक रचना होती. एक फांदी दुसरीवर आडवी आलेली. तिच्यावर एक कावळा बसला होता. ओरडत नव्हता. नाचत नव्हता. स्वस्थ होता. खालच्या फांदीकडे एकटक पहात होता. तिच्यावर एक घरटं होतं. कावळ्याचं असतं तसंच. काटक्यांचं. भरड. आकारहीन. पण भावगर्भ. आत पिलं असावीत. त्यांच्यावर तो सुरक्षिततेची पाखर घालून होता.

ते भावमुग्ध आणि आकारसुंदर दृश्य मागच्या आकाशावर रेखलेलं.

असलं आकाशदर्शन कधी घडलं नव्हतं.

आकाशदर्शन हे आकाशाचं दर्शन नसतं. आकाशाला दर्शनच नसतं. ते फक्त पार्श्वभूमी पुरवितं. या नाटकात नुसतं पडद्यालाच महत्त्व.

आकाश ही एक जादू असते. विश्वदर्शन घडविणारी. रिक्तात रहस्य साठविलेली.

किंवा एक गूढ. अनंत अनाकार गूढ. अनेक आश्चर्य पोटात घालून बसलेलं गूढ.

आकाशाचा अर्थच मुळी पोकळी. पण अर्थपूर्ण पोकळी, या अर्थाचा भेद म्हणजे जे नाही त्याचा भेद. पण नाही तरी कसं म्हणायचं ? आकाश आहे म्हणून इतर गोष्टी आहेत. नाही तर त्या कुठं असत्या ?

मला चंद्रवीरांचा हेवा वाटतो तो ते चंद्रावर पदार्पण करतात म्हणून नाही. चंद्र प्रत्यक्ष पहातात म्हणून नाही, ते पहातात ते आपण पाहू शकतो. चंद्राच्या रंगीबेरंगी दृश्यांनी त्यांची नजर समृद्ध होते तशी आपलीही होऊ शकते. कॅमेऱ्यानं तेवढं केलेलं आहे.

पण एक अनुभव त्यांचाच असतो. खास त्यांचा. तिथं कॅमेरा निरुपयोगी ठरतो. ते अवकाशाचा अनुभव घेतात. ते रिक्ताचा भेद करतात. ते पोकळीतून प्रवास करतात. ते गुरुत्वाकर्षाणातून मुक्त होतात. वजनमुक्तीचं काव्य भोगतात.

हा अनुभव खास त्यांचा. स्वप्नासारखा.

स्वप्नाचा अनुभव हा खास ज्याचा त्याचा. स्वप्न सांगता येतं; पण दाखविता येत नाही. त्याचं छायाचित्र टिपता येत नाही. सांगता येतं ते सुद्धा अर्धअधुरं.

स्वप्न म्हणजे एक समाधीच. समाधीत असलो तर आपण समाधीचे. बाहेर आलो की तिला पारखे. स्वप्नाचं निदान वर्णन करता येतं. समाधीचं तेही नाही. वर्णन करायला स्मृती लागते. समाधीत स्मृती कसली ? स्मृती शिल्लक ठेवते ती समाधी कसली ?

समाधीची खरी आस असते ती परमात्म्यात विलीन होण्याची नाही, तर विश्वचैतन्याचं केंद्र पकडण्याची. स्वप्नाची खरी आस असते ती क्षणभर वास्तव विसरण्याची नाही, तर अबोध मनाचं केंद्र पकडण्याची. कलेची खरी आस असते ती कणभराच्या करमणुकीची नाही, तर अनुभवांचं केंद्र पकडण्याची. आकाशाचा खरा अनुभव असेल त्याचं केंद्र पकडण्यात. पण रिक्ताचं केंद्र कसं पकडणार ? निर्गंधाचा वास कसा घेणार ? अदृष्टाचं दर्शन कसं होणार ? निःशब्दाचा ध्वनी कसा पकडणार ?

शून्याला स्पर्श कसा करणार ? निराकाराची रुची कशी घेणार ? अनस्तित्वाचा तोल कसा सांभाळणार ?

आकाशाचं दर्शन म्हणजे खरोखर प्रकाशाचं दर्शन. सूर्याच्या प्रकाशाचं. प्लेटो म्हणाला होता, सुर्य वस्तूंना पाहिलं जाण्याची शक्ती देतो आणि नेत्रांना पाहण्याची शक्ती देतो. हे नेत्र आकाश पाहतात म्हणजे आकाश व्यापून राहिलेला वायू पाहतात. वायूचं दर्शन म्हणजे निळावंतीचं दर्शन. निळावंतीच्या समाधीचं दर्शन.

तेच आपलं नीलाकाश.

एका तत्त्वज्ञानं म्हटलं होतं, जीवनाला अर्थ नसतो; त्याला अर्थ आपणच द्यायचा असतो. आकाशाला सुद्धा आकार नसतो, त्याला आपण आकार द्यायचा असतो.

खरोखर जीवनाला अर्थ आपण थोडेच देतो ? जीवनाला इतर गोष्टीच अर्थ देत असतात. त्यातला एखादा आपण पकडतो आणि तत्त्वज्ञ बनतो.

आकाशातसुद्धा इतर गोष्टीच आकार देत असतात. त्यातला एखादा आपण पकडतो आणि आकाशदर्शकाची शेखी मिरवतो.

त्या झाडाच्या ओक्याउघडया पण आकारसुंदर शेंडयानं आकाशाला अर्थ दिला. आपल्याला तो भावगर्भ वाटला. जगाचे अर्थ आपण भावपूर्ण करतो आणि आत्म्याच्या रांजणात ओततो.

जगाचा माझा अर्थ सांगू ? जग म्हणजे खरोखर आरसा आहे त्यात आपलंच रूप आपण पाहतो. आपलं रूप निरखीतच आपण जगतो. खरं म्हणजे आपण सारे अस्सल नार्सिसस. एखाद्या वेळेस दाढी विचित्र वाढते आणि आपण आपल्यालाच विद्रूप दिसतो. अशा वेळी आपण दाढी करतो, आरसा फोडीत नाही. काहीजण आरसा फोडायला निघतात आणि स्वत:चंच थोबाड फोडून घेतात.

आकाश म्हणजे सुद्धा आरसाच. त्यात आपलंच रूप आपण पाहतो.

आपलीच आवड शोधतो. आपलेच भावबंध निरखतो. आपल्याच हृदयाच्या तारांनी त्याच्यावर आकृतिबंध बांधतो. म्हणून तर आकाशावर इतकं काव्य झालं आहे; आणि त्याला अर्थ प्राप्त झाला आहे. नाही तर तत्त्वज्ञान फोफावलं असतं आणि अनर्थ माजला असता !

आकाश आरसा आहे म्हणून त्याला आपण आकार देऊ शकतो. आकार देतो म्हणजे काय तर आकाराचीं प्रतिबिंबं पाडतो.

आकाशरेषा हा अशी प्रतिबिंबं पाडण्याचा एक सोपा मार्ग. पृथ्वी जन्माला आली तीच मुळी आकाशरेषेची निर्मिती करीत. पहिली आकाशरेषा म्हणजे क्षितिजरेषा. वर्तुळाकार. वर्तुळ ही खरोखर एक सुंदर आकृती आहे. पण वर्तुळाचं कधीकधी दुष्ट वर्तुळ होतं. ते एकसुरी वाटायला लागतं. क्षितिज-रेषेचं तसंच झालं. तेव्हा निसर्गानं पाणी आणि जमीन असे पृथ्वीचे दोन भाग केले. पाणी सपाट, आणि जमीन उंचसखल. पण पृथ्वीवर पाणीच फार आणि ते फार फार सपाट. तेव्हा पृथ्वीनं अप्सरांची युक्ती केली. तपश्चर्येत निमग्न असलेल्या चंद्रावर मोहिनी टाकली. चंद्र पाघळला. पृथ्वी-भोवती फिरू लागला आणि त्याच्या आकर्षणानं समुद्र उचंबळू लागला. चंद्राला कधी भेटला नाही, पण त्याचा सुन्न सपाटपणा मोडला.

मग सूर्यानंही आपली किमया फेकली. त्यानं सूर्योदयसूर्यास्ताची आश्चर्यं निर्माण केली आणि क्षितिजाला शोभा आणली. क्षितिज सुंदर दिसू लागलं. पण सूर्य तेवढ्यावर थांबला नाही. त्यानं समुद्रावर सकाळ–संध्याकाळ गुलाल फेकला, आणि दुपारच्या समुद्रावर तेजाची सांडणी केली व भूमीवरही प्रकाशाची माया पसरली. पण हे सौंदर्य पाहणार कोण ? म्हणून त्यानं नेत्राची जादू निर्माण केली.

तिकडे चंद्र तळमळत होता. पृथ्वी त्याला भेटत नव्हती. त्याला आलिंगन देत नव्हती. त्याच्या बाहुपाशात शिरत नव्हती. म्हणून त्यानं किरणांचं जाळं फेकलं. पण त्यानं पृथ्वी जवळ आली नाही. मग त्यानं तिला चंदेरी स्वप्नं पाडायला सुरुवात केली.

मात्र पृथ्वी इकडे आपल्या आकाशरेषा निरखण्यात मग्नच होती —

डोंगरटेकड्यांनी तयार केलेल्या आकाशरेषा, वृक्षवल्लरींनी तयार केलेल्या आकाशरेषा.

आकाशरेषेचं माहात्म्य मी पुणेकरांना काय सांगणार ? पुण्यात कुठंही मध्ये उभे रहा, समोवार नजर फिरवा, आकाशरेषांची नजाकत तुम्हाला ताबडतोब पटेल. चतुःशृंगी, सिंहगड, पर्वती, कात्रज, सह्याद्रीच्या एकेक आविष्कारानं पुण्याभोवती आकाशरेषांचं एक कडंच निर्माण केलं आहे. या आकाशरेषांच्या वर्तुळात पुणे आणि पुणेकर अगदी सुरक्षित आहेत. संतुष्ट आहेत. अभिमानानं पुष्ट आहेत. दोन नद्यांच्या वाहिन्यांनी पुण्याच्या अंगात पाणी खेळतं, पण त्याच्यावरच्या तकाकीचा उगम या टेकड्यांतील झऱ्यातच शोधला पाहिजे. या डोंगरटेकड्यांत देवदेवतांची प्रतिष्ठापना करून पुणे-करांनी आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे. पण अविश्वासाचा संरक्षक गुण हाडी खिळलेला असल्यामुळं काही ठिकाणी टेहळणीचे बुरुजही उभारले आहेत. आता पुण्याला या डोंगरटेकड्यांच्या कड्यापलीकडे काय चाललं आहे याची चौकशी करण्याचं कारणच काय ? आपल्या पूर्वजांच्या प्रतिष्ठा-गायनात मशगूल असलं म्हणजे पुरे ! पण म्हणून या आकाशरेषेचं महत्त्व कमी होत नाही.

या आकाशरेषेचं वैभव महाराष्ट्रात सर्वत्रच विखुरलेलं आहे. सह्याद्रीनं तिचे विभ्रम सर्वत्र पेरले आहेत. त्या विभ्रमात अनेक ठिकाणी गड–देवळांच्या वास्तुशिल्पांचं कौशल्य ओतलं आहे. देवळं आणि किल्ले हे आपल्या महाराष्ट्रीयांच्या वास्तुशिल्पीय कल्पकतेचे शाश्वत साक्षीदार. ही कल्पकता सह्याद्रीनंच आपल्या रक्तात ओतली. या कल्पकतेचे नमुने धारण करूनच सह्याद्री अनेक ठिकाणी वावरतो. अंबरनाथ ते लोणावळा आणि कल्याण ते इगतपुरी, डोळे उघडे ठेवून आणि ते तुमच्या बरोबर चाल-लेल्या सह्याद्रीच्या रांगांवर रोखून प्रवास केला म्हणजे पुरे. ठिकठिकाणी तुम्हाला निसर्गाचं धार्मिक आणि राजकीय वास्तुशिल्प दिमाखानं उभं दिसेल. पुण्याच्या वाटेवरचं शिल्प जरा सौम्य आहे, पण नाशिकच्या वाटे-वरच्या शिल्पानं रौद्र रसच प्राशन केला आहे. तेथल्या शिखरांना कधी शंकराच्या त्रिशूलाचं रूप प्राप्त होतं, तर कधी कालीच्या सात्त्विक

संतापाचं. सह्याद्रीच्या अंतरंगात अग्निराज आपल्या ज्वाळांची अस्त्रं धारण करून वावरतो, याचा पुरावा ज्योतिर्लिंगं देतातच, पण संतापाग्नी धारण करणारी अनेक शिखरंही देतात. अनेक ठिकाणी हा पर्वतराज रौद्र रस आणि अद्‌भुत रस यांचं 'कॉक्टेल' प्राशन करूनच संचरतो.

पर्वतप्रसवाच्या प्रक्रियेतच या उन्मादाचा जन्म आहे की काय नकळे ! कोलंबोहून कँडीला जाताना या उन्मादाचं मुक्त दर्शन घडतं — मुक्त म्हणण्यापेक्षा नग्न ! रिओ द जेनिरोचे डोंगर तेथल्या समुद्राच्या अफाट अवतारापुढं जरा दबून असतात, पण जरा खोल विचार केला की येथला खडकाळ निसर्ग, पंचमहाभुतांनी केव्हा तरी यथेच्छ मदिरापान करून बेशुद्ध यादवी माजविली त्यातून निर्माण झाला असावा असं वाटतं. इथलं हवामान ही बुनियादी बेदिली शमविण्यास उपकारक नव्हतंच. तसाच आल्प्सचा काळाकभिन्न उन्माद उतू जातो तो हिमवंतीच्या शुभ्रशीतल सिंचनानंही शांत होत नाही. माँटेनेग्रिन पर्वताच्या काळ्या कातळाचा अणकुचीदार पसारा मनाचा, दुरून विमानातूनही, थरकांप उडवितो. इथं रौद्राचा पाषाणरस निसर्ग-निर्मितीच्या एका चुकार क्षणी त्या डोंगरावर पसरला आणि कोणाला त्याची आठवणच राहिली नाही ! पण आपल्या हिमालयापुढं या पाषाण-छाव्यांची काय कथा ! हिमालय म्हणजे खरोखर भूभागाचं महाभारत आहे. त्यात सर्व रस आहेत. सत्त्व, रज, तमाचे सारे आविष्कार आहेत. पृथ्वीच्या स्वभावाचे सारे साक्षात्कार आहेत. उन्नताचे आणि अवनताचे सारे अवतार आहेत. एक विश्वरूपदर्शनच आहे. आणि साऱ्याचा परिपाक म्हणून शांतीचा संदेश आहे. संस्कृतीचा समारोहच तिथं होतो असं वाटतं. आणि म्हणून भारतानं आपल्या सत्त्वाचं निधान हिमालयात शोधलं. मानवी जीवनाच्या अंतिम ध्येयाचं निधानही तिथंच शोधलं. सर्व आकाशरेषांचं सारच हिमालयात शोधायला हवं. कारण हिमालयाची आकाशरेषा हा एक नवनवोन्मेष आहे. एका आकाशरेषेमागं दुसरी उमलते, दुसरीमागे तिसरी, अशा अनेक आणि प्रत्येक नवी नवनिधानाची नवसाक्षी !

वृक्षवल्लरींची आकाशरेषा म्हणजे वक्रतेचे विभ्रम. विभ्रम म्हणण्यापेक्षा

विक्रम. मगरीचे दात, ड्रॅगनच्या अंगावरचे खवले, ऑथेल्लोमधील आयागोचं अंत:करण, स्टालीनची सुडबुद्धी, हिटलरची अघोरी अस्वस्थता, निक्सनला पडणारी स्वप्नं, इंदिरा गांधींच्या राजकारणाची प्रकृती, थिजणाऱ्या लाव्हाच्या बुडबुड्यांची उघडमीट, क्लिओपात्राच्या नेत्रकटाक्षांची फडफड, सहस्रार्जुनाच्या सहस्रबाहूंचे परस्परकोन, या साऱ्यांच्या वक्रतेची बेरीज करून तिला गणितातील पायनं गुणलं आणि दोन या आकड्याच्या वर्गमुळानं भागलं तर जे हाती लागेल त्याच्या थरथरीचा खेळकर प्रत्यय वृक्षवल्लरींच्या आकाशरेषांत येईल. ही वक्रता म्हणजे एक मायाविनी असते. तिचं रूप किती राजस दिसतं ! दर्शन किती दिलदार असतं ! पण सत्त्व ?

मात्र एका झाडाच्या आकाशरेषेत जो दिमाख असतो तो झाडीच्या आकाशरेषेला नसतो. झाडी अनामिक असते तशीच तिची आकाशरेषा अनामिक. पण एकेका झाडाच्या आकाशरेषेला व्यक्तित्व असते. वटवृक्षाची आकाशरेषा तपश्चर्येला उभ्या असलेल्या ऋषीसारखी गभीरगंभीर असते. पिंपळाच्या आकाशरेषेत या तपश्चर्येला कोणी मोहात पाडलं आहे की काय असं वाटतं. सात्त्विनाच्या आकाशरेषेला सुन्न एकाकीपणा बाधलेला असतो. नारळीची आकाशरेषा अधिक माणसात आलेली आहे. बाभळीच्या आकाशरेषेत आगाऊपणा दिसतो — म्हणजे मला दिसतो. एखाद्याला प्रेमळ-पणा दिसेल ! प्रत्येक झाडाबद्दल आपली काही वृत्ती असते, ती आपल्या दृष्टीत ओतलेली असते आणि ती त्याची आकाशरेषा कोरते. पण हे झाड जेव्हा एकटं असतं, एकाकी असतं, तेव्हा त्याची अपूर्वाई काही वेगळीच. वाईहून दिसणाऱ्या पाचगणीच्या डोंगरावर ते एकाकी झाड आकाशावर आपलं अस्तित्व कोरून उभं नसतं तर त्या डोंगराची अर्धी मिजास कृष्णेत कोसळली असती.

आकाशातून वाहणाऱ्या वाऱ्याला काही ध्येय, धोरण, साध्य, तृप्ती, हेतू वगैरे भानगडी असतात का मला माहीत नाही.पण तसलं काही असलंच तर त्यांचं लक्ष्य झाड असेल. यात मला शंका नाही. वारा आपली ताकद झाडावर अजमावू पहात असेल, वाऱ्यात नारळाचं अगर पोफळीचं झाड घुसळलं म्हणजे त्याला अंतरंगात सुखावल्यासारखं वाटत असेल, पण या

तांडवनृत्यापेक्षा इतर झाडांचं वाऱ्यातलं भरतनाट्यम् त्याला अधिक समाधान देत असावं. निसर्गाची 'डान्स अॅकॅडमी' आपण चालवतो हे समाधान काय सामान्य म्हणायचं ! पण जुने पुराणे, कालाच्या प्रतिनिधी-प्रमाणं उभे असणारे वृक्ष कडाड जमीनदोस्त करण्यात त्याचं काय साधतं हे मात्र समजत नाही. माणसाप्रमाणं वाऱ्याला सुद्धा वेडाचे झटके येतात का ?

निसर्गाच्या आकाशरेषा कमी पडतात म्हणून की काय मानवानं त्या निर्माण करण्याचा सपाटा लावला आहे. शहरं बांधून आणि शहरांची पुनर्रचना करून. शहराची बदलती काया त्याच्या आकाशरेषेत व्यक्त होते. शहराची आकाशरेषा त्याच्या संस्कृतीची साक्षीदार असते. केव्हा त्याच्या असंस्कृत-पणाची ! गेल्या दहा-वीस वर्षांत मुंबईची बदललेली आकाशरेषा तिच्या संस्कृतीची ग्वाही देते असं म्हणणं कठीण आहे. पुष्कळदा ही आकाशरेषा तिच्या खालचा असंस्कृत अमानुषपणा लपविते. न्यूयॉर्कची आकाशरेषा अमेरिकेच्या वास्तुशास्त्राची हिंमत जेवढी दाखविते त्याहून अधिक तिची गुन्हेगारी आणि ऐषआरामी लपविते. हाँगकाँगची आकाशरेषा तशीच. बँकॉकची आकाशरेषा तिच्या धार्मिक सरंजामी प्रकृतीचं रंगदार दर्शन घडविते. एकेका शहराची आकाशरेषा एकेका खास ठिकाणाहून पहावी लागते. न्यूयॉर्कची समुद्रातून, टोकिओची राजवाड्यासमोरील मैदानातून, दिल्लीची इंडिया गेटकडून, पॅरिसची आर्क ऑव्ह ट्रायम्फकडून किंवा सेन नदीवरील एखाद्या पुलावरून. एखाद्या शहराची आकाशरेषा एखाद्या गोष्टीनंच संस्कारलेली असते. दिल्लीची कुतुबमिनारनं, पॅरिसची एफेल टॉवरनं, न्यूयॉर्कची लिबर्टीच्या पुतळ्यानं, वॉशिंग्टनची लिंकन मेमोरिअलनं, सान फ्रान्सिस्कोची समुद्रावरील पुलानं, लंडनची सेंट पॉलनं, आणि आग्र्याची ताजनं ! पण एखाद्या शहराचं भाग्य असं असतं की निसर्गच तिचं दर्शन रेखतो. नैनितालला त्याचं रूप तळ्यानं दिलं आहे, जिनेवाला तळ्याचे स्वरूप धारण केलेल्या नदीनं, बनारसला गंगेनं, मद्रासला मरिनानं ! या शहरांची आकाशरेषा येथूनच निरखायची असते.

आग्र्याला ताज नसता तर आपण तिथं गेलोच नसतो. ताजची

आकाशरेषा हीच आग्र्याची आकाशरेषा. अर्थात आग्र्याच्या किल्ल्यानं या आकाशरेषेला करुणेची झाक दिली आहे. ताज म्हणजे एक संगमरवरी स्वप्न असं म्हणतात. पण या स्वप्नाच्या आकाशावर रेखलेल्या कडा किती तरी अधिक तरलमनोज्ञ आहेत. ताजच्या समोरचं, पाणी खेळवलेलं आकारशील उद्यान, ताजची स्वप्नील वास्तु, वरचा घाटदार घुमट, चार कोपऱ्यांतले चार मनोज्ञ मनोरे, दोनही बाजूस लाल पडदे धरून उभ्या असलेल्या दोन जुळ्या इमारती — यांचं प्रारंभीच प्रवेशद्वारातून दिसणारं एकसंध चित्र मन मुग्ध करतं. पण ताजच्या वास्तुत, त्याला चबुतऱ्यावर अलगद उचलणारी जी तरंगती तरलता आहे तिचं आकाशाच्या पार्श्वभूमी-वरचं मुलखावेगळं दर्शनच अंतःकरण उचलतं.

•

जेव्हा जेव्हा मी ताजच्या दर्शनाला गेलो तेव्हा तेव्हा हे दर्शन पार करून मी मागं गेलो, माझी दृष्टी यमुनेच्या पाण्यात पावन केली आणि पली-कडच्या, पार पलीकडच्या, विस्तारात विसावून दिली. तेथं निळट धूसर क्षितिजात ती चूर झाली. तेथल्या विश्रब्ध विश्वात विलीन झाली. क्वचित डावीकडच्या किल्ल्यात घिरट्या घालणाऱ्या शहाजहानच्या नजरेतील व्यथेनं विद्ध झाली. क्वचित समोरच्या आकाशातील रंगांच्या विभ्रमांशी खेळली, क्वचित यमुनेच्या पाण्यातील त्या विभ्रमांच्या प्रतिबिंबात वितळली, पण बहुतेक वेळा ती पार हरवली. ताजचं ते अबोल, अमोघ, मुग्ध सौंदर्य, त्याची नाजूक. नज़ाकत, त्याच्या शिल्पाची कोमल कळा – आकाशाची पार्श्वभूमी नसती तर हे सारं कोमेजलं असतं, कोमटलं असतं. या प्रीतीच्या अश्रूत या आकाशातून उतरलेला एक दवबिंदूही मिसळलेला आहे.

आकाशाची आकाशरेषा तुम्ही–आम्ही तर रेखतोच, पण पक्षीही रेखतात. आकाशातल्या तळपत्या घारीची तिरकस रेषा तिच्या तिरकस नजरेइतकीच धारदार असते. इंग्रजीत घार आणि पतंग यांना एकच शब्द आहे. दोनही गोष्टी आकाशात सारख्याच तळपतात. आपल्या घरट्यावर वा भक्ष्यावर अचूक नजर ठेवून आकाशात असं तळपताना घार अभिमानाचा क्षण किती भरल्या उरानं अनुभवीत असेल ! खरं तर घार आणि तिची ही अंतराळ-

यात्रा यात किती फरक ! घार एक क्षुद्र पक्षी, पण तिची ही यात्रा किती वैभवशाली ! क्षुद्र गोष्टींनाही अभिमानाची ठिकाणं असतातच ! गावचं गटार आरोग्याचा रखवालदार म्हणून फुरफुरत नसेल काय ? एखादा क्षुद्र किडा प्रयोगशाळेतील टेबलावरील सूक्ष्मदर्शक काचेतून शास्त्रज्ञाच्या चौकस नजरेचं दर्शन घेतो तेव्हा त्याला धन्य वाटत नसेल काय ? दुपारच्या वेळी कावळा झाडावर बसून ओरडतो आणि शेजारच्या खेडवळ घरातील गृहिणीला पाहुण्याच्या आगमनाची ओढ लावतो तेव्हा त्याचा तो एक डोळा पाणीदारपणं चमकत नसेल का ? एखादा भिकारी अपेक्षित पावलीऐवजी मिळालेलं दहा पैशांचं नाणं तुच्छतेनं फेकून देतो तेव्हा त्याचा दिमाख त्याच्या डोळ्यांत नाचत नसेल काय ? पण याहीपेक्षा धन्यतेचा आनंद एखाद्या घोटीव राजकारण्याला एका काळच्या उपकारकर्त्यांला त्याचा उपयोग संपल्याबरोबर कचऱ्यावर फेकून देताना होत असेल !

पण एकट्या घारीपेक्षा काही पक्षी समूहरचना करून सायंकाळी आकाशातून घरट्याकडे परततात तेव्हा जी अलंकृत आकाशरेषा निर्माण होते ती त्यांना, विमानांची समूहरचना आकाशात फिरविणाऱ्या वैमानिकां-पेक्षाही अधिक तृप्ती देत असेल. अर्थात गरुडाच्या यात्रेपुढं या सर्व रचना-बिचना म्हणजे मानवंदना घेणाऱ्या सेनापतीपुढील सैनिकांचं संचलनच होय. उगीच नाही विष्णूनं आपल्या विमानाला गरुडाची इंजिनं जोडली !

आकाशदर्शन हे पुष्कळदा मेघदर्शन असतं. आकाश आणि मेघ यांचं नक्की नातं काय आहे ? मला वाटतं हे थोडंसं प्रेमिकांचं नातं आहे. या नात्यात प्रेमाबरोबर भांडण, तंटे, बखेडे, गैरसमज, थोडीशी जबरदस्ती यांना भरपूर स्थान असतं. किंबहुना यामुळंच प्रेमाला मज्जा येते. ' पावसानं झोडलं नि नवऱ्यानं मारलं ' असं जे नातं एका मराठी म्हणीत पक्कं जाऊन बसलं आहे ते उगीच नाही. ते काही असो, आकाशाला जे अनेक मूडस् प्राप्त होतात ते मुख्यत: मेघांमुळं. सारं आकाश मेघांनी भरून जातं तेव्हा आकाशाचा जीव गुदमरतो, करवादतो. आकाशात वादळ होऊन मेघांचं तांडव सुरू झालं, आणि कडकलक्ष्मी चाबकाचे फटके मारून घेते तसं आकाश स्वत:ला तडितेचं फटके मारून घ्यायला लागलं म्हणजे आकाशाचा अवतार पहावा. हा साक्षात् रौद्र रसच. खरोखर वाङ्मयात नसतील

इतके रस आकाशाच्या ग्रंथात आढळतील. कावळा एखादी निष्पाप चिमणी पकडतो आणि त्याच्या चोचीत ती केविलवाणी फडफडते, किंवा साप झाडावर चढतो आणि पक्षी, आपली पिलं त्याच्या स्वाधीन करून चोहोकडे चिवचिवत उडतात तेव्हा भय आणि क्रौर्य यांचा संयुक्त अनुभव आकाशाच्या पडद्यावर येतो. सूर्याला खग्रास ग्रहण लागतं आणि पक्षी उडूआक्रंदू लागतात तेव्हा भयात करुण मिसळतो. मनोऱ्यावरील कबुतरांचे चोचीत चोच घालून चाललेले विश्रब्ध उद्योग तो प्रसिद्ध रस व्यक्त करतात. पारशांच्या स्मशानवापीवर गिधाडांचा थवा जमतो आणि त्यात जागा मिळण्यासाठी एखादं गिधाड वर घिरट्या घालू लागतं तेव्हा बीभत्साचा प्रत्यय येतो. बीजेची चंद्रकोर मुळी वत्सल रस धारण करूनच उगवते. पण अद्‌भुत रसालाही आकाशात उणीव नाही. दिल्लीला एकदा मी पूर्ण नीलचंद्र पाहिला आणि once in a blue moon या वाक्प्रयोगाची प्रतीती झाली. एकदा कौलालंपूरला जाताना आमचं विमान मेघांच्या गालिच्यावर गेलं तेव्हा त्या गलिच्यावर सूर्याच्या किरणांनी एक वर्तुळाकार इंद्रधनुष्य किंवा इंद्रवर्तुळ रेखलेलं मी पाहिलं ! आणि अलिकडे, ता. १२ जून १९७७ रोजी दुपारी १॥ वाजता नागपूरपासुन ७० किलोमीटर्सवर कामठीखेरी इथं, तिथल्या ' प्रणालिकासिंचना'वर ( म्हणजे आपल्या पाटबंधाऱ्यावर ) काम करणाऱ्या इंजिनिअर्सनी असाच एक चमत्कार पाहिला. सूर्याभोवती काही अंतरावरचं आकाश व्यापून राहिलेल्या ढगांवर त्यांनी चक्क एक इंद्रवर्तुळ पाहिलं.

हा चमत्काररस ! असे अनेक चमत्कार आकाशात मेघ निर्माण करतात. एकदा एका ढगाआडच्या सूर्यानं पलिकडच्या ढगांवर असा काही प्रकाश टाकला की सेनापती बापट मार्गावरून चक्क दोन सूर्य दिसायला लागले आणि ' हा सूर्य आणि हा जयद्रथ ' याची एक आधुनिक ( प्रश्नार्थक ) आवृत्ती निघाली ! एकदा संगमावर बोटिंग करताना मेघांनी चंद्रधूसर आकाश असं काही निर्माण केलं की, वरचं आकाश आणि खालचं गढूळ पाणी यांच्या दरम्यान नितळपणावर हक्क माझ्या बरोबरच्या काही विद्यार्थिनींना तेवढाच उरला ! एकदा ढगांनी वेढलेल्या आकाशाच्या निळ्या तुकड्यात ढग असे काही विखुरलेले दिसले की, मला छोट्यामोठ्या

खडकाळ बेटांच्या खुणा दाखविणाऱ्या ग्रीक समुद्राच्या सृष्टिदर्शक नकाशाची आठवण झाली. ढगांमुळंच आकाशात रंगसिंचनाचे आणि रंगपरिवर्तनाचे चमत्कार घडून आकाशाच्या पडद्याला चित्रकाराच्या कॅनव्हासचं रूप येताना तर आपण नेहमीच पहातो. खरं म्हणजे मेघ हे आकाशाचं एक अप्रूप आहे. मेघानं कालिदासाच्या यक्षाला सुद्धा भुरळ घातली ती उगीच नाही. पण मेघाकडे फक्त काव्यदृष्टीनंच पहाता येते असं नाही. मनोवैज्ञानिकांना, मेघांच्या आकारांत चित्रविचित्र प्राण्यांचा आढळ होणाऱ्या मनोरुग्णांच्या मानसिक विकृतीचं निदान करण्याची युक्ती सापडली आहे! अर्थात 'अतिपरिचयादवज्ञा'चा प्रत्यय येथंही येतो. नाही तर 'नेमेचि येतो मग पावसाळा' हा एक चमत्कारच नाही का? समुद्रातलं पाणी आकाशात नेऊन पृथ्वीवर ओतणाऱ्या या चमत्काराला तुलना सापडेल काय?

हे चमत्कार निर्माण करणारा निसर्ग कलावंत म्हणायचा की जादूगार म्हणायचा? याचं उत्तर एवढंच की निसर्ग हा निसर्ग आहे. त्याची जी रूपं पहाल ती तुम्हाला दिसतील. कधी कलावंताची तर कधी तत्त्वज्ञाची. कधी राजकारण्याची तर कधी तपस्व्याची! सह्याद्रीची अगर दंडकारण्याची आकाशरेषा निर्माण करणारा निसर्ग कलावंत असेल तर वाळवंटात वाळूच्या ढुंग्यांची आकाशरेषा निर्माण करणारा निसर्ग तापसीच म्हटला पाहिजे. तो घोर तपस्वी असला पाहिजे, नाही तर सहारासारखं विराट वाळवंट त्याला निर्माण करता आलं नसतं. पण निसर्ग अनेकदा तपस्व्यापेक्षा राजकारणी वाटतो. आपला तो डोळे मिटून तप करणारा बगळा कोणत्याही मख्ख मंत्रिमंडळात छान शोभेल. काही माशांच्या 'राण्या' नेमक्या अशा वागतात. त्या प्रियकराला भुलवतात आणि आपलं काम झालं की त्याला चक्क खाऊन टाकतात. समुद्राच्या तळाशी असे काही प्राणी आहेत की ते सुंदर निरागस फुलाचं रूप धारण करतात आणि त्याचं केसर खाण्यास आलेल्या माशास गट्ट करतात. दक्षिण अमेरिकेत अशी काही झाडं आहेत की जी आपल्या फांद्यांना आशीर्वाद देणाऱ्या हातांची 'पोज' देतात, आणि त्या आशीर्वादानं पुनीत होण्यासाठी आलेल्या प्राण्याला त्याच हातांनी आवळून 'स्वाहा' करतात.

निसर्ग हा निसर्ग असतो, त्याला रूप आपण देत असतो हे जर खरं तर आकाश आणि मानव यांचं खरोखर नातं काय ? कोणी आकाशात परमात्मा पाहतात, कोणी त्याचं रंगरंगीन सौंदर्य निरखतात, याचा अर्थ काय ? हा अर्थ शोधणं आपणा भारतीयांना खरोखर मुळीच कठीण नाही. आपण उभ्या विश्वाचा अर्थ शोधून बसलो आहोत. एवढंच नव्हे तर त्याच्याशी एकरूपता पावण्याची युक्ती शोधून काढली आहे. कोणाही जातिवंत भारतीयाला या अर्थाचा भेद विचारा. तो ताबडतोब तुम्हांला तीन मार्ग सांगेल — कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, आणि वर या योगांवर भरघोस व्याख्यानं देईल.

पण या योगांचा आकाशाशी संबंध काय ? उत्तर अगदी सोपं आहे. गीतारहस्याला एक छोटीशी तळटीप जोडा : कर्मयोगाचा अर्थ व्यवहारयोग असा करा. व्यवहारवादी माणसाचं आकाशाशी नातं अगदी निकटचं. एक वर्ष पाऊस न पडला तर काय होईल याचा विचार करा. कुणी तरी हिशेब केला आहे : पृथ्वीवरील नद्या, तळी, सरोवरे, विहिरी यांचं पाणी किती दिवस पुरेल ? जेमतेम सहा–सात महिने. समुद्रात ढीग पाणी आहे ! पण ते वाफेच्या रूपानं आकाशात गेलं तर उपयोग ! पण मानवाचे लोकसांख्यिक ' कुटिरोद्योग ' इतक्या जोमानं सुरू आहेत की, वार्षिक पर्जन्ययोगही अपुरा पडणार ! तेव्हा आपण प्रार्थनेखेरीज दुसरं काय करणार ? प्रार्थना अखेरीस उपरवाल्याची किंवा ऊर्ध्व लोकातील शक्तीची. म्हणजे कर्मयोगाचं रूपांतर भक्तियोगात करून भक्तिभरले डोळे आकाशाकडे लावायचे ! आणि मग सप्ततार्‍यांत सप्तर्षींचा पुण्यवास ! तार्‍यांत पुण्यात्मे ! नक्षत्रात सतीत्व !

म्हणजे भक्तीचं काव्य झालं ! भक्तीत सौंदर्याची प्रतीती होतेच. ज्ञानेश्वर–तुकारामांचीच तशी साक्ष आहे. सौंदर्ययोगाचा साक्षात्कार झाला की आकाशात भव्यतेची प्रतीती येते, व्याधात रंगीन तेजाची बदलती रूपं दिसतात, आकाशगंगेत रत्नजडित गालिचाचं दर्शन दिसतं, व ध्रुवतार्‍यात स्थिर शाश्वताचा साक्षात्कार होतो. मग चंद्राचे मुर्दाड खडक आठवत नाहीत,त्याच्या चांदण्यात काव्याचा मोहर उमलतो, प्रीतीची लहर विलसते, स्वर्गीय स्वप्नांचा पुष्पवर्षाव होतो. एकदा सौंदर्ययोगाची सिद्धी प्राप्त झाली

की, विश्वचैतन्यानं अवकाशात निर्बोधपणं भिरकावलेल्या ग्रहताऱ्यांची शास्त्रीय सत्यं क्षणार्धात गुल होतात, किंवा त्यांच्यावर रसाचे रांजण फुटतात.

पण नुसत्या भक्तियोगानं किंवा सौंदर्ययोगानं भागणार नाही. ज्ञानयोगाचीही गरज आहे. ज्ञानानं आत्म्याचं विकसन होतं आणि त्याला पूर्णत्वाची आस लागते. ग्रीक शास्त्रज्ञांनी ग्रहांच्या फेऱ्यांत पूर्णत्व पाहिलं. प्लेटोनं सूर्यतत्त्वात शिवत्वाचा शोध घेतला आणि मानवी कल्याणाचं एक शाश्वत तत्त्वज्ञान मांडलं. आइन्स्टाईननं सूर्यकिरणावर स्वार झाल्याची कल्पना करून मानवाला अणुरहस्यावर स्वार केलं. मानवाची पूर्णत्वाची आस त्याला स्वस्थ बसू देत नाही. तो आकाशाच्या विस्तारात पूर्णत्वाचा शोध घेतो आणि आशा बाळगतो की एक दिवस मानवाला पूर्ण ज्ञान होईल. पण त्याला काय माहीत की ज्या दिवशी मानवाला पूर्ण ज्ञान होईल, त्या दिवशी तो खलास होईल. त्या दिवशी त्याचं रूपांतर ईश्वरात तरी होईल किंवा शून्यात तरी. दोनही एकच — मानवाचा शेवट. मग ज्ञानयोग मागं पडतो आणि आकाशाचा, अंतःकरणावर समाधानाची फुंकर घालणारा, साक्षात्कार होतो तो सौंदर्याचा. मग सह्याद्रीच्या आकाशरेषेत एखाद्या देवळाचं आकारसुंदर दर्शन घडतं. हिमालयाच्या आकाशरेषेत स्वर्गसोपानाची आकृती दिसते. ताजच्या आकाशरेषेवर शुक्रताऱ्याच्या अश्रूंची मालिका आढळते. आकाशातल्या एकेक ताऱ्याभोवती एकेक प्राक्कथा ( मिथ् ) तयार होते. आकाशगंगेत अप्सरांचं दीपदान दिसून येतं. ताऱ्यात आत्म्याची शाश्वत प्रतीती येते. आणि आकाशाच्या रंगतरंगात भाव-विभ्रमांचा प्रत्यय येतो.

एवढं झाल्यावर एखाद्या शुष्क फांदीवरचं भरड घरटं भावगर्भ आणि आकारसुंदर वाटायला काय हरकत आहे ?

# वाढदिवस

खरं म्हणजे आमच्या लहानपणी वाढदिवसाचं आजचं बंड नव्हतंच. बाळंतिणीच्या खोलीबाहेरच्या प्रकाशाचा डोळ्यांना स्पर्श होण्यापूर्वीच पाचवी-सहावीच्या देवी-पूजनानं आणि घुगऱ्यांनी पुढचे सारे संभाव्य वाढदिवस आगाऊच साजरे होत. आता बहुधा म्हणीतच उरलेल्या या घुगऱ्या म्हणजे विकसित हिंदू धर्मानं या भूमीच्या आदि-संस्कृतीला केलेले मानाचे मुजरे असत. रामकृष्णांच्या भक्तांनी मटकावलेल्या या घुगऱ्या म्हणजे जिवती-जाखाईंना अर्पण केलेला प्रसाद !

तत्त्वज्ञ हिंदू धर्माला वाढदिवसाबद्दल आपुलकी वाटण्याचं कारणच काय ? हिंदू तत्त्वज्ञान इहजन्माला मानीत नाही. देहोत्सवाबद्दल त्याला आस्था नाही.

मात्र हिंदू सांस्कृतिकांनी वाढदिवसासारख्या ऐहिक गोष्टीची सर्व-स्थळी सर्व काळी उपेक्षा केली होती असं मात्र नाही. काही ठिकाणी पूर्वी लहान मुलांचा वाढदिवस करीत. मोठ्या काव्यमय पद्धतीनं. प्रतीकात्मक आशयाचा. आईनं बाळाला न्हाऊमाखू घालायचं, पाटावर बसवायचं, कपाळाला कुंकुमतिलक लावायचा, आणि त्याचं औक्षण करायचं. या अगोदर त्यानं आईला फक्त देवाला अगर तुळशीला ओवाळतानाच पाहिलेलं असायचं. पण आता ही गंमत त्याची. त्याच्या डोळ्यांत कुतूहल आणि आनंद एकदम नाचू लागे. तोच आई त्याच्या डोक्यावर हरळी, कापूस आणि तोंडल्याचं फूल वाही. हरळी ( दुरव ) कोठंही टाकली तरी मूळ

धरते. चोहीकडे पसरते. मोठी चिवट जिवट वनस्पती. असा आपला बाळ मूळ धरो. असा आपला वंश वाढो. तोंडल्याचा वेल कधी मरत नाही. त्या अमर वेलीचं ते मूल तसं हे आपलं मूल. वटसावित्रीला वडाच्या झाडाची पूजा करताना तोंडल्याच्या वेलीची आठवण तिला कधी होत असेल का ? पण आपला नवरा त्या वेलासारखा किरकोळ असावा असं कोणत्या स्त्रीला वाटेल ? अन् तो कापूस ? कापूस हे वृद्धत्वाचं प्रतीक. हा सारा विधी झाल्यावर मुलाला खांबावर चढवायचं. तो खांबासारखा बलदंड व्हावा म्हणून ! ( मलखांबाचा उगम यात असेल ? ) पण वाढदिवसाचा हा विधी, बालपण संपलं की त्याच्या बरोबरच संपतो. मग वाढदिवसाची आठवण होते साठी उलटल्यावर. बुद्धी नाठी होऊ नये म्हणून. त्या दिवशी शांती करतात. एकसष्टीची शांती. कामक्रोधादी विकार आता शांत व्हावेत आणि वानप्रस्थाश्रमाच्या मार्गावर निश्चित व धिमं पाऊल पडावं म्हणून. बरोबरच आहे.

पण आता अमृतमहोत्सव सुद्धा आपण मनोभावं आणि प्रेमभावं साजरा करतो. भारतात आधुनिक संस्कृतीचं आगमन झाल्यानंतर आपली वाढदिवसाकडे पहाण्याची दृष्टीच बदलली. ही दृष्टी निसर्गासारख्या गोष्टीतही ऐहिक रस घेऊ लागली. पूर्वी निसर्ग म्हणजे अरण्य. मोक्ष-प्राप्तीसाठी तप करण्याची जागा. संन्याशाच्या निवृत्तीचं ठिकाण. एरव्ही ती मायाच. झाड म्हणजे लाकूड. फार तर देवदेवतांच्या वस्तीचं ठिकाण. देवदेवतांच्या नाही तर भुताखेतांच्या. दोन नद्यांचा संगम, कड्या-वरून उडी घेणारा धबधबा, भूमीतून उगवलेली ज्वाला म्हणूनच पवित्र ठिकाणं ठरली. एखादी मैना, साळुंकी अगर चिमणी ही देवता नसेल, पण तिच्या रूपानं प्रेमळ सासू किंवा मायाळू आजी, आपल्या मायेची पाखर धरण्यासाठी नवा जन्म घेई. असा आपला निसर्ग. तो मुक्त होता. समृद्ध होता. कितीही तोडला तरी नष्ट होत नसे. अवर्षणाला दाद देत नसे. म्हणून अखेरीस आपला सखा बनला, मित्र बनला. नव्हे, ईश्वर बनला. त्याला जिंकण्याची भाषा पाश्चात्यांप्रमाणं आपण कधी केली नाही. निसर्गाची पूजाच केली. पण आता आपल्या दृष्टीला एक नवीनच मोहर आला. ती एखाद्या वृक्षात अगर मैनेत ती लावण्याची लेणी शोधू लागली. कोकिळेच्या ओरड-

ण्यात संगीताचे आलाप ऐकू लागली. निर्झराच्या वाहण्यात मंत्रजागर आळवू लागली. वाङ्मयात कल्पनारम्यतेचा विहार सुरू झाला. जी दृष्टी निसर्गात असे संदर्भ शोधते ती वाढदिवसाच्या उत्सवाची संधी थोडीच सोडणार ?

वाढदिवस हा एक देहोत्सवच. हा आपला देह म्हणजे जीवनतृष्णेचा सळसळता साक्षी. वाढदिवस हे जीवनतृष्णेला केलेलं नतमस्तक अभिवादन. जगण्याच्या इच्छेची शहाजोग पताका. समारंभपूर्वक फडकवलेली. माणसाला जगावंसं का वाटतं ? प्रश्न फजूल आहे. कोंबडं अंडं का घालतं ? कुत्रा का भुंकतो ? सर्प फणा का उभारतो ? पाण्यात भोवरे का निर्माण होतात ? लाव्हा रसाला बुडबुडे का येतात ? भूकंपानं धरणी का भंगते ? या प्रश्नांसारखाच. त्यानं कदाचित वैज्ञानिकांचं कुतूहल जागृत होईल. कदाचित शमेलही. पण जीवनाचा शोध घेणाराचं समाधान होणार नाही.

जीवनाचा शोध ही एक सांस्कृतिक ईर्ष्या असते. वाढदिवसाभोवती सांस्कृतिक वलय निर्माण होणं ही याच ईर्ष्येची एक झलक. ही ईर्ष्या हेच आपणा मानवाचं वैभव. इतर प्राण्यांपाशी नसलेलं. ही ईर्ष्या देहाच्या जड कारभारात काय काय अर्थ शोधते ! महात्मा गांधींना १२५ वर्षे जगण्याची इच्छा होती, त्या धर्तीवर आपणही १०० वर्षे जगण्याची कांक्षा बाळगतो. महात्माजींना ' विश्वचि माझं घर ' वाटे. आपल्याला आपलं घरच विश्व वाटतं एवढाच फरक ! " काय करता हो, जगलं पाहिजे. मुलाबाळांकडे पाहिलं पाहिजे. " प्रत्येक जण कोणत्या तरी उदात्त कारणासाठी जगत असतो !

त्यातलं सत्य असं की हे सारे संज्ञेचे विभ्रम. कशावरही शहाजोग आवरण घालण्यास सिद्ध असलेले, ते आपल्या ठिकाणी सांस्कृतिक साफल्याचा भाव निर्माण करतात. आत्मविकसनाचा भाव निर्माण करतात. जीवनतृष्णेला सुंदर, सुरेख सांस्कृतिक स्वरूप देतात. सत्तेच्या सोसात सामाजिक कल्याणाचा उद्घोष ऐकवतात. देहाच्या परिपोषात आत्म्याच्या शोधाची साक्ष शोधतात. यालाच आपण सांस्कृतिक विकसन म्हणतो. आणि म्हणूनच संस्कृती ही मानवाची मोठी अंतःस्फूर्ती ठरते. अंतःप्रेरणा.

हिनं मानवाच्या अनेक अवजड गोष्टी सुंदर विलोभनीय आवरणात गुंडाळून त्याचं प्रदर्शन मांडलं आहे. दोन तरुण जीवांना संभोगासाठी एकत्र यायचं असतं, त्यासाठी प्रेमाची विलोल भावना निर्माण होते. माणसाला भूक लागते. कच्चं अन्न पचविण्याची मानवाची मूळ ताकद, पण मानवानं पाकशास्त्र निर्माण केलं आणि पुढं पाकक्रियेचं पाककलेत रूपांतर केलं. एके काळी मानव गुहेत किंवा ढोलीत मोठ्या मजेनं रहात होता. पण पुढं त्याला निवासस्थानाचा डौल हवासा झाला, आणि वास्तुशास्त्र व वास्तुकला त्याच्या सेवेस हजर झाल्या. मुक्त कंठानं ओरडणं, कोकलणं ही माणसाची मूलभूत गरज. बायकोवर त्याचा प्रयोग करून आपण ती कधी कधी भागवतो. (आणि बायको त्याची दामदुपटीनं परतफेड करते.) पण मानवच या कोकलण्याची संगीत आवृत्ती काढून स्वतःच्या कंठाचं समाधान करतो. मानवाला अनुभवांची देवघेव करायची असते. हावभावांची विद्या निसर्गानं आपल्याला शिकवलेली आहे. पण संज्ञेचं तेवढ्यानं भागत नाही. भाषा निर्माण व्हायला हवी, व्याकरण निर्माण व्हायला हवं, फार काय साहित्यही निर्माण व्हायला हवं ! मानवाच्या अंगात ऊर्जा असते. म्हणजे रग असते. मारामारी करून ती जिरवता आली असती. पण संस्कृतीला ते मान्य नाही. व्यायाम पुरेसा नाही. शिवाय तो थोडा भरडच. म्हणून क्रीडा निर्माण झाली. त्यात पुरेसा सांस्कृतिक विभ्रम नाही, म्हणून की काय नृत्यही निर्माण झालं ! अशी देहातून संज्ञा, संज्ञेतून आस्था आणि आस्थेतून भावणं निर्माण झालं. आणि भावण्यातून कला आली. भावण्यामुळं जीवनाला खरोखर सजीवता प्राप्त झाली. सुख भावतं व समाधान वाटतं, दुःख भावतं व मनाला वेदना होतात. पण भावणंच नसतं तर ? कल्पना करवत नाही. पण हेही एक भावणंच ! अ पॅरॅडॉक्स ऑव्ह लाईफ.

हे भावणं आहे म्हणून वाढदिवसाला सुंदर विलोभनीय स्वरूप प्राप्त झालं आहे. ती केक – तिला कसा शानदार आकार ! पण त्या आकाराच्या आत जीवनाच्या मूळ गरजेची तरतूद ! केकवरच्या त्या तेवणाऱ्या मेणबत्त्या – त्यांच्या त्या उजळत्या ज्योती ! केकवर कोमल प्रकाश टाकणाऱ्या ! जड जीवनावरची सांस्कृतिक शोभा ! पण त्या फुंकर

घालून का मालवतात ? मला माहीत नाही. कोणाच्या तरी मिस्किल बुद्धीचा तो आगाऊपणा असेल का ? पण हे जीवन अखेर संपुष्टात येणार हे असं सौम्य, सुसह्य, संस्कारशील रीतीनं सुचवणाऱ्या बुद्धीला आगाऊ तरी कसं म्हणायचं ?

नव्या युगात आपल्या मनावरची वैराग्याची भगवी वस्त्रं गळून पडली आणि मनाच्या मायेवर इंद्रधनुष्याची सप्तरंगी शोभा पसरली, यामुळंच वाढदिवस हा मोठा मंतरलेला दिवस ठरला. वास्तविक आपला वाढदिवस नेहेमीच्या दिवसासारखाच उगवतो. इतरांना तो नेहेमीसारखाच वाटतो. पण आपण सकाळी उठल्यावर पहिलं पाऊल टाकतो ते पृथ्वीच्या गद्य भूमीवर नाहीच. आपण हवेतच चालतो. अपूर्वतेचं आसव प्यालेल्या हवेत. त्या दिवशी सूर्याचे किरण येतात ते अगदी आइन्स्टाइनच्या प्रतिभेचं तेज घेऊन आले नाहीत तरी आपल्या डोळ्यांत एका निराळाच प्रकाश उजळीत येतात. त्यामुळं सभोवतालचं जग यक्षभूमीची जादू प्राशन करून आल्यासारखं वाटतं. आपली परिचित हाडामांसाची माणसं कसल्या तरी अपार्थिव चैतन्यानं स्फुरण पावत असलेली दिसतात. त्यांच्या डोळ्यांत आनंदाचे डोह दिसतात. त्यांच्या हालचालीत उत्साहाचा लय आढळतो. ही हाडामांसाची माणसंच कशाला, पंचमहाभूतांचं जडतत्त्व साकारून उभ्या असलेल्या निसर्गादी इतर गोष्टीसुद्धा या चैतन्यानं प्रेरित झालेल्या दिसतात. या चैतन्याचा मूलस्रोत आज आपणात उगम पावतो याची निदान आपल्याला शंका नसते. म्हणून आपल्या जगाचे संकेत आज बदललेले असतात. अद्भुताचा साक्षात्कार झाल्याप्रमाणं आज आपण वागत असतो. पण त्या दिवसाला याची काही क्षिती ? २४ तासात एका मिनिटाची भर न घालता तो उलटतो आणि दुसऱ्या दिवसाची सकाळ ओशट करून टाकतो. इतकी ओशट की, ' There is nothing good or bad in the world, but thinking makes it so ' हे शेक्स्पीअरचं परीक्षेसाठी तोंडपाठ केलेलं वचन आपल्या स्मृतीच्या क्षितिजावर डोकावत नाही,

अगदी तरुणपणी, वैचारिक जीवनाच्या जवळजवळ प्रारंभीच, मी आधुनिक संस्कृतीचा स्वीकार केला. म्हणजे डोक्यानं केला. मनातली मुळं झटकन

उपटत नाहीत हे पुढं कळलं. का स्वीकार केला ? सांगता येणार नाही. कदाचित घरच्या प्रतिगामी वातावरणाचा तो प्रतिवाद असेल. मार्क्स-वादाची वारुणी डोक्यात लवकर चढली असेल. कदाचित बाहेरच्या वाता-वरणाचं वारं अंतःकरणाच्या कोपऱ्याकोपऱ्यात घुमलं असेल. कदाचित रक्तातलं यौवन बेभान झालं असेल.

तारुण्याच्या उसळत्या रक्ताला सभोवतालच्या जगातले हिशेब भावतच नाहीत. परंपरागत अक्कल पटतच नाही. संकेतांची चवकट दिसतच नाही. व्यवहाराचे, चालीरीतीचे सारे आराखडे पार करून यौवनाची दृष्टी दूर दूर कुठंतरी पहाते. क्षितिजाचा वेध घेते. अंतराळात भटकते. अज्ञाताचा शोध घेते. उघडया डोळ्यांनी सुवर्णस्वप्नं पाहाते. तिचं अर्थात समाधान होत नाही. कारण तिला काय हवं असतं ते तिचं तिलाच माहीत नसतं, आणि माहीत नसतं हेही माहीत नसतं. मात्र हे अज्ञान दैवी असतं. दैविकतेचं पावित्र्य प्यालेलं असतं. त्यामुळं स्वतःच्या सर्वज्ञतेबद्दल निःशंक असतं आणि स्वतःतच मश्गूल असतं.

अशा तारुण्यानं आधुनिक सुधारणेची तत्त्वं थोडीबहुत ग्रहण केल्यानंतर वाढदिवसाचा मंतरलेला दिवस क्षितिजावर उगवायला हरकत नव्हती. पण जिच्यावर नुसते डोळे फिरवून अंतरात्मा गार करून घ्यावा अशी वाढदिवस ही काही एखादी खाजगी मालमत्ता नसते. होय, वाढदिवस हा स्वतःला एक अद्भूत साक्षात्कार घडवितो. तो आपलं एक वेगळंच जग त्या दिवसापुरतं निर्माण करतो. या दिवसाचे ताणवाणबाण काही वेगळेच असतात. जगावेगळे असतात. मुलखावेगळे असतात. तरी ते एकट्यानं भोगता येत नाहीत. त्याची अनुभूती खाजगी असू शकत नाही. वाढदिवस साजरा करण्यास इतरांचा सहवास लागतो. सहकार लागतो. आणि मी तर एव्हाना घराशी फारकत घेऊन बसलो होतो. या फारकतीची सुद्धा एक मस्ती असते. तिच्या भरात अशा नवमुक्त देहालाही भूक लागते, त्यालाही डोकं टेकायला उशी लागते, त्याला सुद्धा सहवासाची आस लागते, हे मी जवळजवळ विसरलो होतो.

तसा मी भाग्यवान होतो. एका सज्जन स्नेह्यानं मला आसरा दिला होता. त्याच्या व इतर स्नेह्यांच्या मदतीनं मी शब्दांचे खेळ खेळू लागलो

होतो. प्रथम प्रथम ते क्रॉसवर्ड पझलसारखे अर्थाचा अनुनय करणारे पण अर्थहीन असत. तरी त्यांना एका वृत्तपत्रानं उदार आश्रय दिला होता. कोणी नसूनही कोणी तरी आहोत असं वाटायला लावणाऱ्या पत्रकाराच्या जीवनाचा अनुभव येऊ लागला होता. पण आतच काही तरी बिनसलं होतं. आपल्याला काय हवं आहे तेच कळत नव्हतं. आपल्याला काय होतं आहे तेच समजत नव्हतं. आपण कुठं जात आहोत, कुठं जाऊ पाहात आहोत तेच जाणवत नव्हतं. आपली पावलं उलटी पडताहेत की सुलटी हेही उमजत नव्हतं. प्रथम प्रथम या नवजीवनाच्या उत्साही उड्या मी अचूक मारल्या, पण पुढं त्या वाढत्या वेगानं चुकू लागल्या. आणि अंगातलं तरुण रक्त मुरगुसू लागलं. त्यात अनेक भोवरे फिरू लागले. त्या भोवऱ्यांनी त्या रक्ताला भोवळ येऊ लागली. थोडक्यात सौ. लीलाताई पटवर्धन ( सौ. माधव ज्यूलियन ) यांनी ज्याला ' भूत येणं ' असं यथार्थ नाव दिलं आहे त्याची बाधा मला होऊ लागली. हा रोग प्रतिभावंतांना होतो असं तोपर्यंत मला वाटत होतं. पण मलाही त्याची लागण झाली.

ते करणी केलेले दिवस मला आठवतात आणि मी भरकटून जातो. अजूनही मेंदूच्या काही पेशी स्वतःभोवती गर्गर फिरू लागतात. मला काय झालं आहे ते कळत नव्हतं. काय हवं आहे ते कळत नव्हतं. मी दिवस दिवस नुसता बिछान्यावर पडून रहात असे. खात नसे, पीत नसे, कोणाशी बोलत नसे, अक्षर वाचीत नसे. नुसता छताकडे पहात बसे. छताच्या रंगातील अणूंची बेरीज करीत. त्या बेरजेचं उत्तर कधीच मिळत नसे. या निर्बोध दिवसाला रात्री चमत्कारिक जाग येई. झोप जवळपास फिरकत नसे. आणि सारी संज्ञा रात्रीच्या आवाजांनी भरून जाई. या आवाजांना अकल्पित अर्थ प्राप्त होई. पलिकडच्या रस्त्यावरून वाहनं धावत. मोटारीच्या आवाजांना ' जाझ'चा जोश प्राप्त होई. बैलगाडीच्या लोखंडी धावा आणि सिमेंटचा रस्ता यांची भेट धृतराष्ट्राच्या मिठीचा प्रत्यय देई. घोडागाडीच्या टापा ' टॅप-डान्स'च्या उगमाचं ' सिक्रेट ' सांगत. रस्त्यामागच्या रेलमार्गावरून आगगाड्या किंचाळत येत, त्या कान कापलेल्या शूर्पणखेच्या क्रंदनाची कल्पना देत. त्यांच्या खटकेदार चक्राकार कारभारात विद्वानांच्या व्याख्यानांचं प्रात्यक्षिक घडे. पण बहुतेक वेळा तो नादांची ॲब्स्ट्रक्ट आर्ट उभी करी. रात्री

बारानंतर शेवटच्या शोचे प्रेक्षक घोळक्यानं जात, तेव्हा त्यांच्या गप्पा लाह्या फुटाव्या तशा फुटत. एकदम एखाद्याला गाण्याची तान घेण्याची हुक्की येई आणि बाजूच्या खिडक्यांची तावदानं ठेका धरीत. पण खऱ्या लक्षात राहिल्या आहेत त्या रस्त्यानं जाणाऱ्या प्रेतयात्रा. प्रेतं पोचवायला जाणाऱ्या लोकांना दारू का पाजावी लागते याचं मर्म मला तेव्हा कळलं. त्यांच्या 'भाई बोला राम'नं काही प्रेतं नक्की जागी झाली असतील. ती उठून बसली नाहीत ती केवळ ती मेलेली होती म्हणून! इतर काही प्रेतांना स्वर्गातल्या रामाचं साक्षात दर्शन झालं असेल. माझ्या अस्ताव्यस्त मेंदूला येणारं हे फेफरं फक्त ती प्रेतयात्रा गेल्यावर एकत्र होणाऱ्या भयानक शांततेनं शांत होई. त्या शांततेनं जीवनाची पोकळी म्हणजे काय हे मला प्रथम कळलं.

दिवसा कधीकधी निर्बोध पडून रहायचाही कंटाळा येई आणि मी रस्त्यावर येई. फुटपाथवरून चाले. पण शेजारून एखादी मोटार भरधाव गेली की रोमारोमात भीती दाटे. शुद्ध, निर्लेप भीती. कोणतीही तडजोड करण्यास नाखूष असलेली भीती. कधी मी रस्त्याकाठच्या इमारतीकडे पाही आणि मला ते अजस्र सापळे वाटत. कधी मी समोरून येणाऱ्या पादचाऱ्यांच्या चेहऱ्यांत डोकावून पाही आणि मला त्यात चक्क पशूंचे चेहरे दिसत. बैलाचे, डुकराचे, तरसाचे सुद्धा! आणि मग वेड्यासारखं होई आणि मी खोलीत पळ काढी. आणि खोलीत परतलो की ती पोकळी!

केव्हाशी ही अवस्था नाहीशी झाली. खोलीतल्या वस्तूंना आकार येऊ लागला, त्यांना अर्थ प्राप्त होऊ लागला. रात्रीचे आवाज झोपेत निमाले. थोडक्यात, भुतानं पळ काढला, रस्त्यात काही चैतन्य आहे, आनंद आहे, उत्साह आहे – इथं जीवन आहे, ते हलतं, फुलतं, झुलतं आहे – असं वाटू लागलं. एकदा ट्रॅमला वीज पुरविणाऱ्या तारेवर प्रकाशपुष्पं फुलली. एकदा कॅशियाच्या झाडावर सोनं पिकल्याचा भास झाला. एकदा एका झाडावरच्या घरट्यातून पिलांचे कोवळे आवाज आले व अंतःकरणात पिंपळाच्या नव्या पालवीची लालसर लसलस मखमली स्पर्श करून गेली. एकदा एका तरुणीच्या, शेजारच्या तरुणाकडे पहाणाऱ्या नजरेत बिलोरी पाणी लकाकलं. मी माणसात येऊ लागलो, आलो.

का आलो ? माहीत नाही. पण एक प्रसंग आठवतो. एका रविवारी सकाळी शेजारच्या बिऱ्हाडात राहाणारे एक मान्यवर प्राध्यापक आपल्या पत्नीला,माझा त्या रविवारच्या ' चित्रा'त प्रसिद्ध झालेला लेख मोठमोठ्यानं वाचून दाखवीत असलेले ऐकू आले. हा अनुभव काय असतो हे लेखणीचे नवचाळे करणारालाच केवळ कळेल. एकदा एका वाङ्मयीन पत्राच्या संपादकांनी, पाध्यांचं लेखन बंद करा नाहीतर मी लिहिणार नाही अशी धमकी देणाऱ्या विनोदी लेखकाचं सदर मलाच लिहायला सांगितलं. एकदा डॉ. आंबेडकर, त्यांनी दिलेल्या इंग्रजी मुलाखतीचं माझं भाषांतर वाचून विलक्षण खूष झाले. पुढं धनुर्धारीत गेलो. म्हापणकरांच्या भविष्यानं पत्राच्या खपाची निश्चिती दिल्यामुळं, आणि पत्राचा मालक भविष्याच्या कॉलममधील स्वतःच्या राशीपलीकडे कधी काहीच वाचत नसल्यामुळं, मी माझ्या लेखणीची मुक्त उमेदवारी करण्यास मोकळा झालो. रॉय किणीकर, कुसुमाग्रज यांच्यासारखे प्रतिभेनं फुललेले सहकारी काव्यशास्त्रविनोदाचं एक उत्फुल्ल उद्यान आमच्या कचेरीच्या कोंदट जागेतही निर्मून होते. नुकत्याच सुरू केलेल्या कथालेखनामुळं नवनिर्मितीचा उन्मादक अनुभव अंगप्रत्यंगात भावू लागला होता. माझ्या छोट्याशा जीवनाला सर्जनशील आत्मप्रतीतीची ओळख होत होती,

पण खरी प्रतीती होती ती वैचारिक होती. मार्क्सवादी राजकारणाच्या विपरीत अनुभवामुळं विचारांचा पतंग गोते खाऊ लागला होता. क्षणोक्षणी हातातला धागा तुटणारसं वाटत होतं. फक्त एकच आधार होता. मॅक्स ईस्टमनच्या लिखाणाचा. उदारमतवादी विचार कल्पनारम्य लेखणीनं कसे फुलतात, डुलतात याचा अनुभव मिळत होता. काव्याच्या रसायनात उपरोधाचं द्रव्य मिसळलं म्हणजे विचारांची धार कशी सकंप तळपते याचे पाठ मिळत होते. पण त्या अमेरिकन शैलीसरदाराचा आक्रमक युक्तिवाद या देशाच्या भूमीवर पाय टेकीत नव्हता. तो इंग्लंडअमेरिकेच्या आकाशातच घोटाळत होता. मार्क्सवादी फळीवरून उडालेला जीव पुष्कळदा समाजवाद्यांच्या पुळणीत जाऊन पडतो तसा मीही पडलो होतो, पण भारतीय समाजवादी अद्याप मार्क्सवादाच्या नशेतच होते. राजकारणाच्या प्राङ्गणात मी कुंठीत झालो नि वाङ्मयाच्या ओसरीवर आसरा घेतला. तिथं एक

दिलदार दिलासा मिळाला. आपला आधार अखेरीस इथं. वाङ्मयाच्या वाटेस आजवर फारसा न गेलेला जीव वाङ्मयाच्या वाटिकेत विरंगुळा शोधू लागला, आणि तिथं त्याला एक जीवनोत्सवच जाणवू लागला.

आता वाढदिवसाच्या जादूची भुरळ पडण्यास हरकत नव्हती. कारण वाढदिवस हा एक जीवनोत्सवच असतो. खरं म्हणजे निसर्गात जीवनोत्सव सारखाच आढळतो. आंब्याला मोहर येतो तो जीवनोत्सवच. वसंतात कोकिळेला कंठ फुटतो तोही जीवनोत्सव. पावसाची पहिली सर हा जीवनोत्सव. गुलमोहरावर ज्वाळांचा मोहर पसरतो तो जीवनोत्सव. माझ्या घरी आलेल्या तीन आठवड्यांच्या कुत्र्याच्या पिलानं पहिली इवलाली नाजूक उडी घेतली आणि जीवनोत्सव साजरा केला. माझ्या हाताचा वास घेता घेता गाईच्या कोवळ्या वासरानं शेपटा फुलवून आणि कानात वारा भरून नृत्याच्या उड्या मारल्या तो त्याचा जीवनोत्सव. आकाशात वीज सोन्याचा चाबूक उडविते तो जीवनोत्सवच. आणि तळ्याच्या पाण्यात काठच्या वनश्रीची प्रतिबिंबं पडतात तशी आपल्याला पडणारी स्वप्नं हासुद्धा जीवनोत्सव.

निसर्ग फार उत्सवप्रिय, आणि आपण निसर्गाची लेकुरं. पण संस्कृतीचा सोमरस प्यालेली. त्यांनी आपल्या नैर्सगिक जीवनोत्सवाला संस्कारित (म्हणजे कृत्रिम) रूप द्यायला हवंच. तेव्हा आपण एक दिवस वाढदिवस म्हणून निवडला. त्याचा निसर्गाशी जन्माच्या धाग्यानं तरी संबंध असतो. पणं जपाननं सर्वांच्या वाढदिवसासाठी १ जानेवारीची निवड केली आहे. कम्युनिझम्चं सार्वत्रीकरण जपान्यांना फार कठीण जाऊ नये !

पाश्चात्य जग सुधारलेलं. आधुनिक दृष्टीचं. ऐहिक वृत्तीचं. तिथं वाढदिवसाला विशेष महत्त्व असायलाच हवं. आपण पाश्चात्यांच्या जीवनपथावर ठाम पाऊल टाकलं आहे. तेव्हा आपल्याकडेही ते महत्त्व यायला हवं. वाढदिवस ही जीवनलोलुपतेची खुली कबुली — अगदी जाहिरात लावून केलेली. पारंपरिक दृष्टीला आधुनिकतेनं दिलेली स्पष्ट नाकबुली. ऐहिक ऐश्वर्य भोगण्याचा आपल्याला अधिकार आहे, नव्हे ते आपलं कर्तव्य आहे, अशी दंवडी फिरवलेली. अलिकडे न्यूयॉर्कमध्ये २२ तास वीज गेली. या बिनविजेच्या कालात अलोट लुटालूट झाली. ही लूटमार बेकार दरिद्री नीचस्तरीयांनी केली नव्हती. तळचे लोक तेव्हा वर्तनाच्या

जरा उच्च पातळीवरच होते, लूटमार सुखवस्तू लोकांनी केली होती. फक्त त्यांचा टी.व्ही. शेजाऱ्याच्या टी. व्ही.पेक्षा कमी प्रतीचा होता. त्यांची मोटर जरा कमी श्रीमंत होती. त्यांचं फर्निचर थोडं हलकं होतं.

आता आर्थर कोत्सलरसारखे, भारतीय अध्यात्माच्या शोधात पश्चात्ताप पावलेले लोकसुद्धा 'सेन्सलेस मटिरिॲल'च्या (बेअक्कल भौतिकतेचा) निषेध करू लागले आहेत. माझा प्रश्न तो नव्हता. माझा प्रश्न दारिद्र्याचा होता. पण त्याची कणभर क्षिती नव्हती. अंगात तरुण रक्त धावत होतं. तारुण्याला वाढदिवसादी गोष्टींची गरज नसते. खरं म्हणजे तारुण्याला सहवासाचीही गरज नसते. तारुण्य एकलेपणाची आग मोसंब्याच्या रसासारखी पिऊन टाकतं, आणि तोंडावर तृप्तीचं हास्य खेळवतं. त्यानं वाढदिवसाची फिकिर का करावी ?

पण एक दिवस गंमत झाली. मॅक्स ईस्टमनची जन्मतारीख ४ जानेवारी असं कुठंसं वाचलं. माझी ४ किंवा ६ जानेवारी असं वाटत होतं. शाळेत ६ लागली होती, पण त्याची खात्री नव्हती. अखेरीस आईकडून पत्रिका आणली. एका ज्योतिष्यात जगणाऱ्या मित्राच्या स्वाधीन केली, आणि त्यानं संशोधनपूर्वक ग्वाही दिली की अस्मादिकांची जन्मतारीख ४ जानेवारीच आहे. क्षणभर मॅक्स ईस्टमनची प्रतिभा माझ्या पत्रिकेत नाही तरी या मित्राच्या डोक्यात शिरल्याचा भास झाला.

काही दिवसांनी आणखी एक गंमत झाली. माझं लग्न ठरलं. नियोजित व्याह्यांनी २ जानेवारी किंवा ४ जानेवारी असा मुहूर्त सुचविला. मी ४ जानेवारीवर झडप घातली. (वधूच्या पालकांना हे स्थळ पसंत नसूनही) कार्य व्यवस्थित पार पडलं. माझा जन्मदिवस हाच माझा विवाहदिन ठरला. वाढदिवसाचा गुणाकार झाला. पण वाढदिवसाला पोटात घालायला विवाहदिनाला वेळ लागतो का ?

एका अर्थानं विवाहदिन हा वाढदिवसासारखाच. तोही एक जीवनोत्सवच. दोन तरुण रक्तांचं कॉक्टेल घडविणारा ! कविलोक त्याला मीलन म्हणतात. (हे 'शरीरसंबंधा'ला रोमॅण्टिक उत्तर !) ते एक सेन्द्रीय कलमच म्हणायचं. कोकणात आंब्याची बाठ आणि फणसाची आठल

एकत्र रुजत घालतात. कोकणची ही दोन भूषणं परस्परांना शोभा देत वाढतात. लग्नगाठीनं बांधलेली जोडपी परस्परांना शोभा देतातच याची ग्वाही देता येत नसली तरी ती बहुधा परस्परांना आधार देतात.

पण वाढदिवस आणि विवाहदिन यांमधे एक फरक आहे. एकात उल्लास असतो तर दुसऱ्यात आव्हान असतं. एक बहिर्मुख तर दुसरा अंतर्मुख. एकात ईर्ष्या तर दुसऱ्यात अधिष्ठान. एकात निखळ आत्मगौरव तर दुसऱ्यात आत्मपूर्तीसाठी आवाहन. एकात विस्मृतीला साद तर दुसऱ्यात जागरणाला हाक. तरीपण दोन्ही जीवनोत्सवच. एक निर्भर तर दुसऱ्यात मान राखण्याचा आदेश. एका अर्थी विवाह ही अपूर्णतेची कबुलीच. कमी आहे ते पुरतं करण्याची घडपड.

साहजिकच विवाहदिनानं वाढदिवसाला पोटात घेतला. १९६५ नंतर दोघांचंही माहात्म्य खलास झालं. नंतर पुण्याला आलो. १९६९ साली वयाला साठ वर्षं पूर्ण झाल्याचा सुगावा काही मित्रांना लागला आणि काही जण एकसष्टीच्या समारंभाची भाषा बोलू लागले. एका मित्राला तर न झालेला समारंभ झाल्याचाच साक्षात्कार झाला, आणि तो रेशमी वस्त्र व सौभाग्यवतीला गर्भरेशमी लुगडं घेऊन हजर झाला ! समारंभ होण्याचा संभव नव्हताच. करावयाचा तर तो डॉक्टरांचा आणि औषधांच्या कारखानदारांचा करावा लागला असता. माझ्या दीर्घायुष्याचं आद्य श्रेय त्यांना आहे. अलिकडच्या सत्तरीच्या मानकऱ्यांनी हे सत्य ओळखलं तर किती उचित होईल ! काही जण सत्तरीची वयस्कता प्राप्त झालेली नसतानासुद्धा ते ओळखतात. डॉ. कुमार गंधर्वांनी ते पन्नाशीलाच ओळखलं. त्यांचा तो वाढदिवस साजरा झाला तेव्हा त्यांनी, त्यांना जिवावरच्या दुखण्यातून उभं करणाऱ्या दोन डॉक्टरांचा जाहीर सत्कार केला. लोक त्यात उत्साहानं सामील झाले. या डॉक्टरांनी कुमारांचाच पुनर्जन्म केला होता एवढंच नव्हे तर भारतीय संगीताचाही पुनर्जन्म केला होता.

अशी ही माझी वाढदिवसाची कहाणी सफल संपूर्ण न झालेली. बहुधा न होणारी. आणि तरी अलिकडे नवनवे धुमारे फुटलेली.

या वयात हे धुमारे कशाला ? ज्या वयात निर्मम व्हायचं त्या वयात

ममत्वाचे हे चोचले कशाला ? पण हे अरुणाला मान्य नाही, हेमाला नाही. रोहिणीला नाही, भारतीला नाही, प्रतिभाला नाही, सुनीताला नाही, वाळिंब्यांना नाही.

खरं म्हणजे आज ' शुभास्ते पंथानः ' असं म्हणायचं. पण आपलाही जीव इथं घोटाळत असतोच. हे एक कोडंच म्हणायचं Another paradox of life ! आपण जितके म्हातारे दिसतो तितके म्हातारे नसतो. आपल्या मेंदूत दहा ते पंधरा अब्ज पेशी असतात. विसाव्या वर्षानंतर रोज ३० हजार मरतात. म्हणजे या हिशेबानं अवघ्या पाचसहा टक्के गायब होतात. तुम्ही तितके भाग्यवान असलात तर तुमच्या प्रतिभेच्या पेशी शाबूत असतील. बुद्धीचं बळ शिल्लक असेल. स्मृतीची शक्ती कायम असेल. भावनेच्या कळा टिकून असतील. इच्छेचा जोश जिवंत असेल. मुख्य म्हणजे संवेदना प्रसन्न असतील. मग या शक्तीचा उपयोग कसा करायचा एवढाच प्रश्न शिल्लक उरतो. झाडाची पानं गळतात ती नवी येण्यासाठी असं आता होणार नसतं. पण सगळी पानं गळलेली नसतात, बरीच शिल्लक असतात. छाया देण्याचं शीतल कार्य ती अजून करू शकतात. तुमच्या जीवनावरचा अनुभवाचा पर्णसंभार जितका शिल्लक असेल तितका तो उत्सुक जीवांना आश्वासक सावली देऊ शकेल.

या सावलीचा विस्तार केवढा ? अर्थात ज्याच्या त्याच्या तपस्येएवढा. प्रतिभेच्या आवाक्याएवढा. ता. २६ मे १९६४ रोजी पं. नेहरूंचं शरीर थकलेलं होतं. पण त्या थकलेल्या हातांनीच त्यांनी लिहिलं,

> But I have promises to keep,
> And miles to go before I sleep,
> And miles to go before I sleep.

त्यांचा मैलही मोठा..तुमच्या आमच्या मैलांसारखा आठ फर्लांगाचा नव्हता, आणि तरी असे अनेक मैल चालण्याची हिंमत धरून ते झोपी गेले. तसेच जयप्रकाश नारायण. आता हे खलास झाले अशी खात्री उराशी धरूनच इंदिरा गांधींनी त्यांना सोडलं. डॉक्टरांचाच तसा अभिप्राय होता. पण डॉक्टर शरीर तपासतात. मेंदूच्या पेशी निरखतात. हृदयाचे ठोके मोजतात. रक्ताचं अभिसरण पाहतात. त्यांना संज्ञेच्या अभिसरणाची काय कल्पना ? चैत-

न्याच्या अभिसरणाची काय कल्पना ? जयप्रकाशांचं चैतन्य अबाधित होतं. या चैतन्यानं इतिहास निर्माण केला. नवा स्वातंत्र्यसंग्राम केला. तो जिंकून दाखविला. कृतज्ञ राष्ट्रानं त्यांचा मोठ्या समर्पणबुद्धीनं अमृत-महोत्सव साजरा केला. त्यांच्या सारख्यांना तो शोभतो. कारण तो चैतन्याचा महोत्सव असतो. हे चैतन्य धारण करणारं शरीर थकलं असेल. पण ते चैतन्य थकलेलं नाही चैतन्य कधी थकत नाही.

# सागरदर्शन

समुद्राची पहिली ओळख मला धन्वंतरी म्हणून झाली.

लहानपणची गोष्ट.नीटसं काही आठवत नाही. मला कसलासा त्वचारोग झाला होता. खूप इलाज झाले; पण गुण येईना. तेव्हा एक दिवस वडिलांचा एक दोस्त म्हणाला, " याला चांगला समुद्रात बुचकळून काढा. लागोपाठ पाचसहा दिवस. चट बरा होईल. " ही समुद्रात डुंबण्याची कल्पना मला फार आवडली. समुद्राच्या पाण्यात शिरण्यास मी थोडा अधीरच झालो. दुसऱ्या दिवसापासूनच हा इलाज करायचं ठरलं. गृहस्थ बरोबर चार वाजता हजर झाला नि मला घेऊन गेला. त्या काळच्या वाफेच्या गाडीनं आम्ही चौपाटीवर गेलो. समुद्राचं अवाढव्य रूप पाहिलं. एकामागून एक चाल करून येणाऱ्या लाटा पाहिल्या नि माझा उत्साह मावळला. धडकीच भरली, अन ती आक्रंदनाच्या रूपानं व्यक्त होऊ लागली. पण त्या गृहस्थाच्या अंगात धन्वंतरीच संचारला होता. त्यानं बकोटीला धरलं नि मला पाण्यात खेचलं. अंग एकदम चरचरलं. पाणी झोंबू लागलं. जखमांत शिरून चावू लागलं. मी टाहो फोडला. पण गृहस्थाला ती त्याच्या भिषग्ज्ञानाची पावतीच वाटली. त्यानं मला धरलं आणि खारं पाणी माझ्या अंगात चांगलं चोळलं. मी बोंबललो, बोंबललो. करण्यासारखं असं एवढंच माझ्या हातात होतं.

...पण दोनतीन दिवसांनी तोच पाण्याचा स्पर्श सुखकारक वाटू लागला. माझ्या त्वचारोगाला त्या पाण्याची चटकच लागली. धन्वंतरीनं

निर्णय दिला, रोग पळत आहे. आणि आठ दिवसांत तो खरोखरच पळाला.

असं हे माझं समुद्राचं पहिलं दर्शन. धन्वंतरी म्हणून.

धन्वंतरी ! समुद्रमंथनाचं एक अलौकिक फलित. 'अमृता'चा अर्थ अचूक लागतो. समुद्रात अमृत आहेच. त्याच्यामुळं निसर्गाचा चक्रनेमिक्रम चालू रहातो.

पाण्याला आपण जीवन म्हणतो. पाण्यामुळंच जीवन शक्य होतं, आणि समुद्र हा या जीवनाचा मूलाधार. सूर्याच्या किमयेमुळं तो तसा बनला. निसर्गानं सप्तसागरात इतकं पाणी साठवलं; पण या अपेयाचा भूमीला आणि भूमिपुत्रांना काही उपयोग नव्हता. निसर्ग हा सूर्याचा सुपुत्र — पृथ्वीच्या पोटी जन्मलेला. सूर्य त्याच्या मदतीस धावला, त्यानं सप्तसागरातील जलसंचयाची वाफ केली, वाऱ्यांची योजना करून आकाशात इकडेतिकडे फिरवली, आणि पर्जन्याच्या रूपानं भूमीवर आणली.

मला आठवतं : आपल्या मोसमी पावसाची (मॉन्सूनची) मीमांसा मला समजली, तेव्हा माझं अंतःकरण हललं. पुलकित झालं. मन रोमांचलं. कल्पनारम्य काव्याचा प्रत्यय आला. समजलं, मॉन्सून हा उत्तरायण आणि दक्षिणायन यांचा चमत्कार. आपण हिवाळ्यात मश्गूल असतो तेव्हा विषुव-वृत्ताच्या पलिकडे दक्षिण–महासागरावर उन्हाळा उसळतो. समुद्राच्या पाण्यात उष्णता ओततो. त्यातून ढग निर्माण होतात. हवेत जाऊन विहर-तात. तोच आपला हिवाळा संपून उन्हाळा येतो. त्याच्यामुळं हवा विरळ होते, वारा बदलतो, आणि दक्षिण–महासागरावरचे थंड वारे मेघासहवर्त-मान आपल्या आकाशात घुसतात आणि पावसाळा सुरू होतो. मला वाटायचं, हे भाग्य फक्त भारताचं. पण पुढं ब्रह्मदेश, थायलंड, व्हिएटनाम, फिलिपीन्स वगैरे देशांत तोच चमत्कार पाहिला, आणि मन थोडंसं खट्टू झालं. म्हणजे मॉन्सूनचा मक्ता केवळ भारताला नाही. मन खट्टू झालं, पण लगेच सावरलं आणि स्तिमित झालं. मॉन्सूनचं हे नाट्य जगाच्या रंगभूमी-वर किती किती ठिकाणी सुरू आहे ! नाट्य ! जिथं मॉन्सून नाही तिथं-सुद्धा. सिंगापूरला दर दोनचार दिवसांनी पाऊस पडतो, तेही एक नाट्यच. पण आमच्या नाट्याचा व्याप आणि व्यूह त्याला नाही. महिनामहिना

आपण पावसाची चातकाच्या दृष्टीनं वाट पहातो. 'आषाढस्य प्रथमदिवसा'-कडे डोळे लावून बसतो. 'ये रे ये रे पावसा, तुला देईन पैसा' अशी त्याला लालूच लावतो. अखेरीस पाऊस येतो. पण येतो तो कसा? आकाशात वरुणाचे रांजणच फुटतात. मात्र एखाद्या वर्षी तो गाजतगर्जत येतच नाही. आपटबार फोडीतच नाही. चोरपावलानं येतो. आणि मग, मुंबईच्या पावसाच्या स्फोटक आगमनाकडे नजर लावून बसलेल्या पंडित नेहरूंना 'वन् मोअर इल्युजन लॉस्ट' (आणखी एक भ्रमनिरास) असे निराश उद्‌गार काढावे लागतात. पण बहुतेक वेळा तो आदळआपट करीतच येतो. पण कसाही आला तरी तो हवा असतो. कारण मग पृथ्वी सुजला, सुफला, सस्यश्यामला बनते. एकादवेळेस तर तो 'मेघदूत'सारखं काव्यही घेऊन येतो.

समुद्र मला खरा भेटला तो प्रवासातला सोबती म्हणून. मुंबईहून कोकणात जाताना आमची बोट किनाऱ्याकिनाऱ्यानं जायची. किनाऱ्यावरची दृश्यं दाखवीत. पहिलीपहिली दृश्यं कोकणाची असं मानायलाच आम्ही तयार नसू. ती लालहिरवी तकाकी त्यांच्यावर नसायचीच. मुंबईतून बाहेर पडतानाच खांदेरी उंदेरी भेटायची. तिच्याकडे तर आम्ही तुच्छतेनंच पाहू. मात्र नावं गमतीदार! खरं कोकण सुरू व्हायचं ते श्रीवर्धननंतर, हर्णैनंतर. किनाऱ्यावरचा वाळूचा पांढराधोप विस्तार, त्याच्या मागं शिस्तीत उभी असलेली माडांची झाडं कोकणची किती विविध दर्शनं! कधी खडक, कधी कातळाचा काळा कडा. कधी घळ, कधी खाडी. कधी पुळण, कधी झाडाझुडपांनी रंगलेले डोंगर. यांवर झेपावणाऱ्या पाण्याची दर्शनं तरी किती! काही फेसाळ, तर काही संतप्त. काही अगतिक, तर काही संतुष्ट. काही संथ, तर काही बेहोष. समुद्र भूमीला किती प्रकारांनी भेटतो! कधी तो कड्यावर मस्त हत्तीसारखी टक्कर घेतो. कधी खडकावर डोकं आपटून शीर्णविशीर्ण होतो. कधी घळीत शिरून स्वतःभोवतीच अगतिक फिरतो. कधी पुळणीवर विशविशितपणे अंग टाकतो. पुळणीवर त्याच्या अंगात कधीकधी बालकाचा लडिवाळपणा शिरतो. उलट खडकावर त्याचं आत्मार्पणच होतं. नेहेमी तो भूमीकडे फेनपुष्पांचे शृंगार घेऊन येतो; तर पावसात त्याच्या लाटा किनाऱ्याकडे

अभिसारिकेसारख्या धावतात. संथ शांत सागर म्हणजे समाधिस्थ योगीच ! अंतर्यामी विलक्षण ताकद गोळा करून बसलेला. खाडीत मात्र तो एखाद्या प्रेमिकासारखाच शिरतो. तिथली ती नदीसमुद्राची भेट म्हणजे जिवाशिवाचा संगम. एक अगम्य सायुज्यता. या वेळी तो आपले रंग तरी किती बदलतो. नवनव्हाळीचा हिरवा, उन्मादाचा लाल शेंदरी आणि वैकल्याचा राखी. आपल्याला वाटतं, समुद्राचं पाणी निळं असतं. समुद्राचा रंग आपण नकाशावरून अजमावतो आणि पार फसतो. नकाशातला निळा रंग समुद्र प्राशन करतो तो भूमध्यसमुद्रात. तिथं सागराचा नीलिमा आणि आकाशीचा नीलिमा यांची चढाओढ लागते. पण ती कृतकृतक असते. तो नीलिमा वेगळा आणि हा वेगळा. पाण्याचा गडद, तर आकाशाचा तरल–विरळ. पाण्याचा जडनिश्चल, तर आकाशाचा तलमतेज, पाण्याचा अधुरा शंकात्म, तर आकाशाचा स्वच्छ सळसळीत. एक सूर्यप्रकाशानं अवघडतो, तर दुसरा त्यानं खुलतो, खुशालतो.

डावीकडे कोकणचा किनारा, आणि उजवीकडे सागराचा विस्तार. वाटायचं, या विस्तारापलिकडे काय असेल ? वैतरणेपलिकडचा स्वर्गलोक ? दुपारी क्षितिजावर आकाशसागराचा मेळमिलाफ व्हायचा आणि दृष्टी त्यांना अलगविलग करण्यात गढून जायची. दमायची नि पराभव पत्करायची. मधूनच एखाददुसरं शिडाचं जहाज हलतडुलत असायचं. त्याचं सफेतसुंदर शीड उन्हात तकतकायचं आणि अभिमानानं फुगून आमच्या बोटीकडे एक तुच्छतेची नजर टाकायचं. एखादवेळेस एखादा पांढराधोप पक्षी पाण्यावर ( विमानानं डायव्हिंग करावं तसा ) यायचा आणि चोचीत मासा पकडून आकाशात गडप व्हायचा. त्याची ऐट आणि वेग यांचा गुणाकार दृष्टी भारून टाकायचा. संध्याकाळी या पक्ष्यांची रांगच रांग, हवेत शुभ्रसफेत वस्त्र पसरावं तशी पसरायची. या वस्त्राच्या किती परी नि किती प्रकार !

पण दृष्टी धन्य व्हायची ती सूर्य क्षितिजावर टेकला म्हणजे. सूर्य म्हणजे तेजाचा गोल, हे मास्तरांचं म्हणणं तेव्हा पटायचं. आरक्त तेजाचा गोल — क्षणाक्षणाला रक्तिमा खुलवणारा, खुलवताखुलवता कळा बदलणारा. पण आमची नजर तिष्ठायची ती त्याच्या बुडण्यासाठी. सूर्य समुद्रात

उतरू लागला की कलशाप्रमाणं दिसायचा, पाण्यात घागरीसारखा बुडायचा. आणि तेथं लालट ढगांची विखरण असली, तर या कलशावर नक्षी चढायची. सूर्याचं हे समुद्रावगाहन सुरू असताना पाण्याच्या त्या विशाल पृष्ठभागावर सोनसळ पसरायची सुवर्णाच्या पट्ट्यासारखी. एका डोळ्यानं कलशाकडे पहायचं आणि दुसऱ्या डोळ्यानं या सोनेरी चमत्काराचा वेध घ्यायचा. इतक्यात आकाशात पक्षिगणांचे स्वच्छशुभ्र पद्मबंध पसरायचे आणि त्यांच्या आडचा आकाशाचा रक्तिमा अधिकच खुलायचा. पण या रक्तिम्याला पळायची घाई. नंतर लवकरच तो मावळायचा, कृष्णवर्णीय वस्त्र पांघरायचा — आणि हां हां म्हणता ते गुलाल उधळणारं पाणी काळंगूढ बनायचं.

पुढे कित्येक वर्षांनी सूर्यास्तानंतरच्या या रंगपालटाची शीघ्रगती आवृत्ती सिंगापूरला निघाली. एकिकडे सूर्याचा रक्तगोल जलसमाधी घेत असतानाच रात्रीचा काळोख त्याला कोरू लागला. दिवसावर रात्रीची काळझडप पडली. अर्थात याचं रहस्य एव्हाकडून माहीत झालं होतं. त्यातला काव्यविस्मय ज्ञानानं हडप केला होता. विषुववृत्तावरचा सूर्य समुद्रात सरळ उतरतो. संधिप्रकाशाला फारशी संधी तो देतच नाही. युरोपातला अनुभव उलट. तेथली सकाळ वा संध्याकाळ—त्यांचं संधिप्रकाशाचं वस्त्र म्हणजे द्रौपदीचं पट-वर्धन. भूमध्यसमुद्रात सूर्य क्षितिजाच्या कडेवर आला की अवघा समुद्र लालीलाल होऊन जायचा. सकाळच्या रक्तिम्यावर सुवर्णाची पिवळी झाक आणि सायंकाळच्या रक्तिम्यावर ताम्रपात्राची लालट झाप ! कारण उषेच्या मिठीत बहुत काळ रेंगाळलेले सूर्यमहाराज आकाशात सरळ चढायचेच नाहीत. आकाशात एखाद्या वर्तुलाकार जिन्यानंच चढायचे आणि संध्याकाळी अस्ताच्या मार्गावर तसेच उतरायचे.

कोकणच्या तेव्हाच्या प्रवासाची माझी अक्षय आठवण म्हणजे रत्नागिरी बंदरातलं आगमन. पहाटपाण्यानं आर्द्र बनलेलं. सांद्र बनलेलं. समोर गारगार काळोखावर दीपमालिकांचं रत्नजडित. डावीकडे किल्ल्याच्या डोंगरात दाटलेला काळोखाचा खडक. उजवीकडे जरा दूर अस्पष्ट अंधारात हरवलेला खडकाळ किनारा. त्यातच मुरगुसलेली काजळी नदीची खाडी. मागं निराकार

अंधाराचा निरवयव विस्तार. आम्ही पडावात उतरत असतो. उतरणाऱ्या उतारूंचा अगतिक गलका आणि त्यानंच निर्मिलेल्या एका निरंकार नीरवतेचा साक्षात्कार. माझं त्याच्याकडे एक निमग्न दुर्लक्षच असतं. सारं लक्ष पडावाच्या हालचालींनी समुद्राच्या पाण्यात उमटणाऱ्या चांदीच्या उकळत्या चमकांकडे लागतं. त्यातच शरीर पडावाच्या खसकबाज, खटकदार लयावर आंदोळतं आणि सुखावतं. एकीकडे जलार्द्र निसर्गाशी जुळलेले लागेबांधे संपले म्हणून खंतही वाटत असते. इतक्यात बोट प्रयाणाचा भोंगा देते. खेचलेल्या नांगराचा खळक-खसक आवाज करते. दिव्यांची आरास पाठ फिरवते. पोटात काहीतरी तुटतं. क्षणभर सारं अंधारतं—आणि आपण एकदम कसल्यातरी अनामिक पोकळीत वावरत आहोत असा प्रत्यय येतो. वर आकाश. मोकळंमोकळं. सभोवार अंधार. कुठं निराकार तर कुठं अनोख्या आकाराचा. क्वचित आक्रस्ताळी. एकदम निराधार वाटतं. अगतिक वाटतं. पण क्षणभरात समोरचा प्रकाश किमया करतो. लक्ष भानावर येतं, आणि पाण्यातल्या चांदीत गुंगून जातं.

पण ही एका विशाल आशयाची अस्फुट जाण होती. हे पुढं १९५१ साली भूमध्यसमुद्रात समजलं. चिंतनशील पातळीवर. समुद्रकिनाऱ्यावरच्या पुळणीत वाळूचा जसा कण तसे या विश्वाच्या पसाऱ्यात आपण, या—एका इंग्रजी कवितेतील—कल्पनेनं माझ्या मनाची पकड घेतलेली आहे. आपल्या एका आकाशगंगेत दशसहस्र कोटी सूर्य आहेत ! म्हणजे शंभर अब्ज सूर्य ! निखर्व सूर्य ! सूर्य म्हणजे सूर्यमंडळं ! एका आकाशगंगेत ! विश्वात अशा एक अब्ज आकाशगंगा ! या अजस्र, अफाट, विराट पसाऱ्यात आपण कोण ? काय किंमत आपली ? — या विचाराचा लोळ मनात शिरला, भूमध्य समुद्रात मध्यरात्री — अमावास्येच्या रात्री — आकाशगंगा आपल्या साऱ्या व्यापासह साकारली. व्यूहासह भावली. विस्तारासकट प्रकटली. बोटीच्या डेकवरून सभोवार नजर फिरवली. सर्वत्र अमावास्येचा काळोख. खालचं पाणी हा काळोख प्यालेलं. सभोवारचं आकाश काळोखानं माखलेलं. क्षितिजाची रेखा काळोखानं खाल्लेली. वरचं आकाश मात्र जणू या काळोखानंच उजळलं होतं. आणखी एकवार नजर फिरवली नि वाटलं,

आपण एका अंधारगोलाच्या केंद्रस्थानीच आहोत. एक बिंदू म्हणून. एक निराकार अस्तित्वशून्य बिंदू. पण विचाराची सळसळ शिल्लक असलेला. आकाशगंगेत शंभर अब्ज सूर्य आहेत त्याप्रमाणे मानवाच्या डोक्यात पंधरा अब्ज पेशी आहेत याची ग्वाही देणारा. आपण एका मिजासखोर बोटीवर आहोत याची जाणीव बाळगणारा. मिजासखोर बोट — 'व्हिवाण्टी'! एका विख्यात अमरकीर्ती संगीतकाचं नाव मिरवणारी मानवी संस्कृतीची एक गतिमान रेखा. याच संस्कृतीची आभरणं मिरवणाऱ्या उतारूंत दश-श्वानसहवर्तमान एक संस्थानिक आणि त्याची अमेरिकन पत्नी समाविष्ट असलेली. एक मोठं मातबर प्रकरण. पण त्या क्षणी ते क्षुद्र वाटलं. जाणवलं, ही संस्कृतीची रेषा कोणत्याही क्षणी पुसली जाऊ शकते. मला 'टायटॅनिक'चं स्मरण झालं. अगदी निर्मम स्मरण. तिऱ्हाईत स्मरण. क्षीण, क्षुद्र, क्षणभंगुरतेनं रांधलेलं, अलिप्त स्मरण. वाटलं, हा व्हिवाण्टी तरी असा कोण? या ताऱ्यांच्या संगीतात त्याच्या संगीताचे सूर मिसळतात? या दोन संगीतांची एखादी स्पर्शभेट तरी होते?

असं हे चिंतन. अहम्‌ला समाधी देणारं. त्याला शून्यात बंदिस्त करणारं. पण अहम् लेचापेचा नसतो. अखेरीस डोक्यातील पंधरा अब्ज पेशींचा तो परिपाक. हा अहम् आहे म्हणून आस्था आहे. रस आहे. साफल्य आहे. वैफल्यही आहे. मुख्य म्हणजे अस्तित्वाची प्रतीती आहे. आपल्या साऱ्या अस्तित्वावर अहम् 'मी'चा शिक्का मारतो. स्नेहीसोबती, घरदार, शरीर, मन, आत्मासुद्धा माझा असं म्हणतो. साऱ्या अस्तित्वाचं रंगरूप या अहम्‌च्या कॅलिडोस्कोपमधूनच खुलतं. या अपार विश्वात हा अहम् अगदी पामर असेल; पण स्वत:चं असं अगदी स्वतंत्र विश्व निर्माण करून त्यात रमण्याची शक्ती या अहममध्यं असते. हे विश्व महात्मा गांधींचं असेल नाहीतर बाबू चष्मेवाल्याचं असेल, पण ते त्यांचं त्याचं स्वतंत्र विश्व.

होय, हा अहम् — अस्तित्वाच्या अगदी उगमापाशी वावरणारा, आपल्यातील चैतन्याच्या मूलस्रोताला स्पर्श करणारा अहम् — अखेरीस अगदी एकला आहे. एकलेपणाच्या बंदिस्त कोषात तो तडफडत असतो. आणि तरी 'एकला चलो रे' असा पुकार करण्याची आणि पुढचं पाऊल

टाकण्याची ताकद त्याच्यात आहे. या अंतःस्थ ताकदीच्या जोरावर तो आपल्या वैश्विक क्षुद्रतेवर मात करतो.

आमची 'व्हिवाण्टी' जिनोआहून सुटली आणि फ्रान्सच्या उपसागरात शिरली. मला सावरकरांच्या त्या विश्वविख्यात उडीची आठवण झाली. एका अहम्‌ची उडी ! केवढं साहस !

साहस ? त्या उडीचा आत्मा साहस होता ? की तिचं सत्वस्थ सत्य काही दुसरंच होतं ?

आपण मुंबई–धरमतर, कॅले–डोव्हर असे पोहण्याचे विक्रम पाहतो. त्यांच्याबद्दल वाचतो, आणि पोहणाऱ्याबरोबर धन्य होतो. मानवाच्या पराक्रमाची आणखी एक गाथा असे उद्‌गार काढतो. हा पराक्रम निसर्गाविरुद्ध. आपण निसर्ग खाऊन जगतो आणि निसर्ग आपल्याला गट्ट करू पहातो. निसर्गाशी संवाद साधा, निसर्गावर प्रेम करा, असे मोठे आध्यात्मिक संदेश आपण देतोघेतो. पण इतर आध्यात्मिक संदेशांचं जे होतं तेच याचं होतं. 'देह म्हणजे पापाची राशी हो' असं कंठरवानं सांगणारा कीर्तनकार, कीर्तन संपल्याबरोबर चहाचा कप तोंडाला लावतो तसंच हे. तेव्हा निसर्गावर मात करणाऱ्या कृत्यांचं आपण गुणगान करतो हे ठीकच झालं, पण हे सारं फझुल आहे. निसर्गाला आपण जिंकू शकत नाही. एखादी लढाई जिंकली तरी युद्ध हरणारच. कारण एक दिवस हा निसर्गच आपणा सर्वांसह नाश पावणार. किंबहुना आपण अगोदर जाणार. मनुष्यजात अगोदर संपणार. आत्म्याच्या अमरत्वाची भाषा आपण करतो. या अमरत्वाची इथल्या इथं प्रचीती देण्यासाठी योगी समाधी लावतो. पण खरोखर 'योगिक फीटस् आर फिटस्.' कारण या अवनितलावरचा अवघ्या मानवजातीचा मुक्कामच दोन दिवसांचा आहे. तो गोष्टीतला अतिथी राजाला म्हणाला, "या राजवाड्यातला माझा मुक्काम एक दिवसाचा, तर तुझा दोन. एक दिवस तुला हा राजवाडा सोडून जावं लागणार." उभ्या मानवजातीचीच ही कथा आहे. नंतर आत्म्याच्या अमरत्वाची भाषा करणार तरी कोण ? अशा परिस्थितीत हे पोहण्याचे विक्रम किती पोकळ वाटतात! नुसते बुडबुडे ! वरून आकर्षक, आतून पोकळ. खरं तर हे जीवन म्हणजे

एक प्रचंड बुडबुडाच — अनेक बुडबुडे मिळून बनलेला. शून्यात शून्य मिळविलेला !

पण सावरकरांची उडी या जातीची नव्हती. ते सागराला आव्हान नव्हतं. उलट ती ' सागराला प्रार्थना ' होती. ' सागरा प्राण तळमळला ' या जातीची. या उडीतलं आव्हान निसर्गाच्या शक्तीला नव्हतं; एका मानवी शक्तीला होतं. तो पोहण्याचा विक्रम नव्हता; ध्येयासक्तीचा विक्रम होता. ' अनंत अमुची ध्येयसक्ती ' असा तो पुकार होता. येथं सत्याशी झटापट नव्हती. सत्तेशी झटापट होती. सत्याशी झटापट फार विनम्रतेनं करावी लागते.' माती असशी, मातिस मिळशी ' याचं भान राखून ती करावी लागते. या सत्याचा एकदा साक्षात्कार झाला की सारी अहंता विलयास जाते.

पण मानवी अहंता या सत्यास भीक घालण्याच्या मनःस्थितीत नसते. याचा प्रत्यय मला व्हेनिसमध्ये झाला. व्हेनिस म्हणजे काय ? इतालियन भूमीचे दोन निमुळते तुकडे दोन बाजूंनी समुद्रात घुसले. याच समुद्रात दोन निमुळती बेटं एका समांतर रेषेत आडवी पडली होती, त्यांना हे निमुळते तुकडे बाजूंनी जवळजवळ भिडले. आणि या मीलनातून एक मोठा जलाशय निर्माण झाला. समुद्राच्या पाण्याचाच, पण आपलं अलिप्त अस्तित्व जपणारा. या सरोवरसदृश जलाशयात शंभर बेटं नांदत होती. त्यांतलं एक व्हेनिस. त्यानं त्या सर्वांनाच आपल्या नावाची गवसणी घातली. थोडंसं हे आपल्या मुंबईसारखं झालं, मुंबईची पूर्वी सात बेटं होती. आता त्यांचं एक बेट झालं आहे. ( आणि तेही साष्टी बेटात विलीन होऊ पाहत आहे. ) पण व्हेनिस असं शारीरदृष्ट्या एक झालं नाही. त्यानं आपल्या बेटांभोवतालचं जलार्द्र वास्तव कायम राखलं.

हे वास्तव म्हणजे निसर्गाची केवढी मोठी किमया ! पण मानवानं या किमयेची कदर केली आहे काय ? पाणी, जमीन आणि जमिनीवरचं वैभव यांची सौंदर्यसाक्ष युती करण्याची अप्रतिम संधी निसर्गानं मानवाला इथं दिली. पण मानवानं तिचं काय केलं ? — विटंबना ! व्हेनिसच्या सौंदर्यकथनावर पोसलेल्या जीवांना माझा हा उद्‌गार अतिशय उद्धट

वाटेल. कारण व्हेनिसच्या आपुलकीवर उभारलेलं अभिजात वाङ्मय आपण वाचलेलं आहे. व्हेनिसच्या सौंदर्याच्या चित्तवेधक कथा आपण ऐकलेल्या आहेत. व्हेनिसच्या वास्तुशिल्पाचं गुणगान अनेक वास्तुशिल्पज्ञांनी केलेलं आहे. आणि खरंच, व्हेनिसच्या भूमीवर वास्तुशिल्पाचे काही मनोज्ञ नमुने आहेत. आपण त्यांच्यापुढं नतमस्तक होतो. पण माझ्या लेखी व्हेनिस म्हणजे त्याचे कालवे. हे कालवे म्हणजे समुद्राचं नित्यनूतन पाणी व्हेनिसच्या धमन्यांत खेळवणाऱ्या जलवाहिन्या.रक्तवाहिन्याच. व्हेनिसच्या वास्तुशिल्पाच्या त्या केवढे अलंकार ठरल्या असल्या ! अलंकारच नव्हे, आधार ! वास्तुशिल्प म्हणजे अवकाशाचं शास्त्र. अवकाशाचं वैज्ञानिक आणि कलात्मक व्यवस्थापन. हा अवकाश इमारतीतला तसा इमारतीबाहेरचा. कल्पनाशाली वास्तुशिल्पज्ञ या दोन अवकाशांचं सर्जनशील मीलन घडवतो. बाहेरचा अवकाश आतल्याला वारा-प्रकाश पुरवतो, तर आतला अवकाश बाहेरच्याला आशय प्राप्त करून देतो. दोघे एकमेकांना समृद्ध करत त, एकमेकांची शान वाढवतात, आणि एकमेकांच्या आधारानं वास्तूचा रुबाब निर्माण करतात. पण व्हेनिसमधल्या इमारतींनी भूमीवरचा अवकाश तर खाऊन टाकलाच आहे; पण पाण्यावरच्या अवकाशाचाही गळा दाबला आहे. व्हेनिसमध्यं इमारतींची नुसती गर्दी आहे. गर्दी नव्हे, गिचमिड ! त्यांनी नुसतं एकमेकांवरच आक्रमण केलेलं नाही; शहराच्या या जीवनवाहिन्यांवरही अतिक्रमण केलं आहे. त्यांचा आकार तर आक्रसला आहेच; पण त्यांचा नूरही बिघडला आहे. अनेक ठिकाणी हे कालवे अंग चोरून वाहतात. अनेक ठिकाणी पुलांनी त्यांच्यावर अभद्र ओझं टाकलेलं आहे. आणि कित्येक ठिकाणी त्यांचं अस्तित्व तर शोधून काढावं लागतं. हे कालवे आता कालवे उरलेले नाहीत. त्यांपैकी अनेक पाण्याचे बोळ बनले आहेत — बोळातली सारी घाण उराशी धरून.

आता व्हेनिसच्या कालव्यांनी आपल्या मनात एक विशिष्ट वातावरणाची दर्वळ निर्माण केलेली आहे यात शंकाच नाही. पण ही दर्वळ या कालव्यांच्या कथांनी निर्माण केलेली आहे; वस्तुस्थितीनं नाही. ती वाङ्मयाची किमया असते; वास्तवाची नाही. एखाद्या पावठणीवर पाणी चुबकताना दिसतं आणि वाटतं, डेस्डिमोनानं इथं कधी आपली सुबकसुंदर

पावलं धुतली असतील ? एखादा वाडा कालव्यावर ओणवून आपलं रूप न्याहाळीत असतो, आणि वाटतं, या वाड्यातून पोर्शियाचा गोडगंभीर आवाज कधी ऐकू येत नसेल ? एखादी नक्षीदार खिडकी आपलं लक्ष वेधून घेते आणि वाटतं, नेरिसानं आपली पाणीदार नजर खालच्या पाण्यावर येथून किती वेळा टेकली असेल ?

हे कालवे म्हणजे वास्तुशिल्पज्ञांना एक सविनय प्रार्थना होती — आम्हाला तुमच्या इमारतींचा बहिश्चर प्राण माना. आमच्या पाण्यावर तुमच्या कलात्मक आकृतिबंधांची प्रतिबिंबं पाडा. आमच्या पाण्यात तुमच्या इमारतींना आपलं लावण्य न्याहाळू द्या. आमच्या आरशात तुमच्या वास्तूचं रंगरूप उमटू द्या. हे आज फारसं होतच नाही. व्हेनिसच्या लोकांना या कालव्यांचं असंही सांगणं होतं — आमच्या पाण्यावर तुमच्या जीवनाचे आनंदोत्सव साजरे करा. ही गोष्ट मात्र अगदी मनःपूत होते. ' ग्रँड कनॉल ' सारख्या काही कालव्यांवर मानवाच्या उत्सवाची आरास सतत मांडली जाते. तिची काहीशी उधळणच होते — व्हेनिसकरांकडून नाही, तर व्हेनिसचं सौंदर्य लुटण्यास आलेल्या प्रवासी पाहुण्यांकडून. ही सारीच कलात्मक नसते -- आणि असली तरी त्यात कलेच्या आस्वादापेक्षा बेछूट उत्साहच अधिक असतो. गोण्डोलांच्या मंचकांवर हा उत्सव उधळतो. माझ्या नजरेत हा उत्सव भरण्याऐवजी हे गोंडोले आणि पडाव बांधून ठेवण्यासाठी या कालव्यात अभद्र कुरूप खांब ठिकठिकाणी पुरून ठेवले आहेत तेच अधिक खुपले. ठिकठिकाणी या कालव्यांची शुद्ध चेष्टा आढळते. काही ठिकाणी या कालव्यांची चक्क गटारं बनली आहेत; तर काही ठिकाणी मालनौकांनी गुदमरलेल्या गोद्या !

मानवानं केलेली सागराची विटंबना फक्त व्हेनिसमध्यं दिसते असं मात्र नाही. अनेक ठिकाणी दिसते. (मी प्रदूषणाबद्दल बोलत नाही; ते प्रकरण आज शब्दांच्या पलिकडे गेलं आहे. ) हाँगकाँगची आठवण इथं तीव्रतेनं होते. हाँगकाँगच्या समुद्रावर अनेक ठिकाणी, मनुष्यजातीवर साचलेलं शेवाळ तरंगताना आढळतं. हे शेवाळ अनेक रूपांनी दिसतं. कधी ते बंदरात गर्दी करून राहिलेल्या कर्मदरिद्री जहाजांच्या रूपानं आढळतं; कधी ते समुद्रकाठी उगवलेल्या झोपड्यांच्या रूपानं आढळतं; कधी ते समुद्रात

मजेखातर फेकलेल्या नाण्यांचा शोध करतं; तर कधी ते एखादा मासा अगर खेकडा पकडण्यासाठी प्राण पणाला लावतं. बहुधा ते ' साम्पानां'च्या — चिनी जहाजांच्या — रूपानं वावरतं. ही साम्पानं समुद्राच्या भागावर एकत्र जमतात आणि आपली रीतसर वस्ती प्रस्थापित करतात. ही एक समुद्रावरची झोपडपट्टीच. आपल्याला माहीत असलेली जमिनीवरची झोपडपट्टी तशी ही तरती झोपडपट्टी. एक स्थावर असते, तर दुसरी जंगम. रात्री समुद्रावर जमलेली झोपडपट्टी दिवसा तिथंच राहील अशी खात्री नाही. ही साम्पानं स्थिरप्रकृती नसतात. त्यांचे संकेत आणि बेत अगोदर ठरलेले नसतात. समुद्रावरच्या वाऱ्याप्रमाणं त्यांची ऊर्मीही चंचल असते. ती केव्हा फिरेल आणि कशी वळेल यांची खात्री नसते. त्यांचे सूत्रधारही अवचित बदलतात. पण सूत्रधार बदलले, आकृतिबंध विस्कटले, तरी त्यांचा स्थायीभाव बदलत नाही. इथं व्यभिचारी भाव चालतात ते निराळे. स्मगिलग ( द्रव्याचं नव्हे, व्यक्तींचं ), वेश्याव्यवसाय, जुगार, मांसपूजा आणि मदिराभक्ती, पण यांबरोबरच इथं ईश्वरपूजा, संतभक्ती, अपंगसेवा आणि स्नेहधारणा यांचाही आढळ होतो. मानवाची प्रकृती आणि विकृती, उदात्तता आणि अधमता, सरलता आणि वक्रता — मानवी जीवनावरचे सारे तरंग आणि तवंग इथं सुखानं, सहजतेनं आणि गोडीगुलाबीनं एकत्र नांदत असतात.

या झोपडपट्ट्यांचेही काही हिशेब असतात. हाँगकाँगमध्ये सारं काही हिशेबानं चालतं — तोलूनमापून ! पण झोपडपट्ट्यांच्या हिशेबांचा एक खास तरीका असतो. पुष्कळदा ते बेफाट, बेदरकार, भरमसाट असतात. हिशेबांचासुद्धा एक ' थ्रिल ' असतो. ' रोमान्स ' असतो. अध्यात्मदेखील असतं. या हिशेबाची जात जाणायला एखाद्या झोपडपट्टीतच जायला हवं. मी एकदा एकाच साम्पानमध्ये, एकाच वेळी, बायकांचा स्वैंपाक, पुरुषांचा पत्तेजुगार, मुलांचा खेळ, स्त्रियांचा झगडा, दोन तरुण जीवांचा लयबंध, आणि पांघरुणानं पूर्ण झाकलेल्या एका घोरासुराची झोप इतके प्रकार पाहिले होते. या इतक्या गोष्टींचा सुमेळ बेहिशेबी असणं शक्य नाही. या हिशेबाला छेद देणारी एकच गोष्ट मला दिसली. त्या लयबंधात गुंतलेली चिनी मुलगी कांतीनं आणि रंगानं आपल्याकडच्या एखाद्या वडार मुलीसारखी होती.

या हिशेबी वृत्तीचा एक केविलवाणा प्रकार ' रिपल्स बे'वर पाहिला. अगदी ' रिपल्स बे ' हे नामाभिधान सार्थ करणारा. हाँगकाँगचे बडे लोक इथं पोहायला येतात. रविवारी इथं गर्दी उसळते. पुरुषांची तशी बायका-मुलांची. पण या गर्दीत जीव नसतो. जोम नसतो; क्षणभर सारं काही विसरून जाण्याची ताकद नसते. हाँगकाँगमधून बाहेर सटकण्याची सोय नाही म्हणून हे उबगलेले जीव इथं येतात, व समोर पाण्याचा साठा दिसतो म्हणून त्यात पोहायला उतरतात. या पोहण्यात जेवढी मरगळ दिसते तेवढी इथल्या ब्रिटिश राजवटीच्या भवितव्यातही नसते. पाण्यात उतरलेल्या लोकांचे हातपाय हलतात, कारण त्याच्या लाटा स्वस्थ नसतात. किनाऱ्या-वरचे लोक खातपीत असतात, कारण समोर विक्रेता दिसला की खरेदी करणं ही हाँगकाँगची आदत असते. हे लोक एकमेकांशी गप्पा मारतात, कारण खाणाऱ्या तोंडाला बोलण्याची भारी हौस !

सिंगापूरदेखील हाँगकाँगसारखे छोटंच. एका मर्यादित अर्थानं तसंच कोंडलेलं. ( अर्थात तसं घुसमटलेलं मात्र नाही ) पण तिथल्या जलावतरण-वाल्यांचा उत्साह भरतीच्या लाटांशी मुकाबला करतो. हाँगकाँग आणि सिंगापूर ही ब्रिटिशांची पूर्वेकडची दोन नावाजलेली नाविक ठाणी. दोनही प्रामुख्यानं चिनी वस्तीची. पण एक लाल छायेनं पुरं वठलं आहे, तर दुसरं स्वतःच्या मुक्ततेत मश्गूल आहे.

पण हाँगकाँगच्या एका आश्चर्यास तोड नाही. तिथं तरतं उपाहारगृह आहे. हाँगकाँगमधून हकालपट्टी झालेला सारा उत्साह, सारा उत्सव इथं जमा झाला आहे, आणि गिऱ्हाइकांच्या खाण्यापिण्याभेटण्यात आणि एकमेकात विरूनविसरून जाण्यात व्यक्त झाला आहे. इथं बायकोशी पटत नाही म्हणून शेजारणीकडे चोरून पहाण्याचा मामला नाही. बरंचसं काही खुल्लम खुल्ला असतं.

समुद्रकाठची काही ठिकाणं—अगदी ऐतिहासिक; पण त्यांनी ऐतिहासिक जाण फारशी जागी केलीच नाही. ती न्यूयॉर्कनं केली, बॉस्टननं केली. न्यूयॉर्कइतकं वर्तमानात् जगणारं दुसरं शहर नसेल; पण त्यानं प्रथम-दर्शनीच इतिहासाला कौल लावला. सारी अमेरिकाच म्हणजे नवराष्ट्र

आणि नवसंस्कृती. पण त्याच्याइतकी ऐतिहासिकतेला साद घालणारी राष्ट्रं फार थोडी असतील. अमेरिका साद अगदी प्राचीन ऐतिहासिकतेला घालते. अमेरिकेचा इतिहास निर्माण करणाऱ्या अगदी नव्याकोऱ्या लोकांनी मानवाच्या इतिहासातील काही प्राचीन विशेषांची उजळणी केली. प्राचीन इतिहासात एका मानवसमूहानं दुसऱ्या समूहाचं पार उच्छेदन केलं, तसं अमेरिकेत गोऱ्यांनी रक्तवर्णीय नेटिव्हांचं ( रेड इंडियन्सचं ) केलं. गुलामगिरीची संस्था प्राचीन कालात शहाजोगपणं नांदली, तिची अर्वाचीन आवृत्ती अमेरिकेनं काढली. मानवानं डोळ्यांदेखत निसर्गावर चाल करून त्याला जिंकल्याचं आणि पृथ्वीचं नैसर्गिक वैभव काबीज केल्याचं अर्वाचीन उदाहरण अमेरिकेतच घडलं मानवाच्या वसाहतीच्या वसाहती पावलावर उभ्या आहेत आणि सारखी वाटचाल करताहेत हे प्राचीन इतिहासानं वारंवार देखिलेलं दृश्य अलिकडच्या काळात अमेरिकेतच दिसलं. नवी भूमी आणि जुना मानव यांची प्राचीन इतिहासात अनेकदा झालेली भेट अलिकडच्या काळात अमेरिकेतच पुनःपुन्हा घडली. प्राचीन ऐतिहासिकतेला जगाच्या प्रचलित रंगभूमीवर अमेरिकेनं असं वारंवार ओढलं. या ऐतिहासिकतेला न्यूयॉर्कच्या समुद्रात प्रथमदर्शनीच जाग येते, कारण स्वातंत्र्यदेवतेचा तो अजस्र पुतळा नजरेत एकदम भरतो. पण तो पुतळा अमेरिकन ऐतिहासिकतेला एक सार्वत्रिकता प्राप्त करून देतो. कारण ती केवळ अमेरिकन मुक्तीची देवता नाही, ती या मुक्तीच्या तत्त्वांची देवता आहे. स्वातंत्र्याची दोन तत्त्वं या पुतळ्यात साकार झाली आहेत : एक राष्ट्रीय स्वातंत्र्याचं, आणि दुसरं लोकसत्ताक स्वातंत्र्याचं. माणुसकीप्रमाणंच स्वातंत्र्याचंही विभाजन होऊ शकत नाही.

बॉस्टनमध्यं ऐतिहासिकतेचा प्रत्यय येतो तेवढा मात्र न्यूयॉर्कमध्यं येत नाही. पुण्यात चालताना इतिहासाच्या अवशेषांवर पावलं टाकीत आपण चालतो तसेच बॉस्टनमध्यं चालतो. फरक एवढाच की, बॉस्टनमधील अवशेषांचे संदर्भ आधुनिक आहेत. बॉस्टनच्या बंदरात गेलं, तिथं उभ्या केलेल्या त्या संस्मारक नौकेत पाऊल टाकलं की ' नो टॅक्सेशन विदाउट रिप्रेझेण्टेशन ' ही घोषणा कानांत घुमू लागते. आणि लगेच अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाला प्रज्वलित प्रेरणा देणारं चहा–प्रकरण मनात रंगू लागतं.

पुण्याशी बॉस्टनला जोडणारं प्रकरण. पुण्याचं ( गोपाळराव जोशीप्रणीत ) 'चहाग्रामण्यप्रकरण' ही पुण्याच्या ब्राह्मणी करामतीची एक झकास झलक होती. तीत स्वातंत्र्याला आवाहन नव्हतं, स्वातंत्र्यावर आघात होता. उलट 'बॉस्टन ब्रॅह्मिन्स'नी बॉस्टनमध्यं चहा-प्रकरण सुरू केलं, आणि अमेरिकेच्या स्वातंत्र्य-आंदोलनास सुरुवात झाली. इतिहासाच्या स्मृती बॉस्टनमध्यं नुसत्या पेटतात ! तसं दिल्ली, रोम अगर अथेन्समध्ये होत नाही. दिल्लीला इंद्रप्रस्थाचं रोज दर्शन होतं, पण कुरुक्षेत्राच्या रणभेऱ्या ऐकू येत नाहीत. काश्मिरी गेट अगर तुर्कोमान गेट यांसारख्या ऐतिहासिक दरवाज्यांतून आपण रोज जा-ये करतो, पण मोंगलांच्या दरबाराचं प्रवेशद्वार उघडत नाही. रोमच्या कलोशिअममध्यं ग्लाडिएटर्सच्या लढती मन:चक्षुंपुढे उमलत नाहीत. पण अथेन्समधील पार्थेनॉनच्या शिल्पांत नव्याजुन्याचा संदर्भ तत्काळ साकार होतो. कारण तो कलात्मक संदर्भ असतो आणि कला कालातीत असते. चिरंजीव असते. परशुराम चिरंजीव आहे, कारण मानवाची नव्या वसाहतीची गरज प्रमाथी असते. व्यास चिरंजीव आहे, कारण प्रतिभेची प्रेरणा प्रमाथी असते. अश्वत्थामा चिरंजीव आहे, कारण त्याची वेदना मानवाच्या उराशी भिडलेली आहे. पण कलेचं चिरंजीवित्व याच्याही पलिकडे जाते. अस्तित्वाच्या मुळाशी असलेल्या चैतन्यालाच ती स्पर्श करते.

मी इतका समुद्र पाहिला, समुद्राचे इतके अवतार देखिले, पण कन्याकुमारीचा अनुभव इतर कुणी दिला नाही. समुद्राचा एक खास अनुभव विमानातून आला. सागराचा विस्तार नजरेत भरतो तो विमानातून. खाली पाण्याचा विस्तार आणि भोवताली आकाशाचा विस्तार ! क्षणभर भान भ्रांत होतं, अभिमान उसळतो नि वाटतं, या विस्तारावर मात करून आपण चाललो आहोत. पण दुसऱ्याच क्षणी प्रार्थनेसाठी परमेश्वराचा शोध सुरू होतो. ( आणि ज्यांना तो अगोदरच लागला आहे ते त्याचा धावा करू लागतात.) समुद्राच्या पाण्यावरची वीण हे एक नवं सत्य विमानातून दिसतं. भर समुद्रात एखादी प्रचंड लाट फुटते आणि वर आपल्या मनात बालकाचं हास्य उमलतं. ग्रीसच्या समुद्रातली बेटं कासवांसारखी दिसली,

आणि ग्रीसच्या प्राचीनतेचा प्रत्यय आला. (ऱ्होड्स बेटावर फिरत असताना थायलंडचे भूतपूर्व पंतप्रधान कुक्रित प्रमोज म्हणाले, " इथली जमीनसुद्धा थकलेली दिसते ! " ईव्हन द अर्थ लुक्स टायर्ड हिअर ! ) इण्डोनेशिआची बेटं फुलापानांनी भरलेल्या तबकांसारखी दिसली आणि इथला निसर्ग आदिदेवतेच्या पूजनात गर्क भासला. श्रीलंकेला जाताना दिसलेल्या खडकांच्या रांगांत सेतुबंधाचे स्तंभ दिसले, आणि हे अवशेष कोणाही पुरातत्त्ववेत्त्याच्या नजरेत कसे भरले नाहीत याचं नवल वाटलं. ( मला तर एका खडकात रामाने सालंकृत केलेली खारीची पाठ दिसली ! ) पेनांगच्या समुद्रात मला एक पाणसर्प दिसला, आणि तेव्हापासून माझ्या स्मृतीत अवचित अग्निबाण शिरतो. जपानात अतामीचा समुद्र पाहिला नि वाटलं : जपान्यांसारखाच तो निसर्गपूजक आहे.नाहीतर अतामीच्या वनश्रीनं नटलेल्या डोंगराच्या पायाशी तो असा चूर का झाला असता ? मनिलाचा समुद्र पाहिला आणि तेथल्या मरिन ड्राइव्हमध्यं या अभिधानाच्या सार्थकतेची साक्ष पटली. मग मुंबई, मद्रास आणि नेपल्स येथले मरिन ड्राइव्हज् आठवले, आणि एकेकाच्या सौंदर्यावर झालेलं मानवाच्या आक्रमणाचं क्रूर वास्तवही आठवलं. मद्रासच्या मरिन ड्राइव्हला मरिनाच्या विशाल, व्यापक, दीर्घ किनाऱ्याची संगत लाभली आहे; पण हा मरिना मानवाच्या नानाविध चेष्टितांनी करवादून गेला आहे. या मरिनावर प्रातःकालच्या पूजेअर्चेबरोबरच प्रातःकालचे विधीही चालतात. ( मद्रासच्या समुद्रातील शार्क मासे याचा बंदोबस्त करू शकत नाहीत म्हणून वाईट वाटतं. ) मुंबईचा मरिन ड्राइव्ह मूळचा सच्च्या प्रकृतीचा. समोरच्या पाण्याचे विभ्रम आणि मलबार हिलवरील वनश्रीचं वैभव यांत डोळे आणि चित्त हरवण्यासाठी जन्माला आलेला. पण राजकारणी कारवायांच्या प्रभावामुळे आज हा मरिन ड्राइव्ह बॅक बे रिक्लेमेशनचा भडमुंज्या बनला आहे. नेपल्सच्या मरिन ड्राइव्हनं नेपल्सपेक्षा ब्राझिलच्या राजधानीतच अधिक कीर्ती कमावलेली दिसते. वास्तविक रिओचा कोपाकबाना म्हणजे निर्दोष अर्धवर्तुळी आकार आणि मऊमुलायम वाळू यांपेक्षा अधिक काही नाही. पण रिओच्या कॅरिओकाला त्याच्यात नेपल्सच्या मरिन ड्राइव्हची मिजास आढळते. (रिओ ब्रँकोवरच्या एका उपाहारगृहाच्या भित्तिचित्रात या दोन किनाऱ्यांची

दृश्यं एकमेकाकडे टवकारलेल्या नजरेनं पहातात. ) खरं म्हणजे कोपाकबानावर देहविनोदनाचे जे प्रकार चालतात ते पाहून नेपल्सच्या कॅथॉलिकांचा क्रूस चळकापू लागेल आणि कम्युनिस्टांचा हातोडाकोयता संतप्त होईल.

समुद्राची अशी अनेक दर्शनं मी घेतली. पण कन्याकुमारी ती कन्याकुमारी ! का ? कारण कन्याकुमारीला तीर्थस्थानाचं पावित्र्य झळकलं. पार्वतीच्या उमटलेल्या पावलानं पुनीत झालेलं आणि असंख्यांना पुनीत करणारं. कन्याकुमारी म्हणजे खरोखर दक्षकन्या पार्वती. ही हिमालय–कन्या इथं का आली ? तिच्या रूपानं हिमालयच इथं समुद्रपूजनास आला काय ? आपण मुळात भूमीवर नव्हतो, समुद्रातुन वर आलो नि पृथ्वीचा मानदंड बनलो याचं कृतज्ञ स्मरण या समुद्रपूजनात अभिप्रेत आहे काय ? की समुद्रमंथनातलं विष प्राशन करून नीलकंठ बनलेल्या शंकराचा शोध करीत पार्वती इथं आली ? की तिचे भक्त बृहन्भारताचा शोध करीत अगस्त्य ऋषीबरोबर समुद्रापार गेले, त्यांना निरोप देण्यासाठी ती आली आणि त्यांची प्रतीक्षा करीत इथंच थांबली ? की उत्तर–भारतीयांच्या दक्षिण–दिग्विजयाची साक्षिणी म्हणून ती येथं स्थिरावली ? की उत्तर–दक्षिणेच्या एकतेचं चिरंतन प्रतीक म्हणून ती इथं कायम झाली ? की पूर्वपश्चिम सागरांच्या येथील अभूतपूर्व संगमाला शुभाशीर्वाद देण्यासाठी ती इथं आली आणि त्या संगमाच्या शुभंकर सौंदर्यात स्वतःला विसरली ?

की ही गौरी म्हणजे खरोखर सीताच ? हर आणि हरी यांच्या एकात्मतेची सहचारिणी ? किंवा सहयोगिनी ? रावणानं तिला श्रीलंकेत पळवलं, पण तिचं कन्या–कुमारित्व अक्षत राहिलं याची ही चिरंतन साक्ष तर नव्हे ? कन्याकुमारी श्रीलंकेकडे एक प्रकारच्या तुच्छतेनं आणि एक प्रकारच्या करुणेनं पहात असते ती याचमुळं का ?

ते कांहीही असो. कन्याकुमारीचं पवित्र तीर्थ माझ्या नास्तिक मनालाही भावलं. माझ्या नास्तिक मनाला स्वामी विवेकानंद जसे भावले तशी आपल्या उत्संगावरील विवेकानंदांच्या आत्मशोधक समाधीनं भावमुग्ध बनलेली कन्याकुमारीही भावली. मी नास्तिक असेन; पण मी भारतीय आहे. दोन नद्यांचा संगम, दोन प्रपातांचा संगम, दोन सागरांचा संगम

दोन झऱ्यांचा संगम — दोन किंवा अधिकांचा, कसलाही जलसंगम भारतीयांना पवित्र तीर्थासारखाच वाटतो. नास्तिक हिंदूलाच का, नास्तिक मुसलमानालासुद्धा वाटतो. युसूफ मेहेरअलींनी हे एका नव्या जगाच्या सुपुत्राला दाखवलं. अमेरिकेच्या बर्ट्राम द वूल्फनी मेहेरअलींना एकदा ॲटलांटिक आणि पॅसिफिक महासागरांच्या संगमावर नेलं. त्या संगमात दृष्टी हरवून मेहेरअली स्तब्ध झाले नाहीत. त्यांनी त्याच्यावर भाष्यही केलं नाही. त्यांनी मुकाट्यानं पायांतले बूट काढले, पायमोजे काढले, आणि त्या संगमात आपली पावलं बुडवली. म्हणाले, " जिथंजिथं संगम तिथंतिथं तीर्थ. भारतीय संस्कृती ही संगमसंस्कृती आहे. " या संस्कृतीत हीण मिसळलेलं असेल — नव्हे, आहेच; पण सारं काही शुद्ध करण्याची शक्ती संगमात असते अशी भारतीयांची श्रद्धा आहे.

# डोंगरावरून

मी पुण्याला रहायला आलो तो चतु:शृंगीच्या पायथ्याशी. ' नाव मोठं नि लक्षण खोटं ' असाच हा डोंगर आहे. उनाड रूप, विरूप दर्शन, बोडका ढंग. त्याची ती चार शृंगं कोणत्या महिषासुरानं मोडून नेली ते कधी कळलंच नाही. ' इथं देऊळ बांध ' असं एका धनिकाला स्वप्न पडलं, निदान अशी आवई उठली, आणि डोंगराला देवळाचं सौभाग्य लाभलं. अर्थात चलाख मानवानं आपली सोय करून घेतली. — मानवानं म्हणजे पुजाऱ्यानं, छोटद्यामोठ्या व्यापाऱ्यांनी आणि जत्रा-विशारद पाकेटमारांनी.

असा हा डोंगर. पण रोज सकाळी उठल्याबरोबर त्याचं दर्शन व्हायचं आणि त्याच्यावर जावं असं वाटायचं.

डोंगरावर जावं असं का वाटतं ? चढताना पाऊल दमतं, दम लागतो, जीव घामाघूम होतो — गुरुत्वाकर्षणाच्या सामान्य नियमाशी दंगामस्ती केल्याचं प्रायश्चित्त द्यावं लागतं. चतु:शृंगीसारखा परचुटण डोंगर सोडा, पण वर्षाकाठी हिमालयाची व इतर अनेक पर्वतांची शिखरं — दुर्गम शिखरं — चढून जाण्यासाठी असंख्य शहाणेसुर्ते लोक जीव पाखडतात तो का ?

मानवाच्या असंख्य प्रश्नांप्रमाणं हाही प्रश्न अनुत्तरितच रहाणार आहे. पण उत्तरदुष्ट प्रश्नांची उत्तरं शोधून काढण्यात मानवाला आपल्या बुद्धीचं सार्थक वाटतं त्याला काय करणार ?

तेव्हा आता या प्रश्नाला सामोरं जायला हवंच. माणसं डोंगर-

माथ्यावर चढण्यासाठी का धडपडतात ? माझे एक मित्र पक्के समाजवादी आहेत. निदान आपल्या समाजवादी निष्ठेबद्दल त्यांना स्वत:ला शंका नाही. त्यांच्या तोंडात नेहमी समतेचा पुरस्कार असतो. पण या गृहस्थाची विद्यमान जगाची जाणही पक्की. ते म्हणतात, मी समाजवादी आहे, पण सध्याच्या विषम जगात मी अत्युच्च स्थानासाठीच धडपडणार. 'आय् मस्ट् बी अॅट् द टॉप्' हा इंग्रजी वाक्प्रयोग त्यांच्या तोंडात तळ देऊन बसलेला असतो. पण सर्वांच्या डोक्यावर असलेल्या जागेचं इतकं आकर्षण का ? प्रासादशिखरे स्थित्वे काकोऽपि गरुडायते — राजवाड्याच्या शिखरावर बसलेला कावळासुद्धा गरुडाप्रमाणे शोभतो, तशातला काही हिशेब या श्रीयुतांच्या डोक्यात वावरत असतो काय ? म्हणजे उंदीर पकडणारा प्राणी, उंदरावर उदरनिर्वाह करणाऱ्या नागाला पकडणं ही एक प्राथमिक करमणूक मानणाऱ्या प्राण्याशी बरोबरी करतो ! हा हिशेब म्हणजे न्यूनगंडाचा निर्वाळाच. पण या आमच्या मित्राच्या ध्यानात एक गोष्ट येत नाही. गरुडाची अंतराळातली तडफदार भरारी नजरेला वेड लावते, कावळ्याचा पंखप्रवास पहाण्यासाठी कोणी नजर लावीत नाही. अत्युच्च पदी वावरायला नुसती महत्त्वाकांक्षा पुरी पडत नाही.

ते जाऊ द्या. पण हे असं उंच उंच जाण्याचं माहात्म्य का ? प्रत्येक क्षेत्रात वर जाण्याची ऊर्मी का ? उंचीचं वेड मानवाच्या वृत्तीतच भिनलेलं तर नसेल ? सूर्याविषयीच्या सनातन वेडातच तर याचा उगम नसेल ? उष:सूक्तांच्या प्रेरणेचं हे पार्थिव रूप तर नसेल ? पण अगदी प्रकाश-पुरुषाची प्रेरणा असली तरी अनेकदा ते अगदी आंधळं असतं. बिनडोक असतं. नाहीतर मुंबईच्या आकाशगामी इमारतीत अगदी वरच्या मजल्यावर राहण्यास शहाणेसुर्ते लोक का धडपडले असते ? तिथं पाण्यावाचून तडफडण्याची, विजेवाचून धडपडण्याची पुष्कळदा पाळी येते. पण तिथं राहण्यासाठी आपले धनिक स्वत:चा जीव, आणि त्याहीपेक्षा अधिक म्हणजे आपला पैसा पाखडतात. मुंबईच्या जंजाळापासून थोडी तरी सुटका करून घेण्याची, म्हणजे खरोखर मुक्तीची आस याच्या मुळाशी असते काय ? माणूस शरीरानं जन्मला, पण बरोबर मन नावाची चीज घेऊन आला.

जन्मकाळी हे मन एखाद्या अणूएवढं छोटं असेल, पण विश्वाइतकं व्यापक होण्याची किमया त्याच्यात असते. या किमयेतूनच मुक्तीची आस निर्माण होते. पण या नाठाळ जगात मुक्ती कसली ? गुरुत्वाकर्षण माणसाला पृथ्वीशी जखडतं. जीवनाची आस त्याला व्यवहाराशी जखडते. तरीपण माणसानं आध्यात्मिक मुक्तीची युक्ती शोधून काढली आहे. इहलोकी, इहजन्मी समाधीच्या साहाय्यानं मुक्तीचा आनंद मिळविण्याची युक्ती त्यानं कल्पिली आहे.अर्थात हे तुमच्या आमच्यासारख्याचं काम नोहे. म्हणून मानवानं देवाची कल्पना काढली, स्वर्गाची कल्पना काढली. देवलोकाची स्थापना केली, स्वर्गाची स्थापना केली, आणि त्याचं अधिष्ठान उंचावर राखलं. आपली उत्तमोत्तम देवस्थानं पर्वतावर आहेत — हिमालयावर, सह्याद्रीवर, विंध्यांद्रीवर. देवाचा लोभ सपाटीपेक्षा डोंगरावर अधिक असतो की काय हे त्यानं आपल्याला सांगितलेलं नाही, पण त्याच्या भक्तांचा नक्की असतो. कैलासवासी म्हणजे कैलास पर्वतावर जाऊन बसलेला असं अगदी शब्दनिष्ठ दृष्टीनं पाह्यचं नसलं तरी स्वर्ग आणि पर्वत यांचं काही तरी घनिष्ठ नातं आपल्या पूर्वजांनी जोडून दिलेलं आहे यात शंका नाही. नाहीतर एकामागं एक उभ्या असलेल्या हिमालयाच्या रांगांना स्वर्गसोपान कल्पून त्याच्या खडतर चढणीवर आपली थकलेली पावलं टाकण्यास पांडवांनी का सुरुवात केली असती ? कालिदासनं हिमालयाला पृथ्वीचा मानदंड मानला, पण व्यासांनी त्याची शिडी चक्क स्वर्गाला टेकली होती. आजच्या नास्तिक युगात स्वर्गाचं थोडं अवमूल्यन झालं आहे. तीर्थयात्राही तशा फॅशनेबल उरलेल्या नाहीत. पण त्यांची जागा गिर्यारोहणानं घेतली आहे. गिर्यारोहणानं स्वर्गीय आनंद मिळत नसेल, पण मुक्तीचा आनंद मिळतो. इहलोकीच्या मुक्तीचा. काही काळ जगाच्या झंझटापासुन मुक्त होता येतं. जगाचे क्षुद्र ताप विसरता येतात. व्यवहाराचे क्षुद्र हिशेब कडीकपाटात बंद करता येतात. किंबहुना त्यांच्याकडे तुच्छ दृष्टीनं पाहाता येतं. पाहावंच लागतं. जगाच्या व्यवहारी हिशेबानं वागून तिथं चालणारच नाही. तिथं तुमचे संकेतच बदलतात. सारं काही बदलतं. अन्न बदलतं, पोशाख बदलतो, वेळापत्रक बदलतं, श्वासोच्छ्वासाचा वेगसुद्धा बदलतो. मुख्य म्हणजे पर्वतावर तुमची अनुभवाची जात बदलते. वारा म्हणजे काय,

प्रकाश म्हणजे काय, रात्र म्हणजे काय, जीवनाच्या कडेवरून चालणं म्हणजे काय, जीवनमृत्यूची सीमा म्हणजे काय, निसर्ग म्हणजे काय, या साऱ्यांच्या व्याख्याच बदलतात. पृथ्वीचं स्वरूपच बदलतं. आकाशही बदलतं, त्याच्या विशालतेचा, अथांगतेचा, सौंदर्याचा नवा प्रत्यय येतो. पंचमहाभूतांशी नवं नातं जडतं. निसर्गाचा नवा साक्षात्कार होतो. जगाचाच नवा साक्षात्कार होतो. जगाबद्दल एक सहानुभूतीचं अमृत प्यालेली कीव वाटायला लागते. मुख्य म्हणजे स्वतःचा नवा साक्षात्कार होतो. कारण अनुभवाचा नवा साक्षात्कार होतो. मानव हा खरा अनुभवाचा भुकेला असतो. नेहमीच्या जीवनात आपण अव्याहत अनुभव घेत असतो, पण याची जाणीव उरतच नाही. आता अनुभवाची ओळख होते. खरी जाण होते. वामन मल्हार जोशी म्हणाले होते, भूक म्हणजे काय हे खरं तुरुंगात समजतं. अनुभव म्हणजे काय हे उंच पर्वतावर समजतं.

अर्थात डोंगरमाथ्यावर जाऊन असा काही साक्षात्कार करून घेण्याची महत्त्वाकांक्षा मी बाळगीत नव्हतो. माझं डोंगरावर जाणं हा एक मामुली फिरण्याचा प्रकार होता. पण त्यानंसुद्धा एक अकल्पित दृश्य उमललं. पुण्याचं. मी चतुःशृंगीवर गेलो, मागं वळून पाहिलं आणि समोर शहर पुणं उघडलं.

पुणं तसं एकदम उघडलं, तर ते पुणं कसलं ? पुणं तसं जात्याच खोडकर. आपल्या पुण्याचा प्रारंभ सोन्याच्या नांगरानं झाला. हे सोनं बावनकशी होतं याबद्दल आपण शंका घेऊ शकतच नाही. काही झालं तरी तो दादोजी कोंडदेवांनी शिवाजीसाठी बनवला होता. असं आपलं पुणं सोन्याच्या नांगरानं सुरू झालं. पण नंतर इतिहासानं त्याच्यावर कधीमधी गाढवाचा नांगर फिरवलाच. पण खरा फिरवला तो दुसऱ्या बाजीरावानं — पुण्याबरोबर मराठ्यांच्या इतिहासावरही. एकाच नावाचे दोन विरुद्ध प्रकृतीचे आणि कर्तृत्वाचे पेशवे निर्माण करण्याचा विक्रम पुण्यानंच केलेला आहे. नंतर एल्फिन्स्टनसारख्या सुसंस्कृत सद्‌गृहस्थाचा अंमल सुरू झाला. बाजीरावाच्या स्वराज्यापेक्षा साहेबाचं सुराज्य बरं, असं काही जणांना वाटायला लागलं. पण बाजीरावाच्या रमण्यात सोकावलेल्या सनातन्यांनी आणि त्यांच्या अवलादीनं पुण्याच्या नावाला असा साहेबी बट्टा लावण्याचं

साफ नाकारलं. त्यांनी गर्दभानंदाच्या मिरवणुकीचा सोहळा साजरा केला, आणि आगरकरप्रभृती सुधारकांना ' आपलं मरण पाहिलं मी डोळां ' असा अपरूप अनुभवही दिला. पण याच पुण्यात आधुनिक भारतीय राजकारण, आधुनिक मराठी भाषा व वाङ्मय, आधुनिक सुधारणा सुरू झाल्या. पुणं हे त्यातून वाहणाऱ्या मुळा नदीसारखं आहे. त्यात गाळ आहे. त्यावर शेवाळ आहे. अवघ्या शहराची घाणेरी तिच्या काठी धुतली जातात. पण तिचं पाणी पिऊनच पुणं जगतं. मात्र हे पाणी शरीरात मस्ती आणि डोक्यात मिजास निर्माण करणार नाही अशी खात्री नाही. पुण्याला मार्गावर आणण्यासाठी एखादं धरणच बांधायला हवं. पण तेही फुटणार ! पुण्याच्या कुंडलीत सोन्याचा नांगर आहे, तसा गाढवाचा गोंधळही आहे. इथं साहित्य–संमेलन सुरूही होतं आणि ते साफ संपणार की काय असंही वाटायला लागतं पण काही झालं तरी पुणं संपणार नाही. ते चिरंतन रहाणार कारण पेन्शनरांची अखंड मालिका इथं येऊन स्थायिक होणार ! म्हणून पुणं हा एक जिवंत इतिहास आहे — अस्ताच्या सरहद्दीवर वावरणारा.

असं हे पुणं समोर उघडलं — म्हणजे सारं पुणं नव्हे. पुण्याचे काही भाग. काही डोळ्यांना दिसले नाहीत; पण मनाचे नेत्र तिथं गेले. ' सर्व्हंट्स् ऑव्ह इंडिया सोसायटी'ची इमारत दिसत नव्हती; पण त्या इमारतीच्या गच्चीवर आरामखुर्चीवर रेललेली नामदार गोखल्यांची श्रान्त, विचारमग्न मूर्ती नजरेसमोर आली. ' फर्गसन कॉलेज'ची इमारतही दृष्टिपथात येत नव्हती; पण अंगात बाराबंदी आणि हातात चिलीम असलेली आगरकरांची खोकणारी मूर्ती नजरेतलं तेज फेकीत होती. गायकवाडवाडा तसाच नजरेआड होता; पण आतली मूर्तिमंत स्थितप्रज्ञता गर्जत असलेली ऐकू येत होती. शनिवारवाडाही दिसत नव्हता; पण दिसला असता तरी त्याच्या आत्म्याचा शोध अशक्यच होता. अगदी ठळकपणं दिसत होता तो पंचहौद मिशनचा टॉवर — आणि अर्थात गोपाळराव जोशींची कळलावी करामत आठवणींच्या भोवऱ्यात फिरू लागली. पण या गोपाळराव जोशींची देखील साजुक खिचडी शिजवणारा लेखक या पुण्यातच निर्माण होणार हे या गोपाळरावांना काय माहीत ? या पुण्याचं हे एक वैशिष्ट्यच म्हणायला

हवं — ते मोठ्या लोकांना ( आणि लहान लोकांनाही) जन्माला घालतं आणि त्यांच्या वाङमयीन बेअब्रूची व्यवस्थाही करून ठेवतं.

मी पुण्याकडे पाहात होतो. पुण्याचा इतिहास हेच त्याचं प्रधान वैशिष्ट्य. तेव्हा तो आठवणारच. पण कोकणातल्या एका आडगावीसुद्धा डोंगरावर बसून माझी रिकामटेकडी नजर त्याच्यावर फिरवली, तेव्हा ती थेट त्याच्या वसतीच्या उगमापर्यंत पोचली. वास्तविक तसं होण्याचं कारण नव्हतं. तिला निसर्ग–लावण्याची भूल पडायला हवी होती. ते खेडं म्हणजे सृष्टिसौंदर्याची एक मधुर लकेर होती. दोन डोंगरांच्या रांगांनी काटकोन करून एक सुरक्षित जागा तयार केली. त्या काटकोनात उगम पावून ओढ्याचा एक देखणा प्रवाह अवखळ गाणी म्हणत वाहू लागला, आणि समोरच्या आडव्या ओढ्याला मिळाला. या गावाची तिसरी सीमा या आडव्या ओढ्यानं आखली. हे तिकोनी गाव म्हणजे कुण्या देवतेनं मानवाला दिलेलं अपूप आंदणच. उत्तरेकडच्या डोंगरावरच्या एखाद्या शिळेवर बसून पाहिलं म्हणजे सबंध गाव एकदम डोळ्यांत भरतं. किंवा भरतही नाही, कारण नजर एकदम स्तिमित होते. निसर्गाच्या सौंदर्यानं वेडी होते. उजवीकडच्या राईवर स्तब्ध स्थिरावते. ती राई – आइन, किंजळ, जांभूळ, खैर, पांगारा, साग वगैरे झाडांची स्वैर पखरण झालेली. या पखरणीवर वनवेलींची नक्षी पसरलेली. तिच्यातून ग्रामदेवतेच्या देवळाचं साधं केंबळी पण विश्वस्त शिखर दाखवणारी. सबंध गावाशी आपल्या अक्षत अधिकारानं काहीशी फटकून वागणारी. फक्त पोपट, साळुंक्या, चिमण्या यांनाच स्वतःशी सलगी करू देणारी. स्वतःच्या रंगीन पर्णसंभारावर या पाखरांच्या रंगीन पंखांची चलच्चित्रं दाखवणारी. यांच्या आवाजांनी निसर्गाचा मंत्रजागर करणारी. तो ऐकताऐकता हाताखांद्यांवर विलोल खारींना खेळवणारी. शेजारच्या शेतांतील भाजावळीच्या संस्कारित धुरानं आपला पर्णकलाप शुद्ध करून घेणारी. गावातील लोकांच्या ध्वनि–प्रतिध्वनींना दमदार उठाव देणारी — अशी ती राई त्या गावाचं आदिम वैभव होती. त्या वैभवात नजर शिरली की तिची शुद्धच हरपते. तिला ताळ्यावर आणण्याचं सामर्थ्य ओढ्याकाठच्या शंकराच्या देवळातच होतं. देऊळ

अगदी या वैराग्यनिधीला शोभणारं. चंद्रमौळी खोपट. वारुळांनी बांधलेल्या ओटयावर उभारलेलं. समोवार राखी रेताड जमीन पसरून स्मशानवैराग्य धारण केलेलं. तापसी बेलाच्या झाडाची अधुरी सावली पांघरून बसलेलं. आणि आत जांभ्या दगडाची फुटकी पिंडी असलेलं. इतर सर्व समृद्ध देवळांचा त्याग करून त्रैलोक्यनाथ इथं वास करतो ही गावकऱ्यांची श्रद्धा अर्थातच सार्थ होती. समोर नंदी नव्हता ही उणीव भासण्याचं कारण नव्हतं. पिंडीसमोर उभा राहिलेला प्रत्येक भक्त ती उणीव भरून काढी !

डाव्या बाजूच्या डोंगरावर खोतांची कौलारू घरं—ओढयाला उगमापाशीच्या धरण बांधून आणलेल्या पाटाच्या पाण्यावर पोसलेल्या पोफळीच्या बागांचं आश्वासन, आधार आणि आश्रय असलेली ही घरं आणि ती दोन संस्कृतींची दोन देवळं यांच्या दरम्यान भातशेतं होती – पाटाच्या पाण्यानं तर्र्र फुगलेली, दुपारच्या उन्हात तजेललेली, सायंकाळच्या वाऱ्या-वर मस्त डोलणारी आणि खोतांच्या संसारांना वर्षभराची निश्चिती देणारी.

असं या खेड्याचं रेखीव सौंदर्य. त्यानं नजर मुग्ध व्हायला हरकत नव्हती अंत:करणाचं समर्पण होण्यास अडचण नव्हती. पण सौंदर्याला शाप असतो हेच खरं. माणसाची खटयाळ बुद्धीच तो देत असते. माझ्या डोक्यात चौकस किडा वळवळू लागला. या गावात फक्त खोतच रहातात की काय ? समोरच्या शेतांत राबणारी गडीमाणसं कुठं रहातात ? ही डोंगरावर चरणारी गुरं राखणारे गुराखी — त्यांची घरं कुठं आहेत ? अर्थात गावाच्या कडेला. जिथं पाटाचं पाणी पोचत नाही, जिथल्या बायकांना ओढयातल्या डबक्यातून पाणी आणावं लागतं, जिथं अर्धपोटी अन्न येतं ते खोतांच्या शेतात गाळलेल्या घामातून. अकराव्या शतकात शिलाहारांचे शिलेदार म्हणून हे खोत आले आणि त्यांनी मूळच्या रहिवाशांना खबदाडीत ढकललं. या खोतांनी ओढयाला धरणं बांधली असतील. बागा उभारल्या असतील — पण त्यांनी आपलं बूड गावच्या निवडक भागावर बळजोरीनं रोवलं यात शंकाच नाही. या गावात मी वारंवार येई. तिथल्या गारव्यानं माझी नजर निवे. तिथल्या निवाऱ्यानं मला विसावा मिळे. तिथल्या निवान्त

शांततेनं माझं अंतरंग तुष्ट होई. पण एकदा हा इतिहासाचा स्क्रू डोक्यात पिळवटला आणि ती सारी समाधानी स्वस्थता नष्ट झाली. त्या गावाकडे पहायची सारी दृष्टीच बदलली. तिच्यात अपराध, संताप, कणव, अगतिकता यांचं एक विपरीत मिश्रण ढवळू लागलं. महाराष्ट्राच्या भूमीवर ठिकठिकाणी किल्ले–कड्यांचे आकार धारण करून इतिहास वावरतो. पण इथं अशा विद्रूप स्वरूपात तो प्रकट होईल असं वाटलं नव्हतं.

पण कधीकधी तो अगदी आगळी कळा दाखवतो. दिल्लीला काश्मिरी गेटपलीकडील टेकडीवर उभं राहून दिल्ली विद्यापीठाच्या कचेरीकडे दृष्टी टाकली की एक आश्चर्य साकारतं. अगदी स्वतःच्या आत्म्याची शपथ घेऊन सांगितलं की, या कचेरीची इमारत म्हणजे एका काळचा 'व्हाइसरीगल लॉज', तर थापेबाजीचा रेकॉर्ड–ब्रेक केल्याचं अभिनंदन पदरात पडेल. आणखी असं सांगितलं की, या कचेरीतील रजिस्ट्रारच्या खोलीत माउंटबॅटन लेडी माउंटबॅटनना प्रथम भेटले, तर हे अतिच झालं या समजुतीनं मारपीट होण्याचाही संभव. पण मेंदूला आश्चर्याच्या मुंग्या आणणाऱ्या या गोष्टी अगदी खऱ्या आहेत. ज्या साम्राज्यावर सूर्य मावळण्याची तेव्हा कुणी कल्पनाही करू शकत नसे, त्या साम्राज्याचा बड्यांतला बडा लाट या, आज एखाद्या चीफ सेक्रेटरीला रहायला दिला तर तो त्याला आपल्या पोझिशनचा उपमर्द करण्याचा प्रकार हमखास वाटेल अशा, बंगल्यात रहात होता हे सांगितलं तर ती खात्रीनं एक सुरस आणि चमत्कारिक अशी परीकथा वाटेल. ( हिंदुस्थानची प्रगती झालेली नाही असं कोण म्हणेल ? ) पुढं हाच लाट नव्या दिल्लीच्या 'व्हाइसरीगल लॉज'मधं ( म्हणजे आपल्या राष्ट्रपतिनिवासात ) राहायला गेल्यावर आपलं पुनरुत्थान (रिसरेक्शन) झाल्यासारखं त्याला खात्रीनं वाटलं असेल. पण असं मात्र नक्कीच वाटलं नसेल की, हा दिवा जाण्यापूर्वी मोठा होण्याचा प्रकार होता आणि एक पिढी उलटण्याच्या आतच आपल्या साम्राज्यावरचा सूर्य कायमचा जलसमाधी घेईल. पण असं न वाटल्याबद्दल त्याला कोण दोष देईल ? ज्यानं सत्तासंक्रमणाचा सोहळा याची देही याची डोळा केवळ पाहिला नव्हे, तर घडवून आणला त्याला सुद्धा (एका नोकरशहाच्या एका उद्‌गारावरून) नेहरू–पटेल आपल्याला राज्य कारण्यास पुन्हा बोलावीत आहेत असं वाटलं नव्हतं काय ?

भावनेनं बुद्धीशी खेळणं आणि तिला भ्रमवणं हा एक फार जुना रोग आहे.

दिल्लीच्या या टेकडीवरून विद्यापीठाच्या इमारतीकडे लक्ष टाकलं की त्याच्या शीघ्र शैक्षणिक विकासामुळं मन आश्चर्यानं भरून जायला पाहिजे. तसं काही न होता मन इतिहासात का गेलं आणि गुंगलं? हा इतिहासाचा वेध का? खरं म्हणजे भविष्याचा वेध लागायला हवा. तसा अर्थात तो लागतोच. नाहीतर आजच्या विज्ञानयुगात ज्योतिष्याच्या घरापुढं हत्तीप्रमाणं मोटारी का झुलत असतील? भविष्याचा वेधच का, वेड लागतं. परवा एक मार्क्सवादी विद्यार्थी माझ्याशी ज्योतिष्याच्या खरेपणाची ग्वाही देणारी हुज्जत घालीत होता! पण पत्रिकेतील भविष्याला तोंड देणं तसं सोपं असतं. ते देताना आपली बुद्धी थोडी शिथिल झालेलीच असते. पण खऱ्याखुऱ्या भविष्याला तोंड देणं महाकठीण. भविष्य म्हणजे एक प्रचंड बोगदा – काळ्याकुट्ट अंधारानं भरलेला. त्या मानानं इतिहास सोपा. त्याचे काही अवशेष अद्याप रेंगाळत असतात आणि आपल्याला त्यांत शिरण्याची वाट दाखवीत असतात. आपल्या डोक्यात इतिहासाची काही हाडं भरलेली असतातच. त्यांच्या घर्षणानं काही थोडे स्फुल्लिंग उडतात, व त्यांचा, निसटता का होईना, प्रकाश पडतो. आणि हा प्रकाश आपले पूर्वग्रह यथास्थित पोशीत असतो. दुसऱ्या महायुद्धावर थोडी कुशल लेखणी चालवणाऱ्या एका लेखकानं मला एकदा सांगितलं की, माओच्या गनिमी तंत्रापेक्षा शिवाजीचं गनिमी तंत्र सरस होतं. या दोन तंत्रांच्या दरम्यान तीनशे वर्षांचा युद्धतंत्रप्रगतीचा काल गेला याचा त्याला साफ विसर पडला होता. माओच्या गनिमी तंत्राच्या भाषेतच बोलायचं म्हणजे आमच्या या इतिहासज्ञाची बुद्धी जेव्हा चढाई करीत होती, तेव्हा त्याच्या मेंदूतील स्मृतीच्या पेशी माघार घेत होत्या; आणि त्याची बुद्धी माघार घेत होती तेव्हा त्याच्या कल्पनाशाली पेशी चढाई करीत होत्या! नाहीतरी इतिहासात शिरताना आपल्या डोक्यात एक गनिमी युद्ध सुरू असतंच, आणि तिथं गनिमी काव्याला भरपूर अवसर असतो.

इतिहास हे एक गुप्त दर्शन असतं. लिपी न लागणाऱ्या शिलालेखा-

सारखं. त्यातच काही अक्षरं झिजून गेली आहेत असं. काही अक्षरं लागतात; काही लागत नाहीत. नव्यानं लागतात ती जुन्यांना खोडून काढतात सगळी लागतात तेव्हा त्यांचा एकसंध बोध होतच नाही. आणि बोध होतो तेव्हा हा नवा शिलालेख जुन्यांविरुद्ध बंड पुकारतो. इतिहास प्रत्येकासमोर हजार कँडल पॉवरचा टॉर्च घेऊन येण्याचं आव्हान उभं करतो. अडचण एवढीच की, असा टॉर्च सापडला तरी तो हातात धरवतच नाही. इतिहास प्रत्येकासमोर इतिहासाचार्य राजवाडे बनण्याचं आव्हान खडं करतो; पण ती एकाच वेळी प्रखर आणि नागमोडी असलेली बुद्धी आणायची कुठून ? मात्र इतिहास पुष्कळदा सत्य पुसुन काढण्याचंच आमिष उभं करतो, आणि ते स्वीकारण्याची शक्ती आपल्यापैकी बहुतेकांत असतेच-यात आणखी एक बरं असतं. यामुळं विद्वत्तेचा आभास उत्पन्न होऊ शकतो. मग सत्य आणि विद्वत्ता यांचा काही संबंध उरत नाही. आपण सत्य सहज विसरतो, आणि विद्वत्तेची तारीफ करतो. सर्वांत झकास गोष्ट ही की, यातलं सत्य उजेडात येण्याची सहसा धास्ती नसते. — कारण इतिहास म्हणजे काही अक्षरं गायब झालेला शिलालेख !

आणि तरी आपण इतिहासाला गुंगारा देऊ शकत नाही. तुम्ही कुठंही जा, इतिहास तुम्हाला घट्ट दोरखंडानं आवळीत असतो. शाळा–कॉलेजांतील विद्यार्थ्याला तर इतिहास म्हणजे मानेवर बसलेलं भूतच वाटतं. तो म्हणतो, पृथ्वीराज चव्हाणाशी आपला काय संबंध ? संयोगितेशी त्याचा संयोग झाला तो त्याचा त्याला लखलाभ ! मला का त्याचा ताप ? पण नाही, कोणा एका मुसलमान उठावगीरानं त्याचा पराभव केला आणि ती बाब आपल्याला अद्याप छळीत आहे. मी आता रेडिओवर दरबारी ऐकत आहे. त्याच्या स्वरांनी माझी संज्ञा हवेत तरंगत आहे, पण तेवढ्यावर तो मला थोडाच सोडतो ? त्याचा निर्माता जनाब तानसेन माझ्या स्मरणपेटिकेत शिरतो आणि मला थेट अमीर खुश्रूपर्यंत खेचतो. मी टी. व्ही.वर भारत–ऑस्ट्रेलियन क्रिकेट-सामन्याची दृश्यं लावतो आणि इंग्लंड–ऑस्ट्रेलियाच्या कसोटीला नुकतंच शतक पुरं झाल्याचा तपशील माझ्या डोक्यात डचमळू लागतो. मी सकाळचा पेपर उघडतो, इंदिरा गांधींचं नाव वाचतो, व आणीबाणीची आठवण होते. आणि साम्राज्यवादी लॉर्ड लिटननं सुद्धा वृत्तपत्रांवर अशी नियंत्रणं लादली

नव्हती हे ध्यानात येतं. इतक्यात खिडकीतून सूर्याचा एक किरण येतो, या किरणावर आइन्स्टाईन आरूढ झाला असेल काय असा मनात विचार येतो आणि तो न्यूटनपर्यंत पोचतो. नंतर लगेच आठवणीला तिढा बसून सूर्य-पृथ्वीचं नातं मनात उमलतं आणि विश्वाच्या इतिहासात जाण पार हरवते. खरोखर इतिहास म्हणजे कालाचा साक्षीदार, आणि आपण सारी कालाचीच अपत्यं होय. पूर्वजांना विसरण्याची एक कला असते व ती आपण छानपैकी साध्य करून घेतली आहे. खरं म्हणजे आपण पूर्वजांना विसरतो म्हणून आपलं खट्टंमिठ्ठ आयुष्य सुखरूप चालतं. त्याला कृतघ्नतेची फार बाधा होऊ नये म्हणून आपण स्मृतिदिनांची युक्ती काढली आहे. पण ही युक्ती काढावी लागते याचाच अर्थ असा की आपण इतिहास विसरलो तरी इतिहास आपल्याला विसरत नाही.

पुष्कळदा मी डोंगरावर चढलो, पण इतिहासात शिरलोच नाही. महाराष्ट्रातले डोंगर म्हणजे किल्ले, आणि किल्ले म्हणजे इतिहासाचे जागते बुरुज. ते इतिहासावर दुर्बिणी रोखूनच असतात. त्यांची नजर सतत ऐतिहासिक टेहळणीची असते. पण माझे काही डोंगर इतिहासाचे लेप घातलेले नसतात. निर्लेप असतात. मी माझ्या लांजे गावातील आवाराच्या मावळतीला उभ्या असलेल्या डोंगरावर चढतो तेव्हा तेथून समुद्र दिसतो का हे पाहाण्याचा वृथा आणि वेडा प्रयत्न झाल्यावर मी हमखास माझ्या घराच्या आवारात नजर टाकतो, तेव्हा माझ्या नजरेसमोर इतिहासाचीच भुतं नाचतात असं नाही. तशी थोडीशी नाचतात, पण त्यांचं आकर्षण असतं ते ऐतिहासिक घडामोडींचं नाही, तर चिरंतन अशा मानवी स्वभावाचं. तसा थोडा इतिहास असतोच, कारण मी माझ्या लहानपणची दृश्यं पाहातो. सर्वप्रथम मला दिसतो तो आमच्या जुन्या सामायिक घराचा चौथरा. घराच्या चौथऱ्यावर बैलाचा नांगर चालवीत नाहीत, म्हणून तिथं ऋषीची भाजी लावीत. नंतर आठवते ती जुनाट पडकी उघडी विहीर — आमच्या म्हशीला अलगद गिळंकृत करणारी. या म्हशीच्या या अपघाती मरणामुळं धाय मोकलून रडणाऱ्या माझ्या आजीची विकीर्ण मूर्ती माझ्या नजरेसमोर उभी रहाते. आमची ही म्हैस ' अखूड शिंगी — बहुदुधी ' होती. ती

आमच्या गोठ्यातल्या गाईपेक्षा काय तर गोगलगाईपेक्षाही गरीब होती. तिला गरीब होणं भागच होतं. एच. जी वेल्सनं सांगितलं आहे की, कुरूप मुलीशी लग्न करावं – त्या स्वभावानं गरीब असतात. त्यांना जसं गरीब व्हावंच लागतं तसं आमच्या या बिचाऱ्या म्हशीला गरीब व्हावंच लागलं – ती जन्मांध होती. नंतर माझ्या नजरेसमोर येतं ते अंगणासमोरचं चिवारीचं बेट. त्याचे ते हिरवे–कापशी रंगाचे चिवे, त्यांची ती धारदार आकारशील पानं, त्यांचं ते शानदार राजस रूप. एकेक चिवा म्हणजे नाजुक नक्षीदार शिल्प, आणि सारं बेट म्हणजे एक ढंगदार वास्तुशिल्प ! ते बेट वाऱ्यावर डौलानं हलू सळसळू लागलं म्हणजे एकेक चिवा शेजाऱ्यांशी कानगोष्टी करी आणि सारं बेट अज्ञात अज्ञेय गोष्टींनी भरून जाई. एक दिवस त्या चिवारीला फुलं आली, त्या बेटाला एक नवीच रंगीन उभारी आली. पण माझे आजोबा चुकचुकू लागले. माझ्या प्रश्नार्थक चेहेऱ्याकडे पाहत म्हणाले, " चिवारीच्या बेटाला साठ वर्षांतून एकदा फुलं येतात आणि ते जगाचा निरोप घेतं " असं म्हणून त्यांनी खोलीतून अंगारा आणला, मंतरला, आणि त्या बेटाला गती देण्यासाठी की काय, त्याच्यावर फुंकला.

माझे आजोबा मोठे मांत्रिक होते. पायाखाली लागलं ( म्हणजे सापबिप चावला ) की पंचक्रोशीतली माणसं त्यांच्याकडे येत. मग तात्या पंचांग पहात, तांब्यात पाणी घेत, योग्य तो मंत्र म्हणत, आणि ते मंतरलेलं पाणी देत मग ते जात, आमच्या आवारात एक रिंगीचं रिठ्याचं झाड होतं त्याच्या मुळाशी उकरून कसलंतरी पाळ काढीत, आणि ते त्या पाण्यातून उगाळून घ्यायला सांगत. अनेक लोक येत आणि रोगी बरा झाल्याचं सांगत. दगावल्याचं कुणी सांगितलेलं आठवत नाही ! तात्या कुठून पाळ आणीत ते मी पाहून ठेवलं होतं – आणि मग मी माझ्या मंतरलेल्या बालबुद्धीनं येईल–जाईल त्याला सांगे, " साप चावलाय ? रिंगीचं पाळ उगाळून घ्या म्हणजे विष उतरेल " यावर लोक विचित्र हास्य का करीत ते मला कधीच कळलं नाही.

माझं आवार आठवलं की माझ्या काकाची ती कपाळाची शीर फुगलेली, करारी पण अंतर्यामी अतिशय प्रेमळ अशी मूर्ती माझ्यासमोर उभी रहाते. गावातल्या लोहार–गवंड्यापासून घरच्या गडीमाणसापर्यंत सर्वांशी

जिगरदोस्ती असणाऱ्या या पुरुषाचं आपल्या बायकोशी पळभरही पटलं नाही. बिळात वळवळत शिरणाऱ्या नागाला सपकन शेपटीनं ओढून जमिनीवर आपटणाऱ्या या बहाद्दराला काकीची तोंडात वळवळणारी जीभ कधीच धरता आली नाही. कोणत्याही मारक्या रेड्याला कान धरून वठणीवर आणणाऱ्या या गड्याला बायकोचा कान पकडून कधी सरळसूत करता आलं नाही. नुसत्या नजरेच्या जरबेनं कामचुकार पैऱ्यांना कामाला लावणाऱ्या या रिंगमास्तरला सदान्कदा फुरंगटून बसलेल्या या बाईला कधी कामाला लावता आलं नाही. नुसत्या निरोपानं जहांबाज कुळांना दारात उभं करणाऱ्या या जबरदस्ताला, माहेरी दडी मारून बसलेल्या बायकोला संसारी ओढता आलं नाही. त्याला गावचा संसार झकास करता आला; पण स्वतःच्या संसारात सतत झक मारावी लागली !

दुसरा एक काका. जरा दूरचा. एका काळचा 'कॅसानोव्हा', पण त्या उद्योगात पुरुषत्व गायब झालेलं. आता कामिनीऐवजी कनकाची चटक लागली. नवऱ्याची ही नस अचूक ओळखून त्याच्या धर्मपत्नीनं गावातल्या एका देखण्या पैसेवाल्याशी दोस्ती केली, आणि नवऱ्यानं त्याच्याशी धंद्यात भागिदारी जमवली ! दुसरा एक दूरचा काका. विरुद्ध प्रकृतीचा. दशग्रंथी ब्राह्मण. पण ठोंब्यांच्या मेळाव्यात विद्वत्तेचं जे होतं ते त्याचं झालं. तो ठोंब्यांचा राजा झाला. त्याच्या यजमानांनी उगीच भेदभाव केला नाही. इतर भटजींना जी दक्षिणा, तीच त्याला — ढबू पैशाची ! एक दिवस मी गावी असताना तो भेटायला आला. माझ्या हातात कालिदासाचं 'मालविकाग्निमित्र' होतं. त्याच्यावर त्यानं अधाश्यासारखी झडप घातली. वाचायला घेऊन गेला. परत करायला आला तेव्हा त्याच्या डोळ्यांचा पुनर्जन्म झाला होता. या गांवढ्या गावात त्याच्या जीवनाला अर्थ आला होता — थोड्या वेळापुरताच, स्वतःपुरताच, पण खरा !

त्या दुर्दैवी, नवरा नाहीसा झालेल्या काकूची आठवण झाल्याखेरीज गावचा निरोप मला कधी घेताच आलेला नाही. ती अश्राप स्त्री. आपादमस्तक कुरूप, पण स्वभावानं सुंदर. तिच्या घरी तिला अश्रू ढाळायची परवानगी नसावी. तेवढी फुरसदच नसे. पण घरच्या कामाचे डोंगर उपसून ती शेजारापाजाऱ्यांची कामं करायला धावे -- तिथं अश्रू ढाळायला मिळत

म्हणून असेल. तिच्या अंतःकरणात लाव्हा खदखदे; पण चेहेऱ्यावरचं हसू क्वचितच लोपे. आज आता मला तिची पिंपळाभोवती प्रदक्षिणा घालणारी मूर्ती दिसते आहे. अखंड कष्टांच्या तपस्येत ही हटातटाची भर. पिंपळराजा ती निर्विकार नजरेनं पाही आणि आपल्या सळसळण्याच्या उद्योगात निमग्न राही. कावळ्यांचा कलकलाट, कुत्र्यांचं भुंकणं, कोल्ह्याची कुई, गुराख्यांचं भांडण — कशाकशानं त्याची समाधी भंग पावत नसे. आपल्या सावलीत रवंथ करीत बसलेल्या एकाक्ष गाईकडे ज्या निश्चल नजरेनं तो पाही त्याच नजरेनं, आपल्या भोवती घातलेल्या भन्नाट फेऱ्यांनी भोवळ येणाऱ्या या परित्यक्तेकडं तो पाही — आपल्या लांबलचक सनातनी परंपरेच्या ढम्म् वृत्तीनं !

पण डोंगरावर मला नेहेमी इतिहास भेटला अगर माणसं भेटली असं नाही. डोंगरावरून मला निर्विकल्प निसर्गही भेटला. निर्विकल्प म्हणजे माणसांच्या लुडबुडीला दाद न देणारा.

मी रत्नागिरीच्या किल्ल्यावर गेलो. किल्ला इतिहासाला दाद घालणारा. आमच्या शाळेनं 'तोतयाच्या बंडा'चा प्रयोग नुकताच केला होता. त्यात रत्नागिरीच्या किल्ल्याला स्थान आहे. पण मला या किल्ल्यावरून जाणवली ती काळ्या कड्यावरील लाटांची प्राणघातक धडक ! ते दोन शक्तींचं युद्ध ! निसर्गाच्या दोन रूपांची झटापट ! बर्क्लेला मी अगदी (कृत्रिम) ग्रीक थिएटरच्या सान्निध्यातुन पाहिलं. मला आढळला तो पॅसिफिकच्या निळ्या पाण्याचा विस्तार. अवघ्या विस्तारावर नजर फिरण्याचीही गरज भासली नाही. तिला क्षितिजावरून तरंगत-तरंगत येणारी हवाई बेटं दिसली ! इण्डोनेशिआत बांडुंगला जाताना एका डोंगराच्या खिंडीत टुमदार ठाण मांडून बसलेल्या उपाहारगृहातून पाहिलं — आणि पावसाळी कोकणाचा एक तुकडा आसामच्या चहामळ्याशी गुफ्तगू करीत समोर उमलला ! म्हैसूरच्या चामुंडी टेकडीचं सौंदर्य नजर बांधून ठेवीत असतानासुद्धा ती पार पलिकडच्या भूभागावर फिरली आणि इंग्लिश 'लॅण्डस्केप'चा एक तुकडा इथं कसा आला याचं नवल करीत बसली. हाँगकाँगच्या व्हिक्टोरिया बेटावरील डोंगरावरून समुद्र

पाहिला आणि खवळलेल्या लाल चिनी जीवनसमुद्रातून या समुद्रात प्रवेश करणाऱ्या निर्वासितांच्या जीवघेण्या निर्धाराचा अचंबा वाटला. वेरूळच्या डोंगरासमोर पसरलेल्या माळावरील निसर्गाला एक व्यक्तित्व आहे, त्याच्याशी हितगुज करावं असं वाटतं; पण कैलास लेण्यांच्या अमरत्वाची आस वरचढ ठरते.

पण खरा निसर्ग पाहिला तो अतामीच्या डोंगरावरून. या डोंगरावर जपानी पाइन वृक्षांचं वक्र सौंदर्य आकारांचं एक आगळं विश्वच उभं करतं, पण नजर धावते ती समुद्राकडे. मात्र मधेच अडते — पायथ्याच्या उन्हाळ्यांनी. जपानात मला कोकणची सारखी आठवण व्हायची. आमच्या कोकणात उन्हाळ्यांभोवती आमच्या गद्य प्रकृतीनं 'रोमान्स' उभा केला नाही. (संगमेश्वरचा तुळशीचा रोमान्स देशावरच्या गडकऱ्यांनी तयार केला) पण जपानी लोकांनी आपल्या रोमांचविलासात उन्हाळ्यांना फार उबदार स्थान दिलं आहे. अतामीला वैध-अवैध मधुचंद्रासाठी येणाऱ्या जोडप्यांचा कार्यक्रम या उन्हाळ्यात सहस्नान केल्याखेरीज पुराच होत नाही. आणि तरी या उन्हाळ्याकडे वक्रदृष्टीनं कुणी पाहत नाही. आम्ही जरूर तसं पाहिलं असतं. कारण आपण शारीरिक विलासाकडे नेहेमीच चोरट्या वृत्तीनं पाहिलं आहे. जपानी लोक शारीरिक विलासांत जीवनोत्सवाची निरामय सांगता पाहणारे आहेत.

या आमच्या जन्मजात भारतीय वृत्तीमुळं असेल, अतामीच्या डोंगरावरून माझी आसुसलेली नजर फिरली ती समुद्राच्या विस्तारावर. मी जेव्हा रत्नागिरीच्या किल्ल्यावरून समुद्राकडे पाहिलं तेव्हा माझी नजर क्षितिजावरच्या एका जहाजावरून दूरदेशी गेली; पण इथं ती समुद्राच्या तिथल्या दर्शनातच चूर झाली. खरं म्हणजे ती समुद्राच्या तळाचा ठाव घेण्याचे मांडे बांधू लागली. माणूस डोंगरावर जाण्यासाठी उत्सुकतो, तसा समुद्राच्या तळाचा ठाव घेण्यासाठी उत्सुकतो का? बहुधा नाही. डोंगरावर आरोहण म्हणजे अनुभवाला आवाहन, पण समुद्राच्या तळाचा हव्यास म्हणजे अनुभवाचा अंतच. पण काही जपानी महिलांना हे मान्य नाही. त्या समुद्रमंथनाला उत्सुकच असतात. आपलं समुद्रमंथन म्हणजे चौदा रत्नं. त्या रत्नांत समाविष्ट नसलेलं रत्न शोधून काढण्यासाठी

या महिला समुद्रात बुड्या मारतात. हे रत्न म्हणजे मोती. ही मोत्यं काढणाऱ्या मोतिदार जपानी स्त्रियांचे फोटो मी पाहिलेले होते. आता अतामीच्या समुद्रावर मोतिदार अंगाच्या या जपानी स्त्रिया विहरत असलेल्या माझ्या स्वप्नाळू नजरेला दिसल्या.

अशी डोंगरावरून दिसलेली दर्शनं. एकेक दर्शन म्हणजे एकेक अंतःस्थ प्रत्यय — ज्यात गुंगून जावं, हरवून जावं, हरखून जावं, विस्मृतीचा पक्षी बनून विसावून जावं, असं दर्शन.

पण ते कायमचं असू शकत नाही. आपण डोंगरावर जाऊ शकतो. पण तिथं निरंतर मुक्काम करू शकत नाही. आणि करायचा असला, तर एखादी वसाहतच करावी लागेल. एकटयादुकटयाचं ते काम नव्हे.

बर्ट्रांड रसेलनी एका ठिकाणी म्हटलं आहे की, आपण सारी निसर्गाची लेकरं आहोत. निसर्गाच्या लयाशी संपर्क साधूनच आपण जगू शकतो. आपले बारीकसारीक, माणसानं वसवलेले, डोंगर सोडले तर डोंगरावर हा लय बिघडतो. दबतो. निमतो. बोथट बनतो. आल्प्स्–हिमालयासारख्या पर्वतांवर तर एकच ऋतू असतो. अशा भ्रष्ट लयीत मानवाचं जीवन टिकू शकत नाही. मानवाच्या रक्तातली लय या भ्रष्ट लयीशी संवाद साधू शकत नाही पृथ्वीच्या लयीशी संवाद साधून जगायचं असलं तर खाली उतरायलाच हवं.

## कोयलिया ना बोले डार

त्या दिवशी भर दुपारी भूमध्यसमुद्राचा नीलवर्णीय पृष्ठभाग आणि वरचं निळं आकाश यांचं क्षितिजमीलन पाहिलं, आणि माझ्या नजरेसमोर एक तरल काव्य जन्माला आलं.

... उघड्यावर वाळत घातलेलं ते तलम रेशमी वस्त्र मंदमंद वायुलहरींवर तरंगताना पाहिलं, आणि त्याच्या अंगावर एक आलापी लहरली.

... नैनितालच्या तळ्याच्या आत्ममुग्ध पाण्यावर धुक्याचं वस्त्र मधूनच दाटत आणि मधूनच विरळ होत अंगविक्षेप करीत होतं आणि त्या कोमलमुलायम हवेत एक स्वप्न उमललं.

... हिमालयात कौसानीच्या बर्फाच्छादित शिखरावर मेघांनी आपली मायावी करामत केली, आणि त्या शिखराचं हिमशुभ्र सौंदर्य निरखण्यात हरवलेल्या माझ्या नजरेशी नजरबंदीचा खेळ सुरू केला.

... ऱ्होड्स् आयलंडच्या एका खडकाळ कोपऱ्यात ग्रीक समुद्राची मंदमदीर लाट किनाऱ्याशी शिवाशिवीचा खेळ खेळत होती आणि मला आत्मतुष्ट मातेच्या लहानग्या कन्येशी चाललेल्या चुंबनखेळाची आठवण झाली. आणि तोच समुद्र दुपारच्या उन्हात एका विस्तारलेल्या किनाऱ्यावर लोळण घेत होता आणि मला शेलीच्या Like light dissolved in star-showers ' या ओळीची आठवण झाली.

... एक रूपसुंदरी आपला स्वच्छसुंदर सुस्नात केशकलाप वाऱ्याच्या

स्वच्छंद संचारावर सोडून आपल्या तंद्र मनाशी विश्रब्ध विहार करीत असलेली पाहिली आणि मला —

यत्र स्त्रीणां हरति सुरतग्लानिमङ्गानुकूल:
शिप्रावात: प्रियतम इव प्रार्थनाचाटुकार:

अशा कालिदासकल्पित अवंतीची आठवण झाली.

... पिंपळाच्या नवपालवीवर तेजाळणारा सूर्यप्रकाश आसमन्तात फाकताना पहिला आणि पंचमहाभूतांच्या चैतन्यमीलनाचा साक्षात्कार झाला.

... श्रावणात पारिजातकाच्या झाडाखाली ओल्या जमिनीवर फुलं वेचीत असताना नजर एका टपोऱ्या फुलावर पडली आणि ते उचलायला हात पुढं करणार तोच वरच्या फांदीवरून एक जलार्द्र फूल नेमकं त्या फुलावर पडलं.

— असे एक ना अनेक प्रसंग. अनेक अनुभव. संवेदनेचे अनेक संस्कार. पण त्या वेळी खरोखर काय वाटलं ते शब्दांत कधीच पकडता आलं नाही. किशोरी आमोणकरांच्या गायनानं, त्यांच्या स्वरविभ्रमानं माझ्या मनाचे असेच विभ्रम होतात; पण त्यांची पक्की प्रकृती मला कधीच कळली नाही. कळणारही नाही. अर्थात मला संगीताचं शास्त्र समजत नाही. पण शास्त्राचं इथं काम नाही. त्या गाण्यानं माझं हृदय हलतं, हेलावतं. पण म्हणजे नक्की काय होतं ते शब्दांत कधीच मांडता येत नाही. येणार नाही. हे मनोमन जाणवलेलं असतं. म्हणून प्रयत्नही करीत नाही. पण एक गोष्ट मनात भिनलेली असते. किशोरीच्या संगीताचा अनुभव अपूप असतो. अनोखा असतो. त्याचा आस्वाद घ्यायचा नि गप्प व्हायचं. त्याची चव चाखायची नि चूप राहायचं. त्यावर शब्दांचा मारा — छे: ! कल्पनाच भावत नाही.

त्या दिवशीचे किशोरीबाईंचे ते बागेश्रीचे आलाप. समोर श्रोते दाटीवाटीने बसलेले. अधुऱ्या वृत्तीनं. रुष्ट मनानं. अस्वस्थ चित्तानं. मध्यांतरापूर्वीची मैफल पार फसली होती. श्यामकल्याणचा श्यामवारू प्रारंभीच अडला होता. अकारण अडला होता. उशिरानं सुरू झालेली बैठक मुरगुसली

होती. श्रोते हिरमुसले होते. पण अपेक्षा हरवली नव्हती. अखेरीस ती किशोरी होती. संगीताची अप्सरा. गानकलेची उज्ज्वला. अभिजात अभिसारिकेप्रमाणं ती वादळवाऱ्यातूनही वाट काढीत येईल. आणि झालं तसंच! पण आता ही संगीताची अभिसारिका श्रोत्यांसाठी आलेली नव्हती. तिचं समर्पण इतरांसाठी नव्हतं. ते हृदयस्था गानदेवतेला होतं. अंतरंगात अधिष्ठित झालेल्या इष्टदेवतेला होतं. बागेश्रीचे स्वर मुखातून बाहेर स्रवू लागले, पण त्यांची दृष्टी आत होती. त्यांची आरती अंतर्मुख होती. बागेश्री स्वतःशीच गुणगुणू लागली. स्वतःशीच मश्गूल झाली, श्रोत्यांच्या पाशातून मुक्त झाली. स्वतःची झाली. स्वतंत्र झाली. सायुज्यतेची समाधी अनभवू लागली. मध्यांतरापूर्वी किशोरीबाई कसल्यातरी दडपणाखाली गात होत्या का ? समोर महाराज बसले होते, त्यांची नजर कातर करीत होती का ? एक गानगंधर्व बसले होते. त्यांच्या उपस्थितीत तपश्चर्या अवघडली का ? पण मनस्विनींच्या बाबतीत हे शक्य नाही. मग कसलं दडपण ? कलावंताच्या अंतर्लहरीचं ? कलावंताला ऐन वेळी आक्रसण्याचा जणू हक्कच असतो त्याचं ?

कसंही असो. त्याची आता आठवण कशाला ? वृत्ती आता मुक्त झाली. स्मृती मुग्ध झाली. तंद्री रत झाली. कला आत्मतुष्ट बनली, बागेश्री स्वतःतच हरवून गेली. हरखून गेली. आत्मचिंतनात निमग्न झाली. खुलली, फुलली, रमली. श्रोतेही रमले. त्यांची आत्मसमाधी लागली. तंद्री लागली. बागेश्रीशी सुखसंवाद सुरू झाला, विश्रब्धालाप सुरू झाला. मनोमिलाफ जमला. एक सार्वत्रिक समाधीच तेथं अवतरली. सार्वत्रिक सायुज्यता साकारली. किशोरी आता स्वतःची उरली नाही. श्रोत्यांचीही नाही. कारण श्रोतेच स्वतःचे उरले नाहीत. ते एका अलौकिक अनुभवाचे अंतःसाक्षीदार बनले, एका अकल्पित वातावरणात विलीन झाले.

अशा वातावरणाची आठवण होते नि चित्त हरवतं. त्याचा पुनःप्रत्यय येतो नि भान हरपून जातं. अधिक काही करता येत नाही. त्या गाण्याचं विश्लेषण करता येत नाही. स्वरांची समीकरणं मांडता येत नाहीत. तानांचा तोल जोखता येत नाही. आलापाचा आशय गवसत नाही. त्यासाठी मी शब्द शोधतो नि मला टेनिसनचे ते शब्दच तेवढे आठवतात :

... १२ ...

‘There is sweet music here that softer falls
Than petals from blown roses on the grass’

पण त्यांचा काही उपयोग नाही. इथं फक्त मृदु-मुलायम असंच काही आहे असं नाही. इथं मार्दवावर तेजाचा शिडकावा आहे. स्वरांच्या रेशमात चैतन्याची कलाबूत आहे. इथं साक्षात्कार होतो की, ती कला खरी, की जी तुमच्यातल्या समीक्षकाला स्तब्ध करते. कलेचा तो प्रत्यय सच्चा, की जो तुम्हाला अनुभवाच्या लहरीवरच तरंगत ठेवतो. तो अनुभव खरा की जो निव्वळ मुग्ध करतो. किशोरीबाईंच्या गाण्यानं माझं असं अनेकवार झालं आहे. अलीकडे अन्जायनाच्या आजारानं बिछान्यावर पडून होतो. छातीतील कळांची छिन्नी अनुभवत होतो. डॉ. वसंत पैंच्या तज्ज्ञ देखरेखीखाली होतो. डॉक्टर दुःख कमी करीत होते. पण येथं ताकद हवी होती ती दुःख सहन करण्याची. दुःखाशी दोस्ती करण्याची. हे रहस्य अरुणाला माहीत होतं. तिनं आपला टेपरेकॉर्डर आणि सोबत किशोरींच्या आलापांनी पल्लवित झालेली टेप आणून ठेवली. ती टेप त्यांच्या स्वर-विभ्रमांनी पुलकित झालेली होती. त्यांच्या गानलहरींनी आंदोलित झालेली होती. पुंडलिकांनी किशोरींच्या गाण्यानं गुंग झालेल्या आणखी टेप्स आणल्या आणि माझ्या विद्ध आसमंतात वेदनांना स्वतःचाच विसर पाडणारी किमया विहरू लागली. विलसू लागली. विरंगळू लागली. मग पुन्हा एकवार प्रत्यय आला — पूर्वी अनेकवार आलेला. बालगंधर्वांनी संगीताचा जो अनुभव मला दिला तसाच अनुभव किशोरीबाईंनी दिलेला आहे — अनोखा, अतर्क्य.

आणि तरी आजचा अनुभव काही निराळाच होता. रात्री अकराचा सुमार. अकराला दहा मिनिटं होती. सहज हाताला चाळा म्हणून रेडिओ लावला आणि बोल बाहेर आले :

‘कोयलिया ना बोले डार …’

हा अनुभव नवीन होता. चैतन्याचा एक नवा अनोखा कवडसा होता. चैतन्याची एक नवी लकेर होती. स्वराचं एक नवं रूप धारण करून साक्षात चैतन्यच तेथं अवतरलं होतं. एखाद्या स्वच्छनितळ जलाशयात

सोनेरी मासोळ्यांनी सूर धरून उसळी घ्यावी आणि आकाशातली वीज पाण्याच्या अंतरंगात उमटावी तसं झालं. त्या स्वरविभ्रमात आर्तता होती; पण ती भावनार्तता नव्हती. आच होती; पण ती विरहार्ताची आच नव्हती. ओढ होती, पण ती विद्ध अंतःकरणाची ओढ नव्हती. कवनाच्या नायिकेचा जीव 'तडपत' होता, कोकिळेचा मधुर आलाप तिच्या हृदयात तलवारीच्या पात्यासारखा घुसत होता, पण या स्वरविलासानं त्या पात्याचं तेज तेवढंच प्राशन केलं होतं. त्याची आर्तता ही निखळ चैतन्याची आर्तता होती. शुद्ध चैतन्यानं न्हालेली आर्तता ती होती. ज्या चैतन्यामुळं भूगर्भातली पाण्याची धार खडक फोडून आकाशात उसळते, ज्या चैतन्यामुळं ज्वालामुखीची ज्वाला शंकराचं तेज धारण करून पावन होते, ज्या चैतन्याच्या तांडवामुळं धरणीलाही कंप भरतो ते चैतन्य इथं नादमाधुर्याचं विलोल रूप धारण करून किशोरीच्या मुखातून स्रवत होतं. हा अनुभव नवीन होता. संज्ञेच्या शुद्ध संकल्पाला साद घालणारा होता. तेजाच्या तप्त तारेनं संज्ञेची नजर बांधून ठेवणारा होता. मन एका तंद्रीत शिरलं. अर्धमग्न, अर्धदीप्त अवस्थेत स्वतःशीच रत झालं. त्या आर्त अस्वस्थ अवस्थेच्या अवसरात स्मृतीचा दयाळ पक्षी आपली इवलाली शेपटी उभारून इकडेतिकडे नाचू लागला. निवृत्त नजरेसमोर दोनचार धुकट धुरकट दृश्यांना धारदार कळा येऊ लागली. ...

... मी एका धबधब्यासमोर उभा. पाण्याचा शीघ्र प्रवाह खालच्या दरडीवर अखंड उडी घेत होता. तुषार उडत होते. त्यांच्या फुलोऱ्यावर सूर्याचे सायंकिरण इंद्रफुलांचा बगिचा निर्माण करीत होते. इतक्यात एक छोटासा पक्षी निळ्या, शेंदरी, सोनेरी, अंजिरी, पारव्या रंगांची माया अंगावर धारण करून त्या फुलोऱ्यात शिरला, तोच त्या प्रवाहातून काही तरी चकचकीत आलं नि तो पक्षी दचकून पळाला.

... एकदा लहानपणी कोकणात सराईच्या हिरव्यातुष्ट माळावर सोनावळीच्या ताटव्यांचा, वाऱ्यावर विहरणारा लहरनाच निरखीत होतो, तोच माझ्या पायाजवळून एक हिरवागार नाग सर्कन गेला नि त्या सोनावळीच्या ताटव्यात लुप्त झाला.

... एकदा (बहुधा स्वप्नात) मी एक रंगदार जलधारांचं कारंजं

पाहत उभा होतो. रंगीत धारांना रंगरंगीन धुमारे फुटत होते. रंगांचं एक तलमतरल जाळंच उमलत होतं. त्यांची नवनवी वीण उमलत होती. इतक्यात त्या कारंज्याच्या मुखातून एक अग्निबाण उडाला आणि आकाशात जाऊन तेजाळला.

... एकदा खूप पूर्वी, एक मोटारसायकल मला घासून, घसटून, झपाटून गेली आणि लगेच ती चालवणाऱ्या तरुणीनं माझ्याकडे बघून एक निर्भर, नि:संग, मिस्किल, बेछूट हास्य केलं.

—या साऱ्या दृश्यांत जी एक बेगुमान तिरीप होती तिनं मला खेचलंच. मी उठलोच. काय करीत होतो याचं भानच उरलं नाही. माझी नजर खिडकीबाहेर गेली. बाहेर झाडाचा काळा विस्तार होता. त्याच्यावर रुपेरी कलाबतूची फुलोरी पखरण होती. नजर तिच्याशी खेळू लागली. दुसऱ्या क्षणी माझे पाय दरवाज्याबाहेर जिन्यापाशी होते. जिन्याच्या पायऱ्या चंद्रकिरणांनी फुललेल्या. चंदेरी नक्षीनं नटलेल्या. चांदण्यात नाहणाऱ्या जमिनीकडे खेचणाऱ्या.

नंतरच्या क्षणी मी खिडकीबाहेरच्या झाडाखाली उभा. खाली दाणेदार जमिनीवर चंद्रफुलांचा मखमली गालिचा पसरला होता. नजर त्या चंद्रफुलांच्या पाकळ्या मोजू लागली. फुलांचा आकार रेखू लागली. रेखता-रेखता हरवली. त्या प्रकाशपुष्पांच्या पसाऱ्यात स्वत:ला विसरली. स्मृत-विस्मृताच्या सीमारेषेवर स्तब्ध झाली. हळूच वर वळली. विस्ताराच्या नक्षीदार पोकळीतून आकाशाचा वेध घेऊ लागली. चांदण्याची चांदी पिऊन मस्त झालेलं आकाश स्वत:शीच चूर होतं. त्याच्या चंदेरी धारा मात्र विस्तारातून खाली येऊन चंद्रफुलांच्या कडा कोरू लागल्या. आणि मनावर एक पीस फिरू लागलं. हलकं, फुलकं, झुळकं. मन मग्न झालं, नितळ मुलायम मुग्धतेत हरवलं. केव्हाशी त्याला द ला मेअरच्या त्या ओळीनं जाग आली —

> " Stood thronging the faint moonbeams on the
> dark stair. "

चांदण्यानं फुललेलं जंगल. त्यात ते एकुलतं एक घर. आतूनबाहेरून शांततेनं दाटलेलं. भारलेलं. रात्र उलटून गेलेली. इतक्यात घोड्यांच्या टपोर टापांनी

ती शांतता दचकते. घरासमोर उभ्या राहिलेल्या घोड्यावरून एक घोडेस्वार उतरतो. घराकडे जातो आणि दार ठोठावतो. पण कोणी ओ देत नाही व दरवाजा उघडीत नाही. त्या ठोठावण्यानं तेथली शांता दाटतेच. पण शेजारच्या हिरवळीवर चरणाऱ्या घोड्याच्या तोंडच्या लयदार आवाजानं थोडीशी कंप पावते. तो घोडेस्वार थोडा वेळ तसाच वाट पहात राहतो. स्तब्ध उभा रहातो. नंतर तो पुन्हा ठोठावतो. तेव्हा शेजारच्या झाडावरचा एक पक्षी झपकन उडतो आणि दुसऱ्या एका विस्तारात गडप होतो. आता तो घोडेस्वार ओरडतो, " आत कोणी आहे काय ? " पण कोणीच ' ओ ' देत नाही. कोणाचीच पावलं वाजत नाहीत. किंवा शेजारच्या वनवेलींनी शृंगारलेल्या खिडकीतून कोणीच त्याच्या गोंधळलेल्या नजरेत पहात नाही. तो तसाच स्तब्ध रहातो. सभोवार शांतता नांदते. निखळ शांतता. काही खुट् होत नाही. काही हालचाल होत नाही. फक्त तेथल्या हॉलमधं एक रिक्तगूढ, अर्ध–अंधारलेला जिना असतो, त्याच्या काळोख्या पायऱ्यांवर चंद्रकिरणं उभी असतात; दाटीवाटीनं —

Only a host of phantom listeners
That dwelt in the lone house then
Stood listening in the quiet of the moonlight
To that voice from the world of men :
Stood thronging the faint moonbeams on the dark stair,
That goes down to the empty hall,
Hearkening in an air stirr'd and shaken
By the lonely Traveller's call.

ती चंद्रकिरणंच काय ती त्याच्याकडे कुतूहलानं पहात होती. त्यांचं निःशब्द अस्तित्व त्याच्या नजरेस पडलं. त्याची चकित दृष्टी त्यांच्यावर खिळली. अनिमिष, अबोध, मुग्ध, भारलेली. त्यांचं ते अस्तित्व त्याला भावलं. ते अतर्क्य अस्तित्व, उत्सुक अस्तित्व, प्रकाशलेलं अस्तित्व. एका विबोध विश्वाच्या त्या गुप्तगूढ दूतांशी त्याचं मूक संभाषण सुरू होतं आणि

त्याच्या अंतरंगात एक कळ फिरते. तो पुन्हा एकदा दरवाजा ठोठावतो आणि त्यांना म्हणतो,

'Tell them, I came, that no one answer'd,
That I kept my word.'

त्याच्या त्या आर्त–आर्जवी आवाजानं ती किरणं थरथरतात, शहारतात, आणि कान टवकारून ऐकू लागतात — आणि त्यांच्या विश्रब्ध कानात शिरतो

त्याचा रिकबीवरचा पाय
दगडावरचा घोड्याचा नाल
हळूच परतलेली सौम्यशीतल शांतता
आणि दूरच्या अंतरात विराम पावणाऱ्या टापा.

मलाही त्या ऐकू आल्या. मीही तो गेला त्या दिशेनं पाहू लागलो. अंतराचा वेध घेऊ लागलो —

समोवार काहीतरी गोड, गहन, गूढ, मखमली पसरलं होतं. हिमशुभ्र, धवलधूसर — गाढ निद्रेत निमग्न असलेलं. वरून त्यावर रुपेरी धारांचा वर्षाव होत होता – आणि धरणीवरच्या रुपेरी मायेत विरून जात होता. चोहोकडे चांदण्याचं चित्तचकोर लावण्य. तरल लावण्य. त्या दुधाळ दृश्यावर दृष्टी ठरत नव्हती. तिच्यासमोर पांढऱ्या पारव्यांची फडफड होती. फेनपुष्पांचं प्रसाधन होतं. स्फटिकांची पखरण होती, मी वर पाहिलं. आकाशात चंद्र विलसत होता. त्याचं दर्शन नुसतंच लावण्यमधुर नव्हतं. ते समुत्सुक होतं. सोत्कंठ होतं. संदेशाचं त्यात प्रस्फुरण होतं. मी त्याच्याकडं नुसता पाहतच राहिलो. पाहतच राहिलो. आणि त्याच्याशी एक अबोध, अबोल, संवादच सुरू झाला. चंद्र सांगत होता :

'तुझं पाऊल माझ्या अंगावर पडलं.
तुझं विज्ञान माझ्या अंगावर उतरलं.
पण मी आहे तोच आहे.
माझं गूढ विरलं नाही — विरणार नाही.

माझं रहस्य संपलं नाही — संपणार नाही.
माझ्या मायेचा वर्षाव थांबला नाही — थांबणार नाही.
कारण —
तुझ्या मनाचीच मी हाक आहे.
तुझ्या संज्ञेचीच मी साक्ष आहे.
तुझ्याच मूलस्रोताचा मी स्पर्श आहे.
मी आहे कारण तू आहेस.
तू आहेस म्हणून मी आहे.

किशोरींच्या ‘ कोयलिया ना बोले’नं माझ्या मूलस्रोताला असाच स्पर्श केला. या ठुमरीच्या स्वरांचं अस्तित्व माझ्या संज्ञेशी असंच एकरूप झालं. माझ्या चैतन्याशी एकरूप झालं. त्या ठुमरीनं माझ्या भावनेला स्पर्श केला नाही, माझ्या चैतन्याला स्पर्श केला.

‘ सूनी पडी रे उमर पियाबिन
बरखा ऋतु बैरी हमार...’

— असे किशोरी आळवत होत्या. पण त्यातली वेदना त्यांच्या स्वरात नव्हती. त्यातल्या व्यथेनं त्यांचा स्वर विद्ध झाला नव्हता. त्या स्वराचं तेज हे त्या वेदनेचं तेज नव्हतं. वेदनेला तेज नसतंच. वेदनेला फक्त वेदना असते. तेज असतं ते तिच्या उगमाशी असलेल्या चैतन्याला. हे तेज भावनेनं लिप्त नसतं. भावना जन्मते व्यवहाराच्या जाणिवेत. व्यवहाराच्या सुख-दुःखात. व्यवहाराच्या हर्षखेदांत, व्यवहाराच्या ओढाताणीत. व्यवहाराच्या पेचप्रसंगांत. भावनेवर जखमा असतात त्या व्यवहाराच्या. भावनेवर रोमांच असतात ते व्यवहाराचे. भावनेचं विश्व वेढलेलं असतं ते व्यवहारानं. भावना म्हणजे संसारसागरावरचा तरंग. तवंग. संसारसागराची भरटीओहटी. भावना म्हणजे जीवनतृष्णेच्या पेल्यावरचा फेस. भावना म्हणजे संसारी जीवनाच्या जागत्या चितेवरची आग.

ही भावना कोकिळेला आपले आलाप आवरते घेण्यास सांगत होती. ही भावनाच त्या ‘ तडपत्या ’ जिवाची तडफड होती. पियाबिन सुन्न आणि शून्य झालेल्या जीवनात तिचा जन्म झालेला होता कोकिळेला गप्प

बसायला सांगणाऱ्या ऋतुमतीला आपल्या व्यथेचं कारण माहीत होतं. ' बरखा ऋतु बैरी हमार ' का, हे ती पूर्ण जाणून होती. पण कालिदासाच्या विरही यक्षाची कल्पनारम्यता तिजपाशी नव्हती. तिची भावना अधुरी होती. तितिक्षेचं तीर्थ तिनं प्राशन केलेलं नव्हतं. म्हणून यक्षाला ' धूमज्योतिः सलिलमरुतां संनिपातः ' असा भटक्या मेघ सखा वाटला, तर या विरहिणीला स्वतःला स्वरांच्या पंखावर तोलणारी चिरसखी वैरीण वाटली. पण किशोरींची कला या वैराच्या पलीकडे गेली.

किशोरींच्या ठुमरीत आर्तता होती, पण ती विशुद्ध होती. तिचे बोल त्यांच्या गळ्यातून वैर घेऊन येत नाहीत; कल्पनारम्यतेनं थरारून येतात. भावनांच्या नव्हे, तर चैतन्याच्या स्पर्शानं पुलकित होऊन येतात. त्या बोलांतली सारी व्यथा चैतन्याच्या वेदीवर ज्वालास्नान करून येते. चैतन्याच्या पुष्करिणीत न्हाऊन येते. मग ती माझ्या भावनेला भिडत नाही तर शुद्ध संज्ञेला भिडते. संज्ञेच्या आदितत्त्वाला स्पर्श करते. मग मी एकाच वेळी स्तब्ध आणि अस्वस्थ होतो.

या एकाच वेळी स्तब्ध आणि अस्वस्थ करणाऱ्या यातुचं रहस्य मला माहीत नाही. जीवनाच्या मूलतत्त्वाला स्पर्श करणाऱ्या या किमयेचं रहस्य मला माहीत नाही. माहीत नाही.

असे अनेक अनुभव आहेत. त्यांचं रहस्य मला माहीत नाही. त्यांचा अर्थ मला समजत नाही. त्यांचं केन्द्र आणि परीघ यांमधोल नातं मला कळत नाही. अशा अनुभवांचा गाभा माझ्या प्रज्ञेच्या प्राङ्गणात शिरू शकत नाही.

असे अनेक अनुभव —

... मी कुठंतरी अगदी नव्या अनोळख्या ठिकाणी जातो, आणि वाटतं : आपण पूर्वी येथं आलो होतो, नक्की आलो होतो. या चमत्काराचं गूढ मला उकलत नाही.

... मी एखाद्या ठिकाणी येतो आणि तिथं माझ्या जीवनाचं सूत्रच हरवतं, त्याचे संदर्भच गळून पडतात, आणि अस्तित्व अलिप्त बनतं — याचा थांगपत्ता मला लागत नाही.

... एखाद्या वेळी माझ्याभोवती एकलेपणाच्या आगीच्या ज्वाळा पसरतात, आणि त्या वणव्यात एक अपूर्व तृप्ती दाटते — याची संगती मला लावता येत नाही.

... एखाद्या वेळी एखाद्या शांत स्तब्ध जलाशयात मी डोकावून पहातो आणि दिसणारं प्रतिबिंब कोणातरी तिऱ्हाइताचंच वाटतं — यातलं गूढ मला उलगडत नाही.

... एखाद्या वेळी एखाद्या तळ्यातल्या चंद्राच्या प्रतिबिंबाचं नातं मी त्या तळ्याच्या तळाशी असलेल्या जलदेवतेशी जोडतो, आणि माझ्या तोंडून एकदम प्रार्थनेचे मंत्र स्रवू लागतात -- या साक्षात्काराचा शोध मला घेता येत नाही.

... एखाद्या चर्चमध्ये मी जातो, तेथें तेवणाऱ्या मेणबत्त्यांचा आकृतिबंध पहातो आणि त्या आकृतिबंधात वितळलेली माझी नास्तिकता मी तिथल्या क्रूसात शोधू लागतो. पण मी असं का करतो ते मला बिलकूल कळत नाही.

... एकदा समुद्रावरून दूर जात असलेल्या जहाजावर माझी नजर खिळली. जहाजाबरोबर जाऊ लागली. जहाज लहान होत होत नाहीसं झालं. पण नजर ढळली नाही. जहाजाच्या ठिपक्याचं शून्य झालं. नजर त्या शून्यात शिरली. शून्यात विलीन झाली. सारी संज्ञाच विलीन झाली. भानावर आलो तेव्हा मी, जहाजाच्या डोलकाठीवरील पक्ष्याच्या पंखावरून माझ्या कोकणातील घराच्या अंगणात उतरत होतो. कल्पना अशी का भरकटली ते कधीच कळलं नाही.

...एकदा मी सुर्यकिरणावर आरूढ होऊन अंतराळात गेलो. अनंतात विलीन झालो... आणि स्वत:त परतलो तेव्हा ध्यानात आलं की मी रुमालानं चेहेऱ्यावरचा घाम पुशीत आहे — कल्पनाशक्तीनं अशी पलट का खाल्ली ते कधीच ध्यानात आलं नाही.

— असे अनेक अनुभव. ते गूढ असतात, निगूढ असतात. अर्थाच्या सीमारेषेवर भटकत असतात. प्रकाशाच्या कडांवर काळोख पांघरून वावरतात. नादांच्या लहरींवर नुसते आंदोळतात. जाणिवेच्या कड्यावरून

नेणिवेच्या दरीत डोकावतात. तरी ते अनुभव खरे असतात आणि अंतरंगाला भिडतात.

कलेचा अनुभव हा असाच एक अतर्क्य अनुभव असतो. अनोखा· पण आपल्या संज्ञेला एक चिरपरिचित साद घालणारा. त्याची पूर्वावस्था शोधता येते. उत्तरावस्था सांगता येते. पण त्याच्या साक्षात स्वरूपाबद्दल मूक व्हावं लागतं. किशोरींची 'कोयलिया ना बोले डार' मला असंच मूक करते. मी तिचे स्वर श्रवणात साठवतो. स्मृतीत जतन करतो. अंत:-करणात ओततो. रोमरोमात भिनवतो. तिचं रूप डोळ्यांनी देखण्याचा प्रयत्न करतो. तिचा गंध श्वसून घेतो. तिची चव चाखतो. तिच्या गाभ्यात शिरण्याचा यत्न करतो. तिच्या स्वरविभ्रमांना स्पर्श करण्यासाठी जीव पाखडतो.

पण ते काही खरं नाही. तसं काही होणार नाही. या भैरवीचा रंगरूपगंधस्पर्श मला अनोखाच रहाणार. दुरून खुणावणार. भुरळ पाडणार. पण अखेरीस तो आँखमिचौलीचाच खेळ ठरणार. माझ्या हातात एकच आहे. मी ती ऐकेन. स्तब्ध होईन. अस्वस्थ होईन. आणि एक प्रकारची अबोध आर्तता माझी संज्ञा व्यापून टाकील. तेवढं माझं भाग्य असलं तर आज आला तसा एखादा अतर्क्यसुंदर अनुभव पुन्हा येईल. तो येवो न येवो, एक आश्वासन हमखास आहे : कसलं तरी विलक्षण साफल्य अंतरंगात दाटेल. परिपूर्तीचा प्रत्यय येईल. एका तरल भावविश्वाशी नाजुक नातं जुळेल. किशोरींच्या गाण्यानं नेहेमीच जुळतं. तेवढं मला पुरे आहे.

२२३५८
निबंध
२५०५
(स्थळ प्रत)
REFBK-0022379

विश्वमोहिनीचे
नवे ललित पुस्तक

# कलावंतांचे आनंदपर्यटन

लेखक : ग. दि. माडगूळकर

मूल्य : १० रुपये

गदिमांच्या राजस भाषेतून
उतरलेले प्रत्ययकारी प्रवासानुभव

REFBK-0022379
REFBK-0022379

विश्वमोहिनी,
६२/१२, कर्वे रोड, पुणे ४.



# स्वरांच्या बनात

संगीतविषयक लेख । मूल्य : १२ रु.

लेखक : अरविंद गजेंद्रगडकर

प्रस्तावना : डॉ. वसंतराव देशपांडे

विश्वमोहिनी

६२/१२, कर्वे रोड, पुणे ४११००४